सप्तत्यब्दीमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेला

पं० रंगाचार्य रड्डी

यांचा

लेखसंग्रह

पुणें

श्रावण व. ११ शके १८६१

सप्तत्यब्दीमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेला

पं. रंगाचार्य रड्डी

यांचा

लेखसंग्रह

पुणें

श्रावण व. ११ शके १८६२

प्रकाशक —
वासुदेव गोपाळ परांजपे,
चिटणीस, रद्दी-सत्कार-मंडळ.
फर्ग्युसन कॉलेज, पुणें ४.

प्रती ३००
किं. रु. १-८.

मुद्रक —
लक्ष्मण नारायण चापेकर.
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव पेठ, पुणें २.

विहंगमावलोकन

१. पं. रंगाचार्यांचें जीवनचरित्र आणि वाङ्मयसेवा

सुमारें ३०० वर्षांपूर्वी रड्डी ह्यांचे पूर्वज मद्रासेकडील आपलें निवासस्थान सोडून महाराष्ट्रांत आले. त्यांना पुढें आदिलशाहींत कोरेगांव तालुक्यांतील पिंपरी गांवांतील कांहीं जमिनीसंबंधीं सनदा मिळाल्या.

रड्डींचें घराणें पंडिताचें असून व्याकरण व धर्मशास्त्र यांमधें त्यांचा लौकिक फार असल्यानें याच शास्त्रांतील विद्यार्थी बहुतेक त्यांच्याकडे असत. वर उल्लेखिलेल्या पिंपरी गांवांतील जमिनींच्या सनदाही त्या त्या शास्त्रांतील प्रावीण्यानें व निरपेक्षपणें चालविलेल्या अध्यापनकार्यानें संतुष्ट होऊन राज्यकर्त्यांनीं त्या वेळीं दिलेल्या आहेत.

पुढें मराठेशाहींतही छत्रपति थोरले शाहूमहाराज यांनीं या घराण्यांतील पुरुषांची विद्वत्ता व धर्मनिष्ठा पाहून त्यांचा योगक्षेम अविच्छिन्न चालावा व त्यांच्या अध्ययन-अध्यापनाच्या कार्यांत निश्चितता रहावी, तसेंच त्यांना स्नानसंध्या करून राज्याचें हित चिंतण्यास स्वास्थ्य लाभावें म्हणून वाई तालुक्यांतील मुगांव हा गांव इनाम दिला व कऱ्हाड व वाई येथेंहि कांहीं जमिनी दिल्या. मध्वसंप्रदायी उत्तरादि मठाच्या पीठाधिष्ठित आचार्यांनीं वाई क्षेत्रांतील मठाधिकार त्यांना दिले. रड्डीघराणें माध्वसांप्रदायी असल्यानें साहजिकच माध्वसांप्रदायी आचार्यांनीं त्यांना मठाधिकारी नेमिलें ह्यांत विशेष कांहीं नाहीं असें कोणी म्हणेल, पण अद्वैत संप्रदायाचे श्रीजद्गुरु शंकराचार्य, मठ संस्थान संकेश्वर, ह्यांनींहि त्यांना वाई क्षेत्रांतील आपल्या मठाचे धर्माधिकार दिले हें विशेष नाहीं असें कोण म्हणेल ?

अशा कीर्तिमान् घराण्यांत वे. शा. सं. रंगाचार्य ह्यांचा जन्म झाला. यांचे वडील बाळकृष्णाचार्य. त्यांचें अध्ययन पंडित सिद्धेश्वरशास्त्री द्रविड व सातारचे प्रसिद्ध पंडितप्रवर श्री. राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर यांचेकडे झालें. बाळकृष्णाचार्य मोठे विद्वान् होते. वाईतील विद्वान मंडळींत त्या वेळीं हेच प्रमुख गणले जात असत. व्याकरणशास्त्र व धर्मशास्त्र या शास्त्रांतील वादग्रस्त प्रश्नांचे निर्णय यांचेच द्वारा होत असत. रड्डी यांच्या घरच्या संग्रहांत त्यांनीं दिलेले असे जुने निर्णय अद्यापहि पुष्कळ आहेत. पंडितवर्य बाळकृष्णाचार्य ह्यांचा ग्वाल्हेर-लष्कर येथील वैयाकरण-केसरी पं रामाचार्य गजेंद्रगडकर ह्यांच्या कन्येशीं झाला. याप्रमाणें पं. रंगाचार्य

रद्दी ह्यांचें मातृपितृ-घराणें विद्वानांचें असल्यानें सातारा येथील पंडित गजेंद्रगडकर व कोल्हापूर येथील श्रीमंत राजोपाध्ये ह्यांच्या घराण्याशीं त्यांचे सारखे संबंध व ऋणानुबंध चालत आले आहेत.

पंडितप्रवर बाळकृष्णाचार्य व मातोश्री सौ. लक्ष्मीबाई यांच्या पोटीं पं. रंगाचार्य यांचा जन्म शके १७९१ श्रावण वा. १० दिवशीं झाला. पं. रंगाचार्यांचें बाळपण आजोळीं ग्वाल्हेर येथेंच गेलें. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत ते तेथेंच होते. नंतर तेथून ते वाईस रहावयास आले. रंगाचार्यांचा स्वभाव बाळपणापासून फार हूड असे. अभ्यासाकडे कांहींहि लक्ष्य द्यावयाचें नाहीं. त्यांना पोहण्याचा फार नाद होता. ह्या नादामुळें त्यांनीं वारंवार आपला जीव धोक्यांत घातला आहे. कऱ्हाड येथें भर पावसाळ्यांत कृष्णानदी महापुरानें तुडुंब भरली असतांना रंगाचार्यांनीं त्या अथांग पाण्यांत पोहण्यास उडी टाकली. तसेंच काशी येथें बिंदुमाधवाचे घाटावरून १०० पायऱ्यांवरून प्रवाहांत उडी घेतली होती. अशा प्रकारें त्यांनीं लहानपणीं वारंवार आपला हूडपणा व्यक्त केला आहे. ह्या त्यांच्या हूडपणामुळें त्यांना झालेल्या जखमेची खूण त्यांच्या मस्तकावर अद्याप दिसत आहे. झोपाळ्यावरील अशाच त्यांच्या दांडगाईमुळें त्यांच्या हातांत कडी घुसून मोठी जखम झाली होती, व त्यामुळें हात निकामी होतो कीं काय अशी धास्ती उत्पन्न झाली होती.

आचार्यांचीं भावंडें—दोन बहिणी व एक बंधु—हीं लहानपणींच निवर्तलीं. त्यामुळें आचार्यांवर त्यांच्या वडिलांचा व मातोश्रींचा जीव फार जडला. वाईस आल्यावर कांहीं वर्षांनीं म्हणजे आचार्यांच्या वयाच्या १४ व्या वर्षी आचार्यांना मातृवियोग झाला. मरणापूर्वी एक वर्षच आचार्यांच्या मातोश्रींनीं सुनमुख पाहिलें.

आचार्यांच्या खऱ्या शिक्षणास १२ व्या वर्षीच प्रारंभ झाला. मराठी चार इयत्ता झाल्यावर घरीं वडिलांच्या जवळच आवश्यक तितका संस्कृत भाषेचा काव्यव्युत्पत्तीच्या द्वारा परिचय करून घेऊन त्यांनीं सिद्धान्तकौमुदीचे पाठ घ्यावयास सुरवात केली. पंडित बाळकृष्णाचार्य यांनींच त्यांना आपल्या घराण्यांतील पवित्र ठेवा जें व्याकरणशास्त्र ह्याचे पाठ दिले. आचार्यांनीं सिद्धान्तकौमुदी, शब्दकौस्तुभ इत्यादि व्याकरणाचे ग्रंथ घरीं वडिलांचे जवळ अभ्यासिले. पुढें सातारा येथें पं. अनंताचार्य गजेंद्रगडकर यांचेजवळ परिभाषेन्दुशेखर, महामहोपाध्याय अभ्यंकरशास्त्री यांच्याकडे लघुशब्देंदुशेखर, पं. बाळाचार्य गजेंद्रगडकर यांचेपाशीं काव्यव्युत्पत्ति व साहित्यशास्त्र, अशा प्रकारें आपलें अध्ययन पूर्ण केलें. आचार्यांनीं पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या व्याकरणशास्त्राच्या दोन व अलंकारशास्त्राची एक अशा परीक्षा दिल्या आहेत. तसेंच बडोदें येथील महाभाष्यान्त व्याकरणशास्त्र व अलंकारशास्त्राच्या दोन व व्युत्पत्तिशास्त्रांतील एक अशा श्रावणमासदक्षिणापरीक्षाही दिल्या.

आचार्य आपल्या वयाच्या १४ व्या वर्षापासूनच सभादिकांतून पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करीत असत. त्यांनीं वेळोवेळीं औंध, भोर, फलटण, डेक्कन कॉलेज, पुणें इ. ठिकाणीं संस्कृत भाषेमध्यें व्याख्यानें दिलीं व आपलें पांडित्य व संस्कृत-भाषेवरील प्रभुत्व व्यक्त केलें आहे. अध्ययनसमाप्तीनंतर आपल्या घराण्याच्या परंपरेस अनुसरून त्यांनीं अध्यापनाचा मार्ग स्वीकारला. इ. स. १८९८ सालीं त्यांची सोलापूर हायस्कूलमध्यें शास्त्री म्हणून नेमणूक झाली. त्या वेळीं सोला-पुरास रा. ब. ग. व्यं. जोशी हे हेडमास्तर होते. दीड वर्षानंतर सोलापुराहून त्यांची बदली सातारा येथें झाली. तेथून ते १९०९ सालीं मुंबईस गेले व मुंबई-हून १९११ सालीं पुण्यास आले. १९११ ते १९२० पर्यंत हुजूरपागेंत आचार्य अध्यापनाचें कार्य करीत होते. पुढें १९२० सालीं त्यांची धारवाड येथील कर्नाटक कॉलेजमध्यें नेमणूक झाली. धारवाडहून ते पुण्यास १९२८ सालीं डेक्कन कॉलेजमध्यें आले व तेथेंच इ. स. १९३१ सालीं सेवानिवृत्त झाले.

पुणें येथील वे. शा. सभेनें त्यांना व्याकरण, साहित्य, काव्य, व्युत्पत्ति, वेदान्त (द्वैत) ह्यांचे परीक्षक वेळोंवेळीं नेमलें होतें. तसेंच त्यांनीं मुंबई विश्व-विद्यालयाच्या एम्. ए. परीक्षेंतील—वेदान्तपारितोषिका-(झा. वे. प्रा.)चे परीक्षक म्हणूनहि अनेक वेळां काम केलें आहे.

आचार्यांचा वरीलप्रमाणें अध्यापनाचा व्यवसाय चालू असतांना त्यांचें संस्कृत व मराठी वाचनलेखन अविरत चालू होतें. त्यांनीं मृच्छकटिक, माल-विकाग्निमित्र, काव्यादर्श या संस्कृत ग्रंथांवर विस्तृत संस्कृत टीका लिहिल्या आहेत. रामजोशी यांची छंदोमंजरी टीपा लिहून प्रकाशित केली आहे. न्यायसार, कुंदमाला व ब्रह्मसूत्रांचें माध्वभाष्य—तत्त्वप्रकाशिकेसह—यांचीं भाषांतरें केलीं. शूद्रक, भास, कालिदास, भवभूति यांच्यावर ऐतिहासिक चर्चात्मक व काव्यविवेचक असे प्रबंध मराठींत लिहिले आहेत. तसेंच त्यांनीं माध्वसिद्धान्तसुधाकर, मराठीसाहित्य-पत्रिका, विविधज्ञानविस्तार वगैरे मासिकांतून ईश्वरास्तित्व, भक्तिमार्ग, याजुष-हौत्रविचार, छंदःशास्त्र, व्याकरण, द्वैतवेदान्त व विष्णुसर्वोत्तम इत्यादि निर-निराळ्या विषयांवर विद्वत्ताप्रचुर असे अनेक निबंध लिहून आपल्या बुद्धिमत्तेचें सर्वगामित्व दाखविलें आहे. गद्यलेखांप्रमाणें पद्यरचनेमध्येंहि आचार्यांच्या प्रतिभेनें स्वैरविहार केला आहे. पुढें परिशिष्टांत त्यांच्या लेखनाची कालक्रमानुसार यादी दिली आहे. तिच्यांत त्यांच्या कवितांचा उल्लेख नाहीं हें सांगितलें पाहिजे.

मध्वसिद्धान्तप्रचारिणी सभा—इंदोर, गीर्वाणवाग्वर्धिनी सभा—पुणें, या सभांचें आचार्यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. बडोद्याची प्राच्यविद्यापरिषद् व काशी येथील ब्राह्मणमहासंमेलन या सभांस निमंत्रणावरून हे उपस्थित राहिले आणि ब्राह्मणसंमेलनांतील एका विभागाचे ते अध्यक्षहि होते.

आचार्यांचा शिष्यपरिवार फार मोठा आहे. प्रो. डॉ. परांजपे, प्रि.करमरकर, कु. वेणूबाई पानसे, प्रो. कु. सुलभा पाणंदीकर, सौ. सुशीलाबाई मोहनी, प्रो. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, मिसेस परमानंद; सौ. वेणुबाई मोडक, सौ. आनंदीबाई ढवळे, डॉ. कमलाबाई देशपांडे, सौ. मालिनीबाई परांजपे, कु. शां. बापट, सौ. कमला बंबेवाले, सौ. राजाध्यक्ष, सौ. कोकीळ, कु. चं. पोंक्षे, सौ. शां. नाशीककर, सौ. मायदेव, प्रो. सौ. इ. करमरकर, प्रो. कु. कृ. कोल्हटकर, कु. डॉ. गो. लिमये, श्री. शकुंतलाबाई परांजपे, प्रो. डॉ. दांडेकर वगैरे विद्वद्रत्नांचा आचार्यांच्या शिष्यवृदांत अंतर्भाव होतो.

आचार्यांचा विवाह त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षी सातारा येथील पंडित भद्राचार्य गजेंद्रगडकर (अनंताचार्य गजेंद्रगडकर ह्यांचे बंधु) ह्यांच्या कन्येशीं झाला. यांच्या पत्नीचें नांव रुक्मिणीबाई असें होतें. ह्या स्वभावानें सुशील व सद्गुणी होत्या. आचार्यांना चार पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें आहेत.

आचार्यांचें घराणें जुन्या पद्धतीचें असूनहि त्यांची वृत्ति दुराग्रही व एककल्ली नाहीं. ह्यांनीं आपल्या कौटुंबिक व्यवस्थेंत व्यक्तिस्वातंत्र्याला आपल्या वजनानें दडपून न टाकतां पूर्ण मुभा दिली असल्यानें समाजांत त्यांना ह्यामुळें पुष्कळ आघात सोसावे लागत आहेत.

त्यांना प्रवासाची फार आवड असून तीन वेळां त्यांनीं काशीयात्रा केल्या आहेत आणि द्वारका, रामेश्वर, काश्मीर वगैरे ठिकाणीं प्रवास केला आहे.

आज त्यांच्या वयाला श्रीहरिगुरुकृपेनें ७० वर्षें पूर्ण झालीं असून ह्यापुढेंही जगदीश्वरानें त्यांना दीर्घायुष्य व सौख्य द्यावें व त्यांच्या परिपक्व ज्ञानाचा लाभ जनतेला द्यावा अशी श्रीशचरणीं प्रार्थना आहे.

—पं. बाळाचार्य खुपेरकर, सातारा

२. पं. रंगाचार्यांचें कवित्व

रंगाचार्यांचे बाकीचे व्यवसाय पाहिले म्हणजे त्यांपुढें त्यांची प्रत्यक्ष झालेली काव्यनिर्मिति अगदींच अल्प दिसते. संस्कृत व मराठी मिळून एकंदर १०।१५ लहान लहान कविता—त्याही बहुतेक कांहीं प्रसंग, समारंभ यांनिमित्तानें झालेल्या अशा—एवढेंच या शाखेला आलेलें दृश्य फल होय.

आचार्यांशीं ज्यांचा थोडा तरी निकट संबंध आलेला आहे त्यांना त्यांचा रसिकपणा—तोही वैदग्ध्यपूर्ण असा !— प्रत्ययाला आल्याशिवाय राहिला नसेल. बोलण्याचालण्यांत, एखाद्या विषयाची चर्चा करण्यांत, किंवा अगदीं

सामान्य स्वरूपाच्या गप्पा मारण्यांतही त्यांच्या रसपूर्ण अंतःकरणाची साक्ष पटते. मुलांत मूल, थोरांत थोर, ही भोंवतालच्या मंडळीशीं समरस होऊन वागण्याची वृत्ति हाही रंगाचार्यांच्या स्वभावांतील कौतुक वाटण्याजोगा विशेष होय. सामान्यतः जुन्या पद्धतीचें एकांगी शिक्षण घेतलेल्या शास्त्रीमंडळींतून ही वृत्ति इतक्या उत्कटतेनें क्वचितच दिसून येते.

या गोष्टी येथें सांगण्याचें कारण वरील गुण चांगल्या कवीचे स्वभावविशेष होत. वाङ्मयाचें भरपूर परिशीलन, भाषा योग्य त्या प्रकारें सहज खेळविण्याची शक्ति आणि अंतःकरणाचा हळुवारपणा हे सर्व गुण रंगाचार्यांच्या ठिकाणीं चांगल्या प्रकारें वसत असतां त्यांचा काव्य-संग्रह असा अल्प कां या प्रश्नाला उत्तर ते स्वतःचें म्हणून कांहीं देवोत, पण प्रस्तुत लेखकाला वाटलें तें तो येथें लिहीत आहे. कोणतीही कल्पना बुद्धिमान् मनुष्याच्या डोक्यांत स्फुरल्याबरोबर त्या प्रथमच्या उत्साहांत तो आपल्या कार्याला आरंभ करतो, आणि कार्य तडीला न्यावयास लागणारा रेटकपणा, धीर आंगीं नसल्यामुळें लौकरच तें कार्य तसेंच अर्धवट स्थितींत पडून जातें! आचार्य असले अधीरे किंवा आळशी आहेत ही गोष्ट त्यांची थोडीशीहि माहिती असलेला मनुष्य मुळींच मान्य करणार नाहीं. एखादा टीकात्मक लेख लिहावयाचा झाल्यास त्यासंबंधानें सांगोपांग विचार करून स्वतःच लांबलचक सर्व लिखाण पुरें करावयाचें हें दृश्य प्रस्तुत लेखकानें अनेक वेळां पाहिलें आहे. मग आचार्यांनीं एखादें मोठेसें काव्य, किंवा अनेक स्फुट कविता कां लिहिल्या नाहींत? याला उत्तर असें वाटतें की त्यांना हल्लींच्या धकाधकीच्य मामल्यांत आपल्या या कृतीचें योग्य कौतुक होईल कीं नाहीं याची शंका वाटली असावी. स्वतःची आवड, स्वतःचा ओढा संस्कृतकडे विशेष. त्या संस्कृतसंबंधी सर्वत्र औदासीन्य! बरें, मराठी काव्याकडे पहावें तर त्या प्रांतांत खूप गर्दी! त्यामुळें कधीं कांहीं प्रसंगानिमित्त कोणीं 'शास्त्रीबुवा! या प्रसंगावर कांहीं कविता करून द्या!' असें सांगितलें तर तेवढ्यापुरतें काम करावयाचें. पण मनाच्या य बाजूच्या स्फूर्तीला मात्र पूर्वलगाम घातलेला. अशामुळें आचार्यांच्या कवित्वशक्तीची एकपरी कुचंबणा झाली असावी.

आज आहेत त्यांपैकीं बहुतेक कविता कोणी आले म्हणून त्यांच्या स्वागतार्थ, कोणी गांवाला चालले म्हणून त्याना निरोप देण्याकरितां, अशाच स्वरूपाच्या असल्या तरी त्यांतही आचार्यांचा सहज-प्रसाद हा गुण प्रत्येक पदांतून दिसून येतो. कोठें अर्थाची ओढाताण नाहीं, कोठें श्लोक जमविण्याचे क्लेश नाहींत. सर्व प्रवाह कसा शांत, प्रसन्नपणानें चाललेला! एखादा संस्कृत श्लोक तयार करतांना योग्य शब्दांची अडचण भासून स्वतःची तारांबळ कशी होत

असते याचा ज्यांना अनुभव असेल त्यांना आचार्यांच्या या प्रभुत्वाबद्दल खरोखरच धन्योद्गार काढल्याशिवाय राहवणार नाहीं.

या सर्व काव्यांत 'विरहि-विलाप' ही एकच निर्मिति मात्र अशी आहे की तेथें आचार्यांचें कोवळें अंतःकरण करुणरसानें ओथंबलेलें प्रत्ययास येतें. आणि अतिशयोक्तीचा दोष कोणीं निःस्पृहांनीं (!) दिला तरी त्याची पर्वा न करतां प्रस्तुत लेखकाला असेंच वाटतें की ही एकच कविता रंगाचार्यांना उत्तम कवींच्या श्रेणींत बसविण्यास पुरेशी आहे. इंग्रजी वाङ्मयांत ग्रे कवीची 'Elegy' ही एकच कविता जशी त्या कवीला मान्यता मिळवून देण्यास समर्थ झाली, तशी आचार्यांची ही 'विरहि-विलाप' कविताही यशोदायी ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रियपत्नीचा विरह हा विषय अनेक कवींनीं आपापल्या परीनें आपल्या काव्यांतून वर्णिलेला असल्यामुळें त्या विषयाला एक प्रकारें साच्याचें स्वरूप आलें आहे. तथापि कवीचें हृदय त्या प्रसंगानें खरोखरच हललें असेल तर तो आपल्या करुण-विलापांनीं वाचकालाही हलवून सोडतो हा अनुभव प्रस्तुतच्या काव्यांत येतो. सद्गुणी, शांत स्वभावाची, स्वतःशीं समरस झालेली गृहिणी भरल्या संसारांतून गेली असतां मनाची जी घालमेल उठते, ती या लहानशा काव्यांत स्पष्ट दिसून येते. यांतील पूर्व-स्मृतीचे कवीनें रेखाटलेले एकेक प्रसंग इतके सुंदर वठले आहेत की वाचक स्वतःच त्या दृश्याकडे मनश्चक्षूंनीं पहात थोडा वेळ स्तंभित होतो. विषय नाजूक असल्यामुळें त्याचें विशेष विश्लेषण न करितां वाचकांनीं स्वतःच हें काव्य वाचून अनुभव घ्यावा अशी आग्रहाची सूचना करून दुसऱ्या एका छोट्या कवितेकडे वळतों.

ही 'पंचम-श्रेणी'ची कविता ४|५ मराठी श्लोकांचीच आहे, पण तींत आचार्यांचा विनोदी स्वभाव आपल्या गंभीर स्वरूपांत अवतरलेला दिसतो. मुलांच्या व मुलींच्या वर्गांत काय फरक असतो हें दोन्ही वर्ग शिकविलेल्या शिक्षकाला तुलनेनें माहीत असतें. अशांना या कवितेंतील प्रत्येक शब्द अनुभवाचा वाटून प्रच्छन्न पण सरस विनोदाचा एक नमुना म्हणून या कवितेकडे बोट दाखवावेंसें वाटेल.

बाकीच्या कविता निरनिराळ्या प्रसंगाला निमित्त म्हणूनच पुढें आलेल्या आहेत. तथापि यांतही आचार्यांच्या भाषेची सहज-प्रसन्नता व शब्दकल्पनांचें उदात्त औचित्य हें मनांस पटल्याशिवाय रहात नाहीं.

म्हणूनच पुन्हां पुन्हां मनाला वाटतें की आचार्यांनीं काव्याकडे याहीपेक्षां जास्त लक्ष्य देऊन चांगलीं चांगलीं काव्यें निर्माण कां केलीं नाहींत !

—श्री. नी. ताडपत्रीकर

३. पं. रंगाचार्यांचा स्वभाव आणि प्रतिपक्षाविषयीं आदर

पंडितप्रकांड वे. शा. रा. रा. रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डी यांस ते आपल्या वडिलांच्या जवळ अध्ययन करीत असल्या वेळेपासून मी ओळखतों. या संस्थानांत श्रीमंत अप्पासाहेब राजोपाध्ये यांचे पूर्वजांपासून त्यांचे वडिलांस एक जमीन धर्मादाय इनाम मिळाली होती. त्यांचे कांहीं आप्त येथें आहेत त्यांस भेटण्यासाठीं किंवा दुसऱ्या कांहीं कारणासाठीं ते केव्हांतरी येथें येतात. ते येथें आले म्हणजे कित्येकदां आमचे घरींच उतरतात. त्यांचा स्वभाव गोड, मनमिळाऊ व विनोदी असून त्यांची विनयशीलता वाखणण्यासारखी आहे. थोडे दिवसांपूर्वी गीर्वाणवाग्वर्धिनी सभेच्या वार्षिक उत्सवाच्या प्रसंगीं श्री. तात्यासाहेब केळकर यांचें अध्यक्षीय भाषण गीर्वाणभाषेंत झालें. त्यांत रंगाचार्यांनीं अशाच पूर्वीच्या एका प्रसंगीं केलेल्या भाषणांतील एकदोन गोष्टींचा उल्लेख करून थोडीशी टीका केली होती. तें भाषण वाचल्यावर श्री. तात्यासाहेबांचा गैरसमज झाल्याचें दिसून आल्यावरून त्यांनीं तो दूर करण्याच्या उद्देशानें केसरींत गीर्वाण-भाषेंत एक पत्र प्रसिद्ध केलें. त्या पत्रावरून त्यांचा प्रतिपक्षाबद्दल किती आदर असतो व ते आपल्या म्हणण्याचें समर्थन किती विनयानें करितात याचा प्रत्यय येतो.

कृष्णाजी नारायण पंडितराव
सेवानिवृत्त सरन्यायाधीश, कोल्हापूर

४. पं. रंगाचार्यांच्या बुद्धीचा अष्टपैलूपणा

केशरी पगडी, जुन्या तऱ्हेचा अंगरखा, उपरणें, आनंदी मुद्रा व हंसतमुख असे एक पोक्त गृहस्थ १९२० सालीं आधुनिक दुचाकीवरून माझेकडे आले व हेच आपल्या कॉलेजचे शास्त्री रंगाचार्य रड्डी अशी त्यांची व माझी ओळख करून देण्यांत आली. जुनी वेषभूषा व नव्या युगांतील पायगाडी यांचा सुंदर संगम झालेला पाहून मनास फार आनंद झाला. जुन्या-नव्यांतील उत्तमांश ग्रहण करून जुन्या पिढीचा नव्या पिढीविषयीं व नव्या पिढीचा जुन्या पिढीविषयीं आदर वाढवून पुरातनाची नूतनाशीं सांगड घालणें कसें शक्य आहे हें ज्या कांहीं माननीय व्यक्तींनीं आपल्या जीवनक्रमानें दाखवून दिलें त्यांतील शास्त्रीबोवा हे निःसंशय प्रमुख आहेत.

त्या वेळेपासून शास्त्रीबोवांशीं झालेल्या परिचयांत बुद्धीचा चौरसपणा, संशोधनाची हौस, संस्कृत विद्या व भाषा यांचा अभिमान, गाढ विद्वत्ता, संस्कृत आणि मराठी भाषेवरील प्रभुत्व इत्यादि त्यांचे अंगीं असलेल्या गुणांची चांगलीच ओळख

झाली व शास्त्रीबोवांची भेट म्हणजे आनंदाची लूट हीच समजूत झाली व इतक्या वर्षांनींही ती अजून तशीच दृढ आहे.

असा अष्टपैलू विद्वान् महाराष्ट्रास लाभला ही महाराष्ट्राच्या भाग्याचीच गोष्ट आहे यांत शंका नाहीं.

वृद्धांत वृद्ध, तरुणांत तरुण, मुलांत मूल, पत्ते खेळणारांत पटाईत पत्ते खेळणारे, अशी शास्त्रीबोवांची आठवण माझ्या मनांत सदैव जागृत आहे. वयाचीं सत्तर वर्षें पुरीं होऊन एकाहत्तराव्या वर्षांत ते पदक्षेप करीत आहेत या मंगल प्रसंगीं या सरस्वतीच्या एकनिष्ठ भक्ताला उत्तम आरोग्य लाभून त्याच्याकडून संस्कृत विद्येची सेवा अशीच अनेक वर्षें होवो व विद्यापीठाकडून व सरकारकडून त्यांचा उचित गौरव होवो अशी सदिच्छा प्रदर्शित करून हा अल्प लेख संपवितों.

प्रो. डॉ. विश्वास गंगाधर भट, धारवाड.

५. शास्त्रीबुवांची मध्वसिद्धांतसेवा

वे. शा. सं. रंगाचार्य रड्डी ह्यांनीं श्रीमध्वाचार्यांच्या व श्रीमदाचार्य-शिष्यांच्या समग्र ग्रंथांचा अत्यंत उत्तम अभ्यास केला असून श्रीमदाचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्याचें अत्यंत सुबोध व सुगम भाषेंत त्यांनीं मराठी भाषांतर केलेलें असून तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहे. तसेंच श्रीमदाचार्यांच्या द्वादशस्तोत्र, कृष्णामृतमहार्णव, वायुस्तुति, शिवस्तुति वगैरे ग्रंथांचीं मराठी भाषेंत शास्त्री-बुवांनीं भाषांतरें केलेलीं आहेत.

श्रीमन्मध्वमतानुयायी वर्ग कर्नाटक, निजाम इलाखा व दक्षिण हिंदुस्थान या भागांत फार मोठा असून मध्वपीठगुरु श्रीपादाचार्यांचा संचार त्या ठिकाणीं वारंवार होत असतो. त्यामुळें श्रीमदाचार्यांच्या सिद्धांताची तिकडील लोकांना पुष्कळ माहिती सहजसुलभरीत्या मिळूं शकते. महाराष्ट्रांत मात्र तशी स्थिति नाहीं. या भागांत माध्ववैष्णव लोकांची फार थोडी वस्ती आहे व श्रीपादांचा इकडे संचार क्वचितच, कित्येक वर्षांनीं केव्हां तरी, होतो. यामुळें या लोकांना श्रीमध्वसिद्धांताचें ज्ञान अवगत करून घेण्यास फार अडचणी येतात.

कोणत्याही संप्रदायाच्या प्रचारकार्यासाठीं व्याख्यानें, प्रवचनें, ग्रंथांचें व विविध लेखांचें प्रकाशन, त्या त्या संप्रदायाच्या निरनिराळ्या पुण्यपुरुषांच्या जयंतीचे व पुण्यतिथीचे उत्सव साजरे करणें हींच प्रमुख साधनें होत. श्रीमध्वसिद्धांताचा प्रचार उत्तम रीतीनें व्हावा एतदर्थ महाराष्ट्रांत कांहीं प्रमुख शहरांत हें कार्य करणाऱ्या संस्था स्थापन करण्याचा शास्त्रीबुवांनीं विचार केला. त्या वेळीं शास्त्री-बुवा पुण्यास होते. त्यांनीं आपला विचार पुण्यांतील माध्वसंप्रदायी प्रमुख वैष्णव

मंडळीपुढें मांडला. शास्त्रीबुवांचा विचार या मंडळींना पटला. लगेंच शास्त्रीबुवांनीं उत्तरादिमठाधीश श्रीसत्यध्यानतीर्थ स्वामीमहाराज यांच्याकडे पत्रव्यवहार करून पुण्यांत अशी संस्था काढण्याची परवानगी मिळविली, आणि शके १८३४ मध्यें शास्त्रीबुवांच्या प्रयत्नानें "श्रीमध्वसिद्धांतप्रचारिणी शाखासभा" या नांवाची संस्था पुण्यांत स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेस शास्त्रीबुवांना पुण्यांतील सुप्रसिद्ध वकील श्री. अनंत लक्ष्मण उर्फ आण्णासाहेब देशपांडे व श्री. रामचंद्र हयग्रीव मणूरकर यांची बहुमोल मदत मिळाली. स्वतः अण्णासाहेब देशपांडे हे या सभेचे उपाध्यक्ष होते व अजूनही आहेत. शास्त्रीबुवा बरींच वर्षें या सभेचे उपाध्यक्ष होते व सध्यां ते सभेचे सल्लागारमंडळाचे सदस्य आहेत. कोल्हापूरचे माजी सर न्यायाधीश श्री. पंडितराव हे या संस्थेचे कांहीं वर्षें अध्यक्ष होते. या संस्थेमार्फत श्रीमन्मध्वाचार्यजयंत्युत्सव, श्रीमन्मध्वनवमीचा व श्रीजयतीर्थ टीकाचार्य आदिकरून आचार्यांच्या पुण्यतिथींचे सार्वजनिकरीत्या उत्सव पुण्यास सुरू केले. श्रीमध्वसिद्धांतप्रचारासाठीं एखादें मासिक चालविल्यास प्रचारकार्य उत्तम रीतीनें होईल हें मनांत आणून शास्त्रीबुवांनीं प्रयत्न करुन शके १८३९ च्या विजयादशमीपासून वरील संस्थेमार्फत आपल्या संपादकत्वाखालीं "श्रीमध्वसिद्धांतसुधाकर" या नांवाचें मासिक सुरू केलें. या मासिकांत हल्लींचे उत्तरादिमठाधीश श्रीसत्यध्यानतीर्थ यांचे महत्त्वाचे उपनिषदावर निबंध, अद्वैतमतावर योग्य आक्षेप व द्वैतमतसमर्थनपर लेख प्रसिद्ध झाले असून स्वतः शास्त्रीबुवांनीं केलेलीं श्रीमन्मध्वाचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्य, द्वादशस्तोत्र, कृष्णामृतमहार्णव, वायुस्तुति, शिवस्तुति वगैरे ग्रंथांचीं मराठी भाषांतरें व श्रीमन्मध्वमतावर लिहिलेले अनेक विद्वत्ताप्रचुर लेख प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. हें मासिक सात वर्षें चाललें. पुढें शास्त्रीबुवांची बदली धारवाडला झाली. तिकडे मराठी छापखाने नसल्यानें व तेथें राहून मासिकाचें काम संभाळणें अडचणीचें झाल्यानें हें मासिक बंद झालें.

शास्त्रीबुवांची बदली झाल्यावरसुद्धां वरील संस्थेचें पुण्यास काम चालू होतें व अद्याप चालू आहे. आणि संस्थेमार्फत उत्सव, व्याख्यान, प्रवचन वगैरे कार्यक्रम होत आले आहेत. शके १८५५ सालीं त्या वेळचे पुण्याचे फर्स्ट क्लास सबूजज्ज श्री. बाळाजी व्यंकटेश पोतदार यांच्या प्रोत्साहनानें व त्यांचे अध्यक्षतेखालीं या संस्थेच्या कामास पुनः चालना मिळाली आणि "श्रीमध्वसिद्धांतसुधाकर" त्रैमासिक स्वरूपांत सुरू करण्यांत आला. या वेळीं संस्थेचा चिटणीस व त्रैमासिकाचा उपसंपादक या नात्यानें शास्त्रीबुवांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला. या वेळीं शास्त्रीबुवा वाईस रहात होते. परंतु आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं या त्रैमासिकाच्या संपादकाचें काम पत्करलें. या त्रैमासिकांत शास्त्रीबुवांचें "परमेशास्तित्वविचार" 'भक्ति' वगैरे सुंदर, सुबोध व मननीय लेख प्रसिद्ध

झाले आहेत, तसेंच श्रीसत्यध्यानतर्थांचे लेख प्रसिद्ध केले आहेत.

श्रीमध्यसिद्धांतप्रचाराची शास्त्रीबुवांची कामगिरी येथेंच थांबली नाहीं. अखिल महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अशा संस्था काढून त्यांद्वारा श्रीमदाचार्यांच्या सिद्धांतांच्या ज्ञानामृताचा लाभ लोकांस द्यावा ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. ठिकठिकाणीं प्रमुख लोकांच्या भेटी घेऊन व साहाय्य मिळवून वरील प्रकारच्या शाखासभा सोलापूर, वाई, कोल्हापूर वगैरे शहरांत स्थापन केल्या. या संस्थांमार्फत आज कित्येक वर्षे उत्सव, व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें यांचे द्वारा श्रीमदाचार्यसिद्धांताचें ज्ञान लोकांना दिलें जात आहे.

वरील संस्थांच्या पुष्कळशा कार्यक्रमास ते शारीरिक कष्टाची पर्वा न करतां जातीनें हजर राहतात आणि प्रवचनेंही देतात. शास्त्रीबुवांच्या प्रवचनांत प्रतिपक्षावर अनुदार टीका कधींही आढळून येत नाहीं. सौजन्य, शालीनता, सुबोधपणा हें शास्त्रीबुवांच्या प्रवचनांचें इतर सांप्रदायिक प्रवचनकारांच्या प्रवचनामध्यें फारसें आढळून न येणारें वैशिष्ट्य आहे असें म्हणण्यास मला मुळींच प्रत्यवाय वाटत नाहीं. श्रीमदाचार्यांचे ठिकाणीं आत्यंतिक भक्ति, त्यांच्या सिद्धान्ताविषयीं वाटणारा जिव्हाळा, सतत अविश्रांत मेहनत करण्याची वृत्ति वगैरे गुणांच्या जोरावर शास्त्रीबुवांनीं श्रीमन्मध्वसिद्धान्तप्रचाराचें कार्य आज सुमारें तीस वर्षें अत्यंत यशस्वी रीतीनें बजाविलें आहे व अद्याप तें काम ते करीत आहेत. श्रीमदाचार्यसिद्धान्ताची त्यांची ही सेवा कोणालाही स्पृहणीय वाटेल यांत संदेह नाहीं.

भीमराव कृष्ण कुलकर्णी, बी. ए., एल्‌एल्. बी., वकील, पुणें.

६. वे. शा. सं. रंगाचार्य रड्डी यांचें अंतरंग

प्रणम्य हृदये श्रीशं गुरून्नत्वा च प्रार्थये ।
श्रीरङ्गाचार्यमिश्राणां भूयादायुः शतोत्तरम् ॥

पंडित रंगाचार्य रड्डी यांचा व माझा परिचय वैकुण्ठवासी कृष्णाजी विष्णु आचार्य कालगांवकर (प्रसिद्ध इतिहाससंशोधक) यांच्या सौजन्यानें घडून आला. मला त्यांचें पहिलें दर्शन पुण्यास त्यांच्या घरीं झालें. सभोंवतीं एक कन्या व तीन लहान मुलगे लडिवाळपणानें बोलत बसलीं आहेत. 'रंगाचार्य, रंगाचार्य' असें वारंवार त्यांस संबोधून बोलवीत आहेत, शास्त्रीबुवाहि मधून मधून त्यांना प्रेमळ उत्तरें देत आहेत, परंतु त्यांचें अंतरंग आपल्यापुढें 'डेस्कावर' पसरलेल्या अनेक कागदांत रमलें होतें. ते कागद म्हणजे वैष्णवसिद्धान्तावरील लेख व पुस्तकें. बाहेरून शिक्षक, शास्त्री, काव्यालंकार, कविभूषण, इत्यादि अनेक पेशांमध्यें जरी

ते नटलेले दिसत असत, तरी अंतःकरणरूपी 'जवनिके'च्या आंत ते वेदान्तरसांत रमलेले असत असें माझ्या प्रथमपासूनच निदर्शनास आलें. यास्तव माझ्या स्मृतीवर त्यांच्या स्वभावाचें पहिलें चित्र जें उमटलें त्याला अनुसरून मी त्यांच्या अंतरंगाविषयीं चार शब्द लिहीत आहें.

आपल्याला जें प्राप्त झालें तें दुसऱ्यांस सांगून त्यांनाहि शहाणे करावें ही जी सात्त्विक महत्त्वाकांक्षा लोकोत्तर गुरूंस असते ती त्यांनाहि आहे. यामुळें त्यांनीं निरनिराळ्या दिशेनें अटाकोट प्रयत्न केले. प्रथम पुण्यांत 'मध्वसिद्धान्तप्रचारिणी सभा' स्थापन केली. या सभेमार्फत 'मध्वसिद्धान्तसुधाकर' नांवाचें मासिक त्यांनीं लवकरच सुरू केलें. दुसराहि एक स्तुत्य उपक्रम त्यांनीं केला. प्रतिवर्षी श्रीमध्वाचार्य यांचा जयन्त्युत्सव विजयादशमीस मोठ्या थाटानें सुरू केला. 'योजकस्तत्र दुर्लभः' या वाक्याप्रमाणें महाराष्ट्रांत अलीकडे वीस वर्षांत वैष्णवसमाजांत जेवढे धार्मिक उपक्रम झाले आहेत त्यांचे योजक–प्रेरक हे श्री. रंगाचार्य हेच आहेत. प्रत्यक्ष श्रीमध्वमठाचे स्वामींपासून तों अगदीं प्राकृत आबालवृद्धांचे मुखांत श्री. रंगाचार्यांचें नांव मोठ्या आदरानें येत असतें.

परंतु माध्वमतांचा व आचारांचा पुरस्कार एवढीच एकदेशीय कामगिरी त्यांचेकडून झाली असें म्हणणें चुकीचें होईल. सर्वसाधारण जनता कशी धर्मप्रवण होईल, श्रौतस्मार्तविद्येचा प्रसार कसा होईल याविषयींहि ते अहर्निश झटत आले आहेत. पुण्याची वेदशास्त्रोत्तेजक सभा तर यांना आत्मीयत्वानें संभाविते; तेथील अभ्यासक्रम ठरवितांना व परीक्षा घेतांना शास्त्रीबुवांचें सान्निध्य असावयाचेंच. त्याचप्रमाणें पद्मसरोवर येथील 'मध्वसिद्धान्तोन्नायिनी' सभेच्या कार्यक्रमास व परीक्षासमारंभास परीक्षक या नात्यानेंहि वारंवार शास्त्रीबुवांस सन्मानाचें निमंत्रण येऊन ते जात असत. 'काशीसंमेलनांत स्पृश्यास्पृश्यविचार या विषयावर मोठा मार्मिक निबंध यांनीं वाचला होता. मुंबई विश्वविद्यालयांत 'द्वैतसिद्धान्ता'चा अभ्यास समाविष्ट व्हावा म्हणून यांनीं भगीरथ प्रयत्न केले, व त्यांत ईश्वरकृपेनें यश येऊन एम्.ए.च्या परीक्षेस तें शास्त्र नेमण्यांत आलें. सौ. कृष्णाबाई नारळकर (प्रो. नारळकर यांच्या पत्नी) ह्या द्वैतसिद्धान्तांतील पहिल्या एम्. ए. होत. त्याचप्रमाणें शास्त्रीबुवांचा अद्वैतसिद्धान्त व इतर दर्शनें यांचाहि व्यासंग फार मोठा आहे. 'झाला वेदान्त प्राइज्' विषयाचे ते तीन वर्षें परीक्षक होते. यांनीं नुकताच प्रसिद्ध केलेला "श्रीमध्वाचार्यांचें ब्रह्मसूत्रांवरील भाष्य आणि जयतीर्थांची तत्त्वबोधिनी टीका यांचें मराठी सटीप भाषांतर हा ग्रंथ तर त्यांची अगाध विद्वत्ता, अविश्रांत खटपट, व स्वार्थत्याग यांचें निदर्शन आहे.

गोपाळ प्रल्हाद जांबळे, सातारा

७. परिशिष्टः—आचार्यांच्या ग्रंथांची व लेखांची यादी

साल	विषय
१९०३	मराठी शुद्धलेखन (ज्ञानप्रकाश)
१९०४	मराठी भाषेची घटना
१९०९	मृच्छकटिकम् (संस्कृत टीका)
१९१०	कविवर शूद्रक व तत्कृत मृच्छकटिक यांसंबंधीं कांहीं विचार (विविधज्ञानविस्तार)
१९१३	श्रीमद्भागवत बोपदेवप्रणीत आहे काय ?(चित्रमय जगत्)
१९१३ १९१४	याजुषहौत्रविचार
१९१४	मोरोपंतांच्या रामायणांवर टीपा (काव्यसंग्रह).
१९१५	अद्वैतसिद्धान्ताचा युक्तायुक्त-विचार (प्रस्तावना)
१९१५	श्रीमन्मध्वचरित्र (प्रस्तावना)
१९१६	छन्दोमञ्जरी
१९१६	भास कीं आभास (विविध-ज्ञानविस्तार)
१९१७ —२०	बालिकादर्श (संपादक)
१९१८	मालविकाग्निमित्र (संस्कृत टीका)
१९१७ ––२१	श्रीमध्वसिद्धान्तसुधाकर (संपादक)
१९१९	श्रीमन्मध्वमठपरम्परा (चित्र-मय जगत्)
१९१९	शिवस्तुति (मराठी भाषांत-रासह)
१९१८	द्वादशस्तोत्र (मराठी भाषां-तरासह)
१९१७	वायुस्तुति (मराठी भाषांत-रासह)
१९२१	कृष्णामृतमहार्णव (मराठी भाषांतरासह)
१९२२	न्यायसारः (मराठी भाषांत-रासह)
१९२४	संस्कृत साहित्याचा इतिहास (विविधज्ञानविस्तार)
१९२६ ––२७	सटीक मध्वभाष्याचें सटीप मराठी भाषांतर
१९२६	विद्याधीशविजयः (संस्कृत)
१९२९	भवभूति व उत्तररामचरित (विविधज्ञानविस्तार)
१९३२	काव्यालोचनालोचन (विविधज्ञानविस्तार)
१९३३	पूर्णप्रज्ञदर्शन
१९३३	परमेशास्तित्वविचार
१९३३ ––३५	श्रीमध्वसिद्धान्तसुधाकर (संपादक)
१९३४	विष्णुसर्वोत्तमत्व
१९३४	भक्तिमार्ग
१९३४	स्पर्शास्पर्शविचार
१९३४	छन्दःशास्त्र (विविधज्ञान-विस्तार)
१९३४	रामायणालोचन(लोकशिक्षण)
१९३५	धर्मतत्त्व
१९३५	धर्मगुरूंचें महत्त्व
१९३५	माध्वसिद्धान्तविमर्शः(संस्कृत)

साल	विषय	साल	विषय
१९३५	कुन्दमाला (मराठी भाषांतरासहित)	१९३६	माध्वसिद्धान्त
१९३६	मराठींतील अनुनासिक व त्यांचें लेखन यांसंबंधीं कांहीं विचार (महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका)	१९३६	मराठी-व्याकरणपरिषदेंत अध्यक्षीय भाषण
		१९३७	भामह सौगत कीं वैदिक (विविधज्ञानविस्तार)
		१९३८	काव्यादर्श (संस्कृत टीका)
१९३६	नलदमयंतीस्वयंवराख्यान चर्चा (विविधज्ञानविस्तार)	१९३८	संस्कृतवाग्वर्धिनीसभेंत अध्यक्षीय भाषण
१९३६	पाणिनीय व्याकरण	१९३९	कालिदास (लोकशिक्षण)

अनुक्रमणिका

सूचना :— ह्या लेखसंग्रहांत वेदान्त, धर्मशास्त्र, मराठी व्याकरण, छन्दःशास्त्र, संस्कृत वाङ्मय आणि काव्यपरीक्षण या विषयांवरील पं. रंगाचार्यांच्या लेखाचे प्रतिनिधिभूत म्हणून अनुक्रमें लेखांक १, २, ३, ४, ५-६, ७-८ घेतले आहेत; ९-१६ संस्कृत कवितांचे आणि १७-१९ मराठी कवितांचे प्रतिनिधि आहेत.



पं० रंगाचार्य रड्डी

सप्तत्यब्दीसमारंभ श्रा. वा ११ शके १८६१

॥ श्रीमध्वगुरुराजाय नमः ॥

माध्वसिद्धान्तविमर्शः

हरिभक्तिरसाभिज्ञो न मोक्षमभिकाङ्क्षति ।
प्रसूनमपरं भृङ्गो नेच्छत्यम्बुजलम्पटः ॥

अहो! कालादारभ्यास्मिन्भारते वर्षे विबुधगणजेगीयमानं ब्रह्ममीमांसा नाम शास्त्रं विश्वोत्पत्तिस्थितिसंहारविचारपूर्वकं परमात्मतत्त्वं विवेचयत्समुल्लसति । अस्य शास्त्रस्य मूलं, प्रधानं च प्रमाणं भगवती श्रुतिरेव । तदनुसारिणी अङ्गभूते च प्रत्यक्षानुमाने । श्रुतावपि ब्रह्मतत्त्वं ईशकेनकठमुण्डमाण्डूक्यतैत्तिरीयच्छान्दोग्यबृहदारण्यकाद्युपनिषत्सु प्राधान्येन मीमांसितमस्ति । श्रुतिस्मृतिवचनानामाभासमानविरोधपरिहारपूर्वकं भगवद्भिर्बादरायणाचार्यैः इदमित्थमिति विनिर्णयाय ‘लघूनि सूचितार्थानि स्वल्पाक्षरपदानि च । सर्वतः सारभूतानि सूत्राण्याहुर्मनीषिणः ॥” इति लक्षणसमन्वितानि ब्रह्मसूत्राणि व्यरचिषत । तानि त्वतिगभीरार्थानि विश्वतोमुखानीति विज्ञाय श्रुतिमहोदधिविलोडनमन्दरायमाणैस्तत्रभवद्भिः शंकररामानुजमध्ववल्लभाचार्यैः अद्वैतविशिष्टाद्वैतद्वैतशुद्धाद्वैतसिद्धान्तप्रवर्तकैः विविधश्रुतिस्मृत्युपष्टम्भेन स्वस्वसिद्धान्तानुकूलतया व्याख्यायिषत । तेषां विवेचनप्रबन्धा भाष्यसंज्ञया व्यवह्रियन्ते । सर्वेऽपि एते भाष्यकाराः प्रत्यक्षानुमानशब्दानीति त्रीण्येव प्रमाणानि प्रधानतयाङ्गीकुर्वन्ति । शब्दो नाम अपौरुषेया अत एव दोषलेशशून्या भगवती श्रुतिः, तदनुसारीणि च सूत्रस्मृतिपुराणानि । धर्ममीमांसाशास्त्रे ब्रह्ममीमांसाशास्त्रे च त्रिविधेषु प्रमाणेषु श्रुतेरेव प्राधान्यं सर्वैरुररीक्रियते । अतीन्द्रियेषु धर्माधर्मपापपुण्यस्वर्गनरकादिपदार्थेषु तथैव परमेशतद्गुणधर्मादिषु च न प्रत्यक्षमात्मनो व्यापाराय प्रभवति । न चानुमानम् । पुरुषमतिवैरूप्येण तस्य आनन्त्यादिदमित्थमिति निर्णेतुमसामर्थ्यात् । अतोऽत्र विनिर्णयाय पुरुषदोषशून्यः स्वतः प्रमाणभूतः शब्दप्रमाणमिति तत्प्रामाण्यं विशेषतोऽङ्गीक्रियते । तद् युक्तमेव । श्रुतेरपौरुषेयता स्वतःप्रामाण्यं च व्यवस्थापितं प्रज्ञावरेण्यैर्मीमांसकधुरीणैः । तत् तेषां आकरग्रन्थेभ्योऽवगन्तव्यम् । एतावत्पर्यन्तं यत्संक्षेपेण विवेचितं तत्सर्वपक्षानुमतं, इति नास्त्यत्र विवादलेशः वेदान्तपरिशीलनचतुराणां विदुषाम् ।

तेषु आचार्यचतुष्टयेषु श्रीमन्मध्वाचार्याः श्रुतिस्मृतिप्रमाणकदम्बैः सूत्रनिबद्धैश्च आत्मनो द्वैतराद्धान्तं स्थिरीचक्रुः। द्वाभ्यां स्वतन्त्रास्वतन्त्राभ्यां ईशजीवाभ्यां इतं युक्तं द्वीतम् । द्वीतमेव द्वैतम् । अनया व्युत्पत्त्या परापरौ ईशजीवौ अत्यन्तविभिन्नौ अस्मिन् राद्धान्ते विनिश्चितौ इति स्फुटं भवति । तथा चोक्तं 'स्वतन्त्रमस्वतन्त्रं च द्विविधं तत्त्वमिष्यते। स्वतन्त्रो भगवान् विष्णुः निर्दोषाशेषसद्गुणः ॥' इति। अस्मिन् राद्धान्ते ब्रह्मशब्दवाच्यो विष्णुः, विश्वं सत्यं, जीवेशयोर्भेदः, भगवत्प्रसादान्मोक्षः, तदुपायो ज्ञानभक्तिपूर्विका तदुपासना, इत्येवमादयो विषयाः श्रुतिस्मृतिप्रमाणपूर्वकं ब्रह्मसूत्रेभ्यः त्रिनिर्णीताः सन्ति । तदेतन्माध्वमतं दाक्षिणमहाराष्ट्रेषु मद्रपुरविभागे च विशेषतः यथा प्रसृतं वर्तते, न तादृक् विस्तरो गुर्जरादिप्रदेशेषु विद्यते इति श्रीमदाचार्यापरनामधेयानां श्रीमध्वाचार्याणां केचन सिद्धान्ताः संक्षेपतः प्रथमं निर्दिश्य अनन्तरं अद्वैतसिद्धान्ते ये तेषां आक्षेपास्तेषु कांश्चित् प्रदर्शयामः । येन तेषामाचार्यवराणां विचारसरणिः सर्वसाधारणतयावगता भवेत् ।

श्रीमदाचार्याः जीवेशभेदमङ्गीकुर्वन्ति । तत्र तावदेताः श्रुतयः प्रमाणीभवन्ति : — 'द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति अनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥' इयं श्रुतिः शरीरवृक्षमधितिष्ठन्तौ जीवपरमात्मानौ भिन्नौ इति अन्यशब्देन सुस्पष्टं दर्शयति । 'जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशं अस्य महिमानमिति वीतशोकः ।' अनया श्रुत्या जीवभिन्नस्य सर्वसेव्यस्य महामहिमशालिनो भगवतो दर्शनेन (ज्ञानेन) जीवस्य मोक्षोऽभिधीयते । अत्रापि अन्यशब्देन भेद एव स्फुटीकृतोऽस्ति । 'सोऽश्नुते सर्वान्कामान्सह ।' अनेन श्रुतिवाक्येन मोक्षावस्थायामपि भगवता सहोपभोगवर्णनेन जीवस्य ततो भेदः प्रदर्श्यते । 'एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति' । अत्र उपसंक्रमणकथनात्, जीवेशयोः गम्यगमकभावेन (कर्मकर्तृभावेन च) भेदः स्पष्टतया प्रतीयते । 'इन्द्रस्यात्मा निहितः पंचहोता' 'वायोरात्मानम्' इत्यादिभिः श्रुतिभिः अन्तर्यामित्वेन नियामकत्वेन च जीवाद् भिन्नतयैव परमेश्वरो निर्दिश्यते। एवंविधानि जीवेशभेदप्रतिपादकानि श्रुत्यादिप्रमाणानि तत्तद्विषयविवेचनप्रसङ्गतः संगृहीतानि सन्ति श्रीमदाचार्यवरेण्यैः ।

भगवन्तो बादरायणाचार्या अपि 'भेदव्यपदेशाच्चान्यः' इति सूत्रेण 'इन्द्रस्य आत्मा निहितः' इत्यादिश्रुतिषु इन्द्रान्तर्यामित्वेन परमात्मनो भेदेन व्यपदेशात् स इन्द्रादिदेवेभ्यो भिन्न इति सूचयन्ति । 'कर्मकर्तृव्यपदेशाच्च'। अनेन सूत्रेण 'आत्मानं परस्मै शंसति' (य आत्मानं परस्मै अयोग्याय जीवाय शंसति तस्य वेदा निष्फला भवन्ति इत्यर्थः) अस्यां श्रुतौ जीवस्य शंसनक्रियायाः कर्तृत्वं परमात्मनः कर्मत्वं च दृश्यते अतो जीवेशयोर्भेदः इति दर्शयन्ति । 'शारीरश्च उभयेऽपि भेदेन एनमधीयते' अनेन सूत्रेण 'य आत्मनि तिष्ठन् आत्मनोऽन्तरः, यमात्मा न वेद' 'यो विज्ञाने तिष्ठन् विज्ञानादन्तरः, यं विज्ञानं न वेद' इति माध्यंदिनकाण्वशाखयोः

जीवात्मनः परमात्मानं भेदेन व्यपदिश्य स च परमात्मा जीवात्मनो नियामक इत्युपदिष्टमस्ति । अतः शारीरोऽन्तर्यामी परमात्मा जीवात्मनो भिन्न इति दर्शयन्ति । अत्र चात्मविज्ञानशब्दौ जीवात्मवाचकौ । 'भेदव्यपदेशात्' अनेन सूत्रेण 'जुष्टं यदा पश्यति अन्यमीशम्' इति श्रुत्या जीवपरमात्मनोः अन्यशब्देन भिन्नविभक्त्या च भेदः स्पष्टमभिहितः । अतो न जीवपरमात्मानौ अभिन्नौ इति कथयन्ति । 'सुषुप्त्युत्क्रान्त्योर्भेदेन' अनेन सूत्रेण सुषुप्तौ उत्क्रान्तौ च जीवेशौ श्रुत्या भेदेन निर्दिष्टौ । तथा च सुषुप्तिश्रुतिः । 'प्राज्ञेनात्मना संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद' । अस्या अर्थः । प्राज्ञेन प्रकृष्टज्ञानशालिना आत्मना परमात्मना संपरिष्वक्तः समाश्लिष्टो (सुप्त इत्यर्थः) बाह्यं देहाद् बहिर्भूतं (आन्तरं च) किञ्चन विषयादिकं न वेद न जानाति । अनेन संपरिष्वक्तकथनेन सुषुप्तौ जीवेशयोर्भेदोऽवगतो भवति इति दर्शयन्ति । उत्क्रान्तिश्रुतिः— 'प्राज्ञेनात्मनान्वारूढः उत्सर्जन् याति' प्राज्ञेनात्मना परमात्मना अन्वारूढः अधिष्ठितो जीवात्मा उत्सर्जन् प्राक्तनं देहादिकमुत्सृज्य याति, देहान्तरं वा लोकान्तरं वा भ्रमति इति श्रुत्यर्थः । अनया उत्क्रान्तिश्रुत्यान्वारूढत्वकथनेन, जीवपरमात्मनोर्भेदः सूच्यते । 'भोक्त्रापत्तेरविभागश्चेत् स्याल्लोकवत्' अनेन सूत्रेण 'परेऽव्यये सर्व एकीभवन्ति' इति श्रुत्या मुक्तानां परमात्मना सह य एकीभावोऽभिहितः स लोकव्यवहारवद् गौणो विज्ञेयः । यथा लोकः उदके उदकमासिक्तमेकीभूतं इति मन्यते, परं तन्नैकीभवति, अतो भेदोऽस्त्येव । तथा मुक्तावस्थायां जीवात्मनोर्गौण एकीभावो विज्ञेयः । तदुक्तं काठके 'यथोदके शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवतीति । न तु तदेव भवति इत्यर्थः । अन्यथा वृद्ध्यादीनामनुपपत्तिः स्यात् । एवमादीनि विविधानि सूत्राणि जीवेशभेदप्रतिपादनपराणि भगवान् बादरायणः प्रणिनाय ।

प्रायः सर्वासां श्रुतीनां कर्मोपासनाविनियुक्तत्वात्, कर्मोपासनायाश्च भेदाधीनत्वात् सर्वाः श्रुतयः वस्तुतो भेदपरा एव सन्ति । श्रुत्यनुसारित्वाच्च सूत्रस्मृतीनां तान्यपि साक्षात् परंपरया वा भेदपराण्येव । ये तु विश्वमिथ्यात्वमुररीकृत्य जीवेशयोरभेदं समर्थयन्ति, कर्मोपासनायाश्च प्रतिपादिकानां श्रुतीनां व्यावहारिकप्रामाण्यमङ्गीकुर्वन्ति, तैरेवातीन्द्रिये परेशधर्माधर्माद्यर्थविषये प्रमाणमन्वेषणीयम् । न तेषां मतेन व्यावहारिकप्रामाण्येन नाम वस्तुतः अप्रामाण्येन श्रुतिस्मृतयस्तत्त्वार्थे प्रमाणीभवितुमर्हन्ति । अथ यथाकथंचित् व्यावहारिकप्रामाण्येनापि काः श्रुतीरद्वैतवादिनो जीवेशाभेदविषये उत्थापयन्ति इति विचार्यमाणे 'तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि' इत्यादीनि कानिचिद्वाक्यानि तैरङ्गीकृतानि दृश्यन्ते । एतान्यपि नाभेदसमर्थकानि इति अचिरादेव दर्शयामः । इदं तेषां प्रमाणवैरल्यमस्माभिरेव घोष्यते इति न, अपि तु अद्वैतवादधुरंधराः श्रीशंकराचार्यभाष्यटीकाकाराः आनन्दगिर्याचार्या अपि प्रथमाध्यायतृतीयपादैकोनविंशतिसूत्रस्थस्य 'प्रतिपाद्यं

तु शास्त्रार्थमेकत्वम्' इत्यादिभाष्यस्यावतरणिकाप्रसङ्गे 'ननु जीवब्रह्मणोरैक्यं न क्वापि सूत्रकारो मुखतो वदति । किन्तु सर्वत्र भेदमेव । अतो नैक्यमिष्टम् । तत्राह प्रतिपाद्यं त्विति ।' एवमाहुः । एतेनास्मदुक्तमेवानन्दगिर्याचार्याणामनुमतमिति स्पष्टं भाति । अन्यच्च अद्वैतिनः सकलप्रमाणानां व्यावहारिकप्रामाण्यं मन्यन्ते । प्रमाणान्तःपातितया वेदानामपि तेषां मते व्यावहारिकमेव प्रामाण्यम् । व्यावहारिकं प्रामाण्यं नाम परमार्थतोऽप्रामाण्यम् । तेन चैतेऽद्वैतिनो व्यावहारिका वैदिकाः परमार्थतस्तु सौगता एवेति केनाचिदर्वाचीनेनोक्तं चेत् किमुत्तरयितव्यम् ।

अद्वैतिनो विश्वमिथ्यात्वमुररीकृत्य तत्संसिद्धयेऽध्यासवादं पुरतः कुर्वन्ति । तस्य संक्षेपतो विमर्शं कुर्मः । अध्यासो नाम अतस्मिंस्तद्बुद्धिः । यथा इदं रजतमित्यादौ अतद्भूतायां शुक्तिकायां तद्बुद्धिः रजतबुद्धिः । सर्पोऽयमित्यादौ असर्पभूतायां रज्जौ तद्बुद्धिः सर्पबुद्धिः । एवमेव अतद्भूते ब्रह्मणि अविद्यया तद्बुद्धिः विश्वबुद्धिः । अध्यासाङ्गीकारं विना 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' 'नेह नानास्ति किंचन' इत्यादिश्रुतिवाक्यानां उपपत्तिर्नैव भवति । तदर्थमध्यासोऽवश्यं शरणीकरणीय इति तेषामाशयः । अयं जीवब्रह्मणोः परस्पराध्यासः अध्यासकारणानामभावात् न युक्त इति सर्वथा श्रुतिप्रामाण्यमाश्रयतां विश्वसत्यत्ववादिनां जीवब्रह्मणोरैक्यमनङ्गीकुर्वतां माध्वानां समुद्घोषः । अध्यासस्य पुरोदर्शितानि असाधारणानि कारणानि अपेक्षितानि भवन्ति इति सर्वैरङ्गीक्रियते । तानि च, सामान्यधर्मः, विशेषधर्मः, आरोप्यमाणवस्तुसादृश्यं, एभिर्युक्तमधिष्ठानम् । आरोप्यमाणपदार्थसदृशपदार्थज्ञानं (प्रधानज्ञानम्), सामान्यधर्मज्ञानम्, विशेषधर्मस्याज्ञानम्, एभिर्युक्तः पुरुषः, इत्येतानि कारणानि भ्रमे (अध्यासे) अवश्यमपेक्षितानि भवन्ति । परं 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' इति श्रुतेः सिद्धान्तार्थं परित्यज्यापातरमणीयार्थं चाङ्गीकृत्य ब्रह्मेतरवस्तूनां पारमार्थिकास्तित्वमनङ्गीकुर्वतामध्यासेऽवश्यमपेक्षिताः ये विशेषसामान्यादयो धर्माः तेषां तद्धर्मज्ञपुरुषस्य चाभावात् कथमयं अध्यासो युक्तो भवेत् । ब्रह्मापि निर्गुणं निर्धर्मकं च वदतां मतेन तदध्यासस्याधिष्ठानं भवितुं नार्हति । अतोऽध्यासस्यस्यावश्यंभूतानां कारणानामभावादङ्गीकृतोऽयमध्यासोऽध्यासविलास एव भवितुमर्हति । एतदध्यासविषये जयतीर्थयतिवरैः सुधायां बहु पराक्रान्तं तत् तत्रैव द्रष्टव्यम् । विस्तरभिया नात्र तत् संग्रहीतुं पारयामः ।

प्रसङ्गतो विश्वमिथ्यात्वं साधयितुमद्वैतिभिरङ्गीकृतमनुमानप्रमाणमपि किञ्चिद् विवेचयामः । अनुमाने पक्षसपक्षहेतुदृष्टान्तानामवश्यंभावादद्वैतिनां मते ब्रह्मभिन्नपदार्थानां मिथ्यात्वात्, पक्षसपक्षादीनामेवाभावात्, तदपि आत्मनो व्यापारं कर्तुं नैव प्रभवेत् । अन्यच्च 'विश्वं मिथ्या दृश्यत्वात् शुक्तिरज्जुवत्' एवंविधान्यनुमानानि 'विश्वं सत्यं दृश्यत्वात् आत्मवद्' इत्येवमादिभिः सत्प्रतिपक्षै-

दूषयितुं शक्यन्ते एव । आत्मनः सत्यत्वविषये न केषामपि विवादः । अह-मस्मीति सर्वानुभवस्य जागरूकत्वात् । अतो नानुमानेन विश्वमिथ्यात्वं सिध्यति । सर्वेषां पदार्थानामर्थक्रियाकारित्वेन (सम्यग् व्यवहारास्पदत्वेन) विश्वसत्यत्वं, घटः पटाद्भिन्न इति प्रत्यक्षेण प्रमाणेन च भेदश्च सुदृढो भवति । शब्दप्रमाणमपि विश्वसत्यत्वं दृढीकरोति । तथा हि श्रुतयः । "यच्चिकेत सत्यमित् तन्न मोघम् ।" अस्यार्थः, (परमात्मा) यद् विश्वं चिकेत चकार तत् सत्यमित् सत्यमेव । यतो मोघमर्थक्रियाद्यनुपयुक्तं (निष्फलं) तन्न । 'कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथा-तथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ।' कविः क्रान्तदर्शी सर्वज्ञः, मनीषी सर्वमनसां एषिता प्रेरकः, परिभवति सर्वान् इति परिभूः सर्वोत्तमः, परमनपेक्ष्य स्वयं भवतीति स्वयंभूः अनन्याश्रयः स्वतन्त्रः परमेश्वरः, अर्थान् महदहंकारादि-पदार्थान् शाश्वतीभ्यः समाभ्यः (सप्तम्यर्थे पञ्चमी) । सर्वेष्वपि कालेषु इत्यर्थः । याथातथ्यतः तथाभावमनतिक्रान्तं यथातथं तस्य भावो याथातथ्यं तस्माद् याथातथ्यतः, नाम वास्तवत्वेनैव, व्यधात् निर्मितवान् । 'विश्वं सत्यं मघवाना युवोरिदापश्चन प्रमिनन्ति व्रतं वाम् ।' हे मघवानौ यशस्विनौ धनवन्तौ च इन्द्राबृहस्पती तच्छब्दवाच्यपरमात्मन्, युवोः युवयोरधीनं विश्वं सत्यमित् सत्यमेव । कुतः । वां युवयोर्जगत्सर्जनादिरूपं व्रतं कर्म आपश्चन सर्वा देवता अपि प्रमिनन्ति जानन्ति । 'अथैनमाहुः सत्यकर्मेति सत्यमेवेदं विश्वमसौ सृजते । अथैनमाहुर्नित्यकर्मेऽति नित्यमेव हि असौ कुरुते' । 'यत्सत्यरूपं जगदेतदीदृक् सृष्ट्वा त्वभूत् सत्यकर्मा महात्मा ।' एतासां निगदेनैवार्थाः स्पष्टं प्रतीयन्ते । इत्यादिश्रुतिभ्यो विश्वं सत्यं, तत्कारणं च परमेश्वरः इति स्पष्टमवगम्यते । तथैव विश्वं न परमात्मनि भ्रान्तिकल्पितं, न वा परमात्मा तस्य विवर्तोपादानकारणं, एतदपि ज्ञायते । अन्यच्च परमात्मा विश्वस्य निमित्तकारणं इत्येतदपि 'यो नः पिता जनिता यो विधाता, धामानि वेद भुवनानि विश्वा', 'यतः प्रसूता जगतः प्रसूतिस्तोयेन जीवान् व्यससर्ज भूम्याम्' इत्यादिश्रुतिभ्योऽवगम्यते । अथ श्रुतिभि-र्विवर्तवादं निराकुर्मः । तथाहि 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते' 'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः, आकाशाद्वायुः, वायोरग्निः, अग्नेरापः, अद्भ्यः पृथिवी, पृथिव्या ओषधयः, ओषधीभ्योऽन्नं, अन्नात् पुरुषः ।' 'एतस्मात् जायते प्राणः ।' इत्यादिश्रुतिभ्यो नहि विश्वं परमात्मनि भ्रान्तिकल्पितमिति स्पष्टं प्रतीयते । यतः कल्पिते (अध्यस्ते) पदार्थे 'जायते' 'संभूतः' एवमादयः प्रयोगा नाम्नायेषु दृश्यन्ते । न वा शुक्तिकाया रजतं जायते, रज्वा सर्प उद्भूतः, एतादृशाः प्रयोगाः स्मृतिपुराणादिषु अर्वाचीनेष्वपि अभियुक्तग्रन्थेषु चोपलभ्यन्ते । अन्यच्च विवर्तवादे यथा रज्जौ सर्पभ्रमः, तथैव सर्पेऽपि रज्जुभ्रमः सुशकः । तथा च यथा आत्मनो विवर्तोपादानादाकाशाद्युत्पत्तिस्तथा तद्विपरीतादपि आकाशादिविवर्तो-

पादानकारणभूतेभ्यः पदार्थेभ्यो ब्रह्मणोऽप्युत्पत्तिः संभवेत् । ततश्च न ब्रह्म एव आकाशस्य कारणं, आकाश एव वायोः कारणमिति क्रमनिश्चयः स्यात् । श्रुतिवाक्यात्तु क्रमनिश्चयोऽवगतो भवति । व्यवहारानुभवाच्च । अपि चैकाधिकरणक एव भ्रमोऽस्ति, इति निश्चयो नास्ति । यतः सर्पभ्रमे रज्जुः पुष्पमाला जलरेखादिकं च कारणं भवति इति प्रसिद्धमेव । तथा च विवर्तवादे केवलं ब्रह्मैव विश्वस्य कारणमिति निश्चेतुं न शक्येत । यतो वस्तुभ्रमे विविधानि कारणानि संभवन्ति । अतो विवर्तवादे सर्वा अपि उत्पत्तिश्रुतयो व्याहता भवन्ति ।

ननु 'तत्त्वमसि' 'अहं ब्रह्मास्मि' इत्यादीनि वाक्यानि जीवब्रह्मणोरैक्यं प्रतिपादयन्ति । तच्चैक्यं विश्वमिथ्यात्वं विना न संघटते । तत् कथं भवन्तो विश्वसत्यत्वमङ्गीकृत्य जीवब्रह्मणोर्भेदं ब्रुवन्तः 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यविरोधकाः न भवेयुः इति चेन्न । तत्त्वमस्यादीनां जीवब्रह्माभेदपरत्वाभावात् । ब्रह्मणः सर्वज्ञत्वात् सर्वनियामकत्वात्, स्वतन्त्रत्वात्, सर्वकर्तृत्वात्, जीवस्य च अल्पज्ञत्वात्, परतन्त्रत्वात्, अल्पकर्तृत्वाच्च, कथमेतयोर्विरुद्धधर्मयोरभेदः संभवेत् । तर्हि 'तत्त्वमसि' इत्यस्य को वा वाक्यार्थः, ब्रह्मणोऽपि सर्वज्ञत्वादयो धर्माः कुतोऽवगताः, कथं च ते सत्याः, इति सविशेषं विचारं कुर्मः ।

'तत्त्वमसि' इति छान्दोग्ये षष्ठाध्यायेऽष्टमखण्डमारभ्य षोडशखण्डपर्यन्तं प्रतिखण्डं भिन्नभिन्नदृष्टान्तपूर्वकमुल्लिखितमस्ति । तस्याद्वैतमतानुसारेण प्रथमतोऽर्थं विविच्य, पश्चात् सिद्धान्तार्थं दर्शयामः । अस्मिन् वाक्ये 'तत् त्वं असि' इति त्रीणि पदानि सन्ति । तत्र तत्पदेन सर्वज्ञत्वगुणविशिष्टं ब्रह्म अभिधीयते । 'त्वं' शब्देन अल्पज्ञत्वगुणविशिष्टो जीवः कथ्यते । 'असि' पदेन उभयोरभेदो वर्ण्यते । विरुद्धधर्मयोरेतयोरभेदः कथं स्यात् । अतः जहदजहल्लक्षणया सर्वज्ञत्वाल्पज्ञत्वधर्मपरित्यागेन तत्त्वंपदाभ्यां केवलं चैतन्यमेव लक्ष्यीक्रियते । तस्य च परमार्थतः सद्रूपस्य एकत्वात् ऐक्यमिति । अमुमेवार्थं सुस्थिरीकर्तुं भगवत्या श्रुत्या नवविधदृष्टान्तपूर्वकं नववारं उपदेशः कृत इति । तत्र तावदिदं प्रथमतः प्रसङ्गतो विचार्यते । यत् तत्त्वमस्यादिश्रुतीनां प्रामाण्यं तद् व्यावहारिकं वा पारमार्थिकं वा । व्यावहारिकं चेत् परमार्थतोऽप्रमाणभूतयानया श्रुत्या कथं पारमार्थिकं तत्त्वमवगतं भवेत् । पारमार्थिकं प्रामाण्यं चेत् कथमियमेव श्रुतिः पारमार्थिका, 'अग्निमीळे' इत्यादयः अन्याः अपारमार्थिकाः । उभयोः श्रुतित्वाविशेषात् । व्यावहारिकं प्रामाण्यं चेद् आसामपि तद्भवतु । नास्ति चेत् सर्वासां श्रुतीनां मास्तु । नेदं 'तत्त्वमस्यादयः' श्रुतयः परमार्थतः प्रमाणं 'अग्निमीळे' इत्यादयो न इति अर्धजरतीयं युक्तम् । न हि कुक्कुट्याः अर्धं पाकाय भवति, अर्धं प्रसवाय इति विचारकुशलैर्भवद्भिर्ज्ञायते एव । परमार्थतोऽप्रमाणभूतापि सत्यार्थावेदिका इति तु न विचारक्षमम् । इति अलं प्रसक्तानुप्रसक्त्या ।

प्रस्तुतमनुसरामः। तत्र तावल्लक्षणाविषये प्रथमं विचारः क्रियते। लक्षणा हि अगतिकगतित्वेन वाक्यार्थोपपत्तये प्रधानार्थपरित्यागेन कथमप्याश्रीयते। तथा चाभिधावृत्त्या प्रतीयमानस्य प्रधानभूतस्य शब्दार्थस्य संकोचो यथा स्वल्पो भवेत् तथा सा स्वीकार्येति सर्वसंमतम्। तथा च प्रकृतवाक्ये तत्पदार्थपरित्यागेनैवान्वयोपपत्तौ किमित्युभयोः पदयोः संकोचोऽङ्गीक्रियते। तत्सदृशस्त्वमिति तत्पदस्यैव गौण्या लक्षणयान्वयोपपत्तौ उभयपदार्थपरित्यागे मानाभावात्। चैतन्यादिधर्मैर्जीवस्य परमात्मना सादृश्यमस्ति इति न कापि अनुपपत्तिरेतादृशलक्षणास्वीकारे। अपरं चैतदपि मनसि निधातव्यं यदियं मायावादिभिः स्वीकृता या जहदजहल्लक्षणा, सा न्यायव्याकरणमीमांसादिशास्त्रेषु नामतोऽपि नोपलभ्यते। केवलमद्वैतवादिभिरेव तत्त्वमस्यादिषु त्रिचतुरेषु वाक्येषु स्वसिद्धान्तोपपत्तये कल्पिता दृश्यते। अतो नेयं सर्वशास्त्रसंमता, इत्यनिच्छतापि भवता अङ्गीकार्यमेव। अपरं च अन्वयोपपत्त्यर्थं लक्षणा स्वीकार्या चेत्, तथार्थो लक्षणीयो यथा लक्षितेऽर्थे प्रमाणान्तराणां विरोधो नापतेत्। अत एव गङ्गायां घोष इत्यत्र गङ्गापदेन गङ्गास्थनौका न गृह्यते। तादृशार्थस्वीकरणेनान्वयोपपत्तावपि प्रत्यक्षप्रमाणविरोधापातात्। यतः प्रत्यक्षतरतीरे एव घोषो दृश्यते। तथा प्रकृतेऽपि तत्त्वमसीत्यत्र इतरप्रमाणाविरोधी एव पदार्थो लक्षणीयः। तथा च तत्त्वंपदयोर्लक्षणया चैतन्यमात्रार्थे लक्षिते, तेन चाभेदे साधिते, तस्य प्रत्यक्षशब्दप्रमाणाभ्यां बाधितत्वात् नैतादृशोऽर्थो लक्षणया स्वीकर्तुं शक्यते। तथा हि अहमज्ञ इति जीवस्याल्पज्ञत्वं सर्वजनप्रत्यक्षम्। परमात्मनः सर्वज्ञत्वादिकं च 'यः सर्वज्ञः सर्ववित्।' 'विष्णोर्नु कं वीर्याणि प्रवोचं यः पार्थिवानि विममे रजांसि।' 'न ते विष्णो जायमानो न जातो देव महिम्नः परमन्तमाप।' 'बृहत्वाद् बृंहणत्वाच्च ब्रह्म इत्यभिधीयते।' इत्यादिश्रुतिस्मृतिवाक्यसंघैः परमात्मनः सर्वज्ञत्वादिगुणजातं समुद्घोषितमस्ति। तथा च प्रत्यक्षशब्दप्रमाणाभ्यां समर्थितस्यार्थस्य लक्षणया कथं बाधः स्यात्। अन्यथा 'अग्निः शीतलः पदार्थत्वात् जलवत्।', 'सुरा पेया द्रवद्रव्यत्वाद्दुग्धवत्।' एवंविधानुमानैः साधिता अर्था अपि प्रमाणपदवीं गच्छेयुः। यतो भगवत्स्वरूपं तद्धर्माश्च केवलं श्रुत्यैव बोध्यन्ते। न केवलानुमानेन प्रत्यक्षेण वेति भवतामपि अनुमतम्। अन्यथानुमानेन प्रधानमेव जगतः कारणं वदद्भिः सांख्यैः किमपराद्धमवैदिकत्वेन एव यद् भवद्भिस्तेऽनादृताः। तथा च 'तं त्वा औपनिषदं पुरुषं पृच्छामि।' 'अथ परा यया तदक्षरमधिगम्यते।' 'वेदा विदन्ति ह्येवैनं तस्माद्वेदस्य वेदता।' 'वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो।' 'शास्त्रयोनित्वात्।' इत्यादिश्रुतिस्मृतिसूत्रकदम्बैः श्रुतिबोध्यत्वमेवोद्घोषितमस्ति। तत्कथं सुसंगतं भवेत्। अतो वेदैरेव परमात्मा तद्गुणाश्च बोद्धव्याः। तत एव च जगदुत्पत्त्यादीनां कर्ता सर्वज्ञः सर्वशक्तिः इति मन्तव्यम्। एवंविधस्य चास्याल्पज्ञेन परतन्त्रेण परिमितशक्तिकेन जीवेन सह

ऐक्यं कथमपि न संभवति। नहि परमात्मनः श्रुतिस्मृत्युक्ता गुणा मिथ्या भवेयुः। तथा शङ्किते श्रुतिप्रामाण्यं दत्ततिलाञ्जलि स्यात्। ततश्च वास्तवगुणनिधानेन परमात्मना सहाबाधिताल्पगुणकेन जीवेन विरुद्धधर्मकेन यदि ऐक्यं भवेत् तर्हि 'यजमानः प्रस्तरः' 'आदित्यो यूपः' इति श्रुतिवाक्यानामपि अनयैव रीत्या ऐक्यप्रतिपादकता स्यात्। सा च न कैरपि अङ्गीक्रियते। अन्यच्च 'अग्निर्जलं' इत्यत्रापि अग्निशब्देन औष्ण्यशून्योऽग्निर्गृह्यते। जलशब्देन शैत्यशून्यं तद्गृह्यते। उभयोरपि ऐक्यं च जहदजहल्लक्षणयाङ्गीक्रियते इति केनचिन्मायिना प्रतिपादितं चेत् किमग्निजलयोरैक्यं विचक्षणः पुरुषोऽङ्गीकुर्यात्। स एवं ब्रूयात्। भो तपस्विन् विचक्षण, अबाधितप्रत्यक्षप्रमाणेन विरुद्धधर्मत्वेन ज्ञातयोरग्निजलयोर्न कथमपि ऐक्यं घटेत। तद्वदेव श्रुतिस्मृत्यादिप्रमाणैः सत्यतया निश्चितयोः अबाधितविरुद्धधर्मयोः जीवेशयोरभेदो न कथमपि संघटेत। अन्यच्च तुष्यतुन्यायेन जहदजहल्लक्षणायाः स्वीकारेऽपि तत्त्वमस्यादिवाक्यानां चैतन्यं चैतन्यमस्ति इत्येव अर्थः स्यात्। ततश्च घटो घटोऽस्तीति वाक्यवत् तदनुपपन्नं भवेत्। यथा घटस्य घटत्वे न केषामपि विवादः। तेन चाविवादितार्थकथनाय भगवत्याः श्रुतेः तत्त्वमसीति नववारमुपदेशो बालभाषितलीलामनुकुर्यात्। अपरं च लोके ऐक्यं नाम पदार्थयोः पदार्थानां वा कथमपि व्यावहारिकमेकीभवनम्। तच्च अन्यतरपदार्थविनाशेन अथवा तेषां निरन्तरसंश्लेषेन वा कल्प्यते। तत्र चैतन्यस्य विनाशस्य केनापि अनङ्गीकृतत्वात् न प्रथमः कल्पो युक्तः। द्वितीयेऽपि ब्रह्मणो निष्क्रियत्वात् न संश्लेषणक्रिया संजाघटीति। पक्षद्वये व्यावहारिकमपि एकीभवनमशक्यमेव। 'अतो भक्षितेऽपि लशुने न प्रशान्तो व्याधिः' इति न्यायेन लक्षणायाः स्वीकारेऽपि नाभेदः सिध्यति, इति अलं परप्रद्वेषकारिणा दोषविवेचनेन। अस्तु, एवं 'तत्त्वमसीति वाक्यार्थे' जहदजहल्लक्षणया ऐक्यप्रतिपादके स्वीकृते बहवो दोषाः अहमहमिकया समुत्तिष्ठन्ति। अतः, तत्पदस्य लक्षणया तदधीनः तदाश्रयः, तज्जातः तत्सदृशो वा इत्येवं कमपि अर्थं स्वीकृत्य प्रमाणान्तराविरोधितया अन्वयानुपपत्तिः परिहर्तव्या। सर्वप्रमाणसिद्धो जीवेशयोर्भेदश्चानुसर्तव्यः। एवंकरणे चैतत्प्रकरणस्थानि 'सन्मूलाः सौम्य इमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः', 'सति संपद्य न विदुः', 'सत आगम्य न विदुः', 'अत्र वाव सत्सौम्य निभालयसे अत्रैव किल इति' एवमादीनि भेदबोधकानि वाक्यानि सुस्थिराणि भवेयुः। भेदबोधकैः शकुनिसूत्रपण्डितगान्धारादिदृष्टान्तैरवबोधितो जीवेशयोर्भेदोऽपि अनुसृतो भवेत्। अपरं च 'तत्त्वमसि' 'अहं ब्रह्मास्मि' एतत्सजातीयेषु यजमानः प्रस्तरः, आदित्यो यूपः, इत्यादिवाक्येषु मीमांसकवरेण्यैर्यथा गौणी लक्षणा स्वीकृता, तथैवात्र स्वीकृता चेद् वाक्यार्थविवेचनकुशलानां मीमांसकाचार्याणां परिपाटी अपि अङ्गीकृता भवेदिति शास्त्रसंप्रदायविदां नोपदेष्टव्यं भवति।

'अहं ब्रह्मास्मी'ति वाक्येऽहं ब्रह्माधीनोऽस्मि इति वाक्यार्थो लक्षणया संपादनीयः। तत्रापि जहदजहल्लक्षणया ऐक्यार्थाङ्गीकारे पूर्वोक्ता दोषाः प्रस्फुरन्त्येव। अन्यच्च तत्र तत्र एतादृशस्थलेषु शङ्कराचार्यैरपि अजहल्लक्षणा एव स्वीकृता दृश्यते, न तु जहदजहल्लक्षणा। तथा हि बृहदारण्यके 'अहं ब्रह्म त्वं ब्रह्म' 'अहं लोकः त्वं लोकः', 'अहं यज्ञः त्वं यज्ञः' इत्यादौ अहं नाम मत्कर्तृकं ब्रह्म वेदाध्ययनं, त्वं नाम त्वत्कर्तृकं ब्रह्म वेदाध्ययनमिति अहमादिपदानां लक्षणया अर्थः स्वीकृतः। तथा छान्दोग्येऽपि 'सर्वकामः सर्वगन्धः' इत्यादिषु सर्वकामस्वरूपः सर्वगन्धस्वरूपः एवमभेदार्थे संभवति तं परित्यज्य बहुव्रीहिसमासमाश्रित्य सर्वकामस्वामिक इति भेदपर एव अर्थः स्वीकृतः। इत्यलं परपक्षासारतोद्घाटनेन। एतावत्कृतेन विवेचनेन अहं ब्रह्मास्मीत्येतस्य अहं ब्रह्माधीनोऽस्मीत्यर्थो नापूर्व इति प्रमाणविचक्षणैराकलितं भवेत्।

अद्वैतवादसमर्थनार्थं मायावादिनोऽन्यान्यपि कानिचिच्छ्रुतिवाक्यानि दर्शयन्ति। तेषां संक्षेपतो विवेचनं कुर्मः। ते हि ब्रुवन्ति 'यथा सौम्य एकेन मृत्पिण्डेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्यात्' अनेन श्रुतिवाक्येन एकेन कारणविज्ञानेन सर्वकार्यजातं विज्ञातं भवति इति स्पष्टमाम्नायते। यथा कारणभूताया मृत्तिकाया विज्ञानेन कार्यभूतं घटशरावादिकं ज्ञायते, तथा कारणभूतस्य ब्रह्मणो ज्ञानेन कार्यभूतमखिलं जगद् ज्ञायते। तथा च, यथा घटशरावादीनां मृत्तिकातो नान्यत्वं, केवलं वाचारम्भणो विकारो नामधेयं, एवमेव विश्वस्य ब्रह्मणो नान्यत्वं, अज्ञानकल्पितं हि नामरूपादिकम्। अर्थाद् ब्रह्म एव सत्, विश्वं तु मिथ्येति अद्वैतवादिभिः श्रुतिप्रामाण्यपुरःसरं कृतोऽयमुद्घोषोऽयुक्तः। यतोऽद्वैतिनो हि निमित्तं, उपादानं, विवर्तोपादानं इति त्रिविधानि कारणानि मन्यन्ते। तत्र परमात्मनो विश्वस्य निमित्तकारणत्वस्वीकारे न विवादः। अस्माभिरपि 'यो नः पिता' इत्यादिश्रुतिवाक्यैस्तथैवाङ्गीकारात्। नाप्यत्र तदुपयोगः। यतो निमित्तकारणभूतस्य कुम्भकारस्य ज्ञानेन घटशरावादीनां ज्ञानं हि लोकेऽदृष्टचरम्। अतः कारणज्ञानेन कार्यज्ञानविषये उपादानकारणं स्वीकार्यम्। अस्मिन् प्रकरणे श्रुतौ दृष्टान्ता अपि उपादानकारणभूता मृत्सुवर्णलोहादय एव निर्दिष्टाः। परमद्वैतनये नैतदुपपन्नं भवति। उपादानकारणं हि परिणामिकारणापरपर्यायेण निर्दिश्यते। तथा हि पयसः परिणामः (विकारः) दध्यादिकं, अथवा मृत्तिकासुवर्णादीनां परिणामाः शरावकटकादयः। तथा च उपादानकारणं स्वयं विकारमनुभूय कार्यत्वं प्राप्नोति। ब्रह्म तु 'निर्विकारोऽक्षरः शुद्धः' इत्यादिश्रुतिभिरविकारितया प्रतिज्ञायते। अतो न तद् मृत्सुवर्णवद् विकारित्वेन जगतः कारणं भवितुमर्हति। अत उपादानकारणवादोऽपि नाद्वैतिनामुपयुक्तोऽत्र भवति। अतो

विवर्तवादस्तैरङ्गीकृतः। विवर्तवादो नाम यथा शुक्तिकायामज्ञानेन रजतभ्रान्तिर्जायते तथा अविद्यया ब्रह्मणि जगद्भ्रान्तिर्जायते। न वास्तवं नाम जगदिति। सोऽयं विवर्तवादोऽध्यासमूलक एव ।अध्यासश्चात्र तत्कारणाभावान्नोपपन्न इति पूर्वं दर्शितमेव। 'तुष्यतु' न्यायेन अध्यासस्वीकारेऽपि शुक्तिरजतस्थले यथा शुक्तिज्ञानेन रजतज्ञानं निवृत्तं भवति तथा ब्रह्मज्ञानेन जगतो ज्ञानं निवृत्तं भवेत्। परं भगवती श्रुतिस्तु 'येनाश्रुतं श्रुतं भवति' एवमादिभिः, एतत्प्रकरणस्थैर्वचनैर्ब्रह्मज्ञानेन जगतो ज्ञानं भवतीत्युपदिशति । तदेतद्विवर्तवादेऽत्यन्तमसंगतं भवति । उपादानकारणज्ञानेन कार्यावगमनं युक्तम्। यतस्तत्र कारणानुवृत्तिर्दृश्यते। नारोपादिकं किञ्चिदस्ति। अद्वैतिभिस्तु विकारत्वापत्त्या ब्रह्मण उपादानकारणत्वं न स्वीक्रियते, परं तदर्थं विवर्तवादोऽङ्गीक्रियते। परं तेन 'येनाश्रुतं श्रुतं भवति' इत्यादयः श्रुतयोऽनुपपन्ना भवन्ति। अतो नैतद् व्याख्यानं समीचीनम्। अतः 'एकेन मृत्पिण्डेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात्' इत्यस्य मृत्पिण्डज्ञाने सादृश्याद् घटशरावादिज्ञानं यथा भवति तथा ब्रह्मणोऽवगतौ सत्यत्वादिधर्मेण सादृश्याज्जगतोऽपि ज्ञानं भवति। एवं सादृश्यधर्मेणाविज्ञातस्य विज्ञानमङ्गीकार्यम् । अथवा यथा प्रधानपुरुषज्ञानेन ग्रामो ज्ञात इति व्यवहारो भवति, तद्वदत्र प्रधानब्रह्मणो ज्ञानेन तत्कार्यभूतमप्रधानं जगत् ज्ञातं भवतीति श्रुतेराशयो मन्तव्यः। आस्तामेतत्। सर्वथा विवर्तवादस्वीकारे 'अश्रुतं श्रुतं भवति' इत्यादीनि श्रुतिवचनानि अनुपपन्नानि भवन्तीति न विवर्तवादो युक्तः। तत्त्वमस्यादिवाक्यान्यपि नाभेदपराणि- 'तस्माद्वा एतस्मात्' इत्यादिश्रुतिभिः समुपादिष्टः सृष्ट्युत्पत्तिक्रमो न विवर्तवादे सुसंगतो भवति इति स्पष्टमेव। अत एतत्सर्वावलोचनेन 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' इत्यादिश्रुतिवाक्यानामेकं प्रधानमद्वितीयं स्वसमानान्यसहायरहितं ब्रह्म गुणपूर्णं एवमाद्यर्थं स्वीकृत्य सर्वासां श्रुतीनां यथा एकवाक्यता भवेत् तथा प्रयतितव्यम्। प्रत्यक्षानुमानप्रमाणानां च विरोधपरिहारे यावच्छक्यं प्रयतितव्यम्। ततश्च 'द्वा सुपर्णा' इत्यादिश्रुतिभिर्जीवब्रह्मभेदं स्वीकृत्य 'अजामेकां लोहितशुक्लकृष्णां' इत्यादिश्रुतिभिः 'प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि' इति भगवद्वचनानुरोधेन च प्रकृतिपुरुषौ अनादितया स्वीकृत्य जीवजडयोर्भेदः अङ्गीकार्यः। अन्ते च 'एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा' 'आदित्यवर्णं तमसः परस्तात्' इत्यादिश्रुतिवचनैर्भगवन्तं परमात्मानं सर्वनियामकं, सर्वव्यापकं, सर्वज्ञं, स्वतन्त्रं च विज्ञाय 'यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम्। तदा विद्वान् पुण्यपापे विधूय निरञ्जनः परमं साम्यमुपैति।' इति श्रुतिवचनानुरोधेन विमुक्तये तत्र द्रढीयसी भक्तिर्विधेया। तदुक्तं 'माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः। स्नेहो भक्तिरिति प्रोक्ता तया मुक्तिर्न चान्यथा॥' सा च मुक्तिः 'यमेष वृणुते तेन लभ्यः' इत्यादि-श्रुतिवचनैर्भगवत्प्रसादादेव लभ्यते। संक्षेपत एवं विज्ञातं भवेत्। यत्

श्रौतस्मार्तकर्मभिश्चित्तशुद्धिः कर्तव्या, ततः सच्छास्त्रविचारेण भगवज्ज्ञानमधिगन्तव्यम् । ततो ज्ञानपूर्विका परा भक्तिरनुष्ठातव्या, ततो भगवत्प्रसादः साधितव्यः, तस्माद् भगवत्प्रसादान्मोक्षो लब्धव्य इति । इति सर्वं मङ्गलम् ।

अत एव वैष्णवाश्चराचरनियामकं सर्वज्ञं सर्वकर्तारं सर्वशक्तिकं अनन्तगुणनिधानं भगवन्तं नारदशाण्डिल्यादिभिर्दर्शितमार्गेण प्रह्लादोपदिष्टेन नवविधया भक्त्या भजन्ते, विष्णुभक्तिविषयकं चापूर्वं यशो लभन्ते ।

तदुक्तं केनचिदर्वाचीनेन सद्वैष्णवकिङ्करेण

चकोरा एव चतुराश्चन्द्रिकापानकर्मणि ।
विष्णुभक्तिसुधास्वादे कुशला माध्ववैष्णवाः ॥

इति शम् ।

—×—

स्पृश्यास्पृश्यविचारः।

प्रायश्चित्तं चिकित्सां च ज्यौतिषं धर्मनिर्णयम्।
विना शास्त्रेण यो ब्रूयात्तमाहुर्ब्रह्मघातकम् ॥१॥ (वृद्धमनुः)

अथेदानीं अस्पृश्यस्पर्शविचारे किंचिद्विचिन्त्यते। तत्रादौ तावत् धर्मशास्त्रविनिर्णयाय प्राचीनैर्निबन्धकारैः एकमुखेनादृता प्रमाणपद्धतिर्विशदीक्रियते। प्रत्यक्षमनुमानं शब्दश्चेति त्रीणि प्रधानानि प्रमाणानि। धर्माचरणतत्फलयोः संबन्धस्य तथा फलीभूतस्वर्गादेश्च अप्रत्यक्षत्वान्न धर्मविषये प्रत्यक्षं प्रमाणमवतरति। अनुमानविषये पुरस्ताद्वक्ष्यामः। शब्द एव च धर्मविषये प्रधानं प्रमाणम्। शब्दो नाम अपौरुषेयो वेदः। तस्य पुरुषदोषासंस्पृष्टत्वात् धर्मविषये स्वत एव प्रामाण्यं रवेरिव रूपविषये। स्मृत्यादयस्तु वेदानुसारितया प्रमाणम्। उक्तं च मनुना 'स्मृतिशीले च तद्विदा' मिति। भट्टकुमारिलेनापि 'किं तु तस्याः (स्मृतेः) प्रमाणत्वं श्रुतिमूलत्वकारितम्' इति उद्घोषितम्। श्रुत्यनुकूलानि पुराणान्यपि प्रमाणीभवन्ति। तदुक्तं 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्। बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरिष्यति'॥ इति। याज्ञवल्क्योऽपि 'पुराणन्यायमीमांसा' इति पुराणस्य धर्मस्थानत्वं कथयति। स्मृतिमूलः शिष्टाचारोऽपि धर्मे प्रमाणतामवगाहते। शिष्टास्तु 'आर्यावर्तवासिनः कुम्भीधान्याः अलोलुपाः अगृह्यमाणकारणाः (धर्मे) विद्यायाः पारंगताः' इति भगवता पतञ्जलिना वर्णिताः। अयमप्याचारः श्रुतिस्मृत्योरनुकूल एव स्वीकार्यः प्रतिकूलस्तु त्याज्यः। तदुक्तं भट्टकुमारिलेन 'शिष्टं यावत् श्रुतिस्मृत्योस्तेन यन्न विरुध्यते। तच्छिष्टाचरणं धर्मे प्रमाणत्वेन गम्यते'। गौतमोऽप्याह 'देशजातिकुलधर्माश्च आम्नायैरविरुद्धाः प्रमाणम्' इति। तर्कोऽपि श्रुत्यनुकूल एव प्रमाणवचनार्थनिर्णयाय अनुसंधेयः। तदुक्तं मनुना 'आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्राविरोधिना। यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः॥ योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयात् (तर्कात्) द्विजः। स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः।' इति। महाकौर्मे च "श्रुतिसाहाय्यरहितमनुमानं न कुत्रचित्। निश्चयात्साधयेदर्थं प्रमाणान्तरमेव च॥ श्रुतिस्मृतिसहायं यत् प्रमाणान्तरमुत्तमम्। प्रमाणपदवीं गच्छेन्नात्र कार्या विचारणा॥ पूर्वापराविरोधेन कोऽत्रार्थोऽभिमतो भवेत्। इत्येतदूहनं तर्कः शुष्कतर्कं तु वर्जयेत्" इति। महाभारते च 'अचिन्त्याः खलु ये भावाः (धर्मादयः) न तांस्तर्केण योजयेत्' इति। पुरुषमतीनां वैरूप्यात् तर्कस्य अप्रतिष्ठात्वं 'तर्काप्रतिष्ठानात्' इत्यादिसूत्रेण भगवता बादरायणेनाप्यभिहितम्। 'श्रुत्यर्थविप्रतिपत्तौ च अर्थाभासनिराकरणेन सम्यगर्थनिर्धारणं तर्केणैव वाक्यवृत्ति-

निरूपणरूपेण क्रियते' इति अभिदधद्भिः श्रीमच्छंकराचार्यैः श्रुत्यर्थनिर्णयस्य साधनत्वेन तर्काभ्युपगमः सिद्धान्तितः। 'वेदः स्मृतिः सदाचारः' इत्यस्य विवेचनप्रसङ्गे विश्वरूपाचार्यप्रमुखैः सर्वैरपि धर्मपरायणैर्विद्वद्भिः श्रुत्यनुकूलतर्कस्यैव प्रामाण्यमङ्गीकृतम्। एवं धर्मविषये वेदस्यैव मुख्यप्रामाण्यं तदनुसारित्वेन चान्येषां इत्येतद्विषये एवंविधानि शतशः प्रमाणानि पुरस्कर्तुं शक्नुमः। परं विस्तरभियाऽत्रैव विरम्यते। अस्त्वेतत्। एतावता प्रबन्धेन इदं निष्पन्नं यद्धर्मे प्रमाणमूर्धन्या भगवती श्रुतिस्तदनुसारिण्यः स्मृतयः पुराणानि च। ततः श्रुत्यनुकूलाः सदाचारादयः अर्थाभासनिरासाय च श्रुत्यनुकूलस्तर्कः इति। एवं सति यत् आधुनिकैः पण्डितंमन्यैः श्रुतौ एतावानेव विषय आसीत् ततो बह्वोः कालादनन्तरं श्रुत्यनधिगताः बहवो विषया धर्मे प्रवेशमलभन्त। तथा केषांचिदपि शिष्टानामाचारः स्वतन्त्रमेव प्रमाणं तथा केवलतर्केणैव निबन्धकारैर्बहवोऽर्थाः कल्पिताः इत्यादि यज्जल्पितं तदधर्माभिनिवेशतया धर्मशास्त्रीयपद्धत्यनभिज्ञतया चेति ज्ञेयम्।

इतःपरमस्पृश्यविचारो वचनोपन्यासपूर्वकं वितन्यते। तथा हि मनुः 'दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतकीं तथा। शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति'। याज्ञवल्क्यः 'उदक्याशुचिभिः स्नायात्संस्पृष्टस्तैरुपस्पृशेत्। अब्लिङ्गानि जपेच्चैव गायत्रीं मनसा स्मरन्'। च्यवनः 'श्वानं श्वपाकं प्रेतधूमं......स्पृष्ट्वा सचैलं अम्भोवगाह्य उत्तीर्याग्निमुपस्पृश्य गायत्रीमष्टशतं जपेत्'। बृहस्पतिः 'शवस्पृष्टं दिवाकीर्तिं चितिं पूयं रजस्वलाम्। स्पृष्ट्वा त्वकामतो विप्रः स्नानं कृत्वा विशुध्यति॥' अङ्गिराः 'यस्तु च्छायां श्वपाकस्य ब्राह्मणो ह्यधिरोहति। तत्र स्नानं प्रकुर्वीत घृतं प्राश्य विशुध्यति॥' व्याघ्रपादः 'चण्डालं पतितं चैव दूरतः परिवर्जयेत्। गोवालव्यजनादर्वाक् सवासा जलमाविशेत्॥' पराशरमाधवः 'चण्डालश्वपचैः स्पृष्टो विण्मूत्रोच्छिष्ट एव च। त्रिरात्रेण विशुद्धः स्यात् भुक्तोच्छिष्टः षडाचरेत्।' एवं स्मृतिषु चाण्डालादिपदार्थानां अस्पृश्यत्वं स्पर्शे च प्रायश्चित्तमभिहितम्। तस्य च तुल्यबलवचनमन्तरा निषेधो विकल्पः संकोचो वा भवितुं नार्हति। न त्वेताः स्मृतयः श्रुतिप्रमाणरहिता इति मन्तव्यम्। यतः श्रुत्यविरुद्धाः स्मृतयः भगवता जैमिनिना 'विरोधे त्वनपेक्षं स्यादसति ह्यनुमान' मितिसूत्रेण स्मृत्यनुमेयाः श्रुतयो भवन्त्यष्टकादिस्मृतिवदिति एतादृशानां स्मृतिवचनानां श्रुतिमूलकत्वं निर्बाधं निर्णीतं विद्वद्भिर्ज्ञायत एव। निषेधादिविधायकं तुल्यबलप्रमाणं वचनं नोपलभ्यते। एवं सति वेदेषु विहिताः अनूदिता वा गवालम्भनादयो विषयः कलौ निषिद्धत्वेन स्मृतिषु परिगणिताः इत्युद्घोष्य तान्दृष्टान्तीकृत्य च आधुनिकानां आचारानुरोधादन्त्यजादीनां स्पर्शा अपि निर्दोषत्वेन परिगणनीयाः इति ये रारटन्ति तेषां तत् आरटनं धर्मशास्त्रानभिज्ञतया ज्ञेयम्। यतो नाद्यापि अन्त्यजादीनां स्पर्शादयः धार्मिकैः शिष्टैरङ्गीकृताः। यैरङ्गीकृताश्च तेषां धर्मविषये शिष्टत्वं न कैरप्यनुमतम्। अतः शिष्टाचारादस्पृश्यानां नास्पृश्यत्वं

इत्युक्तिः साहसमात्रम्। अपरं च गवालम्भनादयः श्रौताः विधयो न नित्यत्वेन विहिताः सन्ति। श्राद्धे मांसपाकोपि 'द्वौ मासौ मत्स्यमांसेन त्रीन् मासान् हरिणेन तु' इत्यादिभिर्वचनैः काम्य एव। नियोगस्यापि 'अपुत्रां गुर्वनुज्ञानात् देवरः पुत्रकाम्यया' इति काम्यत्वमेव स्पष्टं दर्शयति न नित्यत्वम्। काम्याकरणे च पातित्यं नास्ति न वा प्रायश्चित्तार्हता। अतो देशकालानुरोधेन केषांचित्काम्यानां स्मृतिषु निषिद्धता चेन्न तेन श्रुतिविरुद्धत्वं भवति। ततश्च तद्दृष्टान्तेन स्मृत्यनुमितश्रुतिविहितं अन्त्यजादिस्पर्शादीनां निर्बाधं प्रायश्चित्तं धार्मिकैः परिहर्तुं न शक्यते। जैमिनिना विरोधे त्वनपेक्षं स्यादसति ह्यनुमानं इति सूत्रेण स्मृत्यनुमेयाः श्रुतय इति स्पष्टमभिहितम्। कलौ पञ्च न कुर्वीत भ्रातृजायां कमण्डलुम्' इत्यादिवचनेन सामान्यतः प्राप्तस्य संन्यासनिषेधस्य 'यावद्भेदविभागोस्ति' इत्यादि विशेषवचनैरपवादितत्वात् संन्यासस्वीकारे न दोषोस्तीति धर्मशास्त्राभिज्ञैर्ज्ञायत एव।

'अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न तु' इति वचनखण्डं पुरतः कृत्वा 'यद्यपि श्रुतिस्मृतिषु कश्चिदाचारोऽनुमतो दृष्टो वा तथापि यदा स लोकानां शिष्टानां वा विद्वेषपात्रं भवति तदा स तैस्त्यज्यते तत्त्यागेन च ते शिष्टा नाधार्मिका भवन्ति' इति यत्कैश्चित्प्रलपितं तत्साहसमात्रम्। यतः विज्ञानेश्वरादिभिः अनेन वचनेन मधुपर्के वैकल्पिकं गोवधादीनामेव निषेधोङ्गीकृतः। विश्वरूपाचार्यैस्तु 'अस्वन्तं लोकविद्विष्टं इति पाठमङ्गीकृत्य स च एवं विवृतः 'लोकविद्विष्टं सर्वजनानभ्युपगतम्। गोवधादि' इति केचित्। तदयुक्तं विधानानर्थक्यात्। अतो लोकं कर्मसाध्यं ये जानन्ति ते लोकविदो मन्वादयस्तैर्द्विष्टं नाचरेत्। उपपन्नेपि अयं धर्मः इति स्वयमभिमानेन मन्वादिभिर्निन्दिते न प्रवर्तेतेत्यर्थः'। अयमेवार्थः 'कर्मणा मनसा वाचा यत्नाद्धर्मं समाचरेत्' इति पूर्वक्रमानुरोधात् युक्तः। 'धर्मं चाप्यसुखोदर्कं लोकविक्रुष्टमेव च' इति मानवीयवचनमपि काम्यासक्तानां सर्वस्वदानादीनामेव निषेधपरतया कुल्लूकभट्टादिभिः उपयोजितं तदेव समीचीनम्। अन्यथा 'धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः' इति धर्मजिज्ञासायां श्रुतेः परप्रामाण्यमङ्गीकुर्वतां तथैव 'यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः। स सर्वोऽभिहितो वेदे सर्वज्ञानमयो हि सः' इति स्वोक्तेः वेदमूलतां प्रतिजानानेन वेदविहितो नित्यो विधिः धर्मं चाप्यसुखोदर्कमित्यनेन कथं निषिध्येत।

सामान्यलोकानां विक्रुष्टत्वेन यदि श्रुतिबोधितानां कर्मणां परित्यागः स्यात्तर्हि पशुमूत्रशकृन्मिश्रितत्वेन पञ्चगव्यं पशुहिंसात्वेन यज्ञादयश्च परित्याज्या भवेयुः। तत्रापि इदानींतनानां शिष्टंमन्यानां विक्रुष्टत्वदर्शनात्। यत्कैश्चिदुक्तं 'श्वचाण्डालपतितोपस्पर्शने सचैलं स्नातः सद्यः पूतो भवतीति विज्ञायते' इति वसिष्ठवचनोपन्यासं कृत्वा अधुना सर्वे जनाः श्वानं मार्जारं वा स्पृष्ट्वा न कदापि सचैलं स्नानमाचरन्ति इति सर्वजनीनमेतत्। तद्वदेव चण्डालादीनां स्पर्शे स्नानाभावोङ्गी-

कृतश्चेद्धर्मो नष्टः इति प्राचीनैः किमर्थं कोलाहलः क्रियते। 'छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम्। पलाण्डुं गृञ्जनं चैव मत्या जग्ध्वा पतेद्द्विजः' इति मानवं वचनं अनादृत्य शिष्टा अशिष्टा वा पलांडुभक्षणे प्रायश्चित्तं नाचरन्ति तद्वदेव चण्डालादिस्पर्शे प्रायश्चित्तेऽननुष्ठिते सति किमर्थमेभिः कोलाहलः क्रियते इति तद्दुरुक्तमेव। यतः अनया परिपाट्या धर्मानुष्ठानं चेत् वराहकुक्कुटभक्षणेपि प्रायश्चित्तं न स्यात्। यतः वराहकुक्कुटभक्षणानिषेधवचने एव पलाण्डुगृञ्जनादीनां समावेशः पलाण्ड्वादीनां भक्षणे च आधुनिकाः प्रायश्चित्तं नाचरन्ति तद्वत् तत्सह-पठितवराहकुक्कुटादीनामपि भक्षणे प्रायश्चित्तं नाचरणीयं भवेत्। अपि नामैतत् धर्ममार्तण्डानां सारमेयं दृष्टान्तीकृत्य चाण्डालस्पर्शं निर्दोषतयाङ्गीकुर्वतां अनुमतं भवेत्। न कोपि धर्मशास्त्रज्ञो मनसाप्येवं चिन्तयेत्। वस्तुतः मन्वादिभिः एतादृशेषु वचनेषु सामान्यतया निषेध्याः पदार्थाः समाहृताः सन्ति न ते सर्वे समानाः। तेषां निषेध्यत्वे तारतम्यं जागर्त्येव। अत एव 'मार्जारश्चैव दर्वी च मारुतश्च सदा शुचिः' 'नाभेरूर्ध्वं करौ मुक्त्वा शुना यद्युपहन्यते। तत्र स्नानमधस्तात् चेत् प्रक्षाल्याचम्य शुध्यति' "चाण्डालं पतितं चैव दूरतः परिवर्जयेत्" 'यस्तु छायां श्वपाकस्य ब्राह्मणो ह्यधिरोहति। तत्र स्नानं प्रकुर्वीत घृतं प्राश्य विशुध्यति' इत्यादिवचनैः लघु-महत्प्रायश्चित्तविधानं विफलं स्यात्।

'रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च। कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते चान्त्यजाः स्मृताः' इति वचनं पुरस्कृत्य अनेन वचनेन यदि रजका अपि अन्त्यजाः तत्स्पर्शः तद्धौतवस्त्रादीनां च स्पर्शः सर्वैरङ्गीक्रियते तर्हि किं चण्डालेनापराद्धं यतस्तत्स्पर्शो दूरतः परिह्रियते इति केचन प्राचीनानाक्षिपन्ति। अयमप्याक्षेपः न विचारक्षमः। यतः 'स्याच्चण्डालस्तु जनितो ब्राह्मण्यां वृषलेन यः' इति नामलिङ्गानुशासनात् चण्डालापरपर्यायान्त्यजशब्दस्य ब्राह्मण्यां वृषलाज्जातत्वरूपो मुख्यो वाच्यार्थः। रजका-दीनां तु 'रजकश्चर्मकारश्चेति' वचनेनातिदिष्टः न त्वतिदिष्टः उपदिष्टतुल्यो भवति इति अतिदिष्टात् उपदिष्टं बलीयः इति न्यायेन सर्वैर्ज्ञायत एव। अन्यथा भवन्मते रजककन्यया सह चण्डालपुत्रस्य विवाहोऽपि अनेन स्मृतिवचनेन उपपन्नः स्यात्। अपरं च 'सामान्यातिदेशे विशेषानतिदेशः' अयमपि न्यायः सर्वविद्वदनुमतः। अन्यथा 'चाण्डालं पतितं चैव' इत्यादीनां चाण्डालस्पर्शे सचैलस्नानादिविधायकानां वचनानां 'रजकं चर्मकारं च नटं धीवरमेव च। बुरुडं च तथा स्पृष्ट्वा शुध्येदाचमनाद्द्विजः' एवंविधानां अतिदिष्टान्त्यजत्वानां रजकानां स्पर्शे च केवलमाचमनादिस्वल्पप्रायश्चित्त-विधायकानां वचनानां कथमुपपत्तिर्भवेत्। तथा च रजकानां अन्त्यजातिदेशः रजकश्चर्मकारश्च इत्यस्य अव्यवहितेन पुरोवर्तिना 'भुक्त्वा चैषां स्त्रियो गत्वा पीत्वापः प्रतिगृह्य च। कृच्छ्राब्दमाचरेत् ज्ञानादज्ञानादैन्दवद्वयम्' इति वचनेन विहित-स्यान्नपानस्त्रीगमनादीनां प्रायश्चित्तस्य प्राशस्त्यार्थमिति ज्ञेयम्। एतदभिप्रायेणैव

विज्ञानेश्वरेणापि 'प्राजापत्यं चरेत्प्राज्ञः' एतद्वचनव्याख्यानावसरे 'अन्त्यजाश्च अत्र 'चण्डालः श्वपचः क्षत्ता सूतो वैदेहिकस्तथा। मागधायोगवौ चैव सप्तैतेन्त्यावसायिनः' इति मध्यमाङ्गिरोदर्शितात् ज्ञातव्याः, न तु 'रजकश्चर्मकारश्च' इत्यादिप्रतिपादिताः, तेषु लघुप्रायश्चित्तस्योक्तत्वात्, इत्याशयं प्रकटीकृत्य रजकादीनां अन्त्यजसमानतया प्रायश्चित्तविशेषे संग्रहो न कृतः। एवं स्थिते धर्मशास्त्रपद्धतिमविज्ञाय विश्वरूपविज्ञानेश्वरादीनां धर्मशास्त्रकोविदानां निबन्धाननालोच्य उपक्रमोपसंहारमविमृश्य च पृथग्जन इव 'यैर्व्याकरणशास्त्रमेव वैद्यकमेव ज्योतिःशास्त्रमेव वाऽधीतं केवलं ये च एकशास्त्राभ्यासेन शास्त्रिण इति समाख्यां मानं पूजां च लभन्ते न ते शिष्टपदवीं भजन्ते इति निरर्गलमाक्रन्दन्ति तेषां परोपहासबद्धरतीनां कुशलमतीनां परनिन्दाकौशल्यमेव न धर्मशास्त्रमिति न तदुत्तरयामः। परोपहासानभिज्ञत्वात्।

'मेदस्य वनिता सम्यक् सैरन्ध्रेण सुसङ्गता। सा सूते यवनं पुत्रं तुरुष्क इति कीर्तितम्॥ तस्माद्वरिष्ठचाण्डालादन्यो नास्तीह निष्ठुरः। प्रत्यहं म्लेच्छदेशेषु गोवधो नास्य शास्त्रतः'॥ इत्यादिजातिविवेकोद्धृतैर्वचनैः म्लेच्छानां चाण्डालोत्तमत्वं अन्यैर्वचनैश्च अस्पृश्यादिकत्वं वर्णितमस्ति। तेनैते अस्पृश्या एव। अतः धार्मिकैस्तत्स्पर्शनादिकं त्याज्यमेव। अतश्च शास्त्रदुष्टं म्लेच्छस्पर्शं दृष्टान्तीकृत्य चाण्डालादीनां स्पृश्यता न निष्पद्यते। न ह्येकेन अनाचारदृष्टान्तेन अन्योऽनाचारः सदाचारो भवति। न हि जारचोराणां दृष्टान्तेन कस्यापि परस्त्रीगमनं चौर्यं च निर्दोषं भवति। अनाचारस्य लोकव्यवहारेण सदाचारत्वं चेत् 'मत्स्यादाश्च नराः पूर्वे व्यभिचाररताः स्त्रियः' इत्यादिभिर्वचनैः देशविशेषत्वेन निर्दिष्टाः अनाचाराः कथमनाचारा भवेयुः। भवन्मते तेषामनाचाराणां शिष्टादृतत्वात् लोकादृतत्वाद्वा सदाचारत्वमेव स्यात्। परं न केऽपि विद्वांसः स्त्रीणां व्यभिचारादिकं सदाचारत्वेन गणयन्ति न वा तमनाचारं धर्मे प्रवेशयन्ति।

'तीर्थे विवाहे यात्रायां सङ्ग्रामे देशविप्लवे।
नगरग्रामदाहे च स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते॥'

एतद्वचनानुरोधेन विवाहादौ अस्पृश्यानां स्पर्शदोषो नास्तीति कैश्चिदाधुनिकैरुद्घोष्यते। परं तन्न समीचीनम्। यतः प्राचीननिबन्धकारैः एतानि वचनानि सूतकाशौचनिर्यासपराणि इति सकलवचनकदम्बानुरोधेन विनिर्णीतम्। अपरं च। अयं अस्पृष्टतानिषेधः अस्पृश्यस्पृश्यस्पृष्टस्य तृतीयस्य चतुर्थस्य वा स्पर्शाशुचित्वनिवारको मन्तव्यः। यतः मनुना 'दिवाकीर्तिमुदक्यां च' इति वचने 'तत्स्पृष्टिनं चैव' स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति इति अन्त्यजादीनां साक्षात्स्पर्शकारिणः तत्स्पृष्टस्पर्शकारिणश्च स्नानं विधीयते 'तृतीयादीनां स्पर्शानां तु आचमनाच्छुद्धिः। तदुक्तं संवर्तेन, तत्स्पृष्टिनं स्पृशेद्यस्तु स्नानं तस्य विधीयते। ऊर्ध्वमाचमनं प्रोक्तं द्रव्याणां प्रोक्षणं तथा इति। गौतमोपि 'पतितचण्डालसूतिकोदक्याशवस्पृष्टितत्स्पृष्ट्युपस्पर्शने सचैलं उदकोपस्पर्शनात्

शुध्येत' इति तृतीयस्यापि स्नानमादिशति। तच्च बुद्धिपूर्वकस्पर्शे ज्ञेयम्। एतत्सर्ववचनकदम्बानुरोधेन विमर्शे विहिते 'तीर्थे विवाहे' इत्ययं स्पृष्टास्पृष्टिनिषेधः तृतीयादीनां विहिताचमनापनोद्यदोषनिवर्तकतया व्याख्येयः इति भाति। तेन च स्पर्शदोषविधायिकानां स्मृतीनां सामान्यतः संकोचो न भवति। तीर्थे विवाहे इत्यादीनां वचनानां च तृतीयस्पृष्टादौ चारितार्थ्यं च भवति।

एवं प्रधानमल्लनिबर्हणन्यायेन अन्त्यजादीनां अस्पृश्यतानिवारकपक्षास्थितप्रधानपुरुषस्य तथा देवालयप्रवेशादिकेषु आधुनिकैः उपन्यस्तेषु विषयेषु अस्पृश्यतानिषेधस्यैव प्राधान्यात् तस्य च निराकरणेन अन्ये तत्पक्षीयाः पुरुषाः पक्षाश्च निराकृता वेदितव्याः।

अन्ते च धर्मशास्त्रे अभिनिविष्टतया वा अनभिज्ञतया वा यत् किमपि प्रतिपाद्य सामान्यजनानां व्यामोहमुत्पादयतां साञ्जलिबन्धं निवेदयामः यत् 'यं वदन्ति तमोमूढाः मूर्खा धर्ममतद्विदः। तत्पापं शतधा भूत्वा तद्वक्तॄनधिगच्छति॥' इति भगवता मनुनोपदिष्टं मनसि कृत्वा अव्यापारव्यापारात् निवर्तनीयमित्यलम्॥

मराठी-व्याकरणपरिषद्, पुणें

अध्यक्षीय भाषण

प्रास्ताविक.— आपण मला आजच्या परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान दिला याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. वस्तुतः आपणांमध्यें विद्वत्तेनें, बुद्धिमत्तेनें व प्रस्तुत विषयाच्या व्यासंगशीलतेनें मजपेक्षां श्रेष्ठ पुष्कळ विद्वान आहेत हें मी जाणून आहें. असें असतां आपण हा कार्यभाग मजवर सोपविला याबद्दल आश्चर्य वाटतें. अथवा आश्चर्य कसलें ? विद्वानांचा असा संप्रदायच असतो की, समानशील व्यक्तीच्या स्वल्पगुणांकडे लक्ष देऊनच त्याचा गौरव करावयाचा व त्यांत समाधान मानावयाचें. 'परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य सन्तः' हें सुभाषित हेंच सांगत आहे. शिवाय, हा सन्मान मी माझा समजत नसून आपणा सर्वांची आराध्यदेवता जो गणाधीश तिचा समजत आहें. कारण अध्यक्ष हा एक गणाधीशाचेंच प्रतीक आहे. आपण मंगल कार्यांत पूगीफलाच्या ठिकाणींहि या प्रतीकाची कल्पना करतों व अर्चनादि विधि भक्तिभावानें त्या प्रतीकाच्या ठिकाणीं करतों. त्या वेळीं पूगीफलाचें लघुत्व वगैरे मनांत आणीत नाहीं. तसेंच हें समजावयाचें. असो.

औचित्य.—मराठी भाषेचें कै. दादोबा पांडुरंगांचें जें व्याकरण त्यास प्रसिद्ध होऊन आज शंभर वर्षें होत असल्यामुळें प्रेमादरबुद्धीनें त्या ग्रंथाच्या व ग्रंथकर्त्याच्या सन्मानार्थ हा उत्सव ही परिषद् करीत आहे ही गोष्ट प्रशस्य आहे. एवढेंच नव्हे, तर पुणेकरांना ही गोष्ट प्रशस्यतर आहे. कारण दादोबांनीं आपल्या व्याकरणांत आश्रयभूत भाषा पुण्याची स्वीकारली होती. ते कोंकणांत जन्मले असतां त्यांनीं पुणेरी भाषेचें शुद्ध व व्यापक स्वरूप पाहून ती आपल्या व्याकरणास आधार मानिली यांत त्यांच्या गुणपक्षपातित्वाचें चांगलेंच आविष्करण होतें. ते आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात की, 'या व्याकरणांत महाराष्ट्रदेशाचा मध्यभाग जो पुणें प्रांत त्यांत जी भाषा राजकीय आणि विद्वान लोक बोलतात तिचें अनुकरण केलें आहे. त्यांत माझा व माझ्या वडिलांचा जन्म कोंकणांतला. म्हणून यांत कदाचित् कोंकणी प्रकाराचें किंचित् आधिक्य असलें तरी मला क्षमा मागण्यास कांहीं अवकाश आहे (महाराष्ट्रव्याकरण, आवृत्ति ६ वी, प्रस्तावना, पान २९). यांत दादोबांची विनयशीलता व शुद्ध भाषेविषयींचें प्रेम स्पष्ट होत आहे. असो. तेव्हां ज्या पुणेरी भाषेला गौरवून दादोबांनीं तिला आपल्या व्याकरणाचें आधारस्थान दिलें व मराठी भाषेस उत्तम वळण लावलें त्या व्याकरणाचा

शताब्दिक गौरव करणें हें पुणेकरांचें प्रधान कर्तव्य होय व तें पुण्यांतील विद्वान मंडळी करीत आहे याबद्दल मला फार संतोष होत आहे व आपणा सर्वांसही तो तसाच होत आहे अशी माझी खात्री आहे.

भाषामाहात्म्य.— आतां आपण प्रथमतः व्याकरणाचें आश्रयभूत जें भाषातत्त्व याचें महत्त्व किती आहे याविषयीं थोडासा विचार करूं. एका विद्वानानें या भाषातत्त्वाविषयीं 'इदमन्धतमः कृत्स्नं जायते भुवनत्रयम् । यदि शब्दाह्वयं ज्योतिरासंसारं न दीप्यते ॥' असे उद्गार काढले आहेत. याचा अर्थ असा आहे की, शब्दस्वरूपी ज्योति सृष्टयुत्पत्तिकालापासून या विश्वाला व्यापून जर प्रकाशित झाली नसती, तर हें सर्व विश्व काळोखानें (अज्ञानानें) भरून गेलें असतें. हें शब्दतत्त्वाचें वर्णन अगदीं यथार्थ आहे. प्राणिमात्राचें अज्ञान दूर करण्यास या शब्दज्योतीसारखी अन्य ज्योति नाहीं. सूर्य, चंद्रमा, विद्युत् वगैरे तेजें विशिष्ट कालीं विशिष्ट तमाचेंच निराकरण करतात; परंतु या शब्दज्योतीनें आंतर व बाह्य अशा सर्व प्रकारच्या तमाचें (अज्ञानाचें) सर्व कालीं निवारण होत असतें. कारण जगांत असा पदार्थच नाहीं की ज्याचें शब्दानें निर्वचन करतां येणार नाहीं. वैयाकरणप्रवर भर्तृहरि आपल्या वाक्यपदीयांत म्हणतो कीं, 'न सोऽस्ति प्रत्ययो लोके यः शब्दानुगमादृते । अनुविद्धमिव ज्ञानं सर्वं शब्देन भासते' ॥ म्हणजे विश्वांत असें ज्ञानच नाहीं कीं ज्याचा शब्दानें अनुगम करतां येणार नाहीं. कोणतीहि वस्तु असो, ती कोणत्या तरी शब्दानें व्यक्त केली जातेच. एवढेंच नव्हे, तर असत्पदार्थहि शब्दानें प्रतीत करून देतां येतात. ही गोष्ट आपण विविध कल्पित कादंबऱ्या वगैरे वाचतों त्यांवरून कळून येण्यासारखी आहे. याप्रमाणें शब्दतत्त्वाचें सामर्थ्य कळल्यावर आतां आपण त्या शब्दांनीं होणारी जी भाषा तिचा थोडासा विचार करूं.

भाषोत्पत्तीविषयीं मतें.— भाषा म्हणजे काय, ती कशी झाली, तिचा उत्पादक कोण, तिच्यांत वैविध्य कशामुळें आलें, इत्यादि गोष्टींचें येथें संक्षेपानें विवेचन करूं. ईश्वरानें प्राणिविशेषांना शब्द उत्पन्न करण्याचें सामर्थ्य दिलें आहे. हा शब्द दोन प्रकारचा आहे. एक ध्वन्यात्मक व दुसरा वर्णात्मक. ध्वन्यात्मक हा वाद्यें वगैरेंत उपलब्ध होतो. यालाहि भावना जागृत करण्याचें सामर्थ्य आहे. रणवाद्यें, मंजुळ वाद्यें, व संगीतांतील केवळ स्वरालाप यांपासून मनुष्याच्या विविध भावना जागृत होतात. दुसरा शब्द वर्णात्मक. हा केवळ मनुष्याच्या ठिकाणींच आहे. यांनींच भाषा बनली आहे. भाषा म्हणजे काय ? तर अंतःकरणास प्रतीत होणारे जे सुखदुःखादि भाव व घटपटादि पदार्थ हे व्यक्त करणारा जो ध्वनिसमूहविशेष त्यास भाषा म्हणतात. ज्या ध्वनिसमूहानें आपल्या अंतःकरणांतील सुखदुःखादि भावना व त्यास ज्ञात झालेले सृष्टींतील विविध पदार्थ यांचें इतरांस

ज्ञान करून देतां येतें, त्या ध्वनिसमूहास भाषा म्हणतात. हें भाषेचें फार व्यापक लक्षण आहे. कारण ज्यांना ज्यांना ध्वन्युत्पादनानें आपलें सुखदुःखादि भाव इतरांस समजावून देतां येतात त्या पशुपक्ष्यांच्या ध्वनीलासुद्धां या लक्षणानें भाषा मानावें लागतें. वासराचा हंबारव श्रवण करून गाय त्याकडे धावत जाते. आपल्या शावकांचा चिंव चिंव शब्द ऐकून त्यांचे माता-पिता असणारे पक्षी त्यांकडे उडत जातात असें आपण पाहतों. मृगराजांची गर्जना ऐकून गोमहिषादि पशु विशिष्ट आवाज काढून आपली भीति प्रकट करतात व कुत्रीं, मांजरें वगैरे पशु आपला आनंद, रोष वगैरे ध्वनिविशेषानेंच सूचित करितात. तेव्हां ध्वनि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य ज्यांना आहे त्या सर्व प्राण्यांस भाषा ही आहे. या सर्व भाषांत मानवी भाषा ही पूर्णावस्थेला पोंचली आहे. कारण या भाषेचा विस्तार व सुखदुःखादि भावना सूक्ष्मपणें प्रकट करण्याचें सामर्थ्य जितकें आहे तितकें अन्य भाषेंत नाहीं. म्हणूनच भाषा हा शब्द मनुष्यप्राण्याच्या भाषेलाच विशेषेंकरून लावलेला आढळतो. पाणिनीनेंही 'भाष् व्यक्तायां वाचि' असा यांतील मूळ धातूचा उल्लेख करून हाच अर्थ सुचविला आहे. तात्पर्य, पदार्थाचें यथार्थ ज्ञान करून देण्यास मानवी भाषेइतकी समर्थ अन्य भाषा नाहीं. अशी सर्वश्रेष्ठ मानवी भाषा कशी उत्पन्न झाली याचा आतां आपण थोडासा विचार करूं.

मीमांसकांचें मत.— धर्मग्रंथांविषयीं ज्यांची प्रामाण्यबुद्धि विशेष आहे असे मीमांसक, वेदान्ती वगैरे पंडित यांच्या मतें भाषा हें अनादि तत्त्व आहे. कारण वेदांमध्यें 'स भूरिति व्याहरत् स भूमिं असृजत्' असें उत्पत्तिप्रकरणामध्यें सांगितलें आहे. म्हणजे परमेश्वरानें प्रथम पृथ्वीचा वाचक भूः असा शब्द उच्चारला व नंतर पृथ्वी उत्पन्न केली असा याचा अर्थ आहे. यावरून सृष्ट्युत्पत्तीच्या पूर्वी शब्दतत्त्व होतें असें सिद्ध होतें व मग यावरून तें तत्त्व अनादि, अपौरुषेय अर्थात् अनुत्पाद्य आहे असें सिद्ध होतें. शब्द हा अनुत्पाद्य व अविनाशी आहे ही गोष्ट आपले त्यासंबंधानें जे व्यवहार त्यांवरूनहि सिद्ध होत आहे. आपण व्यवहारांत रामानें म्हटलेलाच श्लोक गोविंदानें म्हटला असें म्हणतों. तेथें 'तोच हा श्लोक' हें ज्ञान प्रत्यभिज्ञेनें होतें. पूर्वी पाहिलेला पदार्थ पुनः पाहिला असतां त्याचें स्मरण-पूर्वक जें ज्ञान होतें त्यास प्रत्यभिज्ञा म्हणतात. येथें तोच हा श्लोक अशी प्रत्याभिज्ञा होत असल्यामुळें शब्द नित्य मानावा लागतो. तसेंच 'रामानें हा श्लोक दहादां' म्हटला असें आपण म्हणतों. या वाक्यांत दहादां हें आवृत्तिवाचक संख्या-विशेषण आहे. याचा उपयोगहि एकच पदार्थ वारंवार पाहिला अथवा उच्चारला असतां होतो. भिन्न पदार्थ किंवा भिन्न शब्द पाहिले अथवा उच्चारले असतां तेथें दहादां असें न म्हणतां दहा पदार्थ असा संख्यावाचक शब्द योजतात. यावरूनहि शब्द हा एकच आहे व तो अनुत्पाद्य आहे असें सिद्ध होत आहे. याप्रमाणें

मीमांसकाची शब्दनित्यत्वाविषयीं विवाद करण्याची पद्धति आहे. धर्मशास्त्र हें श्रुतीला अनुसरून असल्यामुळें त्यांतहि परमेश्वरानें सर्व सृष्टि वैदिक शब्दानुरोधानेंच केली असे—'सर्वेषां स तु नामानि कर्माणि च पृथक् पृथक् । वेदशब्देभ्य एवादौ पृथक् संस्थाश्च निर्ममे ॥' (मनु १.२१)—उल्लेख येतात. शब्द नित्य असले तरी त्यांची प्रतीति ध्वनिरूप उपाधीनें होत असल्यामुळें ते सर्वदा प्रतीत होत नाहींत असा मीमांसकांचा सिद्धान्त आहे.

नैयायिकांचें मत.— नैयायिकांना हा पक्ष मान्य नाहीं. त्यांच्या मतें वर्ण हे प्रयत्नोच्चार्य (अर्थात् कार्य) असून ते क्षणध्वंसी आहेत, म्हणजे उच्चारल्या-बरोबर विनाश पावणारे आहेत. तेव्हां त्यांस अनादि व अविनाशी मानतां येत नाहीं. शब्दाची प्रत्यभिज्ञा होते हें जें मीमांसकांचें म्हणणें आहे ती प्रत्यभिज्ञा सादृश्यामुळें होत असल्यामुळें खरी नव्हे. दुरून एखाद्या खांबाला पाहून एखा-द्याला जशी विशिष्ट पुरुषाची प्रत्यभिज्ञा होते परंतु ती प्रत्यभिज्ञा जशी खरी नव्हे, तशीच ही प्रत्यभिज्ञा खरी नव्हे. तेव्हां प्रत्यभिज्ञेमुळें शब्द नित्य आहे असें जें मीमांसकांचें म्हणणें तें अयुक्त होय. शब्द अनित्य आहे ह्या सिद्धान्ताला विविध अनुमानें प्रमाण म्हणून देऊन त्यांनीं तो निश्चित केला आहे. याप्रमाणें नैया-यिकांची शब्दाचें अनित्यत्व सिद्ध करण्याची पद्धति आहे.

वैयाकरणांचें मत.— वैयाकरणांनीं या दोन्ही मतांचा अंशतः स्वीकार करून आपला स्फोटवाद सिद्धान्तरूपानें मांडला आहे. यांच्या स्फोटवादाची कल्पना अशी आहे की, शब्दापासून आपणांस अर्थप्रतीति कशी होते याचा विचार केला असतां ध्वनिरूप शब्दाहून निराळा शब्द मानणें भाग पडतें. कसें तें पाहा:— शब्दापासून अर्थबोध होतो असें म्हणणाऱ्यास आमचा असा प्रश्न आहे की, शब्दापासून अर्थबोध होतो म्हणजे त्या शब्दांतील प्रत्येक अक्षरापासून अर्थबोध होतो का त्या शब्दांत जितकीं अक्षरें असतात त्या अक्षरसमुदायापासून अर्थबोध होतो ? यांतील पहिला पक्ष जो शब्दांतील प्रत्येक वर्णापासून अर्थबोध होतो तो मानणें युक्त नव्हे. कारण शब्दांतील एका वर्णापासून जर अर्थबोध झाला तर त्याच अर्थाचें प्रतिपादन करणारे इतर वर्ण पाहिजेत कशाला ? म्हणून प्रथम पक्ष घेतां येत नाहीं. शिवाय शब्दाच्या एकेक वर्णापासून अर्थबोध होतो असा अनुभवहि नाहीं. म्हणून हा पक्ष त्याज्य होय. आतां दुसरा पक्ष पदांतील वर्णसमुदायापासून अर्थबोध होतो हा घ्यावा तर तोहि अनुपपन्न आहे. कारण शब्द हे क्षणध्वंसी असल्यामुळें त्यांचा समुदाय दाखवितां येणार कसा ? एकाच वेळीं अनेक पदा-र्थांचें ज्ञान होत असेल तर समुदायाची कल्पना करतां येईल. उदाहरणार्थ, एके ठिकाणीं एका वेळीं दहा घट असतील तर त्यांच्या समुदायाची प्रतीति होईल; परंतु एक घट फोडून दुसरा घट तयार करूं लागलें तर त्यांच्या

समुदायाची कल्पना करतां येईल का ? कधीं येणार नाहीं. त्याचप्रमाणें एका वर्णाचा विनाश झाल्यावर दुसरा वर्ण उच्चारला जात आहे तर त्यांच्या समुदायाची कल्पना कशी करतां येईल ? करतां येणार नाहीं. समुदायाची जर उपपत्ति होत नाहीं तर अशा अनुपपन्न समुदायरूपी शब्दापासून अर्थबोध होतो हें म्हणणें वंध्येला पुत्र होतो या म्हणण्यासारखेंच उपहसनीय आहे. तेव्हां आमचें म्हणणें ध्वनीनें व्यक्त होणारें अर्थावगमक जें ज्ञान तोच शब्द होय व त्याला आम्ही स्फोट म्हणतों. हा स्फोटशब्द नित्य असून त्याचा व अर्थाचा नित्य संबंध आहे. आमच्या मतें ध्वनि हा नैयायिकांप्रमाणें अनित्य आहे व स्फोटरूपी शब्द हा मीमांसकांप्रमाणें नित्य आहे. असो. याप्रमाणें वयाकरणांचा सिद्धान्त असल्यामुळे त्यांच्या मतें शब्द, त्यांचे अर्थ व त्यांचा संबंध ह्या सर्व गोष्टी नित्य आहेत. अर्थात्, भाषा ही अनादिसिद्ध आहे असें निष्पन्न होतें.

नैयायिकांच्या मतें शब्द उत्पाद्य आहेत. तेव्हां शब्दांपासून अर्थबोध कसा होतो, अमक्या शब्दाचा अमुक अर्थ हें कशावरून समजावयाचें, वगैरे पक्ष या मतीं उत्पन्न होतात. तेव्हां त्यासंबंधानें त्यांना उपपत्ति करावी लागते. त्यांच्या मतें 'अस्मात्पदादयमर्थो बोद्धव्यः इति ईश्वरेच्छासंकेतः शक्तिः' म्हणजे या पदाचा हा अर्थ असा ईश्वरेच्छेनें संकेत केला असल्यामुळें त्या त्या पदापासून ते ते अर्थ प्रतीत होतात. ही प्रतीति होण्यास अभिधा वगैरे वृत्ति त्यांनीं साधनें मानिलीं आहेत. तात्पर्य, यांनाहि शब्दाचा व अर्थाचा संबंध कधीं झाला, कोणीं केला, याचा बरोबर उलगडा करतां येत नसल्यामुळें सर्व अडचणींचा परिहार करणारें जें ईश्वररूपी तत्त्व त्याकडे धाव घ्यावी लागली. असो.

पाश्चात्त्य मत.— कांहीं पंडितांच्या मतें भाषा ही मानवसृष्ट आहे. याविषयीं त्यांची उपपत्ति अशी आहे. आपल्या मनांतील भाव व्यक्त करावा ही इच्छा मनुष्यप्राण्यामध्यें स्वाभाविक आहे. हे अंतःकरणांतील भाव मनुष्य प्रथमतः शरीरव्यापारानें (हस्तनेत्रादिकांच्या चेष्टेनें) व्यक्त करीत होता. पुढें कांहीं विशेष भाव तो एकाक्षरी ध्वनिविशेषानें स्पष्ट करूं लागला. पुढें याच पद्धतीच्या विशेष विस्तारानें विविधार्थाचें बोधन करूं लागला. या ध्वनीस भाषा ही संज्ञा प्राप्त झाली. तेव्हां भाषा ही केवळ मानवप्रयत्नानें जन्मास आली आहे. प्रस्तुतची भाषा ही पूर्वभाषेचा विकास आहे. ही कल्पना ज्या समाजांत प्रसृत झाली त्याच समाजांत याविरुद्ध मत प्रवृत्त करणारे विद्वान आहेत. त्यांच्या मतें आदमसंज्ञक जो आद्यपुरुष त्यानें भाषा उत्पन्न केली आहे; ती मनुष्यसमाजानें केली नाहीं. पशुपक्ष्यांमध्यें भाषा असल्यामुळें भाषा ही समाजानें संकेत केल्यामुळें उत्पन्न झाली असें म्हणतां येत नाहीं. विकासवादानें भाषा विस्तार पावते असें म्हटलें तर त्या विकासवादाचें मूळ कांहीं आद्य मानवसमाज नव्हे. त्याच्याहि पूर्वी अनेक

प्राण्यांत क्रांति दाखवितां येते.

पाणिनीय मत.— कांहीं विद्वान पौरस्त्य पंडितांचें म्हणणें असें आहे की, भाषा ही ईश्वरानें अथवा मानवानें उत्पन्न केलेली नाहीं, तर ती स्वभावतःच उद्भूत झालेली आहे. मनुष्याचें मन व शरीर यांच्या संयोगानें ती उद्भूत होत असते. ज्याप्रमाणें प्राण्याच्या शरिराच्या ठिकाणीं आहार, निद्रा, भय वगैरे विकार स्वयंसिद्ध आहेत, ते कोणाच्या शिकवणीनें त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालेले नाहींत तशीच भाषा हीहि शिकवून उत्पन्न केलेली नाहीं. मनुष्याला बाल्य, तारुण्य, वार्धक्य वगैरे अवस्था जशा कालक्रमानें प्राप्त होत असतात, त्या उत्पन्न करणें अथवा त्यांच्यांत बदल करणें हें जसें मनुष्याच्या हातीं नसतें, तशीच भाषा ही कालप्राप्त असते. ती उत्पाद्य अथवा निवार्य नसते. समाजपरिस्थिति ही भाषाङ्कुराची परिपोषक आहे. उत्पादक नव्हे. आत्मभाव प्रकट करण्याची जी मनुष्याची इच्छा तीच भाषेचें असाधारण कारण आहे. आत्मा व शरीर यांचा संबंध असा कांहीं विलक्षण आहे कीं, आत्म्याच्या ठिकाणीं कोणत्याहि सुखदुःखात्मक संवेदना उत्पन्न झाल्या कीं त्या शरिरांत, तद्द्वारा ध्वनियंत्रांत व तद्द्वारा वागिंद्रियांत लहरीरूपानें प्रविष्ट होऊन तत्सूचक ध्वनिरूपानें मुखांतून बाहेर पडतात. ज्याप्रमाणें सतारीच्या जोडतारांतील एका तारेच्या आघातानें तत्सजातीय दुसरी तार ध्वनि व कंप यांनीं युक्त होते, त्याप्रमाणें ही गोष्ट होय. हाच अर्थ पाणिनीच्या शिक्षेंत

> "आत्मा बुद्ध्या समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया
> मनः कायाग्निमाहन्ति स प्रेरयति मारुतम् ।
> मारुतस्तूरसि चरन् मन्द्रं जनयते ध्वनिम् ।

इत्यादि वचनांनीं सांगितला आहे.

या वचनांचा भावार्थ पुढें दिल्याप्रमाणें आहे. आत्मा हा संवेदनात्मक बुद्धीनें युक्त होऊन त्या संवेदना प्रकट करण्याकरितां मनाची योजना करतो. (कोणताहि व्यापार मनःप्रेरणेवांचून होत नसल्यामुळें आत्मा हा प्रथमतः मनाला प्रवृत्त करतो असें येथें सांगितलें आहे.) नंतर मन हें सर्वशरीरव्यापी जी चैतन्यज्योति तीवर आघात करतें. म्हणजे तिला एकप्रकारें चालना देतें. अशा रीतीनें आंदोलन पावलेलें चैतन्य हें शरीरस्थ वायूच्या ठिकाणीं व्यापार उत्पन्न करतें. याप्रमाणें गतियुक्त झालेला वायु हा हृदयप्रदेशीं मंद्रध्वनि उत्पन्न करतो. तात्पर्य, आत्म्याच्या विशिष्ट स्फुरणानें, मनाच्या व्यापारानें, वायूच्या विशिष्ट आघातानें, स्वरयंत्रद्वारा, मुखांतून विविध शब्द उत्पन्न होतात. अशी ही शब्दोत्पत्तीविषयी शास्त्रीय कल्पना आहे. त्याला मनुष्याची अथवा ईश्वराची अपेक्षा नाहीं. हा भावविशिष्ट आत्मा व मन यांच्या संयोगापासून शरिराच्या ठिकाणीं सहज होणारा व्यापार आहे.

याप्रमाणें ध्वनि व भाषा यांच्या उत्पत्तीविषयीं विविध कल्पना आहेत. त्यांची थोडीशी दिशा दाखविली आहे. असो.

भाषांचें विविधत्व.— याप्रमाणें भाषेच्या उत्पत्तीविषयीं थोडासा विचार झाला. आतां यापुढें तिच्या वैविध्यासंबंधाने विचार करूं. भाषा ही आत्म्याच्या भावना व संवेदना ह्या प्रकट करण्याकरतां जर आहे, तर या भावना व संवेदना मनुष्यमात्राच्या ठिकाणीं सारख्याच असतां त्या प्रकट करणारी भाषा ही विविध-रूप कशी झाली ? सर्व कालीं व सर्वस्थलीं ती एकरूपच कां राहिली नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. त्याला भाषाशास्त्राभिज्ञांचीं पुढें दिल्याप्रमाणें उत्तरें आहेत.

या पांचभौतिक विश्वांत जशी विविध, विचित्र रचना दृष्टीस पडते त्याप्रमाणेंच मनुष्यप्राण्यांत नाना प्रकारचें स्वभाववैचित्र्य व विचारवैचित्र्य हीं दृष्टीस पडतात. स्वभाव व विचार यांच्या या वैचित्र्यामुळें नाना धर्म, नाना शास्त्रें, विविध कला या निर्माण झाल्या आहेत. त्याच कारणानें विविध भाषाहि निर्माण झाल्या आहेत. मानवांचें मतिवैचित्र्य व तज्जन्य व्यापारवैचित्र्य यांचें नियमन कोणाच्याहि हातून होणें शक्य नाहीं. परमेश्वरानें या गोष्टींत प्राणिमात्रास पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे, व त्यामुळें नाना शास्त्रें, नाना धर्म, नाना देवता या जशा उदयास आल्या तशाच नाना भाषाहि उदयास आल्या. मूळारंभीं एकच भाषा होती असें जें विधान कांहीं विद्वान करतात तें आमच्या मतें सापेक्ष असें आहे. कारण जोंपर्यंत या कल्पनेचें कालस्थल निश्चित करतां येत नाहीं तोंपर्यंत ती अव्यवहार्य समजण्यास हरकत नाहीं. मूळारंभीं एकच संस्कृत भाषा होती. म्हणजे शौरसेनी, मागधी, माहाराष्ट्री वगैरे भाषांना आधारभूत एक संस्कृत भाषा होती एवढाच अर्थ समजावा. असो. तेव्हां स्वभाववैचित्र्य व मतिवैचित्र्य हें भाषाभेदाला मुख्य कारण होय.

या परिवर्तनशील संसारामध्यें प्रत्येक वस्तु निरनिराळ्या स्वरूपाला पावत आहे. चार दिवसांच्या पूर्वीचा आंबा आज परिपक्व होऊन वर्णानें व चवीनें बदलत आहे. लहानपणीं पाहिलेलीं गोरींगोमटीं मुलें आज दाढीमिशांनीं युक्त होऊन बाप्ये होत आहेत. असा हा सृष्टिक्रम सर्वत्र दिसत आहे. त्याचप्रमाणें कालप्रवाहानें भाषेचें मूळचें रूप बदलून तिला निरनिराळीं स्वरूपें प्राप्त झालीं आहेत, होत आहेत व होणारहि आहेत. असा हा कालमहिमा असल्यामुळें भाषेंत विविधता उत्पन्न होत आहे हें दुसरें कारण होय.

भाषेच्या विविधतेला तिसरें कारण देशभेद व आचारभेद हे होत. देश-भेदांमुळें हवेंत फरक पडून वागिंद्रियांत कांहीं विशिष्ट भेद उत्पन्न होतो व मग त्या त्या विशिष्ट इंद्रियाला उच्चारण्यास सोयिस्कर असे ध्वनि प्रचारांत येऊन शब्द बनतात. ही गोष्ट काबुली, चिनी व युरोपियन लोकांचे उच्चार ऐकिले म्हणजे

प्रत्ययास येते. आचारभेद म्हणजे आहार-विहारभेद. त्यामुळेंही जिव्हेंत जाड्य वगैरे उत्पन्न होऊन उच्चारभेद होतो व नंतर भाषाभेद होतो; उ. काश्मिरी, बंगाली व द्राविडी यांच्या उच्चारांत विशेष भेद आहेत. काश्मिरी व पंजाबी यांचा मत्स्याशन हा शिष्टाचार आहे, व द्राविडी केवळ धान्यफलाशी आहेत. काश्मिरी व पंजाबी यांच्या जिव्हेंत जाड्य असतें त्या मानानें द्राविडी लोकांची जिव्हा हलकी असते व त्या कारणानें दोहोंच्या उच्चारांत विशेष भेद होतो व त्यायोगें भाषाभेद होतो. असो. याप्रमाणें भाषाभेदाचीं अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख केला आहे. त्यावरून विविध भाषा कां झाल्या याची कल्पना श्रोतृवर्गास येईल. आतां कांहीं भाषा मूलतःच भिन्न आहेत याचें कारण प्रथमतः सांगितलेलें मतिवैचित्र्य होय. याशिवाय अन्य कारण सांगतां येत नाहीं. असो. या अनेक भाषांपैकीं जी मराठी तिच्या इतिहासाकडे आपण आतां वळूं.

मराठीचा इतिहास.— आपल्या या भारतखंडांत ज्या विविध आर्य भाषा प्रचलित आहेत त्या सर्वांस आधारभूत व प्राचीनतम भाषा म्हणजे संस्कृत होय. या संस्कृत भाषेचे वैदिक, पौराणिक, साहित्यिक वगैरे भेद अर्वाचीन विद्वानांनीं कल्पिले आहेत. या संस्कृत भाषा जेव्हां प्रचलित होत्या त्या वेळीं प्राकृत जनांमध्यें व्यावहारिक म्हणून कांहीं भिन्न भाषा प्रचलित होत्या हें देशी नाममालेंतील शब्दांवरून सिद्ध होतें. परंतु त्यांतील वाङ्मय अथवा त्यांचीं व्याकरणें व कोश हीं उपलब्ध नसल्यामुळें त्यांच्या स्वरूपाचें आज कांहींच आकलन करतां येत नाहीं. या प्रचलित भाषाहि कालप्रवाहानें परिवर्तन पावल्या असल्याच पाहिजेत. त्या परिवर्तनांत संस्कृत भाषेचा त्यांच्यावर विशेष परिणाम झाला असला पाहिजे. कारण संस्कृत भाषा ही व्याकरण व कोश यांनीं संपन्न, शिष्ट जनांनीं आदृत व राजाश्रययुक्त असल्यामुळें तिचें वर्चस्व हें असणारच, व त्याचा परिणाम सामान्य भाषेवर होणारच. अशा संस्कृत-संस्कारयुक्त ज्या व्यावहारिक भाषा त्याच पुढें विशेष स्वरूपाला आल्या असतां देशभेदानें शौरसेनी, मागधी, माहाराष्ट्री वगैरे संज्ञांनीं प्रसृत झाल्या. पुढें या सर्वांचें अपभ्रष्ट असें स्वरूप झालें. त्याला अपभ्रंश भाषा असें म्हणतात. या अपभ्रंशांतील माहाराष्ट्री अपभ्रंशापासून मराठी भाषा झाली असें विद्वानांचें मत आहे. माहाराष्ट्र अपभ्रंशापासून मराठी झाली म्हणजे तींत इतर भाषांचा कांहीं संबंध नाहीं असें समजूं नये. कारण तींत वैदिक, संस्कृत, साहित्यिक संस्कृत व माहाराष्ट्री वगैरे भाषांचे परिणाम झालेले दृग्गोचर होतात. देवेभिः अशा वैदिक तृतीयेच्या रूपापासून देवांहीं हें तृतीयेचें रूप झालें आहे. असें कांहीं प्रकार मराठींत वैदिक भाषेपासून आले आहेत. विविध शब्द, शब्दार्थालंकार व छंद (वृत्तें) हीं तिनें साहित्यिक (अभिजात) संस्कृतांतून घेतलीं व विभक्तिप्रत्यय, धातुप्रत्यय वगैरे तिनें माहाराष्ट्री व अपभ्रंश इत्यादींपासून घेतलें. प्रस्तुत-

ऱ्या मराठी भाषेंत तर तामिल, कानडी, फारशी, अरबी, इंग्रजी वगैरे विविध भाषांतील शब्द व थोड्याशा वाक्यपद्धति यांचा प्रवेश झाला आहे. सांप्रत व्यवहारांत असलेल्या गुजराथी, बंगाली, हिंदी वगैरे भाषांत भिन्न भाषांतील शब्द प्रविष्ट झाले असल्यामुळें त्यांचीहि हीच परिस्थिति असावी.

शौरसेनी, मागधी, माहाराष्ट्री वगैरे भाषांत संस्कृतांतून शब्द येतांना त्यांवर काय परिणाम होतात हे येथें सांगणें युक्त असलें तरी त्या विषयाचा विस्तार फार असल्यामुळें व तत्संबंधीं नियम हें सर्वत्र लागू पडणारे असे नसल्यामुळें त्यांची वाटाघाट करीत नाहीं. या भाषा देशविशेषांतील उच्चारपद्धतीमुळें व उच्चारसौलभ्य आणि शिथिलता यांमुळें उद्भवले असल्यामुळें त्यांविषयीं अगदीं बरोबर लागू पडणारे नियम करणें अशक्यच आहे. या भाषांतील वर्णविपर्ययाचे नियम म्हणजे एकंदरीनें वर्णांत फेर काय होतात: तें सामान्यतः सांगावयाचें व मग ज्या शब्दरूपाला जो नियम लागत असेल तो लावून तें रूप सिद्ध करावयाचें. यामुळें अनेक शब्दांचें एकच रूप सिद्ध होत असल्यामुळें त्या शब्दांचा अर्थ वाक्यांत निश्चित करावयास परिश्रम पडतात. उ. 'कई' हें रूप कति, कपि, कवि, कृति या चार संस्कृत शब्दांचें होऊं शकतें. 'मा' हें रूप मत्त, मद, मय, मृग, मृत अशा पांच संस्कृत शब्दांचें होऊं शकतें. 'नाक' हें रूप नासिका व नायक या दोन्ही शब्दांचें होतें. असें असलें तरी बरींच रूपें समजण्यास व नवीन रूपें बनविण्यास या नियमांचा उपयोग होतोच. शिवाय, या प्राकृतांतील कांहीं भाषा थोड्याशा वर्णभेदानें होतात व त्यांचे नियम बरेच निश्चित असतात. उ. शौरसेनीमध्यें 'श' व 'ष' यांबद्दल 'स' येतो, मागधीमध्यें 'स' व 'ष' यांबद्दल 'श' येतो, व 'र'बद्दल 'ल' येतो. शाकारी व चांडाळी यांमध्यें 'ष' व 'स' यांबद्दल 'श' येतो. हे नियम प्रायः निरपवाद आहेत. उच्चारभेदामुळें कशा विविध भाषा बनतात हें कांहीं उदाहरणें देऊन दाखवितों.—

	संस्कृत	प्राकृत	मराठी	बंगाली
१	चक्र	चक्क	चाक	चाका
२	स्तंभ	खंब	खांब	थांब
३	हस्त	हत्त	हात	हाथ
४	विद्युत्	विज्जुली	वीज	बिजली
५	स्नान	न्हाण	नहाण	नाहा
६	गर्जरी	गग्गरी	घागर	गगरी
७	अस्ति	अत्थि	आहे	आघे

याप्रमाणें एकाच संस्कृत शब्दाचे अनेक उच्चार पाहिले म्हणजे उच्चारांत किती वैचित्र्य असतें व अशा उच्चारांमुळें बनणाऱ्या भाषांचें शास्त्र शिथिल स्वरूपाचें

असणें किती संभवनीय आहे याची कल्पना येते. म्हणूनच प्राकृत व्याकरणांत 'बहुलं' असें प्रथमच अधिकारसूत्र असतें. त्याचा अर्थ पुढील नियम 'प्राय: लागू' समजावेत असा आहे. यामुळें आम्ही यासंबंधानें येथें विशेष वाटाघाट करीत नाहीं. ही उच्चारांची गडबड वैदिक वाङ्मयांतही उपलब्ध होते. 'ड'चा 'ळ' व 'ढ'चा ळ्ह ऋग्वेदांत असतो. शुक्ल यजुर्वेदांत 'य'बद्दल 'ज' व 'ष'बद्दल 'ख' येतो. हे सर्व फरक उच्चारभेदमूलकच होत. अभिजात संस्कृत भाषेचें पाणिनीचें व्याकरण अगदीं रेखीव असल्यामुळें व शिक्षा वगैरे ग्रंथांनीं उच्चारहि नियमबद्ध झाल्यामुळें तिचें रूप व उच्चार सर्वत्र सारखे उपलब्ध होतात. या अभिजात भाषेवांचून कोणत्याहि इतर भाषेच्या, रूपांत व उच्चारांत इतकी नियमबद्धता दिसून येत नाहीं. असो.

प्राकृत भाषेचें माहात्म्य.— वर सांगितल्याप्रमाणें उच्चारभेदामुळें शौरसेनी, माहाराष्ट्री वगैरे अनेक भाषा झाल्या. या प्राकृत भाषांविषयीं कांहीं संस्कृतज्ञ जरी अनादर दाखवीत असले तरी प्राकृत व्याकरणकारांनीं व कवींनीं त्यांची विशेष प्रशंसा केली आहे. उदाहरणार्थ पुढील पद्यें पाहा —

"परुसो सक्कहबंधो पाउअबंधोहि होइ सुउमारो ।
पुरिसाणं महिलाणं जेत्तिय मिहंतरं तेत्तियमिमाणम् ॥" (कर्पूरमंजरी)
"अहो तत्प्राकृतं हारि प्रियावक्त्रेंदुसुंदरम् ।
सूक्तयो यत्र राजन्ते सुधानिष्यन्दनिर्भराः ॥" (प्राकृतमंजरी)
"अनल्पार्थं सुखोच्चारि शब्दसाहित्यजीवितम् ।
तच्च प्राकृतमेवेति मतं सूक्तानुवर्तिनाम् ॥" (शब्दानुशासनम्)
"श्रूयते च कुन्तलेषु सातवाहनो नाम राजा ।
तेन प्राकृतभाषात्मकमन्तःपुरमेवेति नियमः कृतः ।" (काव्यमीमांसा)
"केऽभवन्नाढ्यराजस्य राज्ये प्राकृतभाषिणः ।" (सरस्वतीकंठाभरण)
"गिरः श्रव्या दिव्याः प्रकृतिमधुराः प्राकृतगिरः ।" (राजशेखर)

या ठिकाणीं संवत् ८३५ (शक ६९९) या वर्षीं लिहिलेला कुवलयमाला नांवाचा ग्रंथ आहे. त्याचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. त्यांत १८ प्राकृत भाषांचा उल्लेख आहे. त्यांतील सोळा भाषांसंबंधानें त्या भाषा कोणते लोक बोलत होते, त्यांचा बांधा व स्वभाव वगैरे कशा प्रकारचा होता हें सांगून त्या त्या भाषेंतील कांहीं शब्द देऊन तिचें स्वरूप दाखविण्याचा यत्न केला आहे. त्यांत माहाराष्ट्री भाषेबद्दल त्याची जी कारिका आहे ती येथें देतों —

"दढमडहसामलंगे सहिरे अहिमाणकलहसीले य ।
दिण्णिल्ले अ गहिले उल्लविरे तत्थ मरहट्टे ॥"

("द्दढलघुश्यामाङ्गान् सहमानानभिमानकलहशीलांश्च ।
दिण्णल्ले च गहिल्ले उल्लपतस्तत्र महाराष्ट्रीयान् ॥")

यांतील 'अहिमाणकलहसीले य' हें पद आपण ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असो. याप्रमाणें प्राकृत भाषेची प्रशंसा पुष्कळांनीं केली आहे.

प्राकृत शब्दाचा अर्थ.— येथें प्रसंग आहे म्हणून प्राकृत शब्दाचा अर्थ काय तो स्पष्ट करतों. यासंबंधानें प्राचीन व अर्वाचीन विद्वानांनीं विविध कल्पना केल्या आहेत म्हणून त्यांचा निर्णय करणें अवश्य आहे. प्राचीन प्राकृतव्याकरणकार 'प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं तत आगतं वा प्राकृतम् ।' असा अर्थ करतात. म्हणजे प्रकृतिभूत जी संस्कृत तीपासून उत्पन्न झालेली म्हणून प्राकृत असा या वाक्याचा अर्थ आहे. परंतु यापुढेंच 'प्रकृतिप्रत्ययलिङ्गकारकसमाससंज्ञादयः संस्कृतवद्वेदितव्याः' असें सांगितलें असल्यामुळें प्रथम सांगितलेलें प्रकृतित्व हें केवळ व्याकरणा-संबंधानें समजावें लागतें. संस्कृतापासून प्राकृत उत्पन्न झाली असेंच मानण्याचें कारण नाहीं. कांहीं विद्वान लोक 'प्रकृतिः स्वभावः तस्या जातं प्राकृतं' असा अर्थ करतात. म्हणजे स्वाभाविक रीतीनें जी बोलली जाते ती प्राकृत भाषा म्हणजे बोलींतील भाषा. कांही विद्वान माहाराष्ट्री वगैरे भाषांस पूर्वी पाअड (प्रकट) भाषा म्हणत असत. या पाअड शब्दाचें अर्वाचीन संस्कृतज्ञांनीं प्राकृत असें रूप कल्पून तें तिचें नांव बनविलें असें मानितात व प्राकृत भाषा म्हणजे प्रकट भाषा असा आपला अभिप्राय देतात. आमच्या मतें 'प्राकृतस्तु पृथग्जनः' या कोशानुरोधानें साधारण अविद्वान लोक असा अर्थ घेऊन सामान्य लोकांची भाषा असा अर्थ करणें युक्त दिसतें. कारण प्राकृत शब्दाचा हा अर्थ व्यवहारांत विशेषेंकरून आहे. शिवाय, प्राचीन व्यवहारांत या प्राकृत भाषेला बालभाषा या शब्दानें व्यवहारीत असत. बालशब्दाशीं समानार्थक प्राकृत शब्द घ्यावयाचा म्हणजे सामान्य अज्ञ जन हाच अर्थ घेणें युक्त आहे.

मराठीचा उगम.— आतां आपण मराठीसंबंधानें थोडीशी विशेष चर्चा करूं. मराठीच्या स्वरूपाकडे पाहिलें असतां तींत क्वचित् वैदिक पद्धति दृग्गोचर होते. उदाहरणार्थ, तृतीयेचा बहुवचनी हीं प्रत्यय हा भिः पासून आलेला असावा. वेदांत देवेभिः असें रूप होतें. मराठींत देवांहीं असें होतें. वेदांत कोठें 'घ'ला 'ह' होतो; उ. प्रतिसंधायबद्दल प्रतिसंहाय येतें. मराठींत बधिरबद्दल बहिरा असें रूप होतें. अशी वैदिक पद्धतीला अनुसरून होणारी घडामोड थोडी दृष्टीस पडते. विशेषतः अभिजात संस्कृतांतून तद्भव (थोडे वर्णविकार होऊन आलेले) व तत्सम (मूळासारखेच आलेले) अशा रीतीनें पुष्कळ शब्द आले आहेत. वर्णादेश व वर्णलोप होऊन प्राकृत भाषेंतूनहि बरेच शब्द आले आहेत. उ. बारह (प्रा.), बारा (मराठी); गग्गरी (प्रा.), घागर (म.); चोक्ख (प्रा.),

चोख (म.); झगड (प्रा.), झगडा (म.); पोट्ट (प्रा.), पोट (म.). मराठींतील विभक्तिप्रत्यय प्राकृतांतूनच घेतले आहेत. तेव्हा मराठी ही विशेषत: माहाराष्ट्री व अपभ्रंश या भाषांपासून उत्पन्न झाली असें जें विद्वानांचें म्हणणें आहे तें युक्तच आहे. शिलालेखांतील व शालिवाहनाच्या सातव्या शतकांतील कुवलय माला या ग्रंथांतील मराठीच्या उल्लेखावरून मराठी भाषा शालिवाहनाच्या ७ व्या शतकांत व्यवहारांत होती असें विद्वानांच्या मतें ठरत आहे. असो. आतां आपण व्याकरणशास्त्राकडे वळूं.

व्याकरणाचे उपयोग.— 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते पिपासितैः काव्य-रसो न पीयते' असें एक विनोदी सुभाषित आहे. याचा तात्पर्यार्थ व्यवहारांत व्याकरणशास्त्राचा कांहीं उपयोग नाहीं असा आहे. व्याकरण शिकावयाचें कशा-करतां तर शुद्ध बोलतां यावें म्हणून. परंतु व्यवहारांत वस्तुस्थिति अशी दृष्टीस पडते की, ज्याला व्याकरण मुळींच येत नाहीं असा एखादा व्यवहारचतुर उत्तम वक्ता असूं शकतो, व ज्याला व्याकरण अवगत आहे असा एखादा मुखदुर्बल बोलूं लागला असतां दहा ठिकाणीं अडखळतो व अपप्रयोग करितो. तेव्हां व्याकरण-शास्त्राचा उपयोग काय असा कांहीं लोकांचा व्याकरणशास्त्रावर आरोप आहे. त्याचा प्रथम विचार करून नंतर या शास्त्रांतील विवाद्य विषयांकडे वळूं.

त्या त्या विषयाचें व्यवस्थित ज्ञान करून देणारें शास्त्र कशास पाहिजे हा प्रश्न खरोखर पृच्छकांच्या बुद्धीची मंदता स्पष्ट करतो असें आम्हांस वाटतें. सुतार, गवंडी वगैरे कामकरी भव्य प्रासाद उभारतात, मग वास्तुशास्त्रज्ञ इंजिनिअर कशास पाहिजे, किंवा तोंडच्या हिशेबाच्या चालीनें आम्हांस व्यवहारापुरते हिशेब करतां येतात मग गणितशास्त्र कशास पाहिजे, किंवा एखाद्या मुलास नाटकांतील सुंदर पदें म्हणतां येतात मग संगीतशास्त्र कशास पाहिजे, हे प्रश्न जितके अप्रयोजक तित-काच हा प्रश्न आहे. शिष्टप्रयोग हे भाषेचे आधार; कारण तेच भाषेंत गांभीर्य व एकरूपता उत्पन्न करितात. या शिष्टप्रयोगांचें विवेचन करून व्यवस्था लावणारें शास्त्र तें व्याकरणशास्त्र. या शास्त्रानें भाषेस स्थिर स्वरूप प्राप्त होतें. तेव्हां अशा शास्त्राचा उपयोग काय असा प्रश्न करणें हें अत्यंत कोत्या समजुतीचें आहे. असो. तेव्हां आतां व्याकरणशास्त्राचे काय उपयोग आहेत ते थोडेसे स्पष्ट सांगतों.

कोणत्याहि भाषेचें ज्ञान चिरकाल राहण्यास कोश व व्याकरण हीं दोन साधनें अमोघ अशीं आहेत; कोशानें शब्दाचें अर्थज्ञान व व्याकरणानें वाक्यांतील पदांचे परस्परसंबंध वगैरे समजतात. आज हजारों वर्षांपूर्वींच्या वैदिक भाषेचें व अभिजात संस्कृत वाङ्मयाचें जें ज्ञान होत आहे तें निघंटु, कोश व पाणिनि वगैरेंचीं व्याकरणें नसतीं तर आपणांस झालें असतें काय ! प्राकृत भाषांचीं व्याकरणें नसतीं तर मराठी, गुजराथी, बंगाली वगैरे भाषांच्या उत्पत्ति वगैरेसंबंधींचा

इतिहास आपणांस अवगत झाला असता काय ? या सर्व गोष्टी जर आपणांस प्राचीन व्याकरणें व कोश यांमुळें अवगत होत आहेत तर हे प्राचीन वैयाकरणांचे आपणावर उपकार नाहींत काय ? हे उपकार फेडावयाचे असतील तर भविष्यत्कालीन विद्वानांस आपल्या मराठीचें यथार्थ ज्ञान व्हावें, तिचा उत्कर्ष व्हावा, याकरतां आपणांस तिचें व्याकरण करावयास नको काय ? भाषेचें व्याकरण केलें म्हणजे तिचें स्वरूप व्यवस्थित होऊन तिला चिरायुत्व प्राप्त होतें. असें आहे तर आपल्या या जन्मभाषेला चिरंजीविनी होण्याकरितां आपण यत्न करावयास नकोत काय ? 'जननी जन्मभाषा च स्वर्गादपि गरीयसी' ही उक्ति मनांत ठेवून आपण तिच्या उत्कर्षाविषयीं यत्न करावयास नकोत काय ? तात्पर्य, व्याकरण व कोश हीं भाषेला चिरंजीवी करीत असल्यामुळें प्रत्येक भाषाभिमान्यानें त्यांविषयीं आदर ठेवून तीं केलीं पाहिजेत म्हणजे पुढील हजार दोन हजार वर्षांनंतरच्या लोकांस या भाषेच्या स्वरूपाचें आकलन होऊन या भाषेंतील विविध ग्रंथांतील ज्ञानभांडार लुटावयास सांपडेल. भाषा ही जनसमूहाचा अज्ञानांधकार दूर करणारा दीप आहे अशी कल्पना केली तर व्याकरण व कोश हीं त्या दीपाचें जीवनभूत तेल आहे असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं.

व्यावहारिक भाषेचें व्याकरण हें केवळ भविष्यत्कालीन लोकांनाच उपयुक्त असतें असें नाहीं, तर वर्तमानकालींहि त्याचा उपयोग असतो. आज हिंदुस्थानांतील सर्व भागांतील लोकांचें दळणवळण पूर्वींपेक्षां विशेष वाढत आहे. आज मद्रासी, गुजराथी, बंगाली, महाराष्ट्रीय लोकांस परस्परांच्या मुलखांत व्यवहार करणें अवश्य झालें आहे. व्यवहाराच्या साधनांत भाषासाधन हें प्रधान साधन आहे. अर्थात्, ज्या प्रांतांत व्यवहार करावयाचा तेथील भाषा अवगत असणें अवश्य आहे. परभाषा अवगत करून घेण्यास स्वभाषेचें व्याकरणपूर्वक ज्ञान व परभाषेचें व्याकरण हीं महत्त्वाचीं साधनें होत. या साधनांशिवाय परकीय भाषेचें ज्ञान स्वल्प काळांत सुलभ रीतीनें होणें शक्य नसतें व म्हणूनच महाभाष्यांत 'लाघव' हें एक व्याकरणाचें प्रयोजन सांगितलें आहे. तेव्हां भाषेच्या व्यवहारकालींसुद्धां अन्य भाषेचें आपणांस आकलन होण्यास व तसेंच आपल्या भाषेचें इतरांस अवगमन होण्यास भाषेचें व्याकरण असणें अवश्य आहे. शिवाय भाषेचें आकलन व्याकरणानें सुलभ होत असल्यामुळें आपल्या भाषेचा विविध देशांत प्रसार होण्यास तें एक साधन होत असतें हीहि ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

तिसरी गोष्ट, भाषेला महत्त्व व स्थिरत्व येण्याला तींत विविध शास्त्रीय ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. शास्त्रीय ग्रंथांस पारिभाषिक शब्दांची अत्यंत आवश्यकता असते. कोणत्याहि भाषेंत हे पारिभाषिक शब्द स्वयंभू नसतात; ते निर्माण करावे लागतात. त्याकरतां भाषेंतील धातु, प्रत्यय व त्यांचे अर्थ हे अवगत असावे लाग-

तात. ही सर्व फोड व्याकरणानें केलेली असते. त्यामुळें वैयाकरणाच्या हातून अभिप्रेत अर्थाला समुचित शब्द तयार होणें शक्य असतें. अवैयाकरणाकडून असे शब्द निर्माण होणें शक्य नसतें. फार झालें तर दुसऱ्यानें अशा जातीचे प्रयोग केले आहेत म्हणून मीं तसे केले असें तो म्हणूं शकेल. स्वतः उपपत्ति न करतां दुसऱ्यावर हवाला देणें हें विद्वानांना पटत नसतें. त्यांना त्याचें सशास्त्र उपपादन पाहिजे असतें. त्यांना लोकाची उसनवारी हें कमीपणाचें लक्षण वाटतें व अशा परोपजीवी भाषापंडितांविषयीं त्यांच्या मनांत आदर नसतो. साहित्यशास्त्रकुशल भामहानें याविषयीं मोठे मार्मिक उद्गार काढले आहेत. तो म्हणतो :—

"नापारयित्वा दुर्गाधममुं व्याकरणार्णवम् ।
शब्दरत्नं स्वयंगम्यमलंकर्तुमयं जनः ॥
तस्य चाधिगमे यत्नः कार्यः काव्यं विधित्सता ।
परप्रत्ययतो यत्तु क्रियते तेन का रतिः ॥
नान्यप्रत्ययशब्दा वाग्भवतीह मुदे सताम् ।
परेण धृतमुक्तेव सरसा कुसुमावली ॥
मुख्यस्तावदयं न्यायो यत्स्वशक्त्या प्रवर्तते ।
अन्ये सारस्वता नाम सन्त्यन्योक्तानुवादिनः ॥ (भामह)

हें उद्गार किती मार्मिक आहेत हें विद्वान वाचकांस समजून येईलच. तात्पर्य, उत्तम शब्द निर्माण करून शास्त्रीय परिभाषा वगैरे बनविणें हें व्याकरणावांचून शक्य नसल्यामुळें भाषेचें व्याकरण अवश्य पाहिजे.

सभा वगैरे सार्वजनिक स्थलीं सर्वांस बोध होण्याकरतां भाषेच्या ठिकाणीं एकरूपता असणें अवश्य असतें. या दृष्टीनें भाषेला व्याकरण अवश्य पाहिजे. शिवाय वक्त्याला व्याकरण अवगत असल्याशिवाय विशिष्ट प्रयोग करण्यास विश्वास उत्पन्न होत नाहीं. अविश्वस्त वक्ता सभेंत भेदरून जात असल्यामुळें त्याचें वक्तृत्व परिमाणकारक होत नाहीं. असा प्रसंग आपणावर येऊं नये म्हणून प्रत्येकानें व्याकरण शिकावें. अवैयाकरणांचें—

"अस्वीकृतव्याकरणौषधानामपाटवं वाचि सुगाढमास्ते ।
कस्मिंश्चिदुक्ते तु पदे कथंचित् स्वैरं वपुः स्विद्यति वेपते च ॥ (विश्वगुणादर्श)

असें वेंकटाध्वरीनें मार्मिक वर्णन केलें आहे.

विवादभूत विषय.— आतापर्यंत व्याकरणाचें महत्त्व व उपयुक्तता यांचें थोडेंसें विवेचन केलें. तेव्हां आतां हल्लीं चालू असलेल्या मराठी व्याकरणांतील विचारणीय अशा कांहीं गोष्टींचा विचार करूं. या संस्थेच्या चिटणिसांनीं १०।१२ विषयांची विचारणीय विषय म्हणून यादी दिली आहे व त्यांवर विद्वानांकडून निबंधहि मागितले आहेत, व त्यांपैकी कांहीं विषयांची चर्चाहि येथें होणार आहे.

तेव्हां त्यासंबंधानें मला काय सांगावयाचें तें उपसंहार करतांना सांगेन. तथापि व्याकरणांत जे विषय विवाद्य म्हणून समजले जातात व जे कांहीं या चिटणिसांच्या यादींत नाहींत परंतु विचार्य आहेत त्यांपैकी कांहीं विषय मी विद्वानांपुढें विचाराकरितां मांडीत आहें. यांतील अमुक पक्षच युक्त असा माझा आग्रह नाहीं. परंतु त्या विषयाचें स्वरूप किंवा त्यासंबंधानें ऐतिह्य काय वगैरेंची आपणांस माहिती देऊन आपण त्याचा विचार करावा एवढेंच प्रथम सांगून आतां त्या विषयांकडे वळतों. त्यांत मी वर्णविचार, लिपिविचार, विभक्तिविचार, क्रियापदविचार व प्रयोगविचार या गोष्टींचा संक्षेपानें विचार करणार आहें.

हा विचार करण्यापूर्वीं व्याकरण या शब्दाचा अर्थ काय व व्याकरणशास्त्रांत शब्दरूपाला प्राधान्य वा अर्थाला प्राधान्य याचा थोडासा विचार केला पाहिजे. व्याकरणशब्दाची व्युत्पत्ति 'व्याक्रियन्ते व्युत्पाद्यन्ते शब्दा येन यत्र वा तद् व्याकरणम्' अशी प्राचीन पंडितांनीं दिली आहे. हिचा अर्थ 'ज्या शास्त्रानें अथवा ज्या शास्त्रांत शब्दांची फोड केली आहे त्यास व्याकरण म्हणावें' असा आहे. यावरून शब्दरूपांचें ज्यांत मुख्यत्वेंकरून विवेचन केलें असतें त्यास व्याकरण म्हणावें असें निष्पन्न होतें. संस्कृत व तदुत्पन्न प्राकृत भाषा यांचें स्वरूप पाहिलें तर त्यांत साधित शब्दांचें वैपुल्य आढळून येतें. संस्कृतांतील एकेका धातूचीं पणिनीच्या नियमांप्रमाणें रूपें सिद्ध करूं लागलों तर तीं सहज दोन हजारांवर होतात. असे धातु बावीसशे आहेत. शिवाय उणादिपठित शब्द वगैरे पाहिले तर साधित शब्दांचा भरणा फार. शिवाय एकाच शब्दाचे अनेक अर्थहि असतात. तेव्हां अशा भाषेच्या व्याकरणांत रूपनिष्पत्तीला प्राधान्य येणें स्वाभाविक आहे. निरर्थक अक्षरसंघाचें व्याकरण कर्तव्य नसलें तरी सार्थ अक्षरसंघाचीं वाक्योपयुक्त रूपें बनवितांना अर्थाला अनुसरून त्या पदाचें स्वरूप बनवावयाचें कीं प्रथम रूपनिष्पत्ति करून मग अर्थानुसरण करावयाचें असा येथें प्रश्न आहे. त्याचें उत्तर, हें रूप तयार होऊन तें वाक्यांत प्रविष्ट झाल्यावर मग त्यापासून अर्थबोध करून घ्यावयाचा असल्यामुळें तत्पूर्वी केवळ रूपनिष्पत्तीला प्राधान्य देऊन अक्षराच्या घडामोडी करावयाच्या असतात, त्या वेळीं अर्थाविषयीं प्रश्नच उपस्थित होत नाहीं, असें आहे. आतां भगवान्‌पाणिनीनें जेथें रूपाचे कांहीं विशिष्ट अर्थ देऊन रूपसिद्धि केली असेल तेथें रूपनिष्पत्तीला तेवढेच अर्थ उपयुक्त मानून त्यांचा स्वीकार करावयाचा. यापेक्षां जास्त अर्थ स्वीकारावयाचा नाहीं. उ. रामानें याचें व्याकरण करणें झालें तर राम या अकारान्त पुंलिंगी शब्दाचें तृतीयेचें एकवचन एवढेंच व्याकरण सांगावयाचें. कारण त्या रूपाला एवढी माहिती पुरी होते. 'विशेषनाम' वगैरे कांहीं सांगावयास नको किंवा कर्तरि तृतीया हेंहि सांगावयास नको. कारण त्याचा रामानें या रूपाशीं कांहीं संबंध नाहीं. तर त्या गोष्टी वाक्यार्थ करतांना उपयुक्त आहेत. वाक्यार्थाला प्राधान्य देऊन विवेचन कर-

णारे ग्रंथ स्वतंत्र निराळे आहेत; उ. वाक्यपदीय, वैयाकरणभूषण, लघुमंजूषा वगैरे ग्रंथांत वाक्य व तदन्तर्गत पदें यांच्या अर्थासंबंधानेंच विवेचन केलेलें आहे. पाणिनीय व्याकरणशास्त्रांत रूपनिष्पत्तीला प्राधान्य, म्हणून रूपाच्या अनुरोधानें नामांचे व धातूंचे गण, कृत्तद्धितादि विविध प्रत्यय, यांची कल्पना करून रूपसिद्धि केली आहे. पाणिनीनें विभक्तिप्रत्ययांच्या प्रथमादि संज्ञा अथवा विविध काळांच्या लडादि संज्ञा योजिल्या आहेत. त्यांकडे पाहिलें म्हणजे त्याला आपल्या शास्त्रांत रूपसिद्धीला प्राधान्य द्यावयाचें आहे हें स्पष्ट होत आहे. नाहीं तर त्यानें कर्ता, कर्म, अशीं विभक्तीचीं नांवें ठेविलीं असतीं व भूत, वर्तमान, भविष्य अशीं आख्यातप्रत्ययांचीं नांवें ठेविलीं असतीं. या सर्व गोष्टींवरून व्याकरणशास्त्रांत रूपाला प्राधान्य आहे हें सिद्ध होतें. तेव्हां कोणत्याहि शब्दाची व्युत्पत्ति करावयाची असेल तेव्हां ती रूपाकडे दृष्टि ठेवून करावी म्हणजे कांहीं घोटाळे होणार नाहींत. मराठी व्याकरणकारांनीं शब्दाची फोड करतांना अर्थाचा त्यांत उलगडा करण्याचा प्रयत्न केल्यामुळें बराच घोटाळा झाला आहे. चिपळूणकर, दामले प्रभृति वैयाकरणांना व्याकरणशास्त्रांत रूपालाच प्राधान्य असतें ही गोष्ट मान्य आहे व तिचा विभक्तिप्रकरणांत त्यांनीं उल्लेखहि केला आहे.

वर्णविचार.—आतां पूर्वी सांगितलेल्या एकेका विषयाचें विवेचन करूं. त्यांतील पहिला विषय जो वर्णविचार त्यांत दोन गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. मराठींत संयुक्त व्यंजन पुढें आलें असतां मागील स्वराचा संस्कृताप्रमाणें आघातयुक्त उच्चार केला जात नाहीं ही एक गोष्ट व चवर्गाचा मराठी शब्दांत दंततालव्य उच्चार होतो तेव्हां त्याचें स्थान व्याकरणांत तसें मानावें का व मानिलें तर त्यासंबंधानें लिपींत काय व्यवस्था करावी ही दुसरी. यांतील पहिल्या गोष्टीचा विचार करूं. मराठी कुऱ्हाड, वऱ्हाड, बश्या, रड्या, उचल्या, नद्या, पेट्या, त्याच्या, माझ्या वगैरे अनेक ठिकाणीं संयुक्त व्यंजनाच्या पूर्वीच्या स्वरावर आघात होत नाहीं (धक्का बसत नाहीं). संस्कृतांत अशीं उदाहरणें फार थोडीं आहेत. व त्यांबद्दल छंदःशास्त्रांत 'प्रह्रे वा' अशीं कांहीं सूत्रें आहेत. तात्पर्य, संस्कृतांत संयुक्त व्यंजन पुढें आलें असतां मागील स्वरास आघात प्रायः नियमानें होतो, तर मराठींत बरेच ठिकाणीं तो होत नाहीं. हें असें कां व्हावें ? तेव्हां मराठींत हे उच्चार शैथिल्यदोषामुळें आले असें समजावयाचें कीं काय ? हे उच्चार शिष्टाद्दत असल्यामुळें ते सदोष मानतां येत नाहींत. तर हा मराठी भाषेचा केवळ विशेष आहे असें समजावयाचें कीं त्यास कांहीं इतिहास आहे व त्यामुळें तो युक्त आहे असें समजावयाचें ? शिवाय केवळ परंपरेमुळें हा शुद्ध समजावयाचा का त्याची कांहीं उपपत्ति करितां येते इत्यादि प्रश्न उपस्थित होतात. तर या सर्व गोष्टींचा विचार करून काय निष्पन्न होतें तें आपण पाहूं.

संयुक्त व्यंजनापूर्वीच्या स्वरास आघात कां होत नाहीं याचा विचार करावयाचा म्हणजे कालप्रवाहांत हिंदुस्थानांतील भाषेचें परिवर्तन कसें होत चाललें आहे याकडे आपणांस पाहावयास पाहिजे. संस्कृतापासून उद्भवलेल्या प्राकृत भाषेकडे पाहिलें म्हणजे संस्कृतांतील विजातीय संयुक्त वर्णांचे सजातीय संयुक्त वर्ण बनण्याची प्रवृत्ति दिसून येते; जसें:— हस्त-हत्त, कर्ण-कण्ण, वर्ण-वण्ण. अशा फरकानें उच्चारास थोडेंसें सौलभ्य येतें हें स्पष्ट आहे. हेच प्राकृत शब्द मराठींत आले म्हणजे त्यांच्यांतील द्वित्ववर्णांपैकीं एकाचा लोप होऊन तत्पूर्वस्वरास दीर्घत्व येतें व स्वराचा आघात नष्ट होतो; उ. हत्त-हात, कण्ण-कान, वण्ण-वाण, हे प्राकृत भाषेंतील शब्दांपेक्षां सुलभोच्चार्य शब्द बनले आहेत. ह्यावरून एवढेंच सिद्ध होतें की, आघातशून्य उच्चारांकडे या आर्यभाषांचा कल आहे. संस्कृत भाषेंतहि हीच प्रवृत्ति निराळ्या रीतीनें दृष्टीस पडते. संस्कृत भाषेच्या वैदर्भी व गौडी अशा दोन पद्धति आहेत. अल्प शब्दांचे समास, कोमल वर्ण व सुगम अर्थ इत्यादि गोष्टी जींत प्रधान आहेत त्या रचनापद्धतीस वैदर्भी पद्धति म्हणतात, व दीर्घ समास, कठोर वर्ण व क्लिष्ट अनुप्रास इत्यादि गोष्टी जींत मुख्य आहेत तीस गौडी रीति म्हणतात. यांतील वैदर्भी रीतीचें उदाहरण—

हे मंदमंद पद सुंदर कुंददंती । चाले जसा मदधुरंधर इंद्रदंती ।
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते । निष्कंप कंकणकरांसि पुढें करीते ॥
(दमयंतीस्वयंवराख्यान)

हें होईल.

तो दशकंठ अकुंठ विसां भुजिं तें विषकंठधनू उचली ।
कष्टत कोष्ठवरी द्विजओष्ठहि चावुनि त्या जरिनें खचली ॥
चाप उरीं दडपे झडपे मग आननपंक्ति धरे बसली ।
वासुनि दांत मुखांत दहांत पडे मति गाढतमीं खचली ॥ (सीतास्वयंवर)

हा श्लोक गौडीचें उदाहरण होईल. या दोनहि रीति प्रसंगानें युक्त आहेत. पहिली ललित शृंगारांत तर दुसरी वीर, रौद्र वगैरे रसांत उपयुक्त आहे. असें असतां इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून रचिलेल्या साहित्यग्रंथांकडे पाहिलें तर ते सर्व वैदर्भी रीतीचे पुरस्कर्ते असून गौडीविषयीं अनादर बाळगणारे होते असें आढळून येतें. गद्य काय किंवा पद्य काय त्यांतील दीर्घ समास वगैरे प्रकारचें काठिन्य घालवून त्यास मार्दव (कोमलत्व) आणण्याची सर्वांची प्रवृत्ति दिसून येते. कालिदासासारख्या कविसम्राटांचीं काव्यें, नाटकें पाहिलीं तर त्यांजकडूत समुचित प्रसंगींहि गौडी रीतीचें अवलंबन झालेलें दिसून येत नाहीं. याला अपवाद भवभूति कवि होय. त्यानें प्रसंगानुरोधानें उभय रीतींचा अवलंब करण्याची खटपट केली आहे. प्राकृत भाषा तर कोमलपणाविषयी प्रसिद्ध आहे. ती मनोहर स्त्रीप्रमाणें कोमल

आहे, पुरुषाप्रमाणें राठ जी संस्कृत भाषा तशी ती नाहीं असें एका कवीनें प्राकृत भाषेचें वर्णन केल्याचें पूर्वी दाखविलेंच आहे. ही भाषापरिवर्तनाची पद्धति पहिली म्हणजे मराठींत संस्कृताप्रमाणें दीर्घ समास कां नाहींत, संयुक्त व्यंजनापूर्वीचे स्वराघात लुप्त कां झाले याचा बराच उलगडा होतो. या काळांतील सर्व विद्वान लोकांची व राजांची प्रवृत्ति अशीच की सुलभ उच्चार, सुलभ रचना यांनीं युक्त अशा ललित प्रबंधांत रममाण व्हावयाचें. तेव्हां अशी ही मार्दवप्रधान मनोवृत्ति बनल्यामुळें त्याच मनोवृत्तीच्या ओघांत उद्भवलेली जी मराठी भाषा तींतहि तेंच मार्दव रूढ झालें व त्यामुळें ही आघातशून्य उच्चारांची पद्धति निघाली.

आतां संयुक्त व्यंजनापूर्वी आघात उत्पन्न कसा होतो व तो नष्ट कसा करतां येतो तें पाहूं. प्रायः दोन व क्वचित् तीन व्यंजनें मिळून संयुक्त व्यंजन बनतें. या संयुक्त व्यंजनांतील पहिलें अक्षर पूर्वस्वराशीं अथवा पुढील व्यंजनाशीं विशेष लगट करून उच्चारतां येतें. पूर्वस्वराशीं लगट करून तें उच्चारलें म्हणजे तो स्वर व्यंजनान्त होऊन गुरु होतो. व्यंजनान्त ह्रस्व स्वर गुरु होतो याविषयीं छंदःशास्त्रकारांची 'दीर्घान्तं संयोगपरं तथा प्लुतं व्यंजनान्तमूष्माणम् । सानुस्वारं च गुरुं क्वचिदवसानेऽपि लघ्वन्तम् ।' अशी कारिका आहे. दृषद्, सरित्, मरुत् इत्यादि ठिकाणच्या अंत्य व्यंजनांपूर्वीचे अ, इ, उ हे स्वर आघातयुक्त उच्चारले जातात. येथें त्यांच्यापुढें संयुक्त व्यंजन नाहीं. याच शब्दांच्या तृतीयेचीं एकवचनें दृषदा, सरिता, मरुता अशीं झालीं म्हणजे पूर्वीचे स्वर व्यंजनान्त नसल्यामुळें त्यांचे आघातयुक्त उच्चार होत नाहींत हें आपणांस स्पष्ट कळून येत आहे. एवढी गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे तुम्हांस या शब्दाचे दोन उच्चार कसे होतात तें कळून येईल. वर सांगितल्याप्रमाणें ज्या वेळीं म्ही या संयुक्त व्यंजनांतील पहिलें अक्षर म् हें तु-शीं लगट करून उच्चारलें म्हणजे तें व्यंजनान्त होऊन आघातयुक्त होतें. तुम्-ही अशा रीतीनें छेद करून त्याप्रमाणें उच्चार केला म्हणजे आम्ही काय म्हणत आहों तें ध्यानांत येईल. तोच म् ह्-शीं लगट करून उच्चारला म्हणजे पूर्वस्वर व्यंजनान्त नसल्यानें आघातयुक्त होत नाहीं. या वेळीं तु-म्ही असा पदच्छेद करून पूर्व स्वर उच्चारावा म्हणजे आमचें म्हणणें स्पष्ट होईल. तात्पर्य, संयुक्त व्यंजनाच्या उच्चाराच्या अशा दोन प्रकारच्या लकबी असल्यामुळें संस्कृतांत पूर्वस्वराशीं लगट करून संयुक्त व्यंजनांतील प्रथमचें व्यंजन उच्चारण्याची पहिली पद्धत होती. मराठींत दुसरी पद्धत प्रसार पावली आहे. कारण आघातशून्य उच्चाराकडे हजारबाराशे वर्षांचा समाजाचा कल. तेव्हां संप्रदाय व उपपत्ति ह्या दोन्ही गोष्टी आघातलोपाला अनुकूल असल्यामुळें मराठींत यासंबंधानें विकल्प मानावा असें आम्हांस वाटतें.

आतांच ज, झ या वर्णांचे मराठींत दोन प्रकारें उच्चार होतात, म्हणजे

संस्कृत शब्दांचे चंद्र, छाया, जाया वगैरे शब्दांतील केवळ तालव्य– व निव्वळ मराठी शब्दांचे चमचा, झगडा, जांवई वगैरे शब्दांतील दंततालव्य –हे उच्चार जर दोन प्रकारचे आहेत तर त्याला अनुसरून त्यांच्या त्या दोन्ही स्थानांचा उल्लेख व्याकरणांत केला पाहिजे व लिपि ही उच्चारानुसारिणी असणें अवश्य असल्यामुळें तींतहि यांचीं चिन्हें कल्पिलीं पाहिजेत. उच्चार आहेत आणि लिपिचिन्हें नाहींत असें होईल तर तो लिपीस गौणपणा आहे. तेव्हां हा गौणपणा दूर केला पाहिजे असें विद्वानांचें म्हणणें आहे व तें युक्त आहे. आमचें येथें एवढेंच सुचविणें आहे कीं, मराठीची देवनागरी लिपि ही आपल्या सौंदर्यामुळें इतर भाषांच्या लिपींचा प्रदेश आक्रमित आहे व हिंदुस्थानांत सर्वसाधारण भाषा हिंदी व्हावी अशी विद्वानांची इच्छा आहे. त्याप्रमाणेंच सर्वसाधारण लिपि देवनागरी व्हावी अशीहि त्यांची इच्छा आहे. तेव्हां ह्या लिपीच्या विस्तृत प्रदेशाची कल्पना घेऊनच तींत फरक करणें युक्त होईल. अर्थात् गुजराथी, बंगाली वगैरे भाषांत याच वर्णांचे उच्चार कसे होतात–संस्कृताप्रमाणें होतात कीं मराठीप्रमाणें होतात–हें पाहून काय फरक करणें तो केला पाहिजे. एकदेशीय करतां उपयोगी नाहीं.

लिपिविचार.— असो. आतां लिपीचा प्रसंग आला आहे म्हणून तिच्यासंबंधानें थोडा विचार करतों. लिपि ही उच्चारानुसार असावी कीं ऐतिह्य व इतर कांहीं उपयुक्तता यांमुळें उच्चारापासून थोडीशी दूर म्हणजे उच्चारानुसारी नसली तरी ती स्वीकारावी असे दोन पक्ष येथें आहेत. यांचा विचार करतांना लिपि कशाकरतां प्रवृत्त झाली हें प्रथम पाहिलें पाहिजे. या गोष्टीचा विचार केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, उच्चारलें जाणारें वाक्य हें क्षणध्वंसी असल्यामुळें व मनुष्याची स्मरणशक्ति ही भाषेनें ज्ञात होणाऱ्या सर्व अर्थांचें आपल्यांत आकलन करून ठेवण्यास असमर्थ असल्यामुळें श्रवणेंद्रियानें ज्ञात झालेले प्रबंध त्याच भाषेंत चिरकाल राहावेत म्हणून सुबुद्ध लोकांनीं लिपि ही प्रवृत्त केली. अर्थात्, उच्चारलेले वाक्प्रबंध चिरायु करणें हें लिपीचें मुख्य प्रयोजन. तीस ऐतिह्य सुचविण्याकरतां अथवा कांहीं व्यावहारिक उपयोगाकरितां विकृत करणें व कांहीं शिष्टवर्गोपयुक्त अशी एकदेशी बनविणें हें युक्त नव्हे; उ. पांच या संख्यावाचक शब्दावर उच्चारांत नसतांना अनुस्वार द्यावयाचा. कां ? तर त्याचा बाप जो संस्कृत पंच शब्द त्यांत तो आहे म्हणून. म्हणजे वैश्वदेव करतांना धाबळी नेसणाऱ्या वडिलांचा कासोटा फिटला होता म्हणून अडीचहाती धोतर नेसणाऱ्या संपन्न पुत्रानें तो फेडूनच वैश्वदेव केला पाहिजे, कारण त्यांत इतिहास आहे, या उपपादनशैलीइतकेंच हें उपपादन हास्यास्पद आहे. तसेंच संख्यावाचक पांच या शब्दावर अनुस्वार असला म्हणजे हरितरत्नवाचक जो पाच शब्द त्याहून भिन्नत्वानें हा ओळखतां येतो. जणूं काय भाषेंत अनेकार्थ

असलेले सर्व शब्द अशा लिपींतील भिन्न चिन्हांमुळेंच ओळखले जातात. बोलण्याच्या व्यवहारांत निरनुनासिक असणाऱ्या पाच या संख्यावाचक शब्दानें रत्नवाचक शब्दाहून संदर्भानें भिन्नार्थ जाणतां येतो तर तसा लिपींत जाणतां येणार नाहीं का ? तात्पर्य, हे असले मुद्दे पुढें करून निरनुनासिक उच्चारलेल्या शब्दांवर अनुनासिकाचें चिन्ह देण्याचें समर्थन करणें ही केवळ टिंबलोलुपांची लोकांना मोह उत्पन्न करण्याची शक्कल आहे; यापेक्षां तींत विशेष अर्थ नाहीं. यासंबंधाने आम्हीं पूर्वी 'साहित्यपत्रिकें'त विस्तृत विवेचन केलें आहे तें आपण अवश्य पाहावें. त्याचा येथें विस्तार करीत नाहीं. उच्चारानुसारी लिपि असावी हें निर्बाध तत्त्व स्वीकारिलें म्हणजे जशी अनुच्चारित अनुनासिकांचीं टिंबें लुप्त होतात त्याचप्रमाणें हरि, भानु वगैरे शब्द दीर्घ लिहावे हेंहि सिद्ध होतें. असें लिहिणें हें प्राचीन पद्धतीस सोडून होतें अथवा अशुद्ध होतें असें मुळींच नाहीं. याचेंहि विवेचन पूर्वी विस्तृत केलें असल्यामुळें व त्यावर सप्रमाण कोणाचें उत्तर न आल्यामुळें त्याचाहि विस्तार येथें करीत नाहीं. आतां कांहीं विद्वान् पूर्वाण्ह, आल्हाद, कल्हार, ब्राम्हण वगैरे शब्द उच्चाराला सोडून संस्कृताप्रमाणें लिहिण्याचा उपक्रम करीत आहेत त्याचा थोडासा विचार करूं. लिपि ही उच्चारानुसारी असावी हें तत्त्व स्वीकारल्यावर तद्विरुद्ध लिहिणें युक्त नव्हे. प्राकृत भाषेंत हे शब्द मराठींत जसे उच्चारले जातात तसेच उच्चारले जात असल्यामुळें वररुचीनें आपल्या प्राकृतप्रकाश ग्रंथांत तृतीय परिच्छेदांतील आठव्या सूत्रानें संस्कृतांत ह्न, ह्व व ह्म अशीं जीं संयुक्त व्यंजनें आहेत त्यांचा प्राकृतांत क्रम पालटावा म्हणजे तीं न्ह, ल्ह व म्ह अशीं उच्चारावीत म्हणून सांगितलें आहे व भामह टीकाकारानें पुव्वण्ह, कल्हारं, आल्हादो व ब्राम्हणो अशीं उदाहरणें दिलीं आहेत. तर अशा पूर्वपरंपरेनें व उच्चारानुरोधानें मराठींत ब्राम्हण असें लिहावयाचें सोडून संस्कृताकडे उरफाटी धाव घेऊन ब्राह्मण असें लिहिण्याचा आपण आग्रह कां धरावा हें समजत नाहीं.

असो. आतां आपण लिपीसंबंधानें एका विषयाचा विचार करून विभक्तीकडे वळूं. हा विचार म्हणजे अलीकडे अ ची बाराखडी म्हणून लिपींत जो थोडासा भेद करीत आहेत त्यासंबंधानें होय. आजपर्यंत बाराखडीची अशी कल्पना आहे की क, ख वगैरे व्यंजनांस अ, आदि स्वर जोडून त्यांचे पूर्ण उच्चार करावयाचे, व सर्व स्वर जोडून जीं अक्षरें बनतील त्यांस त्या अक्षरांची बाराखडी म्हणावयाचें. विशिष्ट व्यंजनांची बाराखडी म्हणावयाचें कारण तें व्यंजन त्या बाराखडींत सर्वत्र अनुस्यूत असलेलें दिसतें. परंतु या नव्या कल्पिलेल्या अ च्या बाराखडींत कोणाचा कोणाशीं संयोगहि झालेला नसतो, व सर्वत्र अनुस्यूत असा अ चा उच्चारहि नसतो. तेव्हा त्याला बाराखडी म्हणावें कसें हेंच कळत नाही, व कांहीं विशेष कारण नसतांना जर याला अ ची बाराखडी म्हणावयाचें तर मग ती ई ची कां

म्हणूं नये हें समजत नाहीं. अ पुंलिंगी आहे व ई स्त्रीलिंगी आहे म्हणून असा तिचा पाणउतारा कोणी करीत असेल तर तो हल्लींच्या समतावादाच्या काळांत टिकणें अशक्य आहे. जशी क ला इ मिळाली म्हणजे कि होते तशी येथें अ ला इ मिळाली असें म्हणतां येत नाहीं. कारण अ ला इ मिळाली म्हणजे दोन स्वर एकप्रयत्नानें उच्चारतां येत नसल्यामुळें ए च झाला पाहिजे. आतां लिपींतील इ, उ वगैरे चिन्हें कमी होतात ही सोय आहे म्हणून आम्हीं अशी कल्पना काढिली आहे असें कोणी म्हणेल तर तेंहि युक्त नव्हे. कारण या बाराखडीनें इ, ई, उ, ऊ व ए, ऐ एवढींच सहा चिन्हें कमी होतील. कारण ऋ, ऌ हे स्वर मराठींत नसल्यामुळें त्यांचा मराठी भाषेंत विशेष प्रचार नाहीं किंवा ते धरले तरी आणखी दोन चिन्हें कमी होतील. परंतु या बाराखडीकरतां अ चें चिन्ह सर्वत्र जास्त लिहावें लागेल याची वाट काय ? तेव्हां लिपीच्या दृष्टीनें विचार केला तर गौरवच होईल. आतां छापखान्यांतील शिशाचीं अक्षरें जुळविणारांच्या सोयीकरतां ही योजना केली आहे असें म्हणावें तर समाजांत लेखकवर्ग किती व छापखान्यांत अक्षरें जुळवणारा वर्ग किती याचा विचार करावयास नको काय ? समाजांतील एकलक्षांश लोकांकरतां लाखों लोकांवर चिन्हविस्तार लादावयाचा याचा अर्थ काय ? शिवाय, हा उपक्रम रूढ झाला तर आज मुद्रित व लिखित पुस्तकांत जीं इ इत्यादि स्वरांचीं चिन्हें आहेत तीं लोकांस दुर्बोध होणार नाहींत का ? तात्पर्य, अ च्या बाराखडीची कल्पना युक्तायुक्त विचाराच्या दृष्टीनें पाहिली असतां अत्यंत अप्रयोजक दिसते. असो. आता आपण विभक्तिविचाराकडे वळूं.

विभक्तिविचार.— मराठींतील विभक्तींसंबंधानें विचार केला असतां त्यांत बरेच घोटाळे दिसून येतात. कसे ते पाहा : चालू मराठींत प्रथमेला प्रत्ययच नाहींत. द्वितीया व चतुर्थी यांचे प्रत्यय अगदीं सारखे. षष्ठीच्या प्रत्ययांस लिंग-कार्य होत असल्यामुळें तीं रूपें विशेषणांसारखींच वाटतात. कांहीं विभक्तिप्रत्यय केवळ कवितेंतच उपयुक्त व कांहीं ठिकाणीं विभक्तीकरतां शब्दयोगी अव्ययेंच योजावीं लागतात. अशा या विभक्तिप्रत्ययांसंबंधानें भानगडी असल्यामुळें त्यांच्यांत विचारणीय विषय पुष्कळच आहेत. विभक्ति शब्दरूपावरून ठरवाव्या कीं अर्थावरून ठरवाव्या ? त्या किती मानाव्या ? सात, सहा कीं पांच ? वगैरे प्रश्न उपस्थित करून दादोबा, चिपळूणकरशास्त्री, गोडबोले, गुंजीकर प्रभृति प्राचीन विद्वानांनीं व राजवाडे, दामले प्रभृति अर्वाचीन विद्वानांनीं या विषयाची बरीच चर्चा केली आहे. ती सर्व लक्षांत घेऊन आपण थोडीशी चर्चा करूं. विभक्ति-विचारांत विवाद्य पदार्थ काय आहेत त्याची थोडीशी माहिती देऊन आपण त्यांतील साधकबाधक गोष्टींचा विचार करूं.

संस्कृतांत सात किंवा आठ विभक्ति मानतात. कारण वाक्यांत नामाचीं

रूपें इतकींच उपलब्ध होतात. संबोधनाचीं रूपें प्रायः प्रथमेसारखींच असल्यामुळें व वाक्यांत त्यांचा क्रियापदांशीं अथवा नामांशीं कांहींच संबंध दाखवितां येत नसल्यामुळें संबोधन ही कोणी स्वतंत्र विभक्ति मानीत नाहींत. प्राकृतांत चतुर्थीचीं रूपेंच उपलब्ध नसल्यामुळें ती मानीत नाहींत. तिचा संप्रदान अर्थ षष्ठ्यर्थांत समाविष्ट आहे असें समजतात. संस्कृतांत षष्ठीविभक्तींत अनेक अर्थांचा समावेश होत असल्यामुळें चतुर्थीच्या अर्थांचा समावेश तींत होण्यास जड पडत नाहीं. तेव्हां प्राकृतांत सहाच विभक्ति आहेत. येथें ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे कीं, प्राकृतांत चतुर्थी विभक्ति नसली तरी क्रमाप्रमाणें पंचम्यादि विभक्तींचीं नांवें न पालटतां संस्कृताप्रमाणें तींच कायम ठेविलीं आहेत. ह्याचें कारण संस्कृत व्याकरणाविषयीं प्राकृत व्याकरणकारांच्या ठिकाणीं विशेष आदरभाव हेंच होय. प्राकृतांत चतुर्थीचीं रूपें उपलब्ध नसल्यामुळें ज्याप्रमाणें तीं नामशेष झालीं त्याचप्रमाणें मराठींत द्वितीयेचीं रूपें उपलब्ध नसल्यामुळें तीं मानूं असें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे. यावर कोणी म्हणेल, वाक्यांत कर्त्याच्या खालोखाल कर्माचें अर्थात् द्वितीयेचें महत्त्व असल्यामुळें स, ला, तें वगैरे प्रत्यय द्वितीयेचेच समजावे, व मराठींत प्राकृताप्रमाणें चतुर्थीचा अभाव मानावा, तर हें म्हणणें युक्त नव्हे. कारण मराठींतील स व ना हे प्रत्यय संस्कृतांतील स्य व नाम् यांपासून निष्पन्न झाले आहेत असें त्यांच्या स्वरूपावरून प्रतीत होतें व प्राकृतांत चतुर्थीचें काम षष्ठी करीत आहे; असा षष्ठी व चतुर्थी यांचा संबंध आहे. तेव्हा षष्ठीचे प्रत्यय चतुर्थीचे समजणें हें पूर्वेतिहासाला धरून होत आहे. म्हणून मराठींत चतुर्थी मानावी, द्वितीया मानूं नये. शिवाय मराठींत चतुर्थी ही षष्ठीप्रमाणें अनेकार्थसंग्राहक आहे, म्हणून षष्ठीचे प्रत्यय चतुर्थीला समजणें युक्त आहे. मराठींतील षष्ठीप्रत्ययांची कल्पना कांहीं निराळीच आहे. षष्ठीचा संबंध क्रियापदाकडे नसून नामाकडे असल्यामुळें ती एक प्रकारें विशेषणच होय. तेव्हां नामाचें विशेषण बनविणारा जो संस्कृतांतील 'त्य' प्रत्यय त्याचें अपभ्रष्ट रूप जो 'चा' तो प्रत्यय कल्पून मराठींत षष्ठी सिद्ध केली आहे. अर्थात् स्य वगैरे संस्कृत प्रत्ययांचा या रूपांत कांहीं संबंध राहिला नाहीं. तेव्हां ते षष्ठीचे प्रत्यय विविधार्थसंग्राहक जी चतुर्थी तिचे कल्पिले गेले. मला करवतें येथें चतुर्थी कर्त्रर्थी आहे. पंढरीला यात्रा भरते येथें ती अधिकरणार्थी आहे. त्याप्रमाणेंच कृष्णानें रामास मारिलें व कृष्णा रामाला रागें भरतो इत्यादि ठिकाणीं कर्मार्थी चतुर्थी समजावी. याप्रमाणें विचार केला असतां मराठींत द्वितीया नाहीं असें सिद्ध होतें. द्वितीया नष्ट झाली तर तृतीयादि विभक्तिप्रत्ययांना द्वितीयादि विभक्तींचीं नांवें प्राप्त व्हावींत. परंतु प्राकृताप्रमाणें मराठींत हीं संस्कृतांचींच नावें संस्कृताशीं एकवाक्यता ठेवण्याकरितां कायम ठेविलीं. वस्तुतः निर्बाध प्रथमादि विभक्तींचीं नांवें ठेवावयाचीं तर तीं क्रमवाचक संख्याविशेषणा-

त्मक नको होती. कारण विभक्तींच्या न्यूनाधिकतेमुळें त्यांत घोटाळा उत्पन्न होतो. या विभक्तींच्या संज्ञा क, र, प, म अशा अर्थशून्य ठेविल्या असत्या तर हा घोटाळा उद्भवला नसता. येथपर्यंत केलेल्या विवेचनाचा निष्कर्ष मराठींत द्वितीया नाहीं हा निघत आहे.

संयुक्त क्रियापदें.— आतां संयुक्त क्रियापदांविषयीं विचार करूं. रामा काम करीत आहे किंवा असे; रामानें काम केलें आहे किंवा होतें, किंवा असेल; रामाकडून काम झालें नाहीं किंवा नव्हतें, इत्यादि जोडक्रियापदांचीं अनेक वाक्यें मराठींत येतात व त्यांपासून विशिष्ट अर्थबोध होतो. तेव्हां अशा ठिकाणीं 'करीत आहे' एवढें संयुक्त क्रियापद मानावें का 'करीत' हें धातुसाधित विशेषण समजून त्याचा संबंध कर्त्याकडे मानावा असा येथें विचाराचा प्रश्न आहे. अशा जोड-क्रियापदानें विशिष्ट काळ व अर्थ दर्शविण्याची पद्धति संस्कृतच्या मानानें मराठींत फारच आहे. इतका विस्तार संस्कृतांत नाहीं. या जोडक्रियापदांत क्रियावाचक कृदन्त जें असतें तें अर्थाच्या दृष्टीनें मुख्य असतें. परंतु कर्त्याचा अधिकार सहाय क्रिया-पदावर चालतो; उ. मी काम करीत आहें, आम्ही काम करीत आहों, तूं काम करीत आहेस इ. तेव्हां अशी ही जोडक्रियापदाची पद्धत मराठी भाषेंत विविध प्रकारची असून ती शिष्टाहत आहे. तेव्हां वैयाकरणांनीं तिची फोड करून उपपत्ति केली पाहिजे. दादोबा, चिपळूणकर प्रभृति वैयाकरणांनीं हीं संयुक्त क्रियापदें मानून त्यांपासून प्रतीत होणाऱ्या अर्थाप्रमाणें विशेष काल व अर्थ मानिले आहेत. विशेषतः दामले यांच्या व्याकरणांत यासंबंधानें विशेष माहिती दिली आहे ती आपण तेथेंच पहावी. कांहीं अर्वाचीन विद्वानांचें म्हणणें असें आहे की, संस्कृतामध्यें रामः कार्यं कुर्वन्नास्ते, आसीत्, भुक्त्वा व्रजति, अव्राजीत्, वगैरे वाक्यें आहेत. त्यांचा अर्थ राम काम करीत आहे किंवा होता, तो जेवून जातो किंवा गेला. तेथें आपण संयुक्त क्रियापद मानीत नाहीं, तर कृदन्त रूपें कर्त्याचीं विशेषणें समजतों. तीच व्याकरणाची पद्धति मराठींत अंगीकारावी. संयुक्त क्रियापदाची नवीन टूम कशास पाहिजे? संस्कृतांत व प्राकृतांत जर संयुक्त क्रियापदें नाहींत तर त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याची मराठी भाषेंतील ही शकल कशास पाहिजे? इत्यादि प्रश्नांत बरेंच तथ्य आहे. व संस्कृतच्या पद्धतीनें फोड करावयाची ठरविलें म्हणजे अस्, हो वगैरे सामान्य अर्थाचीं क्रियापदें जोडून विशेष काल व अर्थ यांची प्रतीति करून देण्याकरतां जी रचना केली जाते तेथें या पद्धतीनें व्याकरण करतां येईल. परंतु मराठींत या संयुक्त क्रियापदांचा विस्तार फार आहे. केवळ अस्, हो या धातूंसारखे सामान्यार्थाचे धातु जोडूनच तीं होतात असें नाहीं. तर कांहीं शब्दांबरोबर कांहीं क्रियापदें आलीं असतां कांहीं विशिष्ट अर्थ उत्पन्न होतो. तेथें त्या नुसत्या क्रियापदांचा व

शब्दांचा अर्थ कांहीं सांगतां येत नाहीं; अशा ठिकाणीं त्या अवयवभूत शब्दांचें व्याकरण करणें कठिण जातें; उदा. तो आंबे विकत घेतो, त्यानें पुस्तक लिहून काढिलें, तूं काम करूं नको, बसावें लागतें, अशीं अनेक संयुक्त क्रियापदें या भाषेंत आहेत. असे विशिष्टार्थाचे प्रयोग करणें ही एक या भाषेची विशेष पद्धतिच आहे म्हटलें तरी चालेल. यांतील विकत घेणें, लिहून काढणें, न करणें, बसावें लागणें, या क्रियापदांपासून विशिष्ट अर्थाची प्रतीति होते व त्या विशिष्ट अर्थाचा व त्या क्रियापदांतील अवयवभूत पदांच्या अर्थाचा कांहीं संबंध नसतो. अशा ठिकाणीं संयुक्त क्रियापदें मानणें भाग पडतें व सोयीचें होतें. तसेंच हात दाखविणें, दांत धरणें इ., हींहि संयुक्त क्रियापदें मानणें युक्त दिसतें. येथें लक्षणेनें हा अर्थ प्रतीत होतो म्हणावा तर कोणत्या पदाची लक्षणा मानावी व एका पदाची लक्षणा मानिली तर लक्षणेनें अर्थ काय घ्यावयाचा व दुसऱ्या पदाचा अर्थ काय मानावयाचा हेंहि सांगतां येत नाहीं व पदाच्या मूळ अर्थाशीं लक्षित अर्थाचा संबंधहि दाखवितां येत नाहीं. तेव्हां अशा ठिकाणीं संयुक्त क्रियापद मानूनच विशिष्टार्थाची कल्पना करावी हें युक्त दिसतें. संयुक्त क्रियापद याचा अर्थ इतर पदांशीं संयुक्त होऊन अर्थ प्रतीति करून देणारें क्रियापद. संयुक्त क्रियापद म्हणजे दोन क्रियावाचक शब्दांचें बनलेलें क्रियापद असा संकुचित अर्थ नव्हे. अस्, हो वगैरे धातूंच्या संबंधामुळें विशेष काल, अर्थ वगैरेंची प्रतीति जेथें होते तेथें अस्, हो वगैरे क्रियापदें सहाय क्रियापदें होत. तेव्हां त्यांस सहाय क्रियापदें म्हणणें युक्त होय. वर सांगितलेल्या अर्थाप्रमाणें संयुक्त क्रियापदांचा वर्ग वेगळा अशी या ठिकाणीं फोड करणें आम्हांस युक्त दिसतें. सहाय क्रियापदें जेथें असतील तेथें संस्कृताप्रमाणें कृदन्त रूपांचें व्याकरण करावें आणि संयुक्त क्रियापदांच्या ठिकाणीं फोड न करतां विशिष्टच क्रियापद मानावें व मग त्या विशिष्ट क्रियापदाचा काळ, पुरुष, वचन वगैरे अर्थ सांगावा. अशी योजना केली म्हणजे त्यानें मला हात दाखविला, मिशीवर ताव मारला, डोळे मिटले, वगैरे विशिष्ट क्रियापदांचें व्याकरण करणें सुलभ होईल. तेथें संस्कृत पद्धतीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तेव्हां या मीं केलेल्या विवेचनाचा विचार करावा. आतां आपण मराठी व्याकरणांतील कांहीं परिभाषिक शब्दांकडे वळूं.

पारिभाषिक शब्द.— कांहीं विद्वानांचें म्हणणें असें आहे कीं, मराठी व्याकरणांतील कांहीं पारिभाषिक शब्द बदलावयास पाहिजेत. कारण त्यांचा मूळचा अर्थ येथें मुळींच लागू पडत नाहीं. उदाहरणार्थ, सुबन्त व तिङन्त हे पारिभाषिक शब्द घ्या. वाक्यांतील नामाच्या रूपाला सुबन्त म्हणतात व क्रियापदाच्या रूपाला तिङन्त म्हणतात. या संज्ञा संस्कृतांतील आहेत. संस्कृतांत या संज्ञा युक्त आहेत. कारण तेथें सुप् व तिङ् हे प्रत्याहार असून नामापुढें येणारे

प्रत्यय सुप्-पदानें सांगितले जातात व क्रियापदापुढें येणारे प्रत्यय तिङ्-पदानें सांगितले जातात. मराठींत सुप्, तिङ् प्रत्याहारच करतां येत नाहींत. तेव्हां ते शब्द मराठींतील विभक्तिप्रत्यय व आख्यातप्रत्यय यांचे वाचक कसे होतील ? अर्थात्, मराठींतील प्रत्ययाला सुप् तिङ् म्हणतां येत नसल्यामुळें तर प्रत्ययान्त रूपाला सुबन्त तिङन्त म्हणतां येणार नाहीं. तेव्हां मराठी व्याकरणांत सुबन्त तिङन्त हा जो व्यवहार होतो तो अशास्त्रीय असल्यामुळें बंद करावा. शंकाकाराची शंका बरोबर आहे. परंतु अन्वर्थक व थोडासा परिचित असा दुसरा पारिभाषिक शब्द त्यांनीं सुचविल्याशिवाय हा शब्द सोडतां कसा येईल ? मराठीप्रमाणें प्राकृत व्याकरणांतहि संस्कृताहून भिन्न प्रत्यय आहेत. परंतु तेथें सुबन्त तिङन्त हाच व्यवहार दृष्टीस पडतो. या संज्ञा मूळच्या जरी कांहीं विशिष्ट कारणानें प्रत्ययांच्या असल्या तरी पुढें रूढीनें त्या केवळ नाम व आख्यात यांच्या चरम प्रत्ययांच्याच वाचक झाल्या. त्यांचा संस्कृतांतील विशिष्ट अर्थ राहिला नाहीं. रूढि हें व्यवहाराचें प्रधान साधन आहे. रूढ शब्दांचा अवयवार्थ पाहावयाचा नसतो. 'रमन्ते योगिनो यस्मिन् स रामः' असा दाशरथि रामाचा अर्थ आहे. परंतु आपण त्याजविषयींच्या आदराने आपल्या मुलाचें तेंच नांव ठेवितों. तेथें अवयवार्थाचा कांहीं संबंध नसतो. तसेंच पाणिनीय व्याकरणाविषयीं विशेष आदर असल्यामुळें प्राचीन वैयाकरणांनीं त्याच्याच पारिभाषिक संज्ञा आपल्या व्याकरणांत घेऊन त्या रूढ केल्या. तेव्हां आतां त्या संज्ञा वापरण्याचा सर्वत्र संप्रदाय पडला आहे. संप्रदाय सोडण्यास विशेष कारण असल्यावांचून समाज तयार नसतो. तेव्हां सुप् तिङ् ह्या सामान्यार्थीनें संज्ञा समजून त्यांचा व्यवहार चालला आहे. तो स्वीकारावा हें प्रस्तुत युक्त होय.

व्याकरणशास्त्राची मांडणी.— आतां आपण व्याकरणाचा उद्देश काय असतो व त्याला अनुसरून व्याकरणशास्त्राची मांडणी करावयाची म्हणजे ती कशी करावी या महत्त्वाच्या प्रश्नाचा थोडासा विचार करूं. वाक्यांतील विविध शब्दरूपांची फोड करून त्यानें वाक्यास उपयुक्त असें त्यांचें ज्ञान करून देणें हें व्याकरणशास्त्राचें प्रधान ध्येय आहे. रूपसिद्धीला जेवढ्या अर्थाची अपेक्षा असते तेवढ्याच अर्थाचा उल्लेख करून रूपसिद्धि करावयाची. त्यापेक्षां वाक्यार्थोपयुक्त विशेष अर्थाची वाटाघाट करावयाची नाहीं. म्हणजे रूपसिद्धीला प्राधान्य देऊन अर्थाचें तदनुषंगिकत्वानें ग्रहण करावयाचें. अर्थाला महत्त्व देऊन विवेचन करणें अवश्य आहे, तथापि त्याकरतां व्युत्पत्तिशास्त्र, साहित्यशास्त्र, न्यायशास्त्र, मीमांसाशास्त्र वगैरे शास्त्रें स्वतंत्र आहेत. व्याकरणशास्त्राचा तो मुख्य विषय नाहीं. मुख्य म्हणण्याचें कारण पाणिनीनें कारकप्रक्रिया व लकारार्थप्रक्रिया हे दोन भाग केवळ अर्थविवेचनाकरतांच योजिले आहेत. व इतरत्र तो अर्थाची थोडीशी माहिती

देतो. परंतु ती त्याच्या रूपसिद्धिविवेचनाच्या मानानें अत्यल्प असते. मुख्यतः धातु व प्रातिपदिकें यांपासून विविध रूपें जीं बनतात त्यांचें वर्गीकरण करून सामान्यविशेषनियमांनीं लघूपायानें तीं सिद्ध करून दाखवावयाचीं हेंच त्याचें ध्येय आहे. यासंबंधानें एक दोन उदाहरणें घेऊन विवेचन करूं. संस्कृतांत अव्यय म्हणून जे शब्द आहेत त्यांचें लक्षण करावयाचें झालें तर ज्याला प्रायः लिंगप्रत्यय व विभक्तिप्रत्यय लागत नाहींत तें अव्यय असें तो करील. एवढ्या लक्षणानें वाक्यांतील अव्ययसंज्ञक रूपाची फोड बरोबर होत असल्यामुळें तो अव्ययांचे स्थलवाचक, कालवाचक, अनुकरणवाचक वगैरे भेद देणार नाहीं. कारण तो विषय कोशाचा व व्युत्पत्तीचा आहे म्हणून तो सोडून देईल. या दृष्टीनेंच त्यानें कारक-विभक्तींच्या प्रथमा, द्वितीया इत्यादि निरर्थक संज्ञा ठेविल्या आहेत. कर्ता, कर्म, करण अशा सार्थ ठेविल्या नाहींत. अशा जर संज्ञा ठेविल्या असत्या तर रूपाची फोड करून सिद्धिच करतां आली नसती. यासंबंधानें आपण मराठीचें उदाहरण घेऊं. त्या वाटेनें कांटे फार आहेत; हातास फोड आला आहे; डोक्याला जखम झाली; तो रात्रीचा जागतो व दिवसास झोपतो; तो पुण्यास गेला; रात्रीं अंधार पडतो, इत्यादि उदाहरणांत वाटेनें, हातास, डोक्याला, रात्रींचा, दिवसास व रात्रीं हीं सर्व अधिकरणें आहेत. तेव्हां अधिकरणार्थी सप्तमी मानली तर या सर्व रूपांचा उलगडा कसा होणार ? हीं सर्व रूपें सप्तमीचीं मानतां येतील कां ? आपणांस तर या सर्व रूपांचा उलगडा करणें आहे. तेव्हां येथें रूपास प्राधान्य देऊन त्यांची फोड करणें अवश्य आहे. अर्थात् या रूपाला अनुसरून प्रत्यय व विविध कार्यें यांची कल्पना करून तीं रूपें सिद्ध केलीं पाहिजेत. त्यांचे अर्थ मीमांसक विविध प्रमाणांनीं निश्चित करतील. तो विषय त्यांचा आहे; व्याकरणाचा नव्हे. तसेंच, दुसरें एक उदाहरण देतों. शिवाजी अफझुलखानाच्या तंबूंत जातो, त्याच्या पोटांत वाघनखें घालतो व त्यास ठार करतो, ही गोष्ट त्याच्या धैर्याची नाहीं असें कोण म्हणेल ? तूं केव्हां आलास ? हा आतांच येतों आहें; तूं केव्हां जाशील ? हा जातोंच; तो अभ्यास कोठें करतो आहे म्हणून पास होईल ? जो दान देतो तो स्वर्गाला जातो; तुम्ही जितकें वाढाल तितकें मी खातों; तूं बापास टाकून बोलतोस हें निंद्य आहे; या वाक्यांतील जातो, घालतो, ठार करतो, येतो आहे, जातो, करतो, देतो, जातो, खातों, टाकून बोलतोस, हीं सर्व रूपें त्यांच्या स्वरूपाकडे पाहिलें तर एक प्रकारचीं आहेत असें दिसेल. तेव्हां रूपसिद्धीला त्या सर्वांस एका वर्गांत घालून त्याविषयीं नियम करणें इष्ट आहे. परंतु अर्थाकडे पाहिलें तर कांहींचा भूतकाळ व कांहींचा भविष्य-काळ. तेव्हां अर्थावरून यांची फोड कशी करतां येईल ? व्याकरणकार शब्दांचीं रूपें पाहून त्यांस अमुक प्रत्यय लावावा, अमुक विकार करावा असें सांगतात. त्यांचा अमुक विशेष अर्थ आहे असें मुख्यत्वें सांगत नाहींत. यावरून व्याकरणांत

शब्दरूपाला प्राधान्य असतें हें आपणांस कळून येईल. तात्पर्य, व्याकरण हें जरी अर्थज्ञानाला साधन असलें तरी त्याचें तें मुख्य उद्देश्य नव्हे. तो विषय मीमांसादि शास्त्रांचा आहे. उदाहरणार्थ, आपण छंदःशास्त्र घेऊं. त्याचा विषय म्हणजे अक्षरगणांनीं व मात्रागणांनीं विविध वृत्तांची मांडणी करून त्या त्या वृत्ताची कशी रचना असते ह्याचा उलगडा करावयाचा. एवढें झालें म्हणजे छंदःशास्त्राचें काम झालें. त्यांत जसें अमक्या रसास अमुक वृत्त योजावें हें सांगणें त्याचें मुख्य ध्येय नव्हे, तो विषय साहित्यशास्त्राचा, तसेंच हें होय. वैद्यशास्त्रांत रसायनें तयार करण्याचे ग्रंथ निराळे व चिकित्सा करून रोगांचें निदान करणारे ग्रंथ निराळे असतात. तसेंच रूपनिष्पत्ति करणारें शास्त्र निराळें व त्याचा उपयोग कसा करावा हें सांगणारें शास्त्र निराळें असें समजावें. यासंबंधानें पुष्कळ सांगण्यासारखें आहे. तथापि आम्हीं येथपर्यंत जें विवेचन केलें आहे त्यावरून आमचें म्हणणें काय आहे तें आपणांस कळेल म्हणून विस्तार करीत नाहीं. तात्पर्य, शब्दरूपाची सिद्धि करून दाखविणें हें जर व्याकरणाचें ध्येय होय, तर ती लघूपायानें करून दाखविणें हेंच व्याकरणाचें मुख्य उद्देश्य होय. मराठीच्या व्याकरणकारांनीं हें व्याकरणाचें ध्येय निश्चलपणें डोळ्यांपुढें न ठेविल्यामुळें रूपनिष्पत्ति करतांना त्याविषयीं ज्याचा कांहीं उपयोग नाहीं असें अर्थविवेचन पुष्कळ केलें आहे. त्यामुळें बराच घोटाळा होऊन विद्यार्थ्यांस त्रास होतो. याकरतां नवीन व्याकरणाची सुलभ उभारणी करावयाची असेल तर केवळ रूपाकडे दृष्टि देऊन केल्यास ती फार सोयीची होईल. वाक्यार्थ समजण्याकरतां वाक्यार्थमीमांसा वगैरे ग्रंथ करून त्यांत ज्या काय उद्देश्य, विधेय वगैरे गोष्टी सांगावयाच्या असतील त्या सांगाव्या. या उद्देश्यविधेयांवर जर आमचीं शब्दरूपें अवलंबून नाहींत तर त्यांचा व्याकरणांत विचार करण्याचें कारण नाहीं.

शब्दांचें वर्गीकरण.— या दृष्टीनें जर आपण शब्दांचे वर्ग केले तर प्रथमतः नाम आणि धातु असे दोन वर्ग पडतील. पुढें नामांत विशेषण, अव्यय हे पोटभेद होतील व क्रियापदांत नामधातु हा एक पोटभेद होईल. यापेक्षां रूपनिष्पत्तीला विशेष भेद करण्याचें कारण पडणार नाहीं. संस्कृतांतहि मराठीसारखे विशेष भेद केले नाहींत. असें झालें म्हणजे रामाचा हें अकारान्त पुंलिंगी रामशब्दाचें षष्ठीचें एकवचन एवढें व्याकरण पुरें होईल. तें विशेषनाम आहे, त्याचा संबंध अमक्याकडे आहे हें सांगावयास नको. शब्दरूपाला अन्त, लिंग व विभक्ति यांपेक्षां विशेष गोष्टींची जरूरी नसते. तसेंच रामा शिकतो, येथें शीक हें 'त' आख्याताचें तृतीयपुरुषी एकवचन. येथें रूपाच्या दृष्टीनें एवढी फोड पुरी आहे. 'करणरूपी मूळरूपभेदी स्वार्थी' वगैरे सांगण्याचें कारण नाहीं. धातूच्या रूपाला काळ, अर्थ व वचन यांपेक्षां इतर गोष्टींची अपेक्षा नसते. मी हें जें सांगत आहें तें सिद्धांतरूप सांगत आहें असें नाहीं तर रूपावर दृष्टि ठेवून व्याकरणाची उभारणी केली तर ती कशी सोयीची

होईल ह्याची नुसती कल्पना दाखवीत आहें. यांत शब्दरूपाच्या घडामोडीकरितां कांहीं विशेष भेद करणें असेल तर तो खुशाल करतां येईल. फक्त व्याकरणाची उभारणी कशी करावी व ती सुलभ कशी होईल याची दिशा दाखविण्याचा हा प्रयत्न आहे हें आपण ध्यानांत ठेवावें.

रचनापद्धति.— मराठी भाषेचा उद्भव संस्कृतादि प्राच्य भाषांपासून झाला असून तींत वाक्यरचना वगैरे गोष्टी या पूर्वभाषासंप्रदायास अनुसरूनच आहेत. अर्थात् तिचें व्याकरण प्राचीन व्याकरणसंप्रदायास अनुसरून असणें स्वाभाविक आहे. तेव्हां प्राचीन व्याकरणांतील पारिभाषिक संज्ञा मराठीच्या व्याकरणांत येणें युक्त आहे व त्याप्रमाणें व्याकरणकारांनीं घेतल्या आहेत. परंतु क्वचित् कांहीं कारण नसतांना हे संज्ञाशब्द इंग्रजी व्याकरणानुरोधानें बनविले आहेत, हा घर-सोडीचा प्रकार युक्त नव्हे; उदा. संस्कृतांत क्रियापद चालविण्याची पद्धत-गच्छति, गच्छतः, गच्छन्ति; गच्छसि, गच्छथः, गच्छथ; गच्छामि, गच्छावः गच्छामः अशी असून यांस प्रथमपुरुष, मध्यमपुरुष व उत्तमपुरुष अशा संज्ञा आहेत. परंतु मराठी व्याकरणकारांनीं कांहीं कारण नसतांना त्या तृतीयपुरुष, द्वितीय-पुरुष, व प्रथमपुरुष अशा ठेविल्या आहेत. हा फेर करण्यांत सोय काय पाहिली ! केवळ इंग्रजी भाषेचा विशेष परिचय हेंच कारण असेल तर तें युक्त नव्हे.

परकीय शब्द.— आतां शेवटीं एका विवादित प्रश्नाचा संक्षेपानें विचार करून हें व्याकरणशास्त्राचें विवेचन पुरें करतों. प्रतुतच्या कांहीं भाषापंडितांचें असें म्हणणें आहे की, ‘मराठी भाषेवर जें परकीय म्हणजे आरबी, फारसी वगैरे भाषांतील शब्दांचें आक्रमण झालेलें आहे, तें तदर्थक मराठींतील शब्द रूढींत आणून किंवा मराठींत त्या अर्थी शब्द नसतील तर आपली प्राचीन भाषा जी संस्कृत तिच्यापासून ते बनवून मराठींत योजावे व हें परकीय भाषेचें आक्रमण दूर करावें. हें एक प्रकारें मराठी भाषेस लांछन आहे. त्याचें प्रोन्मार्जन करणें आपलें कर्तव्य आहे. आपल्या भाषेच्या शुद्धतेविषयीं आपण काळजी घेतली नाहीं तर दुसरा कोण घेणार ! तेव्हां शब्दप्रयोग करतांना आपल्या भाषणांत व लेखनांत हे परकीय शब्द येऊं देऊं नयेत’ इत्यादि. ही विचारसरणी प्रसंशनीय आहे, व विशेषतः संस्कृतज्ञाला ती रुचेल याविषयीं शंका नाहीं. कारण पर्यायानें या योजनेनें संस्कृत भाषेचा परिचय वाढून विस्तारहि थोडासा होईल. परंतु व्याव-हारिक दृष्टीनें पाहिलें असतां जे अन्यभाषीय शब्द वर्णविकार, विभक्तिप्रत्यय, सामान्यरूप वगैरे संस्कारांनीं मराठीशीं इतके एकजीव झाले आहेत की सामान्य लोकांस काय पण मराठीतील उत्तम वैयाकरणांसहि कोश पाहिल्यावांचून हा शब्द अमक्या भाषेंतील आहे असें सांगतां येणार नाहीं, असे प्रचारांत आलेले शब्द भाषेंतून निघणें अशक्य आहे. हा निबंध आम्ही लिहीत आहों या वेळीं

आमच्याजवळ दऊत आहे व तींत शाई आहे. हे दोन्ही शब्द आमच्या इतक्या परिचयाचे झाले आहेत की, ते आम्हांस परकीय वाटतच नाहींत. तेव्हां ते प्रचारांतून निघणार कसे! तेव्हां ज्या शब्दांवर वर्णविकार, सामान्यरूप, विभक्तिप्रत्ययांची जोडणी वगैरे संस्कार होऊन ते मराठीशीं एकरूप झाले आहेत त्या परकीय शब्दांचे ते संस्कार म्हणजे व्रात्यस्तोमसंस्कार समजून व्रात्यस्तोमानें जसें परकीयांस आपण आपल्यांत समाविष्ट करून घेण्यास तयार झालां, तसेंच या शब्दांचा समावेश करून घेण्यास तयार होणें अपरिहार्य आहे. तेव्हां कोणत्याहि परकीय भाषेंतला नवीन शब्द विशेष उपयुक्त नसेल तर आपल्या भाषेंत न येऊं देण्याविषयीं दक्षता ठेवावी व आलेले शब्द 'पदरीं पडलें पवित्र झालें' या न्यायानें स्वीकारावेत हाच मार्ग आम्हांस व्यवहार्य व उपयुक्त वाटतो. या विषयासंबंधानें पुष्कळच सांगण्यासारखें आहे. परंतु भाषणाचा विस्तार बराच झाल्यामुळें व यासंबंधानें मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांत विद्वानांची चर्चा सुरू असल्यामुळें हा विषय येथेंच पुरा करतों व शेवटीं आजचा समारंभ ज्यांच्या व्याकरणाच्या शताब्दीनिमित्त आहे त्या कै. दादोबा पांडुरंगांविषयीं दोन शब्द सांगून हें व्याख्यान पुरें करतों.

दादोबांची संक्षिप्त माहिती.— रा. दादोबा यांचें आत्मचरित्र कांहीं वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तारांत आलें होतें. त्यांतील कांहीं भाग त्या वेळीं मीं वाचला होता. त्यावरून त्यांची अत्यंत निर्मळ मनोवृत्ति, विद्वानांविषयीं आदर, बालबोध व्यवहारपद्धति वगैरे गोष्टी समजून आल्या व त्यांच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न झाली. पुढें त्यांची व्याकरणग्रंथाची प्रस्तावना वाचली. तीवरून हीच गोष्ट सिद्ध झाली. त्यांच्यापूर्वी मराठीची व्याकरणें गोवाप्रांत, बंगाल वगैरे ठिकाणीं युरोपियन लोकांनीं विद्वान ब्राह्मणवर्गाच्या साहाय्यानें तयार केलीं होतीं. त्यांचा हेतु आपल्या लोकांना मराठीचें ज्ञान होण्यास साधन असावें हा असल्यामुळें हीं व्याकरणें इंग्रजी भाषेच्या पद्धतीला अनुसरून झालीं. पुढें दादोबांच्या समान कालीं असणारे विद्वदग्रेसर असे पंडित बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांनीं मराठी व्याकरण लिहिलें. परंतु तें आज उपलब्ध नाहीं. याच वेळीं गंगाधरशास्त्री फडके यांनीं एक व्याकरण लिहिलें तें मुद्रित आहे. हें दादोबांच्या व्याकरणाच्या समान कालीं म्हणजे १८३६ त प्रसिद्ध झालें. दादोबांचें व्याकरण पुढें प्रसिद्ध झालें. हें सर्वांगपरिपूर्ण व सुलभ असल्यामुळें व त्या वेळच्या विद्याधिकाऱ्यांनीं यासच प्रोत्साहन दिल्यामुळें शाळाखात्यांत चालू होऊन विशेष पुढें आलें. व्याकरण रचण्यासंबंधानें दादोबांची इच्छा लहानपणापासून होती हें त्यांच्या व्याकरणाच्या प्रस्तावनेवरून स्पष्ट होत आहे. ते बारा वर्षांचे असतांना मुंबईतील शिक्षा-मंडळाच्या मराठी शाळेंत शिकावयास जात असत. त्या वेळीं त्या शाळेंत पं.

बापूशास्त्री शुक्ल नांवाचे विद्वान गृहस्थ मराठीचे शिक्षक होते. त्यांची शिकवण्याची हातोटी विशेष मनोहर असल्यामुळें दादोबांना मराठी व्याकरणाची गोडी लागली व त्याच वेळेपासून आपण मराठी व्याकरण करावें अशी भावना त्यांच्या अंतः-करणांत स्थिर झाली. त्या भावनेनें ते मराठी व्याकरण विषयांत तन्मय होऊन गेले म्हणून त्यांच्या हातून त्या काळीं सुंदर व्याकरण झालें. त्यांनीं व्याकरण लिहिलें त्या वेळीं त्यांचें वय बावीस वर्षांचें होतें हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असो. दादोबाचे हे मराठी भाषेवर व तद्द्वारा मराठी बोलणारे व लिहिणारे यांवर मोठे उपकार आहेत. तेव्हां जेव्हां जेव्हां मराठी व्याकरणासंबंधानें प्रश्न उद्भवेल तेव्हां तेव्हां आपण त्यांच्याविषयीं आदर व्यक्त केला पाहिजे व हें करणें आपलें कर्तव्य आहे. तसेंच या वेळीं रा. प्रियोळकर यांनीं मराठी व्याकरणकार आणि प्राचीन व्याकरणें यांसंबंधीं उपयुक्त माहिती पुस्तकरूपानें व 'लोकशिक्षण' मासिकांतून प्रसिद्ध केली या त्यांच्या स्तुत्य प्रयत्नांसंबंधानें संतोष होत आहे असें सांगून व आपण अध्यक्षपदाचा मान देऊन चार शब्द वदविले व शांतपणें श्रवण केलें याबद्दल आपले आभार मानून मी आपलें भाषण पुरें करतों.

छन्दःशास्त्र

'छन्दः पादौ तु वेदस्य'— पाणिनीय शिक्षा.
'छन्द हे चरण वेदनराचे'— छन्दोमंजिरी (रामजोशी.)

सामान्य माहिती.—प्राचीन वैदिक वाङ्मय छन्दोबद्ध असल्यामुळें वेदकालापासून संस्कृत वाङ्मयांत छन्दोविचार प्रचलित असला पाहिजे. 'यो हि अविदितार्षेयच्छन्दो दैवतब्राह्मणेन मन्त्रेण याजयति वा अध्यापयति वा स स्थाणुं वर्च्छेति गर्तं वा पद्यते वा प्रमीयते पापीयान्भवति यातयामानि अस्य छन्दांसि भवन्ति' (छान्दोग्यब्राह्मण) अशा अविदितच्छन्द अशा श्रोत्रियाचा श्रुतीनें अधःपात वर्णिला आहे. यावरून वैदिककालीं छन्दोज्ञानास विशेष महत्त्व होतें असें दिसून येतें. 'अनुष्टुभा यजति, बृहत्या गायति, गायत्र्या स्तौति' अशीं यज्ञकर्मांत विधायक वाक्यें असल्यामुळें याज्ञिकांना छन्दोज्ञान किती आवश्यक होतें हेंहि समजून येतें. 'ब्राह्मणेन निष्कारणो धर्मः षडङ्गो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च' अशी ही श्रुति ब्राह्मणाला छन्दोज्ञान नित्य आहे असें विधान करीत आहे. कारण शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्दस् व ज्यौतिष हीं वेदाचीं षडंगें आहेत, व त्यांत छन्दाचें ग्रहण आहे. तात्पर्य, वैदिककालीं छन्दाला विशेष महत्त्व होतें व श्रोत्रिय ब्राह्मण वेदाप्रमाणें छन्दःशास्त्राचें अध्ययन अवश्य म्हणून करीत असत. वैदिक वाङ्मय छन्दःप्रधान असल्यामुळें छन्दाला असें महत्त्व असणें युक्तच होय.

या छन्दाचें विवेचन करणारें जें शास्त्र त्यास छन्दःशास्त्र म्हणतात. प्रस्तुत षडंगांत गणलें जाणाऱ्या छन्दःशास्त्राचा कर्ता पिंगल मुनि होय. या पिंगलाविषयीं 'छन्दोज्ञाननिधिं जघान मकरो वेलातटे पिङ्गलम्' व 'चतुर्भिर्यकारैर्भुजङ्गप्रयातम्' असे प्राचीन वाङ्मयांत उल्लेख सांपडतात व त्यावरून अर्वाचीन पंडित त्यांच्या चरित्राविषयीं कांहीं कल्पना करतात. यापेक्षां याविषयीं विशेष माहिती उपलब्ध होत नाहीं.

प्राकृतपैङ्गलम् म्हणून एक प्राकृतांत छन्दःशास्त्रावर ग्रंथ आहे व तो पिंगलाचा म्हणूनच प्रसिद्ध आहे. परंतु तो पिंगल व हा पिंगल एक नव्हेत. प्राकृतपैंगलामध्यें 'सवाई' वगैरे फारशी शब्द उपलब्ध होत असल्यामुळें तो अर्वाचीन ठरत आहे असें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे. शिवाय वेदकालीन प्राकृत पद्यें

विशेष उपलब्ध होत नसल्यामुळें व यांतील प्राकृत पद्यें अर्वाचीन चालीच्या पद्याशीं जुळत असल्यामुळें याला वेदकालीन छन्दःशास्त्रकार मानणें युक्त वाटत नाहीं.

वैदिक छन्दःशास्त्रकार पिंगल हा छन्दःशास्त्राचा आद्य प्रणेता होता असें मानतां येत नाहीं. कारण त्याच्या छन्दःशास्त्रांत 'यास्क', 'सैतव', 'काश्यप' इत्यादि छन्दःशास्त्रज्ञांचे उल्लेख आलेले आहेत. तथापि त्यांचे ग्रंथ आज उपलब्ध नसल्यामुळें प्राचीन छन्दःप्रबंध म्हणून याच्याच ग्रंथाचा उल्लेख होतो. याच्या-पुढें छन्दःशास्त्रांत वृत्तरत्नाकर, छन्दःकौस्तुभ, छन्दोमंजरी, वाणीभूषण वगैरे अनेक ग्रंथ झाले व ते विद्वन्मान्य झाले आहेत. या अर्वाचीन छन्दोग्रंथांत वैदिक छन्दांचा विचार नसून केवळ लौकिक छन्दांचाच विचार केला आहे.

मराठींत मोरोपंत, रामजोशी, परशुराम तात्या वगैरे साहित्यभक्तांनीं छन्दांचें विवेचन केलें आहे. परंतु तें अत्यंत संक्षिप्त असून संस्कृतांतील कांहीं भागाचें प्रतिबिंब आहे. केवळ मराठी अशी जी ओवी, अभंग, साकी, दिंडी वगैरे वृत्तें यांचें विवेचन यांच्या ग्रंथांत आढळतें. परंतु तें सर्व निश्चित स्वरूप दाखविणारें नसल्यामुळें बरेचसें अशास्त्रीयच म्हणावें लागतें. कै. राजवाडे यांनीं 'सरस्वती-मंदिर' या मासिकांत मराठी छन्द या मथळ्याखालीं या छन्दांसंबंधानें विवेचन केलें आहे. परंतु तेंहि निर्णायक नसल्यामुळें अशास्त्रीयच वाटतें. याचा विशेष विचार पुढें करूं. विद्यमानकाळीं प्रो. माधवरावजी पटवर्धन यांनीं 'छन्दोरचना' म्हणून पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यांची स्वतंत्रबुद्धि व या शास्त्रावरील विशेष व्यासंग प्रतीत होतात. परंतु याहि ग्रंथांत ओवी, अभंग यांविषयीं शास्त्रीय विवेचन विशेष आढळत नाहीं. असो. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून छन्दःशास्त्रासंबंधानें साधारण माहिती आपणांस येईल.

छंदःशास्त्राची व्युत्पत्ति.—आतां आपण थोडेंसें विशेष विवेचन करूं. 'छन्दस्' या शब्दाची व्युत्पत्ति यास्काचार्यांनीं 'मन्त्रा मननात् छन्दांसि छादनात्' या वचनानें आच्छादन करणारे (रक्षण करणारे) ते छंद अशी केली आहे. व यास 'ते छन्दोभिरात्मानं छादयित्वोपायन्। तच्छन्दसां छन्दस्त्वम्', 'छादयन्ति वा एनं छन्दांसि पापात्कर्मणः' 'गायत्रेण छन्दसा त्वां छादयामि', 'ते छन्दोभिरात्मानं छादयन् । यदेभिराच्छादयंस्तच्छन्दसां छन्दस्त्वम्' इ. इ. वैदिक वाक्यें प्रमाण आहेत. या वाक्यांतील 'छद्' धातूचा अर्थ रक्षण करणें असा आहे. शाकटायन ऋषीनें 'चदि आह्लादे सुखे च' या धातूपासून याची व्युत्पत्ति कल्पून' आनंद देणारा तो छंद असा अर्थ केला आहे. व छंद या रूपसिद्धीकरतां 'चदेरादेश्च छ' असें सूत्र केलें आहे. तात्पर्य, यास्काचें मतें (पापादिकांपासून) रक्षण करणारा तो छंद. व शाकटायनाचे मतें आल्हाद देणारा तो छंद असा अर्थ होत आहे. यांतील प्रथम अर्थास श्रुतिवाक्यें प्रमाण आहेत तर द्वितीय अर्थ अनुभव-

सिद्ध आहे. तेव्हां दोन्ही अर्थ दोन दृष्टीनें युक्तच आहेत असें आपण समजण्यास हरकत नाहीं.

छन्दांचे प्रकार—१. उक्था, २. अत्युक्था, ३. मध्या, ४. प्रतिष्ठा, ५. सुप्रतिष्ठा, ६. गायत्री, ७. उष्णिक्, ८. अनुष्टुप्, ९. बृहती, १०. पंक्ति, ११. त्रिष्टुप्, १२. जगती, १३. अतिजगती, १४. शक्वरी, १५. अतिशक्वरी, १६. अष्टि, १७. अत्यष्टि, १९. धृति, १९. अतिधृति, २०. कृति, २१. प्रकृति, २२. आकृति, २३. विकृति, २४. संस्कृति, २५. अतिकृति, २६. उत्कृति, अशा एकापासून सव्वीस अक्षरांपर्यंतच्या पादांच्या संज्ञा आहेत. यांच्यापुढें छंदः शब्द जोडून 'उक्थाछंद', 'अत्युक्था छंद' म्हणजे एकाक्षरी छंद, द्व्यक्षरी छंद असा अर्थ होतो. व या परिभाषेनें छंदांची अक्षरसंख्या सांगण्याची पद्धति आहे. वैदिक छंद हे प्रायः अक्षरसंख्येवर अवलंबून आहेत; मात्रा अथवा गण यांवर अवलंबून नाहींत; त्यामुळें त्यांचीं लक्षणें अक्षरसंख्येवरच सांगितलेलीं आहेत. तेव्हां त्या या परिभाषेस संख्यादर्शक संज्ञा उपयुक्तच आहेत; उदाहरणार्थ 'उष्णिक्गायत्रौ जागतश्च' या सूत्रानें उष्णिक् छंद हा गायत्रीछंदाचे दोन पाद व एक जगती छंदाचा पाद म्हणजे दोन अष्टाक्षरी पाद व एक द्वादशाक्षरी पाद यांचा झाला आहे. 'अनुष्टुप्गायत्रैः' म्हणजे गायत्रीछंदाच्या चार पादांनीं अनुष्टुप् होतो. अशीं अक्षरसंख्येनें लक्षणें बांधलीं आहेत. याचप्रमाणें कांहीं विशिष्टसंख्यायुक्त पादाच्या परिवर्तनानेंही छंदांचीं लक्षणें बांधलीं आहेत; उ. मध्येऽन्त्ये च' म्हणजे जगती छंदाच्या पादाच्या मध्यें व शेवटीं गायत्री छंदाचे पाद आले असतां तोहि छंद अनुष्टुभच होतो. या अक्षरसंख्येवरच प्रायः वैदिक छंदांचीं लक्षणें आहेत. वेदांत गायत्री, उष्णिक्, अनुष्टुप्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुभ् व जगती ह्या सात छंदांस प्रामुख्य दिलेलें आढळतें. तसेंच त्र्यक्षर गणाची कल्पना होती. ह्या गोष्टी 'अक्षरेण मिमते सत्पवाणीः' इत्यादि वाक्यांवरून ऊहित होतात. या सात छंदांतहि गायत्री छंदच प्रधान होय ही गोष्ट '(प्रजापतिः) यदष्टौ कृत्वाक्षरत् सैवाष्टाक्षरा गायत्री अभवत्' 'अष्टाक्षरा गायत्री तस्मादाहुर्गायत्रोग्निरिति', 'गायत्रो वै ब्राह्मणः त्रैष्टुभो वै राजन्यः जागतो वै वैश्यः' 'गायत्र्या ब्राह्मणं निरवर्तयत त्रिष्टुभा राजन्यं जगत्या वैश्यं न केनचिच्छन्दसा शूद्रं निरवर्तयत', 'तेजो वै ब्रह्मवर्चसं गायत्री ब्रह्म गायत्री ओजो वा इन्द्रियं वीर्यं त्रिष्टुप् क्षत्रं वा त्रिष्टुप्' इत्यादि श्रुतिवाक्यांनीं सिद्ध होत आहे. गायत्री वगैरे छंदांच्या अक्षरसंख्येवर विविध कल्पनेनें रूपकें केल्याचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. तैत्तिरीयसंहितेंत 'सोऽब्रवीत्प्रजापतिः छन्दांसि । रथो मे भवत । युष्माभिरहमेतमध्वानमनुसंचाराणीति । तस्य गायत्री च जगती च पक्षौ अभवताम् । उष्णिक् च त्रिष्टुप् च प्रष्ठयौ । अनुष्टुप् च पङ्क्तिश्च धुर्यौ । बृहत्येवोद्धिरभवत् । स एतं

छन्दोरथमास्थाय एतमध्वानमनु संचरत् ।' अशी सप्तच्छंदावर रूपकानें रथाची कल्पना केली आहे. यावरून वैदिक वाङ्मयांत छंद हा किती लोकप्रिय झाला होता हें कळून येईल.

प्राकृतपैंगलांतील संक्षिप्त माहिती. — प्राकृतपैंगलानें 'जिम ण सहइ कणअ तुला तिलतुलिअं अद्ध अद्धेण । तेम ण सहइ सवण तुला अवछन्दं छन्दभंगेण ।। अबुह बुहाणं मझ्झे कव्वं जो पढइ लक्खणविहीणं । भू अग्ग लग्ग खग्गहि सीस खुडिअं ण जाणेइ' अशा प्रथमतः दोन आर्या छंदांचें महत्त्व सांगणाऱ्या दिल्या आहेत. यांचा अर्थ--ज्याप्रमाणें सोनें जोखण्याचा ताजवा अर्धा तिळसुद्धां कमी जास्त सहन करीत नाहीं त्याप्रमाणें काव्य श्रवण करणाराची श्रवण-(कर्ण-) तुला स्वल्पहि छन्दोभंग सहन करीत नाहीं. तसेंच जो मूर्ख मनुष्य विद्वान लोकांपुढें अव्यवस्थितपणें छन्दोबद्ध काव्याचें पठण करतो, आपल्या हातांतील तलवारीनेंच जणुं काय आपलें मस्तक मी तोडित आहें, ही गोष्ट त्याला समजत नाहीं. याप्रमाणें छन्दःशास्त्राचें महत्त्व सांगून पुढें मात्रागणच्छन्द, मात्राछन्द व अक्षरगणछंद अशा तीन प्रकारच्या छंदांचें विवेचन केलें आहे. यांत मात्रागणानें नियमित म्हणून आर्या, पथ्या, उद्गीति वगैरे छंद सांगितले आहेत. केवळ मात्राछंद म्हणून वैतालीय, औपच्छंदसिक, आपातालिका वगैरे दिले आहेत. व समानी, प्रमाणिका वगैरे अक्षरगणछंद म्हणून सांगितले आहेत. पुढील छंदःशास्त्रज्ञांनीं मात्रागणछंद सोडून देऊन आर्या, पथ्या वगैरे छंद मात्राछंदांतच समाविष्ट केले आहेत. म्हणजे प्राचीन रचनेच्या मानानें यांची रचना थोडीशी शिथिल केली.

वृत्तविस्तार.— प्राकृतपैंगलामध्ये मात्रावृत्त व गणवृत्त यांचा विस्तार पुष्कळच केलेला आहे. उदाहरणार्थ, गायत्री छंदामध्यें (षडाक्षरी छंदामध्यें) वैदिक पिंगलानें एक तनुमध्याच गणवृत्त दिलें आहे. प्राकृतपैंगलांत शेषा, तिलक, विज्जोहा, चतुरंसा, मन्थान, शंखनारी, मालती वगैरे अनेक वृत्तें सांगितलीं आहेत. याप्रमाणें छन्दोविस्तार प्राकृतपैंगलानें जागोजागीं केलेला आहे. व तो कालविस्तारामुळें होणें अपरिहार्यच आहे. असा छंदांचा विस्तार होऊं लागल्यामुळें त्यांच्या नियामक मात्रागणांचाहि विस्तार झालेला दिसतो. उ. छंदःशास्त्रांत मात्रागण चार कलांचा (कला म्हणजे एक मात्रा) एक गण मानिला आहे व त्याचे प्रस्तारपद्धतीनें सर्वगुरु (ऽऽ), आदिगुरू (ऽ ।।), मध्यगुरु (।ऽ।), अंत्यगुरु (।। ऽ), सर्वलघु (।।।।), असे पांच प्रकार होतात, त्यावर सर्वमात्रागणवृत्ताची उभारणी केली आहे. प्राकृतपैंगलांत सहा, पांच, चार, तीन, दोन अशा कलांचे (मात्रांचे) गण कल्पून क्रमानें ट, ठ, ड, ढ, व ण अशा संज्ञा दिल्या आहेत, व नंतर पुनः त्यांच्या प्रस्तारपद्धतीनें होणाऱ्या भेदास विविध संज्ञा देऊन या गणांच्या विवेचनाचा बराच विस्तार केला आहे; उ. टसंज्ञक

जो षट्कलात्मक गण त्याचीं प्रस्तारानें तेरा रूपें होतात, त्यांस क्रमानें हर (ऽऽऽ), शची (।।ऽऽ), सूर (।ऽ।ऽ), शक्र (ऽ।।ऽ), शेष (।।।।ऽ), अहि (।ऽऽ।), कमल (ऽ।ऽ।), ब्रह्मा (।।।ऽ।), कलि (ऽऽ।।), चन्द्र (।।ऽ।।), ध्रुव (।ऽ।।), धर्म (ऽ।।।।), शालिकर (।।। ।।।), अशा संज्ञा दिल्या आहेत. अशा प्रकारें गणांस व त्यांच्या प्रस्तारास केवळ एकेक संज्ञाच आहेत असें नाहीं तर अनेक संज्ञा कल्पिल्या आहेत; उ. चतुष्कलांतील अंत्यगुरु प्रकार (।।ऽ) यास कर, पाणि, कमल, हस्त, बाहु, भुजदण्ड, प्रहरण, अशनि, गजाभरण, भुजाभरण अशा संज्ञा आहेत. या विविध गणांच्या विविध संज्ञांच्या कारिका आहेत. त्या मुखोद्गत असल्यावांचून या संज्ञा ध्यानांत ठेवणें कठीण आहे. या संज्ञाविस्ताराचा उपयोग एवढाच की वृत्तांचे लक्षणात्मक श्लोक श्लेषमहिम्यानें वस्तुवर्णनात्मकहि करतां येतात; उ. [1]'पादविराजन्नूपुरयुग्मा कुण्डलशोभासङ्गि-सुरूपा । शङ्खवती हारद्वयपूर्णा चम्पकमाला भाति सुवर्णा ॥' हा श्लोक चंपकमाला वृत्ताचें लक्षण असून त्यानें चम्पकमालासंज्ञक नायिकेचेंहि वर्णन केलें जातें. अशा रीतीनें चमत्कृतिपूर्ण वृत्तलक्षण बांधितां यावें म्हणूनच हा संज्ञाविस्तार असावा व तो सुबुद्ध जनांना कौतुकावह वाटेल. याप्रमाणें प्राकृतपैंगलाची माहिती दिल्यावर आतां आपण अक्षरगणवृत्ताकडे वळूं.

गणवृत्तांची साधारण माहिती.—अक्षरवृत्तांच्या विचाराकरतां प्रथमतः लघु, गुरु वगैरेविषयीं सामान्य माहिती दिली असतां उपयुक्त होईल म्हणून ती प्रथम देऊं या. अक्षरांचे लघु व गुरु असे दोन प्रकार छंदःशास्त्रकारांनीं स्वीकारले आहेत. लघूची एक मात्रा आणि गुरूच्या दोन मात्रा आहेत. मीयते अनया (कालविशेषः) सा मात्रा अशी मात्राशब्दाची व्युत्पत्ति आहे. यावरून

---

१. या पद्यांत चंपकमालेचें लक्षण पुढील संकेताप्रमाणें आहे. चतुष्कलाच्या प्रस्तारांत आदिगुरूच्या (ऽ।।) प्रकारास 'आदिगुरुर्वसुचरणानाम्' या परिभाषेप्रमाणें वसु व चरण इ. संज्ञा आहेत. तसेंच 'नूपुर-रसन-चामर-कंकण-मंजरी-ताटङ्काः । कुंडलहारौ वलयं गुरु-नामानि कथितानि ॥' या कारिकेनें नूपुर, वगैरे गुरूच्या संज्ञा म्हणून सांगितलें आहे. 'शर-मेरु-दंड-कनकं शङ्खोरुगन्ध-कुसुमानि । स्पर्शरसाविति संज्ञा मात्रामात्रस्य पिङ्गलेनोक्ताः ॥' या कारिकेनें लघूच्या संज्ञा सांगितल्या आहेत. ह्या लक्षांत घेतल्या म्हणजे 'पादविराजन्नूपुर-युग्मा' याचा अर्थ असा होतो. पाद म्हणजे (ऽ।।) चतुष्कलांतील आदिगुरु गण यानें शोभणारे नूपुरयुग्म म्हणजे दोन गुरू (ऽऽ) व कुण्डल म्हणजे (ऽ) एक गुरु यांनीं शोभ-णारें रूप म्हणजे एक लघु (।) व हारद्वय म्हणजे दोन गुरु यांनीं युक्त असणारें म्हणजे (ऽ।।ऽऽऽ।।ऽऽ) असें चंपकमालेचें रूप निष्पन्न होतें. चंपकमाला नायिका ह्या पक्षीं वर्णनपर अर्थ स्पष्ट असल्यामुळें देत नाहीं.

मात्राशब्द हा कालविशेषाचा बोधक आहे असें निष्पन्न होतें. पाणिनीय शिक्षेंत 'चाषस्तु वदते मात्रां द्विमात्रं तु वायसः। शिखी रौति त्रिमात्रं तु नकुलस्त्वर्धमात्रकः॥' असे पक्षिविशेषांच्या ध्वनींवरून विशिष्ट मात्रांचें स्वरूप सांगितलें आहे. गणच्छंदास 'वृत्त' हा शब्द योजितात व मात्राछंदास जाति म्हणतात. गण हा त्र्यक्षरात्मक मानिलेला आहे. त्यांतील लघुगुरूंच्या परिवर्तनानें प्रस्तारपद्धतीनें त्याचे आठ प्रकार होतात. त्यांसच क्रमानें म, य, र, स, त, ज, भ, व न या संज्ञा आहेत. त्यांचें लक्षण 'मगणस्त्रिगुरुस्त्रिलघुर्नगणो मगणादिगुरुर्यगणादिलघुः। गुरुमध्यग'जो' लघुमध्यग'रः' सगणोन्तगुरुस्तगणोन्तलघुः॥ या कारिकेनें स्पष्ट होत आहे.

केवळ मराठींत उपलब्ध होणारे अभंग, ओवी हे छंद अक्षर, मात्रा व गण यांवर अवलंबून नसून ते केवळ अनुप्रास व चरण यांवर अवलंबून आहेत असें आम्हांस वाटतें. गेय पद्यें हीं प्राधान्येंकरून स्वरान्दोलनावर अवलंबून असतात. कारण षड्जमध्यमादि स्वरांच्या आरोहावरोहात्मक आंदोलन व आवर्तन यांवरच भैरवी, मालकंस वगैरे रागांची उभारणी असते व यांत कांहीं स्वरांचे उच्चार त्रिमात्रक, चतुर्मात्रक वगैरे असतात. वृत्तांत हा प्रकार नाहीं. शिवाय ह्या स्वरांदोलनाचे तालमानानें विविध भेद होत असल्यामुळें त्यांचा विस्तारहि विशेष आहे. तेव्हां छंदःशास्त्रज्ञांनीं संगीतशास्त्राचा तो विषय समजून त्याचा आपल्या छंदःशास्त्रांत समावेश केला नाहीं. अर्थात् मराठींतील पदें, आरत्या, लावण्या वगैरे भेद स्वरांदोलनावर विशेष अवलंबून असल्यामुळें त्यांचा छंदःशास्त्रांत समावेश कोणीं केल्याचें आढळत नाहीं. प्रो. माधवरावजी पटवर्धन यांनीं आपल्या 'छंदोरचनें'त यांनाहि गणरचनेंत गोंवण्याचा यत्न केला आहे व तो कौतुकास्पद आहे.

अक्षरगणवृत्तें हीं पंडितांनीं विशेषेंकरून आठ अक्षरांपासून सव्वीस अक्षरांपर्यंत दिलीं आहेत. परंतु छंदःशास्त्रावरील प्रबंधकारांनीं एका अक्षरापासून सव्वीस अक्षरांपर्यंत तीं मानिलीं आहेत व त्यांचीं लक्षणें व उदाहरणें (स्वकृत) दिलीं आहेत. सव्वीस अक्षरांपेक्षां जास्त अक्षरें एका चरणांत असतील तर तशा छंदास सामान्यतः दंडक असें नांव देऊन त्याचा वृत्तांत समावेश केला आहे. मालतीमाधवांतील 'प्रचलितकरिकृत्ति०' हें दंडक ५४ अक्षरांचें आहे.

छंदांच्या लक्षणांचे प्रकार.— केदारभट्ट-गंगादास-प्रभृति छंदःशास्त्रज्ञांनीं छंदाचें लक्षण त्याच छंदाच्या एका चरणांत गण, यति व छंदाचें नांव यांचा समावेश करून सांगितलें आहे. कालिदासानें श्रुतबोधांत त्या त्या वृत्तांत लक्षणात्मक पद्य करून त्यांत लघुगुरूंचा क्रम, नांव व यति सांगितले आहेत. प्राकृतपैंगलांत लघुगुरूंच्या व गणांच्या विविध संज्ञा कल्पून त्यांनीं त्या त्या

वृत्तांत छंदाचें लक्षण व संज्ञा सांगितल्या आहेत. कांहीं पंडितांनीं या पद्धतीनें कांहीं श्लोक द्व्यर्थी करून चमत्कृति दाखविली आहे. मराठींत रामजोशी यांनीं त्या त्या गणाचें लक्षण त्याच वृत्तांत करून प्रथमचरणांत गणांचीं अक्षरें योग्य स्थळीं आणिलीं आहेत व चतुर्थ चरणांत त्या छंदाचें नांवहि आणिलें आहे; उ. राधिका रात्रिदारीं उभी राहिली (प्रथम चरण) पूर्णमासीव मुक्ताफलस्रग्विणी (चतुर्थ चरण) असें स्रग्विणी वृत्ताचें लक्षण दिलें आहे. वृत्तदर्पणकारांनीं संस्कृतची माहिती मराठींत दिली आहे यापेक्षां विशेष कांहीं नाहीं. छंदोरचनाकारांनीं आपल्या पुस्तकांत वृत्तें व जाति यांचा समावेश करून पदें, आरत्या वगैरे संबंधानें लघुगुरूसंबंधानें माहिती देऊन योग्य ती फोड केली आहे. या विवेचनांत त्यांनीं चतुरक्षरी, पंचाक्षरी वगैरे गणांची कल्पना करून त्यांस बरेंच शास्त्रीयत्व आणिलें आहे व एखादें मध्यवृत्त घेऊन त्यांत कांहीं गणांचें न्यूनाधिक्य केलें असतां इतर वृत्तें कशीं होतात हें मार्मिकपणें दाखविलें आहे. तसेंच कांहीं अक्षरांच्या न्यूनाधिक्यास पूर्ण, अपूर्ण व वृद्ध अशीं विशेषणें योजून कांहीं छंदांचा त्यांनीं उलगडा केला आहे व पदें वगैरे छंदशास्त्राच्या नियमांत आणण्याचा त्यांनीं यत्न केला आहे. ही त्यांची पद्धति वैदिक पिंगलाच्या नमुन्याप्रमाणें दिसते. त्यांतहि निवृत्, भूरिक् वगैरे संज्ञा अशाच अर्थानें योजिल्या आहेत. तेव्हां या सर्व गोष्टी प्रो. पटवर्धन यांच्या या विषयावरील व्यासंगाच्या निदर्शक आहेत.

लिपीचा घोटाळा.—लघुगुरूंच्या लिपीनें छंदाचें स्वरूप दाखवितां यावें म्हणून प्राचीन छंदःशास्त्रज्ञांनीं 'रेखाभ्यामृजुवक्राभ्यां ज्ञेयौ लघुगुरू क्रमात्' म्हणजे लघूची । अशी सरळ रेषा व गुरूची ऽ अशी वक्र रेषा लिपिचिन्ह म्हणून समजावी असें सांगितलें आहे. उदाहरणार्थः भगण, दोन तगण व दोन गुरू यांनीं शालिनी-वृत्त होतें, तर तें या लिपिसंकेताप्रमाणें ऽऽऽऽऽ।ऽऽ।ऽऽ असें मांडून दाखवितां येतें. परंतु अलीकडील छंदःशास्त्रज्ञांनीं लघूची वक्ररेषा ⏑ व गुरूची – सरळ रेषा कल्पून ती अक्षरांच्या मस्तकावर देण्याचा क्रम सुरू केला आहे. मा ज्या चि त्ता वा ट तें नि त्य जा वें, म्हणजे − − − − − ⏑ − − ⏑ − − अशीं शीर्षावर तीं चिन्हें मांडूं लागले आहेत. प्राचीन संप्रदायांत गुरुलघूंचीं चिन्हें ⏑ – अशीं होतीं तीं यांनीं बदलून – ⏑ अशीं कां केलीं हें कळत नाहीं. तसेंच नागरी लिपींत वेलांट्या व मात्रा अक्षराच्या मस्तकावर येत असल्यामुळें त्यांत आणखी लघु गुरु चिन्हांनीं भरती करून घोटाळा करणें सोयीचें दिसत नाहीं. ही सर्व आलटापालट इंग्रजी पद्धतीच्या अनुकरणानें झाली असावी. परंतु ती युक्त वाटत नाहीं. कारण कोणताहि फायदा नसतां उलट थोडीशी गैरसोय होत असतांना आपला पूर्वसंप्रदाय सोडून अंधानुकरण करणें केव्हांही अयुक्तच. असो. आमच्या या म्हणण्याचा तज्ज्ञांनीं विचार करावा.

आतां आपण लघुगुरूंसंबंधानें विचार करूं. 'सानुस्वारो विसर्गान्ते दीर्घो युक्तपरश्च यः । वा पादान्ते त्वसौ वक्रो ज्ञेयोऽन्यो मात्रिको ह्यृजुः ॥' या कारिकेचा अर्थ असा आहे की अनुस्वार व विसर्गयुक्त स्वर, दीर्घस्वर, संयोगाच्या पूर्वी येणारा ऱ्हस्व स्वर व पादान्तीं म्हणजे चरणान्तीं येणारा ऱ्हस्व स्वर हे गुरु होत, व ते वक्र (ऽ) रेषेनें लिहावेत; त्यांच्या दोन मात्रा समजाव्यात; यांवाचून अन्य स्वर लघु समजावा व तो सरळ (।) रेषेनें लिहावा व त्याची एक मात्रा समजावी. छंदःशास्त्रांत प्लुत स्वराची गणना नाहीं. म्हणजे त्रिमात्रिकापासून पुढच्या चतुर्मात्रिक वगैरे स्वरांची गणना नाहीं. हा सामान्य नियम. परंतु यास अपवाद बरेच आहेत; उ. ए ओ, हे स्वर व संयुक्ताक्षराच्या पूर्वीचा स्वर हे इतरत्र दीर्घ म्हणजे गुरु समजतात. परंतु छंदःशास्त्रांत 'संयुक्तपूर्वोपि लघुः क्वचित्स्यात् वर्णस्तु प्रह्रादिगतो विभाषा । ए ओ क्वाचित् प्राकृते लघु स्तः इं हिं तथा बिंदुयुते पठित्वा ॥ या कारिकेनें व तसेंच इं हिंकारौ बिंदुयुतौ ए ओ शुद्धौ च वर्णमिलितावपि लघू । रेफहकारौ व्यञ्जनसंयोगे परे अशेषमपि सविभाषम् ॥ यदि दीर्घमपि वर्णं लघु जिह्वा पठति सोपि लघुः । वर्णौ (वर्णा वा) त्वरितपठितौ द्वौ त्रयो वा एकं जानीत ॥ पादादौ हि वर्णस्य संयोगः क्रमसंज्ञितः । परस्थितेन तेन स्यात् लघुतापि क्वचिद्गुरोः ॥ इ. इ. वचनांनीं बऱ्याच गुरूंस लघुत्व मानिलें आहे. या सर्व वचनांचा संक्षिप्त अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहे. संयुक्ताक्षराच्या पूर्वीचा ऱ्हस्व स्वर कोठें कोठें लघु समजावा. प्र व ह्र या अक्षरांपूर्वीचा ऱ्हस्व स्वर विकल्पानें लघु समजावा.ए,ओ हे स्वर क्वचित् लघु समजावेत. इं हिं हे प्राकृत भाषेंतील वर्ण लघु समजावेत. कोणताहि दीर्घ स्वर द्रुतोच्चारामुळें लघु होतो असें समजावें व तसेंच दोन किंवा त्यांहून अधिक वर्ण शीघ्रपठित केले तर ती एकच वर्ण समजावा. यावरून असें दिसून येतें की संस्कृतज्ञांचा जेव्हां अन्य भाषांशीं (कानडी वगैरे भाषांशीं) विशेष परिचय झाला तेव्हां संस्कृत पद्धतीहून निराळे असे गुरूंचे व अक्षरांचे उच्चार होऊं लागले व त्यामुळें त्यांचें अपवादांत परिगणन करावें लागलें. कानडींत ए, ओ हे स्वर ऱ्हस्व व दीर्घ असे दोन्ही प्रकारचे मानिले आहेत, व तसेच कांहीं वर्णोच्चार अन्य भाषेंत एकमात्राक कालांत अनेक वर्णांचे होतात. मराठींत संयुक्तपूर्व ऱ्हस्व स्वर बरेच ठिकाणीं आघातशून्य उच्चारला जातो, तेव्हां त्यास लघु मानावें लागतें. तात्पर्य, हा अपवादांतील बराचसा भाग अन्यभाषासंसर्गानें स्वीकारावा लागला असावा. आतां या अपवादांचीं कांहीं उदाहरणें देतों. 'तव ह्रियापह्रियो मम ह्रीरभूत्', 'मम प्रिये क्व समेष्यति तत्पुनः. ' पदाच्या आरंभीं जो संयोग असतो त्यास क्रम अशी संज्ञा आहे. तो पुढें आला असतां पूर्व ऱ्हस्व स्वर लघु मानितात; उ. मालिनीः—भ्रमति भ्रमरनारी कानने विप्रयुक्ता ।' 'अरे रे कथय वार्तां दूति तस्यातिचित्राम्' यांत रे रे हीं अक्षरें. द्रुतोच्चारानें लघु केलीं आहेत. हा मालिनीछंदाचा चरण

आहे. मालिनींत पहिलीं सहा अक्षरें लघु असावीं लागतात. 'ऐशा काव्या कराया, हिकडुन तिकडुन आणुनी, बुद्धि दे चक्रपाणी' हें अर्वाचीन विनोदी पद्य प्रसिद्ध आहे. यांत हिकडुन तिकडुन हीं आठ अक्षरें चार अक्षरांबद्दल योजिलीं आहेत. तीं द्रुतोच्चारानेंच कशीं तरी वृत्तपठनांत जुळवून घ्यावीं लागतात. अशा रीतीनें अपवाद म्हणून जरी यांचें परिगणन केलें असलें तरी अभिजात कवि या परिगणनाचा फायदा घेत नाहींत हें ध्यानांत ठेवावें.

आतां संयुक्त व्यंजनापूर्वीच्या लघु स्वरास जें लघुत्व सांगितलें आहे त्याचा थोडासा विचार करूं. कारण त्याचा मराठी भाषेंतील संयुक्तपूर्व स्वरोच्चारास विशेष उपयोग आहे. संयुक्त अक्षराचा सावकाश उच्चार केला असतां त्यांतील प्रथम व्यंजन पूर्वस्वराशीं संबद्ध झाल्यासारखें होऊन त्याच्या उच्चारांत मिसळल्यासारखें होतें. अर्थात् तो उच्चार अर्धमात्रेनें वाढतो, व त्यास गुरुत्व येतें. व्यञ्जनान्त उच्चारास अशा प्रकारें गुरुत्व येत असल्यामुळें 'दीर्घं संयोगपरं तथा प्लुतं व्यंजनान्तमूष्माणम् ।' या कारिकेंत गुरुपरिगणनेंत व्यंजनान्ताचें ग्रहण केलें आहे. याचा स्पष्ट बोध होण्याकरतां 'मी आत्मा हत् इंद्रियें देह वाणी' हा शालिनी वृत्ताचा चरण घेऊं. शालिनी वृत्तांत दुसरा गण तगण असल्यामुळें प्रथमाक्षर गुरु पाहिजे. तें गुरुत्व येथें ह या ऱ्हस्वाक्षराशीं त् हें व्यंजन जोडून साधिलें आहे. संस्कृत नियमाप्रमाणें त् हें अक्षर पुढील स्वराशीं जोडल्यास 'दि' असें होऊन सामील हु या अक्षरास गुरुत्व येणार नाहीं. यावरून हें स्पष्ट झालें की व्यंजनान्त स्वर गुरु होतो. तेव्हां जेव्हां सावकाश उच्चारामुळें संयुक्ताक्षरांतील प्रथम वर्ण पूर्वस्वराशीं संलग्न होऊन उच्चार होतो तेव्हां पूर्वस्वर गुरु होतो. जेव्हां द्रुतोच्चारामुळें तो पूर्वस्वराशीं मिसळल्यासारखा न होऊन उत्तरव्यंजनाशीं तो संबद्ध होतो तेव्हां पूर्वस्वराचा लघु उच्चार होत असल्यामुळें त्यास लघुत्व मानावें लागतें व प्रचारांत असलेल्या भाषेंत असे उच्चार होणें अपरिहार्य असल्यामुळें त्याविषयीं तसा नियम करणेंहि नाप्राप्त होतें. तात्पर्य, मराठींत तुम्ही वगैरे हजारों शब्दांत संयुक्त पूर्वस्वरास लघुत्व येतें तें यामुळेंच येतें, व म्हणूनच त्याचें अपवादांत परिगणन करावें लागतें.

आतां आपण यतीसंबंधानें विचार करूं. 'श्लोकेषु नियतस्थानं पदच्छेदं यतिं विदुः ।' असें आचार्यदण्डीनें यतीचें लक्षण दिलें आहे. याचा अर्थ श्लोकामध्यें पदच्छेदाचें (पदच्छेदपूर्वक विश्रांतीचें) जें विशिष्ट ठरलेलें स्थान त्यास यति म्हणतात. याच अर्थाचें 'यतिर्विच्छेदः' असें पिंगलाचें सूत्र आहे. 'यतिर्विच्छेदसंज्ञकः' असें केदारभट्टानें व 'यतिर्जिह्वेष्टविश्रान्तिस्थानं कविभिरुच्यते' असें गंगादासानें यतीचें लक्षण केलें आहे. या सर्वांचा तात्पर्यार्थ वर दिलेलाच आहे.

तेव्हां श्लोकामध्यें पदच्छेदानें जें विश्रांतिस्थान तो यति होय व यतीचा भंग म्हणजे तेथें पदाचा छेद न होणें. 'संहितैकपदे नित्या नित्या धातूपसर्गयोः। नित्या समासे' या नियमाप्रमाणें श्लोकांतील विश्रांतिस्थानीं अविच्छिन्नोच्चार्य अक्षरें आलीं म्हणजे यतिभंगदोष होतो. या यतिभंगाचे अनेक प्रकार आहेत. यति हा प्रायः पादान्तीं, अर्धान्तीं व कांहीं वृत्तांत विशिष्टस्थानीं असतो; उ. मंदाक्रान्तेंत चवथ्या, दहाव्या व सतराव्या अक्षरांवर, स्रग्धरेच्या सातव्या सातव्या अक्षरांवर, शार्दूलविक्रीडिताच्या बाराव्या अक्षरावर यति असतो. तेथें एकपदत्वामुळें जर विश्रांति घेतां आली नाहीं, म्हणजे विश्रांति घेतली असतां पदाच्या मध्येंच छेद होऊन वैरस्य उत्पन्न होतें, तो यतिभंगदोष समजावा. दोन पदांतील स्वराचा संधि केला असतां त्या संधीवर यति येईल तर तेथेंहि वैरस्योत्पत्तीमुळें यतिभंगदोष होतो. चादि अव्ययें यतीमुळें पुढील पदांशीं व प्रादि उपसर्ग मागील पदाशीं संबद्ध होतील तर तेथेंहि यतिभंग मानतात. या सर्व प्रकारच्या यतिभंगांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. 'नमस्तस्मै महादेवाय शशाङ्कार्धधारिणे' 'तुझ्या पदाब्जीं मनभृंग तारा'–हीं पदभंगामुळें यतिभंगदोषाचीं उदाहरणें होत. 'स्वादु स्वच्छं च हिमसलिलं प्रीतये कस्य नास्ति' व 'दुःखं मे प्र-क्षिपति हृदयं दुःसहत्वाद्वियोगः।' हीं चादि अव्ययें व उपसर्ग यांचा विश्रांतीमुळें संयुक्तस्थानीं संबंध होत असल्यामुळें यतिभंगदोषाचीं उदाहरणें होत आहेत. 'स्यादस्थानोपगत-यमुनासंगमेवाभिरामा।' हें स्वरसंधीवर यति असल्यामुळें यतिभंगाचें उदाहरण होत आहे. असे हे यतिभंगाचे अनेक प्रकार आहेत. विस्तार फार होईल म्हणून ते सर्व देत नाहीं. यतिभंग हा वैरस्योत्पादक असेल तरच सदोष मानला जात असल्यामुळें व वैरस्योत्पादन विश्रांतिपूर्वक श्लोक म्हटला असतांनाच होत असल्यामुळें जर विश्रांति न घेतां श्लोक म्हटला तर तेथें यतिभंग होत नाहीं. व यामुळेंच 'श्वेतमाण्डव्यमुख्यास्तु नेच्छन्ति मुनयो यतिम्' असा प्राचीनांचा प्रवाद आहे. व म्हणून प्राकृतपिंगल, वाणीभूषण वगैरे ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत यतीचा विचार केलेला नाहीं.

प्रस्तारादिकांचे विचार. — पिंगलप्रभृति छंदःशास्त्रप्रणेत्यांनीं 'उक्था' वगैरे छंदांतील लघुगुरु भिन्नाभिन्न प्रकारांनीं मांडावयाचे झाले तर किती प्रकारांनीं मांडतां येतील हें ठरविण्याकरतां लघुगुरु मांडण्याची एक पद्धति ठरवून अमक्या एका छंदास लघुगुरूंच्या परिवर्तनानें इतके प्रकार निष्पन्न होतात असें गणितानें सिद्ध केलें आहे. यास प्रस्तार म्हणतात. तसेंच या प्रस्तारांतील अमुक एक प्रकार असा असावा किंवा अमका प्रकार कितवा असावा हेंही गणितानें सिद्ध करून दाखविण्याची पद्धति दिली आहे. तीस नष्टोद्दिष्ट म्हणतात. हा सर्व विषय गणिताचा असल्यामुळें थोडासा क्लिष्ट आहे तेव्हां त्याचा येथें विस्तार

करीत नाहीं. तो समजून घेण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांनीं आमच्या छंदोमंजरीच्या परिशिष्टांत पाहावें. तेथें हा विषय स्पष्ट केला आहे.

अभंग-ओवीविचार. — आतां केवळ मराठी छंद म्हणून जे साकी, दिंडी, अभंग, जोवी वगैरे आहेत त्यांपैकीं ओवी-अभंगांविषयीं थोडासा विचार करूं. साकी दिंडी यांत विशेष विवादार्ह विषय नसल्यामुळें त्यासंबंधानें येथें विचार करीत नाहीं. अभंगाला चार चरण असतात. त्यांत पहिल्या तीन चरणांत अक्षरें प्रायः समसंख्याक असतात. चवथा चरण प्रायः न्यूनाक्षर म्हणजे एक दोन अक्षरांनीं कमी असतो. प्रथमच्या तीन चरणांत चारपांसून बारापर्यंत अक्षरें असतात. दोन, तीन किंवा चारी चरणांत यमक साधलेलें असतें. चार चरणांस चौक म्हणतात. अभंग हा मात्रांनीं अथवा गणांनीं नियमित नसतो. तीन चरणांत अक्षरें प्रायः समानसंख्याक येतात. परंतु चतुर्थचरणांत तीं न्यून असल्यामुळें ह्यास समाक्षरी वृत्त म्हणतां येत नाहीं. विषमाक्षरी म्हणतां आलें असतें परंतु चौथ्या चरणांत फक्त दोन किंवा तीन अक्षरें कमी येत असल्यामुळें विषमाक्षरी वृत्तहि म्हणण्यास नड येते. एखादें अक्षर कमी असल्यास व चारहि चरण विषम असतील तर त्यास विषमाक्षरी म्हणावें असा प्राचीन संकेत आहे. अर्ध समवृत्त म्हणावें तर तीन चरण समानाक्षर असल्यामुळें तसेंहि म्हणतां येत नाहीं. कारण अर्ध समांत दोन चरणच सम असतात. ओवीचीहि हीच स्थिति आहे. तेव्हां अभंग व ओवी यांचें फक्त चार चरणांनींच संस्कृत वृत्ताशीं साम्य दाखवितां येतें. याशिवाय कोणत्याहि रीतीनें सादृश्य नाहीं. नामदेवानें अभंग छंदाचें लक्षण "सहा साडे तीन चरण जाणावे । अक्षरें मोजावे चौक चारी ॥ दीड चरणाची दीर्घ तीं अक्षरें । सूक्ष्म विचारें बोध केला ॥ असें दिलें आहे. तें फक्त सहाअक्षरी अभंगाचेंच आहे. परंतु अभंगाच्या चरणांत अक्षरें बारापर्यंत येत असल्यामुळें तें लक्षण फारच एकदेशी आहे. आतां या अभंगाचीं कांहीं उदाहरणें प्रथम देऊन नंतर यास वृत्त म्हणतां येईल कीं नाहीं याचा विचार करूं.

चारअक्षरी— तीन शिरें । साहा हात । तया माझे । दंडवत.

पांचअक्षरी— अकरावरी । सातवें होतें । सातवें कोठें । मावळलें.

सहाअक्षरी— जगाच्यां कल्याणां । संतांच्या विभूति । देह कष्टवीती । उपकारें.

सातअक्षरी— चातकेवीण लक्ष । अंतरींच ठेले । तेथें एक बोलले । ब्रह्मा मेघ.

आठअक्षरी— आम्हीं जाणावें तें काई । तुझें वर्म कोण्या ठाई । अंत पार नाहीं । ऐसें श्रुती बोलती.

नऊअक्षरी— ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठल नामें मुक्त पेठा ।
स्नान दान घडे रे श्रेष्ठा । वैकुंठवाटा संत गेले ॥
दहाअक्षरी— लावण्य मान्यता विद्यावंत । सखे स्वजन पुत्र कलत्र ।
विषयभोग वयसा व्यर्थ । देहासि हित मरणावर्ती ॥
अकराअक्षरी— जागृतीमध्ये कवण जागत । सुषुप्तिमध्ये कवण निद्रिस्त ।
दोघे भ्रमलीया स्वप्नदेखत । जीव मन सांगति ॥
बाराअक्षरी— वऱ्हाड न होता खेळ मेळे । लग्न लागलें कवणे दुष्ट वेळे ।
तेथुनी अंबोला चालवितो माते । कैसेनि तेथें निस्तरावें ।

येथपर्यंत दिलेल्या उदाहरणांवरून हें स्पष्ट दिसून येईल की अभंगाचें लक्षण मात्रा अथवा गण यांनीं बांधता येणें शक्य नाहीं. अक्षरांवरूनहि ठरवितां येत नाहीं. कारण तींही निश्चित सांगतां येत नाहींत. चतुर्थचरणांत प्रायः तीं न्यून असतात असें वर म्हटलें आहे. तेथें प्रायः असें म्हणावयाचें कारण वरील उदाहरणांत चार, नऊ व दहा अक्षरी अभंगांत चवथा चरण ऊनाक्षर नाहीं. तात्पर्य, अभंगाचें शास्त्रीय पद्धतीनें अव्याप्त्यतिव्याप्त्यादिदोषरहित लक्षण सांगणें कठीण आहे. हीच स्थिति ओवीची आहे. तिचेंहि गणमात्रादिकांनीं निश्चित लक्षण करतां येत नाहीं. तसेंच अभंग व ओवींत काय फरक सांगावा हेंही कळत नाहीं. कारण ओव्याहि अशाच चार अक्षरांपासून बाराअक्षरी चरणाच्या उपलब्ध आहेतच. कै. राजवाडे यांनीं दोहोंत असा फरक सांगितला आहे की अभंगाचे चरणांतील उपांत्याक्षर प्लुत म्हणतात. ओवीचें अंत्याक्षर प्लुत म्हणतात. आमच्या मतें ही उपपत्ति छंदःशास्त्रास धरून नाहीं. आजपर्यंतच्या छंदःशास्त्रज्ञांनीं छंदाचा विचार करतांना फक्त लघु व गुरु, ऱ्हस्व व दीर्घ, एवढेच उपयुक्त म्हणून शास्त्रांत संग्रहीत आहेत. प्लुतादिक जरी म्हणतांना एखाद्या स्वराचे एखाद्यानें उच्चारिले तरी ते वृत्तरचनाविषयांत येत नाहींत. कारण व्यावहारिक भाषा ही नेहमीं ऱ्हस्वदीर्घात्मक असते. प्लुताचा तींत विशेषसा संबंध नसतो. वृत्तनियमन हें व्यावहारिक भाषेस अनुसरून आहे. तेव्हां तींत प्लुतादिकांचा संबंध येत नाहीं. ते संगीतांत उपयुक्त आहेत. तेव्हां अभंग य ओवी यांचा प्लुतोच्चार-भेदामुळें दोहोंत भेद करणें हें छंदःशास्त्रास सोडून आहे. शिवाय केवळ म्हणण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळें आपण वृत्तभेद करूं लागलों तर हरिणी, शार्दूलविक्रीडित वगैरे वृत्तें दोन चार पद्धतीनें सुरांत म्हणतां येत असल्यामुळें त्या त्या पद्धतीस निराळें वृत्त मानावें लागेल. परंतु तसा संप्रदाय नाहीं, व तो संप्रदाय शास्त्रीयहि होणार नाहीं. तेव्हां कै. राजवाडे यांची ही उपपत्ति युक्त वाटत नाहीं. आतां ओवींत प्रथम तीन चरणांत अनुप्रास साधलेला असतो, अभंगांत दुसऱ्या तिसऱ्या चरणांत तो असतो, असा फरक करावा तर यालाहि विपुल अपवाद आहेत, हें वर दिलेले अभंग

जरा लक्ष लावून पाहिले असतां कोणाच्याही ध्यानांत येईल. शिवाय 'कृष्णाप्रति गोपाळ । म्हणताति सकळ । न कळसी आकळ । आतां ताता ।।' 'माय बाप भाऊ पुत्र । सर्व सोयरे कलत्र । मूळ मानिती विचित्र । हा संसार बापया ।।' इ.इ. कितीतरी अभंग ओवीप्रमाणें चरणत्रयांत यमक साधलेले आहेत. तेव्हां यमक हा ओवी व अभंग यांचा व्यवच्छेदक धर्म मानतां येत नाहीं.

अभंगादिकांचा समावेश कशांत करावा.—संस्कृतांत पद्यगंधि म्हणून एक वाक्यरचनापद्धति आहे. त्या पद्धतींत मधून मधून एखादें वाक्य पद्याच्या चरणांत आलेलें असतें. ती पद्धति अभंग-ओवींत आढळते. उ. 'माय बाप भाऊ पुत्र । सखे सोयरे कलत्र ।' हे चरण समानिका वृत्ताचे आहेत. 'सौख्य होतें मना । ईश्वरी योजितां । जाणसी हे मना । तत्पदीं लागतां ।।' हे चरण स्रग्विणीचे आहेत. असे संस्कृत वृत्तांतील कांहीं चरण यांत म्हणून हे वृत्तगंधि भासतात. परंतु यांस प्रत्येक अभंगाचे अथवा ओवीचे चार चरणच असतात. वृत्तगंधि गद्यांत तसें नसतें, त्यामुळें यांना पद्यांत ढकलण्याचा अर्वाचीनांचा प्रयत्न दिसतो. परंतु ते चरण न्यूनाधिक अक्षरात्मक असल्यामुळें त्यांचा वृत्तांत समावेश करणें कठीण जातें. आतां सर्वसाधारणपणें अभंग व ओवी यांत अत्यंत वैपुल्यानें आढळणारा विशेष म्हणजे यमकप्राचुर्य. बहुधा यमकशून्य अभंग अथवा ओवी सांपडत नाहीं. तेव्हां (१) चार चरणात्मक व यमकप्रधान व (२) गद्यासारखी गणमात्राशून्य जी वाक्यपद्धति तीस ओवी अभंग समजण्यास हरकत नाहीं. ही गद्यपद्धति कांहीं अधिकारी पुरुषांनीं प्रचारांत आणल्यामुळें तत्पंथीय वर्गांत सुरू होऊन विस्तार पावली. ही पद्धति संस्कृतांत नाहीं, प्राकृतांत नाहीं, इतर कोणत्या भाषेंत असल्याबद्दल प्रसिद्धि नाहीं. तेव्हां प्रस्तुत कालीं अभंग व ओवी यासंबंधानें एवढीच उपपत्ति विद्वानांपुढे ठेवून चर्चा सुरू करण्यास हरकत नाहीं.

कै. राजवाडे यांनीं अभंगशब्दाची व्युत्पत्ति, भंग— कर्णमधुरध्वनि— तो ज्यांत नाहीं तो अभंग अशी दिली आहे. यास प्रमाण कांहीं एक दिलें नाहीं. भंग या शब्दाचा कर्णमधुरध्वनि हा अर्थ उपलब्ध होत नाहीं. आतां गणशून्यतेमुळें अभंग कर्णमधुर नाहीं म्हणावें तर तें अनुभवाविरुद्ध आहे. व ओवींत तरी गणानुबद्ध रचना कोठें आहे ? मग तीहि कर्णमधुर नसल्यामुळें अभंगशब्दानें वाच्य कां होऊं नये ? तात्पर्य, ही कै. राजवाडे यांची व्युत्पत्ति विद्वद्ग्राह्य होणें शक्य नाहीं. कांहीं विद्वान अभंग हा कोणत्याहि तालांत गायिला तरी तालभंग यांत होत नाहीं म्हणून यास अभंग म्हणतात. परंतु अभंगसजातीय ज्या ओव्या तेथेंहि तालभंग होत नसल्यामुळें त्यांस अभंग कां म्हणूं नये ? आमच्या मतें अभंग संस्कृत सुभाषितांसारखे विविध विषयांवर सुटसुटीत रचनात्मक असल्यामुळें, ज्यांस कधींहि भंग म्हणजे विनाश नाहींत ते, अशा अर्थानें या

शब्दाची प्रवृत्ति झाली असावी, व ओवी म्हणजे संपूर्ण विषय ज्यांत ओवला आहे ती. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, यांनीं गीता, भागवत, भारत, यांतील विषयांना आपल्या ग्रंथांत ओवले असल्यामुळें त्यास ओवी म्हणतात. ओवी यांत मूळ धातु 'वे' असा असेल तर तोही संपूर्ण विषय ओवणें या अर्थानें उपयुक्त होत आहे. तात्पर्य, अभंग व ओवी हे शब्द गण व ताल यांच्यासंबंधानें प्रचारांत आले नसून ते अर्थविशेषावरून या रचनाप्रकारास लावले जात असावेत असें वाटतें.

असो, येथपर्यंत जें विवेचन केलें तें कोणत्याहि मतास अभिनिविष्ट होऊन अथवा व्यक्तिविशेषाविषयीं सुहृदसुहृद्भावानें मुग्ध होऊन केलेलें नाहीं हें वाचकांस कळून येईल. फक्त या विषयाची पूर्वसंप्रदायाची माहिती होऊन त्याची पुढें चर्चा होऊन विवादित गोष्टीचा शास्त्रशुद्ध निर्णय व्हावा हाच प्रधान हेतु आहे. तेव्हां त्याच दृष्टीनें या निबंधाकडे दृष्टि ठेवून विद्वानांनीं चर्चा करावी एवढी विनंति करून हें विवेचन येथेंच थांबवितों.

कविप्रवर भवभूति व तत्कृत उत्तररामचरित

यांसंबंधानें कांहीं विचार

सुबन्धौ भक्तिर्नः क इह रघुकारे न रमते
धृतिर्दाक्षीपुत्रे हरति हरचन्द्रोऽपि हृदयम्।
विशुद्धोक्तिः शूरः प्रकृतिमधुरा भारविगिर-
स्तथाप्यन्तर्मोदं कमपि भवभूतिर्वितनुते ॥

प्रस्तुत कालीं संस्कृत वाङ्मयांत जीं नाटकें उपलब्ध आहेत, त्यांत कालिदास, भवभूति या कविद्वयाचीं नाटकें विशेष मान्य झालेलीं आहेत. त्यांतही कालिदासाचें शाकुंतल व भवभूतीचें उत्तररामचरित हीं दोन नाटकें विद्वान रसिकांनीं फार प्रशंसिलेलीं आहेत. कालिदासानें शाकुंतलांत प्रभावशाली, व्यवहारधूर्त, विलासी, नवनवरसास्वादलोलुप असा रसिक नायक; निर्मलहृदया, अव्याजमनोहरा, विकसितयौवना, तपस्विजनपालिता नायिका; सात्त्विकवृत्ति, तपोरत, परिणतवयस्क, अपत्यवत्सल पिता; मुग्धस्वभावा, प्रेमलवृत्ति, जनकानुरक्ता सुता; कुलाभिमानी, प्रभाववान्, संपत्तिमान् परंतु अपत्यशून्यतेमुळें उदासीनवृत्ति, विषण्णमनस्क, मध्यमवयस्क असा पुरुष व स्वाभिमानी, सत्त्वसंपन्न, धैर्यशाली, तेजस्वी कुमार अशा विविधप्रकारच्या पात्रांची योजना करून शृंगार, करुण, वत्सल इत्यादि रसांचा उत्तम परिपोष करून दाखविला आहे. भवभूतीनें उत्तररामचरितांत सदाचरणी, सत्त्वशील, प्रेमलवृत्ति परंतु कर्तव्यनिष्ठुर असा पति; सुशील, भर्तृपरायण परंतु मृदुस्वभावी अशी पत्नी; पराक्रमी, विनयशील कुमार, अशा प्रकारच्या पात्रांची योजना करून शृंगार, करुण, वीररसांची उभारणी करून दाखविली आहे. तसेंच शाकुंतलांतील नायक व नायिका यांचा आश्रम-पुष्पवाटिकेंतील प्रथमभेटीचा देखावा, त्यांचा लतामंडपांतील प्रेममधुर संयोग, पितृवत्सल कन्यकेचा वृद्ध पित्यास सोडून भर्तृगृहगमनप्रसंग, राजगृहीं (भर्तृगृहीं) प्रियवल्लभाकडून अनपेक्षित रीतीनें होणारा साध्वी पत्नीचा अवमान व त्या वेळचें तिचें बाणेदार वर्तन, पवित्र मारीच ऋषीच्या आश्रमांत अकल्पित नायक-नायिकांचा भेटीचा योग हे प्रसंग, व तसेंच उत्तररामचरितांतील चित्रदर्शन-प्रसंगींचे परस्परानुरक्तदंपतींचे प्रेमालाप, सीतादेवीच्या त्यागाच्या वेळचे रामचंद्राचे करुणालाप, दंडकारण्यांतील मनोहर पूर्वव्यवहारांचें स्मरण करून देणारे मर्मस्पृक

प्रसंग, वासंतीचे हृदयभेदी उद्गार, रामाचा गंभीर शोक, शौर्यसौजन्यादिगुणशाली कुमारांची भेट व त्यांचें सहजमनोहारी भाषण इ. इ. प्रसंगांनीं हीं दोन्ही नाटकें रसिकजनांस अत्यंत मनोरम वाटत आहेत. आणि यामुळेंच आजपर्यंत शेंकडों विद्वानांच्या मुखांतून कालिदास हा साक्षात् सरस्वतीचा अवतार म्हणून कालिदाससंबंधानें व भवभूतेः संबन्धात् भूधरभूरेव भारती भाति। एतत्कृतकारुण्ये किमन्यथा रोदिति ग्रावा॥ असे भवभूतीसंबंधानें प्रशंसोद्गार निघत आहेत.

आज आमचा भवभूति व त्याचें उत्तररामचरित नाटक यांवर चार शब्द लिहिण्याचा विचार आहे, कारण चालू सालीं मुंबई विश्वविद्यालयानें हें पुस्तक पाठशाळेच्या (कॉलेजच्या) संस्कृत अभ्यासक्रमांत नेमिलें असल्यामुळें विद्वान् शिक्षकवर्गाकडून समंजस विद्यार्थिवर्गाला शिकविलें जात आहे. तेव्हां या वेळीं आपले विचार प्रसिद्ध केले असतां त्यांच्या युक्तायुक्ततेचा विचार विद्वद्वर्गाकडून होईल व त्यामुळें कांहीं तरी आपणांस उपयुक्त माहिती मिळेल, व विद्यार्थिवर्गासहि तिचा उपयोग होईल, एवढाच आमचा प्रधान हेतु आहे. कोणाशीं वादविवाद करण्याच्या हेतूनें अथवा कोणास उत्तर देण्याच्या भावनेनेंही हा आमचा उपक्रम नाहीं. तेव्हां सर्व विद्वानांनीं या सद्भावनेनेंच हा निबंध वाचावा व आपले विचार प्रसिद्ध करावेत अशी आमची विनंति आहे.

आतां आपण प्रथम भवभूतीसंबंधानें थोडासा विचार करूं व नंतर त्याचें नाटक जें उत्तररामचरित त्याच्या गुणावगुणांचें पर्यालोचन करूं. भवभूतीसंबंधानें त्याच्या नाटकांतून पुढें दिल्याप्रमाणें माहिती मिळते. दक्षिणापथांत पद्मपुर येथें तैत्तिरीयशाखी, काश्यपगोत्री, पंचाग्निव्रतधारी, सोमयाजी, उदुंबर उपनांवाचें ब्राह्मणघराणें राहत असे. त्यांत भट्टगोपाल नांवाची एक सन्मान्य व्यक्ति झाली. भट्टगोपाळाला नीलकंठ नांवाचा पुत्र झाला. या नीलकंठास जतुकर्णी नांवाच्या स्त्रीचे ठिकाणीं एक मुलगा झाला. हाच भवभूति होय. हा वेदशास्त्रसंपन्न असून त्यास श्रीकंठ ही पदवी मिळालेली होती. मालतीमाधवाच्या एका जुन्या प्रतींत सहाव्या अंकाचे शेवटीं "इति श्रीकुमारिलस्वामिप्रसादप्राप्तवाग्वैभवश्रीमदुंवेकाचार्यविरचिते मालतीमाधवे षष्ठोऽङ्कः' असा उल्लेख आहे. या वरील सर्व माहितीवरून भवभूतीच्या नांवासंबंधानें थोडासा वाद सुरू आहे. कोणी म्हणतात या कवीचें मूळ नांव श्रीकंठ असून 'साम्बा पुनातु भवभूतिपवित्रमूर्तिः' या श्लोकावरून अथवा 'गिरिजायाः कुचौ वन्दे भवभूतिसिताननौ' या पद्यावरून त्यास मागून विद्वान लोक भवभूति म्हणूं लागले. वर दिलेल्या सहाव्या अंकांतील उंवेकाचार्य हा उल्लेख लेखकप्रमादानें पडला आहे; कारण इतरत्र कोठेंही हा उल्लेख सांपडत नाहीं. 'दीपशिखाकालिदासः', 'घण्टामाघः', 'छत्रभारविः' अशा तऱ्हेचे कवीचे

उल्लेख त्यांच्या विविष्ट पद्यांवरून चालू असलेले दृष्टीस पडत असल्यामुळें भवभूति हें नांव त्याच्या पद्यांवरून त्यास मिळालें असेल ही कल्पना अग्राह्य वाटत नाहीं. कांहीं टीकाकारांनीं भवभूति शैव असल्यामुळें त्याच्या उपासनेनें संतुष्ट झालेल्या शंकरानें प्रसाद म्हणून त्यास आपली भूति (भस्म) दिली, तेव्हांपासून त्यास भवभूति म्हणूं लागले असें म्हटलें आहे. कांहीं म्हटलें तरी प्रस्तुत कवीचें भवभूति हें जन्मनांव नसावें हाच निष्कर्ष निघतो. तेव्हां आतां राहिलेलें जें पद श्रीकंठ तेंच या कवीचें जन्मनांव असावें असा या मंडळींचा अभिप्राय आहे. तात्पर्य, आजच्या महाराष्ट्रपद्धतीनें भवभूतीचें संपूर्ण नांव सांगावयाचें म्हणजे श्रीकंठ नीलकंठ उदुंबरे असें होईल. मद्रासी पद्धतीनें सांगावयाचें तर उदुंबरी श्रीकंठ असें होईल. यासंबंधानें आमचें मत निराळें आहे. प्रस्तुत कवीचें जन्म-नांव श्रीकंठ नसावें असें आम्हांस वाटतें. कारण जन्मनांव सांगतांना 'लाञ्छनः' 'भूषणः' असें त्याच्यापुढें विशेषणात्मक पद प्रायः येत नाहीं. नाम, अभिधा, आख्या हेच शब्द प्रायः येतात. एखाद्या व्यक्तीस सन्मानानें जी पदवी प्राप्त होते, तिचा उल्लेख कर्तव्य असतांना मात्र अलंकृत, लाञ्छित, भूषित अशीं विशे-षणें जोडून तीं योजिलीं जातात. तेव्हां या संप्रदायाच्या दृष्टीनें विचार केला असतां 'श्रीकण्ठपदलाञ्छन' असा जो तीन्ही नाटकांत उल्लेख आला आहे त्यानें 'श्रीकंठ' हा भवभूतीची पदवी असावी असें वाटतें. प्रस्तुत कवीस त्याच्या उत्तम वक्तृत्वामुळें श्रीकंठ (वक्तृत्वश्री आहे कंठाच्या ठिकाणीं ज्याच्या, अशा अर्थानें) ही पदवी मिळाली असावी. त्याचें खरें नांव भवभूति हेंच असावें. कारण त्याच्या सर्व नाटकांत प्रस्तावनेंत 'भवभूतिर्नाम कविः' असाच उल्लेख सांपडतो. धनपाल, क्षेमेन्द्र, गोवर्धनाचार्य, विक्रमार्क, जह्लण, राजशेखर वगैरे कवींनीं आपल्या ग्रंथांत भवभूति याच नांवानें त्याचा उल्लेख केलेला आहे. सर्वत्र प्रचारही भवभूति याच नांवाचा आहे; श्रीकंठ या नांवाचा नाहीं. या कवीचें घराणें शैव असल्या-मुळें त्याच्या नीलकंठ जनकानें, भवानें (शंकरानें) ही पुत्ररूपी भूति (संपत्ति) आपणांस दिली या भावनेनें हें नांव ठेविलें असावें, व पुढें हा नामांकित विद्वान झाल्यावर त्याच्या भक्तमंडळीनें त्या नांवावर आपापल्या कल्पनेप्रमाणें कथा रचून आपला आदर व्यक्त केला असावा, ही कल्पना वर दिलेल्या माहितीवरून आम्हांस युक्त वाटते. आतां भवभूति हें जन्मनांव नव्हे, तर वर निर्दिष्ट केलेल्या मालतीमाधवाच्या प्राचीन पुस्तकांतील उल्लेखावरून उंवेकाचार्य हें कवीचें नांव असावें असें कांहीं विद्वानांस वाटण्याचा संभव आहे कारण मालतीमाधवां-तील एवढा विस्तृत उल्लेख लेखकप्रमादानें पडला असेल असें विशेष प्रमाणावांचून विधान करणें थोडेंसें धाडसाचें आहे. शिवाय इतर गोष्टी या विधानास अनुकूल असून त्या पंक्तींतील बाकीचा सर्व मजकूर भवभूतीसंबंधानें जुळण्यासारखा आहे.

भवभूति दाक्षिणात्य, कुमारिलस्वामीहि दाक्षिणात्य, भवभूतीचा काळ सातव्य शतकाचा शेवट व आठव्या शतकाचा आरंभ, तर कुमारिल स्वामीचाही तोच काळ; भवभूति हा उत्तम मीमांसक तर कुमारिलस्वामी तर मीमांसाशास्त्रप्रवर्तक. या सर्व गोष्टी त्या उल्लेखास अनुकूल आहेत. परंतु आम्हांस हा उल्लेख विश्वासार्ह वाटत नाहीं. कारण अर्वाचीन विद्वान भवभूति हा कुमारिलस्वामींहून थोडासा प्राचीन असावा असें म्हणतात. वर दिलेला उल्लेख एका प्रतीवांचून दुसऱ्या कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन प्रतींत सांपडत नाहीं. भवभूतीच्या पुढील ग्रंथकारांनीं अथवा कवींनीं उंवेकाचार्य या नांवानें त्याचा उल्लेख केलेला नाहीं. तेव्हां वरील उल्लेखासंबंधानें कोणीतरी कुमारिलस्वामींच्या उंवेकाचार्य शिष्यानें 'लिखितं' या अर्थी 'विरचिते' लिहून हा घोटाळा केला आहे असें आम्हांस वाटतें. अथवा उंवेकाचार्य लेखकानें 'लिखिते' असेंच लिहिलें असेल व मागच्या लेखकांनीं 'लिखिते' बद्दल चुकून 'विरचिते' घातलें असेल. लेखक पुस्तकसमाप्तीच्या स्थळीं आपलीं नांवें घालतात. तेव्हां आम्हांस हीच कल्पना युक्त वाटते. तात्पर्य, भवभूतीचें नांव उंवेकाचार्य नव्हे, भवभूतिच होय, असें आमचें मत आहे.

भवभूतीच्या आचरणासंबंधानें व विद्वत्तेसंबंधानें विचार केला तर तो सदाचारसंपन्न, श्रौतकर्मानुष्ठानतत्पर, मीमांसावेदांतादि शास्त्रांत प्रवीण असा होता. यासंबंधानें सूचक उल्लेख व प्रमाणें उत्तररामचरितांत पुढें दिल्याप्रमाणें आढळतात. ऋष्यशृंगाश्रम व त्यांतील द्वादशवार्षिकसत्रवर्णन, वाल्मिकीचा आश्रम व त्यांतील शिष्यगणवर्णन, अगस्त्याश्रम, वसिष्ठ, वाल्मीकि, अगस्त्य, लोपामुद्रा, गंगा, भूदेवी, तमसा, मुरला, आत्रेयी, वासन्ती, जनक इत्यादि देवता, ब्रह्मर्षि राजर्षि अशा प्रकारच्या पात्रांची योजना; चवथ्या अंकांतील समांसमधुपर्कमीमांसा, जनकाचें धर्मप्रधान भाषण, अश्वमेधीय मेध्याश्वाचें लवानें केलेलें वर्णन, व तसेंच 'नमोवाकम्', 'तीर्थोदकं च वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः', 'नीवारमुष्टिपचनाः', 'पुराणब्रह्मवादिनं प्राचेतसमृषिं', 'ब्रह्मपारायणाय उपासते' 'गर्भैकादशे वर्षे क्षात्रेण कल्पेनोपनीय त्रयीविद्यामध्यापितौ' 'माध्यंदिने सवने,' 'यत्रानन्दाश्च मोदाश्च यत्र पुण्याभिसंचयः। वैराजा नाम ते लोकास्तेजसाः सन्तु तेऽधुना', 'साक्षात्कृतधर्माणः ऋषयः' 'अमृतंभराणि प्रज्ञानानि', 'ब्रह्मकोषस्य गुप्त्यै', 'चूडाचुम्बितकङ्कपत्रमभितस्तूणीद्वयं पृष्ठतो भस्मस्तोमपवित्रलाञ्छनगुरो धत्ते त्वचं रौरवीम्। मौर्व्या मेखलया नियन्त्रितमधोवासश्च माञ्जिष्ठकं पाणौ कार्मुकमक्षसूत्रवलयं दण्डोऽपरः पैप्पलः॥' इ. इ. या वर दिलेल्या प्रमाणांवरून भवभूति मीमांसक होता अशी कल्पना करण्यास हरकत पडणार नाहीं.

अद्वैतवेदान्तशास्त्रांत हा कवि प्रवीण होता हें या नाटकांतील पुढें दिलेल्या प्रमाणांनीं सिद्ध होण्यासारखें आहे. 'प्रबुद्धोऽसि वागात्मनि ब्रह्मणि', 'शब्दब्रह्मणस्तादृशं विवर्तमितिहासम्', 'शाश्वतं पदं प्रविशामि', 'संकल्पाभ्यासपाटवोपादानः',

'याज्ञवल्क्यो मुनिर्यस्य ब्रह्मपारायणं जगौ', 'परं ज्योतिः प्रकाशताम्', 'आविर्भूत-ज्योतिषां ब्राह्मणानां', 'विकल्पव्युपरमे', 'एको रसः करुण एव निमित्तभेदात् भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान्। आवर्तबुद्बुदतरङ्गमयान् विकारानम्भो यथा सलिलमेव तु तत्समग्रम्', 'विद्याकल्पेन मरुता मेघानां भूयसामपि। ब्रह्मणीव विवर्तानां क्वापि प्रविलयः कृतः इ. इ.

कवि व नाटककार या दृष्टींनीं पाहिलें तर जरी हा कवि कविकुलगुरु कालिदास याच्या तोडीचा नाहीं तरी तो उच्च दर्जाचा आहे यांत संशय नाहीं. सदाचरण, उदात्त विचार व शुद्ध सात्त्विक प्रेम हे गुण तर या कवींत अप्रतिम होते. व या गुणांचा विकास या उत्तररामचरित नाटकांत उत्तम रीतीनें झालेला दृष्टीस पडत असल्यामुळें या नाटकाची व त्यामुळें कवीचीहि कीर्ति विशेष विस्तृत झाली आहे व ती सदैव अशीच राहील यांत संशय नाहीं.

कांहीं विद्वानांचा असा तर्क आहे कीं, भवभूतीची सांपत्तिक स्थिति फार निकृष्ट होती. त्याला राजाश्रय व लोकाश्रयही विशेष नसल्यामुळें द्रव्यप्राप्तीकरतांच त्यानें हीं नाटकें रचिलीं. परंतु त्या वेळीं त्याच्या नाटकाचे चहाते व त्याच्या गुणांची पारख करणारे कोणी नसल्यामुळें त्या व्यवसायांतही त्याला यश आलें नाहीं. व त्यामुळेंच त्यानें "सर्वथा व्यवहर्तव्यं कुतो ह्यवचनीयता। यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः" ॥ हा अथवा "ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः। उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी" ॥ असे निराशेचे व निर्वाणीचे उद्गार काढिले आहेत इ. इ. आम्हांस हा तर्क बरोबर वाटत नाहीं. या कवीचा काळ इ. स. ८ वें शतक आहे हें वर दाखविलेंच आहे. तेव्हां त्या काळीं धनकनकसंपन्न अशा या भरतखंडांत भवभूतीसारख्या मीमांसावेदान्तादि शास्त्रांत निष्णात अशा घरंदाज, सच्छील कवीला उदरवृत्ति चालविण्यास अडचण पडत असेल हें संभवनीय दिसत नाहीं. पद्मावतीपुरींत हें उदुंबर नांवाचें घराणें नांवाजलेलें, ज्या घराण्यांतील व्यक्ति पंक्तिपावन व सोमयाजी, ज्या घराण्यांत द्रव्यार्जन 'इष्टाय पूर्ताय च कर्मणेऽर्थान्', या दृष्टीनें केलें जात असे, अशा घराण्यांतील सरस व उदात्त विचाराच्या कवीनें उदरनिर्वाहाकरितां नाटकें रचण्याचा उपक्रम केला असेल अशी कल्पनाच करावीशी वाटत नाहीं. शिवाय त्या वेळीं ब्राह्मणधर्मानुयायी राजांचें हिंदुस्थानांत वर्चस्व होतें, या देशाचा व्यापार बुडाला नव्हता, या देशाचा संपत्तीचा झरा इतर राष्ट्रांकडे वाहूं लागला नव्हता, तेव्हां अशा काळीं भवभूतीसारख्या व्यक्तीला उदरविवंचना करावी लागली असेल असें वाटत नाहीं. शिवाय प्राचीन काळीं नाटकें हीं प्रयोगरूपानें द्रव्यार्जनाचें साधन म्हणून रचलीं जात होतीं असा कोठेंही

उल्लेख सांपडत नाहीं. 'काव्यं यशसे' या न्यायानें तीं केवळ आपली अजरामर कीर्ति राहावी म्हणून रचीत असत. व विविधयात्रोत्सवप्रसंगीं नाना देशांतील पंडित जमले असतां त्यांच्यापुढें परीक्षणाकरतां तीं करून दाखवीत असत. परीक्षकांनीं तीं पसंत केलीं म्हणजे जनमनोरंजनार्थ राजदरबारांत वगैरे होत असत. राजशेखरानें काव्यमीमांसेंत 'महानगरेषु काव्यशास्त्रपरीक्षार्थं ब्रह्मसभाः कारयेत् । तत्र परीक्षोत्तीर्णानां ब्रह्मरथयानं पट्टबन्धश्च । श्रूयते चोज्जयिन्यां काव्यकारपरीक्षा— इह कालिदासमेण्ठावत्रामररूपसूरभारवयः । हरिश्चन्द्रचन्द्रगुप्तौ परीक्षिताविह विशालायाम् । श्रूयते च पाटलिपुत्रे शास्त्रकारपरीक्षा—अत्रोपवर्षवर्षाविह पाणिनिपिङ्गलाविह व्याडिः । वररुचिपतञ्जली इह परीक्षिताः ख्यातिमुपजग्मुः ॥' अशा रीतीनें परीक्षेसंबंधीं माहिती दिली आहे, ती महत्त्वाची आहे. टीकाकारांनींहि आम्ही म्हणतों हाच अर्थ ध्वनित केला आहे. तेव्हां भवभूतीच्या घराण्याचा लौकिक, त्याची स्वतःची विद्वत्ता, हिंदुस्थानची १२ शें वर्षांपूर्वींची भरभराटीची स्थिति, व प्राचीन संप्रदाय या सर्व गोष्टींचा समुदितपद्धतीनें विचार केला म्हणजे भवभूतीनें हीं नाटकें उदरनिर्वाहाकरतां रचिलीं असावींत हा तर्क अयुक्त वाटतो. आतां यापुढें असा सहज प्रश्न येतो की मग भवभूतीनें संतापपरिपूर्ण वर दिलेले उद्गार कां काढले ? त्याची व्यवस्था काय ? आम्हांस त्या उद्गारांचीं कारणें निराळीं वाटतात. भवभूति हा पूर्वोत्तरमीमांसादि शास्त्रांत प्रवीण होता हें वर दर्शविलेंच आहे. तसेंच तो आचरणानें शुद्ध, विचारानें उदात्त, पदार्थांचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांमध्यें कुशल, व बराच उच्च दर्जाचा कविही होता यांत संशय नाहीं. परंतु एवढ्या गुणांनीं अद्वितीय कवि अथवा नाटककार होणें कठीण आहे. निदान कालिदासाची बरोबरी होणें तरी अशक्य आहे. कालिदासाची अद्वितीय प्रतिभा, मोजक्या व नेमक्या शब्दांनीं वर्णन करण्याची हातोटी, कल्पनेची भरारी, उपमादि अलंकारांनीं अर्थ खुलविण्याचें चातुर्य, नाटकांतील संविधानकाची निर्दोष मांडणी इ. इ. गोष्टी अद्वितीय आहेत. उदयसुंदरीमध्यें 'ख्यातः कृती सोऽपि च कालिदासः शुद्धा सुधास्वादुमती च यस्य । वाणीमिषाच्चण्डमरीचगोत्रसिन्धोः परं पारमवाप कीर्तिः' ॥ असें जें वर्णन केलें आहे तें अगदीं युक्त आहे. तात्पर्य, त्याची उज्ज्वल कवित्वशक्ति, व मनोहर नाटकरचना यांमुळें त्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. भवभूतीची इच्छा आपलीं नाटकेंहि अशींच कीर्तीला पात्र व्हावींत अशी असणें स्वाभाविक आहे. कारण तोहि विद्वान व रसिक कवि होता. परंतु कवित्वानें अथवा संविधानरचनेनें कालिदासाची बरोबरी करणें त्याला शक्य झालें नाहीं. साहित्यकोविद परीक्षकांकडून त्याला कालिदासाचा मान मिळणें अशक्य होतें. त्यामुळें त्रासून त्यानें वरील उद्गार काढले असावेत. प्रायः वैदिक, श्रौती, शास्त्री वगैरे वर्गांत ते विशिष्ट विषयांत निष्णात असल्यामुळें आपण सर्व विषयांत प्रवीण

आहों, आपल्या बुद्धीस अगम्य कांहीं नाहीं, जनता आपल्यापुढें उगीच इतरांची स्तुति करीत आहे, अशा प्रकारची त्यांची वृत्ति झालेली दृष्टीस पडते, व हीच वृत्ति इतरांचा अवमान करण्यास कारण होत असते. भवभूति पंडित असल्यामुळें त्यानें याच वृत्तीनें आपणांस कालिदासासारखा श्रेष्ठ न मानणाऱ्या परीक्षकांची निंदा करण्याकरतांच 'यथा स्त्रीणां तथा वाचाम्' इत्यादि प्रलाप काढले असावेत. तात्पर्य, भवभूतीच्या उद्दाम नैराश्यवादास त्याचें दारिद्य कारण नसून आपल्या सदाचरणाचा व शास्त्रीय विद्वत्तेचा मर्यादातिक्रम करणारा अभिमान हाच कारण असावा असें आम्हांस वाटतें. एवढेंच नव्हे तर त्याची सांपत्तिक स्थिति चांगली असेल व तीहि थोडीशी या उद्दाम वृत्तीस कारण झाली असेल. कारण धनाचा उबारा जवळ असला म्हणजे स्पष्टपणानें अथवा निर्भीडपणानें बोलतां येतें याचा अनुभव वाचकवर्गास असेलच.

आतां ज्या दोषांमुळें भवभूतीचीं नाटकें व कवित्व रसिकजनांस कालिदासाच्या तोडीचीं वाटलीं नाहींत अशी आमची कल्पना आहे तिचें थोडेंसें, प्रमाणांनीं समर्थन केलें पाहिजे, म्हणून भवभूतीच्या संविधानकांत, कवितेंत व भाषेंत काय वैगुण्य आहे याचें प्रथम थोडेंसें विवेचन करूं, व नंतर त्याच्या गुणांचेंही निरीक्षण करूं. हें गुणदोषनिरीक्षण सध्यां फक्त उत्तररामचरिताचेंच करावयाचें आहे. कारण या निबंधाचा विषय भवभूति व उत्तररामचरित एवढाच मर्यादित स्वरूपाचा आहे.

भवभूतीनें जें कथानक रचिलें आहे तें मूळ वाल्मीकिरामायणांत कसें आहे हें थोडक्यांत आपण पाहूं, म्हणजे या नाटकांत काय फेरफार केले आहेत ते समजतील व मग गुणदोषविवेचन करण्यास बरें होईल. रामानें रावणवध केल्यावर तो सीतादेवी, सुग्रीव, बिभीषण, हनुमान वगैरे मंडळीसह पुष्पकविमानांतून ताबडतोब अयोध्येस आला. तेथें त्याला राज्याभिषेक झाला. पुढें आप्तेष्ट मंडळी राज्याभिषेकसमारंभ पाहून आपापल्या स्थळीं गेल्यावर राम सुखानें राज्यकारभार पहात होता. पुढें कांहीं दिवसांनीं, अयोध्येजवळ अशोकवन होतें तेथें राम सीतेसह वास्तव्य करीत असतां त्यास सीता आपन्नसत्त्वा असल्याचें आढळून आलें. पुढें रामानें तुझी काय इच्छा आहे असें सीतेस विचारलें असतां मला भागीरथींत स्नान करून वनविहार करावेसे वाटतात असें तिनें सांगितलें. रामानें बरें आहे म्हणून तो आपल्या मित्रमंडळींत बसण्यास गेला. तेथें त्याला भद्र नांवाच्या मित्राकडून सीतेविषयीं जनापवाद कळला. तेव्हां त्यानें लक्ष्मणाकडून वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सीतेस सोडून दिलें. पुढें वाल्मीकि सीतेस आश्रमांत घेऊन गेला. तेथें तिला दोन पुत्र झाले. ते वाल्मीकीनें पाळले, व त्यांस क्षत्रियास योग्य असें शिक्षण दिलें. रामानें सीतेची सुवर्णप्रतिमा करून अश्व-

मेधयज्ञ आरंभिला. वाल्मीकि कुशलवांसह तेथें गेला, व त्या मुलांकडून त्यांनीं तेथें जमलेल्या सर्व मंडळींसह रामास रामायण ऐकविलें. त्यामुळें रामास कुश व लव आपले पुत्र आहेत असें समजलें. पुढें रामानें वाल्मीकीस सांगितलें की सीतेनें येथें येऊन आपण शुद्ध आहों अशी पौरजानपदांची खात्री करून दिली तर मी तिचा स्वीकार करण्यास तयार आहें. नंतर वाल्मीकि सीतेस घेऊन आला व त्यानें सीतेच्या शुद्धतेविषयीं आपण स्वतःही पुष्कळ सांगितलें. नंतर सीतेनें मीं जर मनानेंही रामावांचून दुसऱ्याचें चिंतन केलें नसेल तर या भूदेवीनें आपल्या उदरांत मला स्थान द्यावें असें म्हटलें.त्याबरोबर भूतलांतून दिव्य सिंहासन आलें. त्यावर सीतादेवीस घेऊन भूदेवी अदृश्य झाली. रामास फार शोक झाला. पुढें रामानें कुशलवांस भरताच्या संमतीनें राज्याभिषेक करून आपलें अवतारकृत्य संपविलें. या रामायणांतील कथानकावरून वाचकांच्या ध्यानांत येईल की, ऋष्यशृंगाचें सत्र व तेथें वसिष्ठादि मंडळींचें गमन, राज्याभिषेकानंतर लगेच सीतात्याग, जृंभकास्त्रप्राप्ति, रामाचा पंचवटींतील प्रवेश, लवचंद्रकेतूंचें युद्ध, सीतेची पुनःप्राप्ति, या सर्व गोष्टी कवीनें नवीन रचल्या आहेत. मुळांत सीतापवाद दुर्मुखानें सांगितला नसून मित्रांनीं सांगितला आहे. याप्रमाणें कवीनें मूळ संविधानकांत बरेच फरक केले आहेत आणि त्याचें कारण रामाला कोणत्याही प्रकारें न्यूनता न येतां त्याचें उदात्तचरित लोकांस आदर्शभूत व्हावें हेंच होय. परंतु या फेरफारांमुळें कांहीं घोटाळे होतात कीं काय, संविधानक सदोष होतें कीं काय, हें आतां आपण पाहूं.

उत्तररामचरितांतील संविधानकाचा विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल की या नाटकांतील कथानकाचा आरंभ लोकापवादास्तव होणाऱ्या सीतात्यागावर झाला असून त्याची समाप्ति निष्कलंक सीतेच्या प्राप्तीवर झाली आहे. या नाटकाचें अंतिम ध्येय, सीतेविषयीं उद्भवलेल्या लोकापवादाचा निरास करून ती पवित्राचरणी आहे अशी सर्वांची खात्री करावयाची व मग तिचा रामाकडून स्वीकार करावयाचा हें आहे. पौरजानपदांची ही खात्री नाटककार कवीनें विविध युक्त उपायांनीं नाटकांत करून दाखवावयास पाहिजे. कारण ती गोष्ट नाटकांत महत्त्वाची आहे. तिच्याकरतांच नाटकरचना आहे. परंतु प्रस्तुत नाटकांत ही गोष्ट कवीनें गंगा व पृथिवी यांच्या पड्यांतील साक्षीवरून व अरुंधतीच्या सांगण्यावरूनच भागविली आहे. सर्व पौरजानपदांत प्रसृत झालेल्या या सीतापवादाच्या परिहाराला यापेक्षां विशेष पुरावा द्यावयास पाहिजे होता. रामायणांत ही खात्री करण्याकरतां वाल्मीकिमहर्षींनें सीता पवित्र आहे असें शपथेवर सांगितलें आहे व हें माझें म्हणणें असत्य असेल तर माझी आजपर्यंतची तपश्चर्या वगैरे नष्ट होईल, इ. इ. शपथा घेतल्या आहेत. हा पुरावा भवभूतीच्या भूदेवी व भागीरथी यांच्या सांगण्यापेक्षां विशेष प्रबल आहे. कारण वाल्मीकीला ब्रह्मदेवाच्या वरानें रामचरितासंबंधानें सांगोपांग माहिती

झाली होती. त्याला त्यासंबंधानें दिव्य दृष्टि प्राप्त झाली होती. तेव्हां अशा अधिकारी मनुष्यानें सीतेची पवित्रता आपल्या प्रतिज्ञावाक्यानें सिद्ध करणें ही गोष्ट सीताशुद्धीला महत्त्वाची आहे. भवभूतीनें गंगा, पृथ्वी व अरुंधती यांजकडून ती गोष्ट केली आहे, ती तितकी जोरदार वठत नाहीं. कवीनें प्रस्तावनेंत नटाच्या तोंडीं 'देव्यामपि हि वैदेह्यां सापवादो यतो जनः । रक्षोगृहे स्थितिर्मूलमग्निशुद्धौ त्वनिश्चयः ॥ अशी उक्ति घातली आहे. तेव्हां जेथें लोकांचा अग्निशुद्धीवर विश्वास बसत नाहीं, त्या दुर्जनांचा या स्त्रीवर्गाच्या सांगण्यावर किती विश्वास बसेल हा प्रश्नच आहे. ह्या स्त्रिया देवता आहेत, सदाचारणी आहेत, सत्यभाषणी आहेत व पुरुषवर्गापेक्षां स्त्रीवर्गाच्या उक्तीला विशेष महत्त्व असतें, ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. परंतु सीताशुद्धीची खात्री पटविण्याला यांच्यापेक्षां वाल्मीकीची प्रतिज्ञाच जास्त परिणामकारक झाली असती. कारण त्याला ब्रह्मदेवाच्या वरानें रामचरित्रासंबंधानें दिव्यदृष्टि प्राप्त झालेली आहे असें सर्वांस माहीत होतें. शिवाय सीताशुद्धि यापेक्षां जास्त पुरावे कल्पून कवीनें दाखवावयास पाहिजे होती. असो. ही किरकोळ गोष्ट आहे. परंतु आमच्या मतें संविधानकासंबंधानें कवीच्या हातून दुसरा एक विशेष प्रमाद झाला आहे, तो असा की, नाटकांतील कथानकाचा आरंभ रामास राज्याभिषेक झाल्यावर आठपंधरा दिवसांतच झाला आहे, हें या नाटकांतील प्रस्तावनेवरून अगदीं उघड होत आहे. रावणवधानंतर रामास राज्याभिषेक किती दिवसांनीं झाला याचा खुलासा या नाटकांत नाहीं, तेव्हां तो आपण रामायणाप्रमाणें आहे हें घेऊन चाललें पाहिजे. रामायणावरून रावणवधानंतर आठपंधरा दिवसांतच रामास राज्याभिषेक झाला असावा असें अनुमान होतें. कारण रावणवधानंतर रामानें कोठेंही वेळ न मोडतां तो अयोध्येस आला आहे व तेथें आल्यावर लगेंच त्यास राज्याभिषेक झाला आहे. लंकेंतून अयोध्येस येण्यास काय वेळ लागला तेवढाच काय तो रावणवध व रामराज्याभिषेक यांत काळ गेला. अर्थात् रावणवधानंतर पंधरा दिवसांनीं किंवा तीन वारांनीं रामास राज्याभिषेक झाला. राज्याभिषेक झाल्यावर रामाचें सभाजन करण्याकरतां आलेली आप्तेष्ट मंडळी आठ पंधरा दिवसांत परत गेली हें याच नाटकावरून सिद्ध होत आहे. ही आप्तेष्ट मंडळी गेल्यामुळें विमनस्क झालेल्या सीतेच्या शान्तवनाकरतां राम तिच्या महालांत गेला आहे. म्हणजे ही गोष्ट रावणवधानंतर फार तर महिना दोन महिन्यांच्या आंत घडली असावी. या रामाच्या भेटीच्या वेळीं कवि सीतादेवीचा गर्भ परिपूर्ण झाल्याचें, म्हणजे तिला नवमास झाल्याचें, स्पष्ट सुचवीत आहे. एवढेंच नव्हे तर या भेटीनंतर पुढें दुसरे दिवशीं म्हणजे लक्ष्मण तिला वनांत टाकून गेल्यावर ती प्रसूत झाली आहे असें सातव्या अंकांतील कथानकावरून सिद्ध होत आहे. कवीला जो करुणरस वर्णन करावयाचा आहे त्याला सीतेची ही पूर्णगर्भावस्था अनुकूल आहे. परंतु यामुळें लोकापवादास भलत्याच रीतीनें

दुजोरा मिळत आहे हें कवीच्या ध्यानांत आलें नाहीं. कारण अशा रीतीच्या वर्णनानें सीता ही लंकेंतून येऊन दोन महिने झाले नाहींत तोंच नवमासपरिपूर्ण गर्भवती आहे असें वर्णन केल्यासारखें होत आहे. तेव्हां कवीची ही मोठी चूक आहे. बरें आतां आपण अशी कल्पना करूं की आपन्नसत्त्वा शकुंतला पाहून दुष्यंताच्या मनांत जशी शंका उत्पन्न झाली तशीच शंका सीतेविषयीं पौरजानपदांच्या मनांत उत्पन्न झाली आहे, असेंच कवीस सुचवावयाचें आहे, तर तेंही बरोबर नाहीं. कारण पुढें मग या शंकेचा निरास होणें अशक्य आहे. कारण सीताशुद्धीच्या कारणाची कितीही परंपरा लाविली तरी या प्रत्यक्ष अनुभवाचा निरास कशानें होणार ? व तो जर न होईल तर राम व सीतादेवी यांच्या उज्ज्वल कीर्तीवर या कवीकडून वेडेपणामुळें मोठाच घाला घातल्यासारखें होणार आहे. मूळ रामायणांत राज्याभिषेक झाल्यावर सर्व मंडळी परत गेल्यावर राम व सीता यांनीं अयोध्येसमीप असणाऱ्या अशोकवनिकेंत विविध विलास केले व नंतर सीतादेवी आपन्नसत्वा झाली असें सयुक्तिक वर्णन केलें आहे. परंतु तो कथाभाग गाळून राज्याभिषेकानंतर सीतादेवीस पूर्णगर्भवती म्हणून वर्णिल्यामुळें हा घोटाळा झाला आहे, व या नाटकाचें मुख्य ध्येय जें सीताशुद्धि करून दाखवावयाची त्यास या वर्णनानें मोठा बाध येत असल्यामुळें हा या नाटकांत 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' अशांतला प्रकार झाला आहे.

येथें प्रसंग आला आहे म्हणून दुसऱ्या एका मुद्याचें विवेचन करूं. वस्तुतः या मुद्याचा या नाटकांत विशेष संबंध नाहीं. तथापि तो वाचकापुढें ठेवण्यासारखा आहे म्हणून लिहित आहों. कांहीं विद्वान लोक व बऱ्याच स्त्रिया यांचा रामावर असा आक्षेप आहे की त्यानें स्वताची खात्री असतांना लोकापवादास्तव सीतात्याग केला ही गोष्ट युक्त केली नाहीं. हा दोषारोप कोणासही पटण्यासारखा आहे. परंतु रामायणांतील कथाभागाचें अवलोकन केलें तर राम निर्दोष आहे असें दिसून येतें. रामायणांत राम एके दिवशीं मित्रमंडळींत बसला असतां भद्र नांवाच्या त्याच्या मित्राकडून त्याला सीतेविषयीं पुढें दिल्याप्रमाणें जनापवाद समजतो. भद्र म्हणतो, "कीदृशं हृदये तस्य सीतासंयोगजं सुखम् । अङ्कमारोप्य तु पुरा रावणेन बलाद्धृताम् । लंकामपि पुरा नीतामशोकवनिकागताम् । रक्षसां वशमापन्नां कथं रामो न कुत्सति । अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति । यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते । एवं बहुविधा वाचो वदंति पुरवासिनः । नगरेषु च सर्वेषु राजन् जनपदेषु च ॥" असा जनापवाद आहे. यावरून सीताशुद्धतेविषयीं लोकांची खात्री नव्हती हें उघड आहे. रामाची तिच्या शुद्धतेविषयीं खात्री होती. म्हणून त्यानें तिला वानप्रस्थधर्मानें राहण्याकरतां भगवान् वाल्मीकीच्या पवित्र आश्रमांत पोचती केली. सीता धर्मशील व वनश्री-

मध्यें रमणारी असल्यामुळें रामानें अशी योजना केली. यांत लोकापवाद टळला व सीतेलाही वाईट रीतीनें वागविलें नाहीं. लोकमताला मान देऊन यापेक्षां सीतेविषयीं त्याला चांगलें काय करतां आलें असतें ? रामाचें व्यक्तिदृष्टीनें कसेंही मत असलें तरी नृपति या दृष्टीनें सर्व समाजास योग्य वळण देण्याचें कर्तव्य फार महत्त्वाचें होतें. व सीतेस आपण घरीं ठेविली तर 'अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति' । असें जें वर म्हटलें आहे त्याचा त्याला विशेष विचार कर्तव्य होता. व त्या विचाराला जागून त्यानें सीतेस वाल्मीकीच्या आश्रमांत सोडिली. रामानें सीतेस अरण्यांत टाकिली हें कवीचें वर्णन आहे; ती वस्तुस्थिति नव्हे. त्याला अरण्यांत टाकून सीतेचा घातच करावयाचा असता तर वाटेल त्या निर्जन प्रदेशीं टाकतां आलें असतें. तसें न करतां वाल्मीकीच्या आश्रमापाशीं तिला सोडिली यावरूनच सीतेनें कर्तव्यतत्परतेनें तेथें दिवस काढावे, पुढें ती प्रसूत झाली म्हणजे तिच्या संततीवरून व वाल्मीकीला जो तिजविषयीं अनुभव येईल तो त्यानें लोकांस सांगितल्यावर त्यावरून लोकांची समजूत होईल व आपणांस तिचा स्वीकार करतां येईल अशा भावनेनेंच त्यानें ही योजना केली असावी. तात्पर्य, सीतेचा त्याग कांहीं कालपर्यंत, व तोहि जेथें तिचे हाल होणार नाहींत अशा स्थळीं केला, या गोष्टींचा विचार केला म्हणजे रामास कोणी विशेष नांवें ठेवणार नाहींत असें आम्हांस वाटतें. असो. आतां आपण प्रस्तुत विषयाकडे वळूं.

दुसरा दोष असा वाटतो की कवीनें जृंभकास्त्रांचा या संविधानकांत जो वरचेवर उल्लेख केला आहे त्याचें प्रयोजन काय हें कळत नाहीं. तिसऱ्या व चवथ्या अंकावांचून प्रत्येक अंकांत जृंभकास्त्रांचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून असें वाटतें की हीं अस्त्रें पुढें या संविधानकांत कांहीं महत्त्वाचा उलगडा करून दाखवितील. शाकुंतलांत अंगुलीयकानें जसें महत्त्वाचें कार्य केलें आहे, तसें हीं जृंभकास्त्रेंही कांहींतरी महत्त्वाचें कार्य करून दाखवितील. परंतु अशा रीतीनें पाहूं लागावें तों त्यांचा संविधानकाला कांहीं विशेष उपयोग असल्याचें दिसून येत नाहीं. रामचंद्राच्या वरावरून जृंभकास्त्राचा उपयोग एवढाच की कुश व लव हे सीतेचे मुलगे आहेत असें सिद्ध करावयाचें. परंतु कुश व लव हे सीतेचे मुलगे नव्हेत असा वाद आहे कोठें ? तो रामायणांत नाहीं व नाटकांतही नाहीं तेव्हां ज्याबद्दल शंका नाहीं त्या शंकेच्या निवृत्तीबद्दल एवढा खटाटोप कशाला ? दुष्यंताला शकुंतलेच्या विवाहाचीच शंका, तेव्हां तिच्या गर्भाविषयींही शंका येणें साहजिकच आहे. तेव्हां त्या शंकेच्या निवारणार्थ 'पुत्रमेवंगुणोपेतं चक्रवर्तिनमाप्नुहि' 'सर्वथा चक्रवर्तिनं पुत्रमाप्नुहि' हा प्रथमांकांतील वर व सातव्या अंकांतील रक्षाकरंडकल्पना हीं फार उपयुक्त आहेत. आईबापांवांचून इतरांनीं तो रक्षाकरंड उचलला तर तो सर्प होऊन चावतो, व हें त्याचें सामर्थ्य आम्हीं पुष्कळ वेळां अनुभविलें आहे, असें तापसीकडून तेथें कवीनें

स्पष्ट वदविलें आहे. तेव्हां या दोन प्रमाणांनीं हा शकुंतलेचा पुत्र आपलाच होय असें निःसंशय रीतीनें राजास समजण्यास हरकत नाहीं. तेव्हां तो सर्व भाग उपयुक्त आहे. परंतु प्रस्तुत जृंभकास्त्रांचा असा उपयोग दाखवितां येत नाहीं. कारण जृंभकास्त्रें सीतेच्या संततीला लाभतील (सर्वथेदानीं त्वत्प्रसूतिमुपस्थास्यन्ति) असा रामाचा अनुपयुक्त अर्धवट वर आहे. वाद सीतेच्या चारित्र्याचा. परंतु सीतेचें चारित्र्य शुद्ध वठविण्यास या अस्त्रांचा कांहींच उपयोग नाहीं. कदाचित् कवीच्या मनांत हीं अस्त्रें, ही संतति रामाची आहे हें सिद्ध करण्याकरतांच उपयुक्त करावयाचीं असतील व कवीचा मूळचा पाठ 'मत्प्रसूतिं' असाहि असेल. पाठीमागून कोणी तरी एखाद्यानें सीतेविषयींचा विशेष प्रेमविकास दाखविण्याकरतां 'त्वत्प्रसूतिं' असें केलें असेल. अशी कांहीं लोकांस शंका येण्याचा संभव आहे. परंतु कोणत्याही पुस्तकांत तसा पाठ आढळत नाहीं. व भवभूतीच्या हातून प्रेमविकास वर्णन करण्यांत असा अव्यवस्थितपणा होणें संभवनीय आहे म्हणून आम्हीं हा प्रचलित पाठ भवभूतीचाच आहे असें धरून वरील टीका केली आहे. तसेंच सीताशुद्धि प्रस्थापित करण्यास वस्तुतः वाल्मीकि हा युक्त होता. कारण ब्रह्मदेवानें त्यांस 'अव्याहतज्योतिरार्षं ते प्रतिभाचक्षुः' असें म्हटलें आहे, त्यावरून वस्तुस्वरूपज्ञानाविषयीं त्याचा अधिकार सर्वांत विशेष. त्याच्या तोंडीं सीताशुद्धि घातली असती तर विशेष सयुक्तिक झाली असती. त्याला सोडून अरुंधतीच्या मुखीं सीताशुद्धि घातली हें विशेष युक्त नव्हे. तसेंच सीता रामास अरुंधतीनें अर्पण केली असतां राम तिचें सांत्वन करीत नाहीं, किंवा विनयानें आपलें सदोषत्व दाखवीत नाहीं, एवढेंच नव्हे तर तिच्याशीं एक अक्षरसुद्धां बोलत नाहीं,हेंहि चमत्कारिकच आहे. याप्रमाणें संविधानकांत दोष वाटतात.

तिसरा दोष आम्हांस असा वाटतो कीं या कवीनें दृश्य काव्यासंबंधानें जे नियम पाळावयास पाहिजेत ते पाळले नाहींत. काव्याचें दोन प्रकार आहेत. एक दृश्य व दुसरें श्रव्य. नाटकें, प्रकरणें वगैरे सर्व दृश्य काव्यांत येतात. रघुवंश-कादंबर्यादि श्रव्यांत मोडतात. श्रव्यकाव्यांत कवीनें आपल्या कल्पनाशक्तीस पूर्ण स्वातंत्र्य देऊन रचनांतरिक्षांत हव्या तशा भराऱ्या मारल्या तरी चालतात. परंतु दृश्यकाव्यांत कल्पनाशक्तीला तसें स्वातंत्र्य देतां येत नाहीं. तेथें कवि प्रेक्षकांच्या अवलोकनशक्तिमर्यादेला बांधला गेलेला असतो. म्हणजे ज्या स्थळांचें वगैरे वर्णन करावयाचें तें असें केलें पाहिजे की तें प्रेक्षकास रंगभूमीवरून अवगत होईल. तें नुसतें कल्पनारम्य असतां उपयोगी नाहीं. कारण ज्या स्थळांचें वर्णन वगैरे एखादें पात्र करीत असेल तें स्थळ प्रत्यक्ष पाहूनच तें पात्र वर्णन करीत आहे असें प्रेक्षकांस वाटलें पाहिजे, व असें वाटलें म्हणजेच तादात्म्यवृत्तीनें त्याला त्या रसाचा अथवा स्थितीचा अनुभव घेतां येतो. रंगभूमीवर दिसण्यास अशक्य असें पदार्थवर्णन नटांच्या तोंडून वदविण्यांत अर्थ नसतो. म्हणूनच नाट्यशास्त्रकारांनीं रंगभूमीवर घडण्यास

अशक्य अशा युद्ध, मृत्यु वगैरे गोष्टी वर्ज्य कराव्या म्हणून नियम केले आहेत.
परंतु भवभूतीनें याकडे विशेष लक्ष दिलेलें नाहीं. कारण तो शंबूकवध व लवाचें
सैनिकांशीं युद्ध, ह्या गोष्टी रंगभूमीवरच दाखवीत आहे. वस्तुतः त्या पडद्यांत
घडत आहेत असें दाखवावयास पाहिजे. तसेंच वर्णनानें रंगभूमीवर दाखविण्यास
नड पडेल अशा रीतीचें वर्णन, केवळ वर्णनाच्या मोहास पडून व शब्दचमत्कृति
दाखविण्याचे हौसेनेंही केलेलें बरेंच ठिकाणीं दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, शंबूकाच्या
तोंडीं घातलेलें वनश्रीचें वर्णन, जृंभकास्त्रांच्या प्रयोगाच्या वेळचें वर्णन, व
वासंतीचें 'कण्डूलद्विपगण्ड' या श्लोकानें केलेलें मध्यान्हकालचें वर्णन, ह्या गोष्टी
रंगभूमीवर दाखवितां येतील कशा ? तें सर्व कल्पनेच्या भरारीनें श्रोतृवर्गास कसें
आनंदित करतां येईल अशा गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवून केलें आहे. त्यामुळें तें
दृश्य काव्याच्या दृष्टीनें थोडेंसें गौण वाटत आहे. श्रव्यकाव्याच्या दृष्टीनें तें अनुपम
होईल यांत संशय नाहीं. परंतु दृश्य काव्यास युक्त होईल कीं नाहीं हा विचारार्ह
प्रश्न आहे. तेव्हां आमच्या मतें ही थोडीशी कवीची प्रसंगानभिज्ञताच होय.

चवथा दोष रसासंबंधानें थोडासा वाटतो, त्याचें विवेचन आतां करूं. या
नाटकांत प्रधान रस करुण व वीर आहेत हें त्यांतील वर्णनावरून कोणासही दिसून
येईल. या दोन रसांत करुण रस उत्तम वठला आहे. याचें आम्ही पुढें गुणविवे-
चनांत स्पष्ट विवेचन करूं. सध्यां येथें या नाटकांतील वीररसासंबंधानें थोडासा
विचार कर्तव्य आहे. त्याच्यापूर्वी प्रथम थोडीशी रसासंबंधानें माहिती दिली
पाहिजे. म्हणजे आमच्या म्हणण्याचें रहस्य कळेल. प्रत्येकाच्या अंतःकरणांत
ईश्वरानें प्रेम, हास (चमत्कृतीच्या दर्शनानें अंतःकरणाचा जो विकास होतो तो),
शोक, क्रोध, उत्साह इत्यादि वृत्ति अथवा धर्म ठेविले आहेत. हे धर्म नेहमीं
अनुद्भूत रूपानें असतात. त्यांचा विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांनीं
उद्भव (विकास) झाला असतां त्या विकासास क्रमानें शृंगार, हास्य, करुण, रौद्र,
वीर इ. असें म्हणतात. विभाव म्हणजे रसोत्पत्ति करणारा (अंतःकरणांतील ते ते
धर्म विकसित करणारा). याचे आलंबन व उद्दीपन असे दोन प्रकार आहेत.
ज्यामुळें अंतःकरणाचा धर्म जागृत होतो तो आलंबनविभाव; उदा. शृंगाराचा
आलंबनविभाव नायिका होय. ज्यानें अंतःकरणांतील जागृत झालेले धर्म
उद्दीपित होतात ते उद्दीपनविभाग होत. शृंगारांत चंद्र, दक्षिणानिल,
उद्यान वगैरे उद्दीपनविभाव होत. रसोत्पत्ति झाली असतां तिचे परिणाम म्हणून
शरीरांत जे व्यापार सुरू होतात त्यांस अनुभाव म्हणतात. रसानुभव करून
देण्यास जे सारखे उपयोगीं पडतात त्यांस व्यभिचारिभाव म्हणतात. म्हणजे
अंतःकरणांतील प्रेमादि वृत्ति जागृत झाली असतां असूया, शंका, आलस्य वगैरे
ज्या कांहीं वृत्ति उत्पन्न होतात व रसाची जाणीव सतत ठेवतात त्यांस व्यभि-

चारिभाव म्हणतात. तात्पर्य विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांनीं अंतःकरणांत वासनारूपानें (सूक्ष्म रूपानें) असणाऱ्या प्रेमादि वृत्ति पूर्ण विकसित झाल्या म्हणजे त्याला रस म्हणतात. अनुचित प्रकारांनीं हा विकास झाल्याचें वर्णन केलें तर तेथें वस्तुतः विकास होत नसल्यामुळें त्यास रसाभास म्हणतात. विजातीय-गुणधर्मीय स्त्रीपुरुषांचें प्रेम वर्णिलें तर तो शृंगार नव्हे, शृंगाराभास होय. रावणाचें सीतेच्या ठिकाणच्या प्रेमाचें वर्णन अथवा शूर्पणखेचें रामावर असलेल्या प्रेमाचें वर्णन हे शृंगाराभास होत. एवढा विचार लक्षांत ठेविला म्हणजे प्रस्तुत नाटकांतील वीररस हा वीररस आहे कीं वीररसाभास आहे याचा उलगडा करण्यास बरें पडेल. वीररसाचे आलंबन-विभाव वास्तविक परस्परशत्रु असणाऱ्या व्यक्ति होत. रामरावण, भीष्मदुर्योधन हे वीररसाचे आलंबन-विभाव होत. कारण हे परस्परशत्रु असल्यामुळें त्यांच्यांत परस्परविनाशाविषयीं उत्साह असणें हें स्वाभाविक आहे. वीररसांचा स्थायिभाव उत्साह आहे. तेव्हां या स्थायिभावाचे उत्पादक शत्रुच होत असल्यामुळें भीमदुर्योधन आलंबनविभाव होणें युक्त आहे. वीररसाचा उद्दीपनविभाव परस्परांचीं भाषणें अथवा कृति ह्या होत, अनुभाव युद्धक्रिया वगैरे होत, व व्यभिचारिभाव धैर्य, गर्व इत्यादि होत. या नाटकांतील वीररसाचे अवलंबनविभाव चन्द्रकेतुलव होत. उद्दीपनविभाव 'योऽयमश्वःपताकेय-मथवा वीरघोषणा । सप्तलोकैकवीरस्य दशकण्ठकुलद्विषः' । इत्यादि योध्यांचीं भाषणें होत. अनुभाव व परस्परयुद्ध वगैरे, व व्यभिचारिभाव परस्परांचें धैर्य व गर्व इत्यादि होत. परंतु यांतील चंद्रकेतु व लव हे जे वीररसाचे आलंबनविभाव ते युक्त होत नाहींत. कारण त्याच्यांतील वैर बद्धमूल झालेलें नाहीं. तें प्रथमतःच येथें वीरघोषणेनें उत्पन्न होत आहे. प्रत्यक्ष भेटींत तर तारामैत्रक म्हणून म्हणा अथवा कांहीं एक आंतरहेतूनें म्हणा, परस्परांचीं परस्परांविषयीं प्रेमबुद्धिच जागृत होत आहे. ही वात्सल्यमनोवृत्ति वीररसाला पोषक नसते. तेव्हां अशा आलंबनविभावापासून उत्पन्न झालेला वीररस हा वस्तुतः वीररस नसून वीररसाभासच होय, व अशा रसाभासाच्या वर्णनाकरतां कवीनें दीड अंक खर्ची घालणें युक्त नव्हे. बरें हा कथाभाग मूळ रामायणांत आलेला आहे म्हणून घातला आहे असें म्हणावें तर तसेंहि नाहीं. हा कविकल्पित आहे. तो जृंभकास्त्रांचा उपयोग करून दाखविण्याकरतां कवीनें कल्पिला आहे. परंतु हा जृंभकास्त्रांचा कथाभागच प्रस्तुत संविधानकांत निरुपयुक्त आहे असें आम्हीं वर दाखविलें असल्यामुळें त्याकरतां केलेला हा युद्धवर्णनविस्तार अनुपयुक्तच आहे, व शिवाय रंगभूमीवर युद्धवर्णन करून दाखविणें, असंभावी जृंभकास्त्रांचें वर्णन करणें, हें दृश्य काव्यास वैगुण्य आणणारें आहे हें वर दाखविलेंच आहे. सीताशुद्धीच्या विषयीं तर हा कथाभाग मुळींच उपयोगीं पडत नाहीं. तात्पर्य, या युद्धवर्णनांतील वीररस हा रसाभास

होत असल्यामुळें तितका सरस होत नाहीं. कल्पित जृंभकास्त्राचा संविधानकास उपयोग नाहीं. सीताशुद्धीस या वर्णनाचा कांहीं उपयोग आहे म्हणून म्हणावें तर तोही नाहीं. कुश आणि लव हे सीतेचे पुत्र आहेत हें सिद्ध करण्याकरतां हें वर्णन आहे म्हणावें तर तो वादच नाहीं. कवीनें आपलें युद्धवर्णनचातुर्य दाखविण्याकरतां हा भाग घातला आहे म्हणावें तर दृश्य काव्याच्या दृष्टीनें तो अनुपयुक्त व फार विस्तृत झाला आहे. तात्पर्य, हा युद्धवर्णनाचा दीड अंक संविधानकाच्या दृष्टीनें व इतर वर दिलेल्या कारणांनीं युक्त होत नाहीं. कथानकास निरुपयोगी असें अप्रस्तुत वर्णन कालिदास कधींहि विस्तारानें करावयाचा नाहीं.

दुसऱ्या अंकांतहि संविधानकासंबंधानें एक दोष आढळतो. त्या अंकाचें पर्यालोचन केलें तर विष्कंभकांत जो कथाभाग ग्रथित झालेला आहे त्या मानानें मुख्य प्रवेशांत कांहींच नाहीं. त्यामुळें विष्कंभक हाच मुख्य भाग होऊन रामप्रवेशादि भाग गौण होऊं पहात आहे. कारण राम प्रवेश करून फक्त थोडेंसें वनश्रीचें वर्णन करतो आणि जातो एवढाच कथाभाग मुख्य प्रवेशांत आहे. विष्कंभकांत मात्र १ कुशलवांची वाल्मीकिऋषीस प्राप्ति, २ त्या ऋषीचा रामायण रचण्याचा उपक्रम, ३ रामचंद्रानें केलेल्या सीतात्यागाची हकीकत, ४ रामाचा अश्वमेधोपक्रम, ५ वसिष्ठादि ऋषींचें व अरुंधती-कौसल्यादि स्त्रियांचें वाल्मीकीच्या आश्रमांत आगमन, व शंबूकवधाकरतां रामाचें पंचवटींत आगमन इतक्या गोष्टी उल्लेखिल्या आहेत. यांपैकीं फक्त सहावा कथाभाग या अंकाला उपयुक्त आहे. बाकीचे कथांश हे चौथ्या अंकापासून उपयुक्त आहेत. त्यांपैकीं दुसरा, चवथा व पांचवा हे कथांश चौथ्या अंकाच्या विष्कंभांत सहज घालतां आले असते. पहिला, तिसरा व सहावा हे कथांश तिसऱ्या अंकाच्या विष्कंभांत घालून प्रवेश केला असता व अगस्त्याश्रमप्रवेश टाळून 'सीतादेव्याः' या श्लोकानें वासंतीचा प्रवेश केला असता तर संविधानकाला कोणतेंही वैगुण्य न येतां सर्व सुसंगत झालें असतें. म्हणजे दुसरा अंक अजिबात गाळण्यासारखा आहे. दंडकारण्य अथवा पंचवटी यांचें जें वर्णन कवीनें केलें आहे त्याकरतां एक अंक खर्ची घालण्यास नको होता. पांचव्या अंकाचीहि हीच स्थिति आहे हें वर दाखविलें आहेच. तेव्हां दुसरा व पांचवा हे अंक कमी करून आम्हीं सुचविल्याप्रमाणें योजना केली तर संविधानकास कोणतेंही वैगुण्य न येतां पांच अंकीं नाटक आटपशीर झालें असतें. या दोन्ही अंकांतील मजकूर पाहिला असतां त्यांत कथाभाग मुळींच नसून केवळ वर्णनात्मक ते आहेत. दृश्य काव्याला त्याचें इतकें महत्त्व नाहीं. या गोष्टीवरून असें सिद्ध होतें की या कवीला कालिदासासारखें संक्षेप कोठें करावा, विस्तार कशाचा करावा, याचें औचित्य माहीत नाहीं, अथवा शूद्रकासारखें संविधानकरचनाचातुर्यही नाहीं.

आतां पांचवा दोष शब्दरचनेसंबंधानें. याची शब्दांची धाटणी पाहिली तर ती दीर्घसमासयुक्त बोजड शब्द, अनुपयुक्त उपसर्गप्रयोग, अप्रयुक्त शब्दप्रयोग, अरूढार्थ शब्दप्रयोग व क्लिष्ट रचना इत्यादि गोष्टींनीं कोठें कोठें सदोष दिसते. क्वचित् व्याकरणदोषही आढळतात. उत्तररामचरितांत वर दिलेले दोष कमी आहेत हें खरें; तथापि ते कवीच्या आंगवळणीं पडले असल्यामुळें कोठेंकोठें तें डोकावतातच. उदाहरणार्थः—'त्वं वह्निर्मुनयो वसिष्ठगृहिणी गंगा च यस्या विदुः। येथें विदुः बद्दल 'विदः' असा प्रयोग व्याकरणरीत्या व साहित्यरीत्या निर्दोष झाला असता. 'परिलघुरयस्कांतशकलः' यांतील 'परि' फुकट आहे. 'तर्जयन्ति कुमारमायुधश्रेणयः' यांतील 'तर्जयन्ति' प्रयोग व्याकरणास धरून नाहीं. 'उपरिशरतुषारं कोऽप्ययं वीरपोतः' येथें 'तुषार' शब्दाचा वृष्टि ह्या अर्थी उपयोग केला आहे. परंतु तो अर्थ रूढ नाहीं. 'अयं हि शिशुरेककः' यांतील क प्रत्ययास विशेष स्वारस्य नाहीं. 'करालकरकंदली' येथील 'कंदली' शब्द वैरस्योत्पादक आहे. 'अयं शैलाघात' या श्लोकांत पयोराशेरोघः' या उपमेवरून कवीला 'अयं' शब्दानें 'सेनौघ' अभिप्रेत आहे असें दिसतें. परंतु तसें पूर्वी पद आलें नसल्यामुळें 'अयं' ह्या शब्दानें तसा अर्थ घेतां येत नाहीं. 'कालज्येष्ठैः' यांतील काल शब्द व्यर्थ होत आहे. 'पुराणो वा जन्मांतरनिबिडबद्धः परिचयः' येथें जन्मांतर हें विशेषण परिचयाचें पुराणत्व दाखवीत असतां फिरून पुराण हें विशेषण व्यर्थ होत आहे. 'पूर्वलूनायां'ऐवजीं लूनपूर्वायां हें व्याकरणदृष्ट्या विशेष स्वीकार्य. 'वयमपि न खल्वेवंप्रायाः' येथें यतिभंग होत आहे. 'तां चाप्येतां' यांतील अपि शब्द फुकट आहे. 'पुटभेदः' याचा नेत्र उघडणें अशा अर्थी प्रयोग अपरिचित आहे. 'ध्वनिश्च मांगल्यमृदंगमांगलः' येथें मांगल्य हें भाववाचक रूप उगींच केलें आहे. 'हृदयं त्वेव जानाति प्रीतियोगं परस्परं' येथें 'परस्परं' हें नाम असतां विशेषणासारखें योजिलें आहे. याप्रमाणें बरेच वाक्यदोष, शब्ददोष, व क्वचित् व्याकरणदोष याच्या कृतींत दाखवितां येतील. आतां हें खरें आहे की सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करूं लागलें तर वाटेल त्या कवीच्या काव्यांतून असे दोष दाखवितां येतील. तेव्हां कोणाहि संबंधानें असे दोष दाखवावयाचे म्हणजे ते सामान्य मर्यादेपेक्षां अधिक असतील तरच दाखविले पाहिजेत. नाहीं तर दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु हा विचार मनांत ठेवूनच या कवीच्या कृतींत हे दोष अधिक आढळतात म्हणून आम्हीं ते दाखविले आहेत, असें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

या कवीसंबंधानें येथपर्यंत जें आम्ही विवेचन केलें आहे त्यावरून पुष्कळांचा असा समज होणें शक्य आहे की, भवभूतीच्या कृतींत आम्हांस कांहींच चांगलें दिसत नाहीं; त्याच्या काव्यांत सर्वत्र आम्हांस दोषच दिसत आहेत. प्राचीन व अर्वाचीन विद्वान ज्या कवीस कालिदासाच्या तोडीचा समजतात; एवढेंच नव्हे

तर कांहीं विद्वान ज्यास कालिदासाहूनहि श्रेष्ठ समजतात, अशा विद्वन्मान्य व्यक्तीसंबंधानें अशा तऱ्हेनें त्याच्या कृतींत दोष दाखविणें म्हणजे त्या विद्वानांपेक्षां आपणांस जास्त समजतें अशी पर्यायानें प्रौढी मारणेंच होय; अथवा आपलें अरसिकत्व व्यक्त करणें होय. परंतु आमची सर्व वाचकवृंदास सविनय विनंति आहे की कोणींहि असा आपला गैरसमज करून घेऊं नये. कारण प्रस्तुतच्या लेखकाच्या मनांत भवभूतीविषयीं पूर्ण आदर असून त्याच्या कृतिहि त्याला प्रिय वाटत आहेत. त्याचे उदात्त विचार त्यास मान्य आहेत. परंतु, हा कवि कालिदासाच्या तोडीचा आहे काय ? त्याचें उत्तररामचरित शाकुंतलाच्या तोडीचें आहे काय ? या दृष्टीनें विचार करूं लागलें असतां कालिदासाच्या अधिकाराचा हा नाहीं एवढेंच आम्हांस दाखवावयाचें आहे, व हीच गोष्ट सिद्ध करण्याकरतां त्याचे दोष वगैरे दाखविले आहेत. हा कवि कालिदासासारखा संक्षेपानें मार्मिक कविता करणारा व निर्दोष संविधानक रचना करणारा नसल्यामुळें उभयांगविकल अशा या कवीची कृति नाट्यशास्त्रकोविदांनीं व साहित्यशास्त्रनिष्णातांनीं कालिदासासारखी मानिली नाहीं तर त्यांत आश्चर्य नाहीं. हा कवि श्रौतमार्गानुयायी धर्मशील पंडित असल्यामुळें त्याजमध्यें एक प्रकारचा अभिमान उत्पन्न झाला असला पाहिजे. व त्यांतच कवित्वशक्ति व नाटकरचनाचातुर्य हींहि त्यास अवगत असल्यामुळें आपला अधिकार कालिदासादि प्राचीनांपेक्षां अधिक आहे अशी त्याची भावना झाली असली पाहिजे. परंतु परीक्षकांनीं तसा मान न दिल्यामुळें 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः' अशा रीतीचे त्यानें उद्गार काढिले असावेत. तात्पर्य, हे उद्गार त्यानें दारिद्र्यामुळें वैतागून काढले नसून प्राचीन कवीसारखा आपणांस मान मिळत नाहीं म्हणून वैतागून काढले आहेत, असें आम्हांस वाटतें, व तें स्पष्ट करण्याकरतां हा इतका विस्तार करावा लागला.

असो. आतां प्राचीन विद्वानांनीं जो भवभूतीस मान दिला आहे—गोवर्धनाचार्य, राजशेखर, उदयसुंदरीकार यांनीं प्रस्तुत कवीची मनःपूर्वक स्तुति केली आहे—त्याचें कारण काय, या कवीच्या कृतींत कोणते विशेष गुण आहेत याचें आतां आपण निरूपण करूं.

भवभूतीच्या कृतींत त्याच्या उदात्त मनोवृत्ति दिसून येतात. विशेषतः ह्या कवीचा स्त्रीवर्गाविषयीं आदर विशेष आहे असें या नाटकांत सीताशुद्धि दाखविण्याकरतां त्यांनीं अरुंधतीचा जो अधिकार दाखविला आहे त्यावरून दिसून येतें. ह्या कवीचें वस्तुनिरीक्षण सूक्ष्म असून तें वर्णन करण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. ह्यास मनोधर्मही सूक्ष्म रीतीनें फार चांगले वर्णन करण्याची कला अवगत होती. ही गोष्ट वर्णन करण्याच्या ओघांत तो जोरानें शिरला असतां जे त्याचे उद्गार निघतात त्यांवरून स्पष्ट होण्यासारखी आहे. तिसऱ्या अंकांत रामाला

व्यथित पाहून सीतेची वृत्ति चंचल झाली असतां तिच्या अंतःकरणाचें वर्णन, तमसा करिते : "तटस्थं नैराश्यादपि च कलुषं विप्रयवशात् वियोगे दीर्घेऽस्मिन् झटिति घटनोत्तम्भितमिव । प्रसन्नं सौजन्यादपि च करुणैर्गाढकरुणं द्रवीभूतं प्रेम्णा तव हृदयमस्मिन् क्षण इव ॥" अशा प्रकारचे श्लोक आमच्या वरील विधानाची सार्थकता दाखवितील. या कवीस परिणतप्रज्ञावस्था प्राप्त झाल्यावर त्यानें उत्तररामचरित नाटक रचिलें असें विद्वानांनीं ठरविलें आहे, व तें युक्तही आहे. या नाटकांत राम, सीता यांच्या ज्या मनोवृत्ति त्यानें दाखविल्या आहेत, जी कौटुंबिक परिस्थिति वर्णन केली आहे, राजपुरुषाचें ध्येय जें दाखविलें आहे, ह्या सर्व गोष्टी फार मनोहर असून उदात्त आहेत. लोकमतास मान देण्याचें इतकें उज्ज्वल स्वरूप जगांतील राजवर्गांत क्वचित्च दृष्टीस पडेल. रामाची प्रजाभक्ति, गुरुजनांविषयीं आदर, कर्तव्याविषयीं निश्चय, व सीतेंवरील प्रेम हे गुण फार मार्मिकपणानें कवीनें दाखविले आहेत. या नाटकांतील करुणरसाची उठावणी तर सर्वांगपरिपूर्ण आहे.प्रथमांकांत अनुरागवती सुशीला, भार्या, प्रेमलवृत्ति सदाचरणी भर्ता, विनयशील व वडील बंधूस पित्यासारखा मान देणारा भ्राता, वत्सलतापरिपूर्ण कौसल्यादि गुरुजन, रघुकुलाभिमानी तपस्वी वसिष्ठासारखा उपदेश इ. इ. गोष्टींनीं श्रीरामचंद्राची कौटुंबिक परिस्थिति सर्वांगपरिपूर्ण सौभाग्यशिखराला पोंचली होती असें कवीनें दाखविलें आहे. ह्या सर्व गोष्टी कवीला पुढें वर्ण्य म्हणून अभिप्रेत जो करुणरस त्याला प्रस्तावरूपानें मोठ्या उज्ज्वल रीतीनें कारण झाल्या आहेत. या पूर्वस्थितीच्या कल्पनेनें मार्मिक वाचकांस पुढील करुणरस विशेष चटकदार वाटतो. अशा रीतीनें कौटुंबिक सुखाचा विकास दाखवून त्या सुखाची जीवनभूत जी नायिका तिचा कुलाभिमानी, प्रजानुरागी, नृपतिवर्गाला आदर्शभूत अशा प्रेमल नायकाकडून स्वतःस अनभिमत परंतु राजकर्तव्यदृष्टीनें अपरिहार्य अशा कारणांनीं त्याग वर्णिला आहे. परंतु या अनिष्टापत्तीमुळें नायक हा अंतर्गूढ घनव्यथेनें क्षीण होत चालला असतां त्याच्या करुण वृत्तीचा परिस्फोट करण्याकरतां ज्या ठिकाणीं स्वप्रेयसीसह विविध विश्रंभविलासांत त्यानें पुष्कळ दिवस घालविले होते, ज्या ठिकाणीं 'न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते' या सरसोक्तीचा त्यानें पूर्ण अनुभव घेतला होता, त्या स्थळीं त्याला कवीनें आणिलें आहे. तेथें आपण प्रेमानें वाढविलेले वृक्ष, आपण लहानपणीं संभाळलेलें परंतु आतां तरुण होऊन स्वप्रेयसीसहवर्तमान क्रीडा करीत असलेले गजराज मयूर वगैरे पशुपक्षी, आपलीं विलासस्थानभूत लतागृहें व त्या वेळाच्या स्निग्ध सुहृदांच्या भेटी इ. इ. गोष्टी घडवून त्या योगानें रामासारख्या गंभीरवृत्ति पुरुषाची करुणावृत्ति हृदयास हालवून टाकण्यासारखी वर्णिली आहे. व हा नायकाचा करुणवृत्तीचा विकास नायिकेस दाखविण्याचा योग गुप्त तऱ्हेनें आणल्यामुळें

विशेषच मौज झाली आहे. त्या योगानें तिचा नायकाविषयींचा कलुषित झालेला भाव पार मावळून जाऊन तिचा त्याविषयींचा अनुरागच दृढ होऊन नायकाच्या आपल्याविषयींच्या शोकानें तीहि शोक करावयास लागत आहे, ही शोक वर्णन करण्याची सीमा होय. या योगानें नायक व नायिका ह्या दोघांच्या प्रेमांचा पूर्ण परिचय वाचकास होतो. सीतादेवी रामाची करुणावस्था पाहून इतकी व्यथित होते की आपल्या बाजूनें बोलणारी जी वासंती तिचा सुद्धां तिला राग येतो. एवढेंच नव्हे तर ती स्वतःससुद्धां आपल्यामुळें रामास दुःख होतें म्हणून धिःकारीत आहे. वाचकहो! यापेक्षां उज्ज्वल प्रेमस्वरूप तें काय असणार!!! याप्रमाणें दोघांकडून म्हणजे नायक व नायिकेकडून शोकवृत्तीच्या संभूतीचें वर्णन केल्यामुळें हां करुणरस पूर्ण निर्दोष वठला आहे. त्याचप्रमाणें या रसाचे विविधोपाधीनें होणारे भेदही या नाटकांत कवीनें मोठ्या कल्पकतेनें दाखविले आहेत. समदुःख सखीजनाचा (वासंतीचा) शोक, पित्याचा (जनकाचा) स्वकन्येविषयींचा शोक, माता भूदेवी हिचा शोक, श्वश्रू कौसल्यादिजन यांचा शोक, तपस्वी अरुंधत्यादिजन यांचा शोक इ. इ. विविध प्रकारचे शोक दाखविले असल्यामुळें 'एको रसः करुण एव निमित्तभेदात् भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान्।' हें जें कवीनें म्हटलें आहे तें पूर्ण तऱ्हेनें पटतें. या श्लोकाचा कांहीं लोक या नाटकांत शृंगार, वीर वगैरे जे रस आहेत ते करुणरसमूलक आहेत, म्हणजे ते करुणरसाचा परिपोष करण्याकरतां दाखविले आहेत म्हणून ते करुणरसात्मकच होत असा अभिप्राय दर्शवितात. परंतु आम्हांस त्यापेक्षां आम्हीं वर दर्शविलेलाच अर्थ सयुक्तिक वाटतो. कवीनें वर्णिलेलें हे दांपत्यप्रेम अत्यंत शुद्ध असल्यामुळें प्रत्येक सच्छील पुरुषास तें आदर्शभूत आहे. प्रपंचसुखाची ती गुरुकिल्ली आहे. हा प्रीतियोग आहे. हें करुणरसाचे उपदेश करणारे करुणोपनिषद् आहे. या उपनिषदाच्या श्रवणाला सच्छील, उदात्तचरणी, एकपत्नीव्रती असा पुरुष अथवा त्याच जातीची स्त्री अधिकारी होय. या उपनिषदांतील करुणरसाचा साक्षात्कार पत्नीवियोगानंतरच अनुभवास येणारा आहे. पुष्कळ लोक या कवीच्या नाटकांतील प्रस्तावनेवरून या कवीच्या देशकालादिकांविषयीं विविध अनुमानें करीत असतात. आमच्या मतें उत्तररामचरित नाटकावरून या कवीविषयीं कांहीं अनुमान करावयाचें असेल तर हेंच की या कवीची प्रेमळ सुशील बायको विनाश पावली होती. हेंच अनुमान निर्दोष होय. त्याशिवाय इतका मार्मिक करुणरस वठावयाचा नाहीं. या नाटकांत शुद्ध करुणरस उत्तम वठल्यामुळें 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' इ. इ. जे प्राचीन कवींचे प्रसंशोद्गार आहेत ते युक्तच आहेत. 'अहं वा भवभूतिर्वा अहमेव न संशयः। उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते' हेंही वर्णन या रसामुळेंच. शाकुंतल नाटकासंबंधानें 'काव्येषु नाटकं रम्यं' हा जो श्लोक आहे तो 'काव्येषु नाटकं रम्यं तत्रो-

त्तरचरित्रकम् । तत्रापि च तृतीयोऽङ्कः तत्र श्लोकचतुष्टयम् ।' असा पाठभेद करून 'एतत्तदेव कदलीवनमध्यवर्ति कांतासखस्य शयनीयशिलातलं ते । अत्र स्थिता तृणमदाद् बहुशो यदेभ्यः सीता ततो हरिणकैर्न विमुच्यते स्म ॥ १ ॥ त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं त्वं कौमुदी नयनयोरमृतं त्वमङ्गे । इत्यादिभिः प्रियशतैरनुरुध्य मुग्धां तामेव शान्तमथवा किमिहोत्तरेण ॥२॥ अयि कठोर यशः किल ते प्रियं किमयशो ननु घोरमतः परम् । किमभवद्विपिने हरिणीदृशः कथय नाथ कथं बत मन्यसे ॥३॥ अस्मिन्नेव लतागृहे त्वमभवस्तन्मार्गदत्तेक्षणः सा हंसैः स्थिरकौतुका चिरमभूद्गोदावरीरोधसि । आयान्त्या परिदुर्मनायितमिव त्वां वीक्ष्य बद्धस्तया कातर्यादरविन्दकुड्मलनिभो मुग्धः प्रणामाञ्जलिः ॥ ४ ॥ हे चार श्लोक दिले तर कांहीं वावगें होणार नाहीं. तात्पर्य, या कवीनें करुणरसाची या नाटकांत फार उत्तम रीतीनें मांडणी केली आहे. यावरून त्याची प्रेमळ व पवित्र मनोवृत्ति स्पष्ट होत आहे. कांहीं कांहीं त्याचीं वस्तु व भावनावर्णनपर पद्येंही फार चांगलीं आहेत, त्यावरून त्याच्या वृत्तींतील गांभीर्य दिसून येतें; उ० लीलोत्खातमृणालकाण्डकवलच्छेदेषु संपादिताः । पुष्यत्पुष्करवासितस्य पयसो गण्डूषसंक्रान्तयः ॥ सेकः शीकरिणा करेण विहितः कामं विरामे पुनः । न स्नेहादनालनालनलिनीपत्रातपत्रं धृतम् ॥ विलुलितमतिपूरैर्बाष्पमानन्दशोकप्रभवमवसृजन्ती तृष्णयोत्तानदीर्घा। स्नपयति हृदयेशं स्नेहनिष्यन्दिनी ते धवलबहलमुग्धा दुग्धकुल्येव दृष्टिः ॥ न किल भवतां स्थानं देव्या गृहेऽभिमतं ततस्तृणमिव वने शून्ये त्यक्ता न चाप्यनुशोचिता । चिरपरिचितास्ते ते भावाः परिद्रवयन्ति मामिदमशरणैरद्याप्येवं प्रसीदत रुद्यते ॥ इ.इ. साधारणपणें तिसऱ्या अंकांतील सर्वच पद्यें चांगलीं आहेत. कोठें कोठें अनुप्रासही चांगले साधले आहेत; उदा. कण्डूलद्विपगण्डपिण्डकषणोत्कम्पने संपातिभिर्घर्मस्रंसितबन्धनैः स्वकुसुमैरर्चन्ति गोदावरीम् । छायापस्किरमाणविष्किरमुखव्याकृष्टकीटत्वचः कूजत्क्लान्तकपोतकुक्कुटकुलाः कूले कुलायद्रुमाः ॥ गुञ्जत्कुञ्जकुटीरकौशिकघटाघूत्कारवत्कीचकस्तम्बाडम्बरमूकमौकुलिकुलः क्रौञ्चावतोऽयं गिरिः. युद्धवर्णनाच्या वेळच्या कांहीं पद्यांतहि अनुप्रास साधले आहेत. याशिवाय आणखीहि या कवीचे गुण दाखवितां येतील. परंतु आतांपर्यंत दाखविलेल्या गुणापुढें ते फिके पडतील व केलेल्या वर्णनानें वाचकांस कवीची योग्य कल्पना होईल म्हणून आतां विस्तार करीत नाहीं.

भामह सौगत कीं वैदिक ?

इसवी सनाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकाच्या सुमारास भामह नांवाचा उत्तम विद्वान् व साहित्यशास्त्रनिष्णात पंडित होऊन गेला. त्यानें साहित्यशास्त्रांतील विषयांचें संक्षेपानें ज्यांत विवेचन केलें आहे, असा काव्यालंकार नांवाचा ग्रंथ आहे, व तो सर्व साहित्यशास्त्रज्ञ पंडितांना मान्य आहे. वररुचीच्या प्राकृत व्याकरणसूत्रावर मनोरमा नांवाची टीका आहे, तीही भामहानेंच केली आहे. परंतु तो भामह व हा काव्यालंकारकार भामह एक होत का भिन्न होत याविषयीं विद्वानांत मतभेद आहेत. याशिवाय छंदःशास्त्रावर याचा एक ग्रंथ असावा. कारण शाकुंतलटीकाकार राघवभट्ट व वृत्तरत्नटीकाकार नारायणभट्ट हे आपल्या ग्रंथांत भामहाच्या नांवानें छंदःशास्त्रांतील कांहीं विषयांचे उतारे उद्धृत करतात. परंतु अद्याप तो ग्रंथ उपलब्ध नाहीं. तेव्हां तो ग्रंथ याच भामहाचा किंवा दुसऱ्या एखाद्या भामहाचा याविषयीं कांहींच निर्णय करतां येत नाहीं.

भामहाच्या काव्यालंकाराचें साधारणपणें निरीक्षण केलें असतां विद्वानांना पुढील गोष्टी उपलब्ध होतात. त्या म्हणजे भामह हा उत्तम वैयाकरण, नैयायिक, मीमांसक, मार्मिक साहित्यशास्त्रज्ञ व रसिक कवि होता. तसेंच त्यानें या ग्रंथांत जे ग्रंथ व ग्रंथकार यांचे उल्लेख केले आहेत[1], त्यांवरून तो बराच प्राचीन असावा हेंही स्पष्ट होत आहे. तसेंच या कवीनें हा ग्रंथ विविध काव्यनाटकें पाहून व त्यांची विचिकित्सा करून स्वतंत्र बुद्धीनें लिहिलेला असावा, असें त्याच्या या ग्रंथांतील उल्लेखावरून प्रतीत होतें.[2] याच्या पूर्वीं साहित्यशास्त्रांत प्रमाणभूत ग्रंथ भरताचा नाट्यशास्त्र हाच असावा. भामहानें प्राचीन साहित्यकोविदांचे उल्लेख

---

१. प्रहेलिका सा ह्युदिता **रामशर्माच्युतोत्तरे** २.१९
त एवोपमादोषाः सप्त **मेधाविनोदिताः** २.४०
उवाच **रत्नाहरणे** चैवं शार्ङ्गधनुर्यथा ३.८
दृष्टं वा सर्वसारूप्यं **राजमित्रे** यथोदितम् २.४५
दिनार्धभाजः परिवेषिणोऽर्कात् (शाखवर्धन)

२. स्वयं कृतैरेव निदर्शनैरियं मया प्रक्लृप्ता खलु वागलंकृतिः ।
गिरामलंकारविधिः सविस्तरः स्वयं विनिश्चित्य धिया मयोदितः ॥
न दूषणायायमुदाहृतो विधिः नचाभिमानेन किमु प्रतीयते ।
अवलोक्य मतानि सत्कवीनां अवगम्य स्वधिया च काव्यलक्ष्म ॥

केले आहेत, परंतु प्रस्तुत त्यांचे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळें त्यांचें स्वरूप कळत नाहीं; तथापि ते या काव्यालंकारांत जितक्या विषयांचा समावेश झाला आहे तितक्या विषयांनीं परिपूरित नसावेत असें वाटतें.

भामह व दंडी यांच्या पौर्वापर्याविषयीं विद्वानांत विवाद आहेत. कांहीं विद्वान् दंडी हा भामहाच्या पूर्वींचा म्हणून समजतात; कांहीं विद्वान् भामह दंडीहून प्राचीन म्हणून मानतात, तर कांहीं विद्वान् भामह व दंडी एककालीन मानतात. आम्हांस प्रस्तुत निबंधांत या विषयाची चर्चा कर्तव्य नाहीं; कारण तो विषय बराच विस्तृत असल्यामुळें स्वतंत्र निबंधाचा विषय होईल. तसेंच भामहाच्या काव्यालंकार ग्रंथांतील विषयांचें विवेचनही प्रस्तुत कर्तव्य नाहीं. कारण तोही बराच विस्तृत विषय आहे. या निबंधांत उत्तम पंडित व साहित्यशास्त्रकुशल भामह हा सौगत होता का वैदिक होता, या विषयाचें थोडेंसें विवेचन करणार आहों. कारण अर्वाचीन कांहीं विद्वानांनीं यासंबंधानें विवेचन करून तो वैदिक होता असें ठरविलें आहे. परंतु आम्हांस या विधानासंबंधानें संशय असल्यामुळें तो बौद्ध कशावरून, तो वैदिक आहे असें म्हणणारे जे विद्वान् त्यांचे मुद्दे काय आहेत, यासंबंधानें थोडीशी चर्चा कर्तव्य आहे. एवढी प्रस्तावना करून आतां मुख्य विषयाची चर्चा सुरू करतों.

भामह बौद्ध होता या विधानाला पुढील प्रमाणें विचारणीय आहेतः—

१ काव्यालंकार ग्रंथाच्या आरंभीं जो मंगलश्लोक आहे तो असा आहे—

"प्रणम्य सार्वं सर्वज्ञं मनोवाक्कायकर्मभिः ।
काव्यालंकार इत्येष यथाबुद्धि विधास्यते ॥"

यांतील सार्वं हें विशेषण व सर्वज्ञं हें नाम बुद्धास उद्देशून आहे. 'सर्वज्ञः सुगतो बुद्धो' असा अमरकोश आहे. 'सार्वं' याची व्युत्पत्ति 'सर्वस्मै हितं' (सर्वांना हितकारक अथवा सर्वांचें हित इच्छिणारा) अशी आहे, व ही व्युत्पत्ति प्रस्तुत ग्रंथकारानें प्रस्तुत ग्रंथांतील सहाव्या परिच्छेदांत 'हितप्रकरणे णं च सर्वशब्दात् प्रयुज्यते' अशी स्पष्ट केली आहे. सर्व जनांच्या कल्याणाविषयीं आदर बाळगणारा बुद्धदेव होय असें सर्व बौद्ध व त्याच्या चरित्राचें परिशीलन करणारे अर्वाचीन विद्वानही मानतात. बौद्ध सांप्रदायिक बुद्धस्तुतींमध्यें सर्वज्ञत्व व दयासिंधुत्व या दोन गोष्टींचा उल्लेख प्रायः असतो. या दृष्टीनें विचार केला म्हणजे 'प्रणम्य सार्वं सर्वज्ञं' हें ग्रंथारंभीं भामहानें केलेलें मंगल बुद्धदेवतेस उद्देशून आहे असें स्पष्ट होतें, व त्यावरून तो बौद्धधर्मी असावा हें सिद्ध होतें.

या काव्यालंकाराच्या शेवटच्या श्लोकांत आपला निर्देश कवीनें केला आहे. तेथें 'ग्रथितं रक्रिलगोमिसूनुनेदम्' असें म्हटलें आहे. यावरून भामह हा 'रक्रिल-गोमाचा' मुलगा आहे हें स्पष्ट होत आहे. बौद्धवर्गांत सोमिल, राहुल, पोत्तिल

अशी त्र्यक्षरी लान्त नामें प्रचारांत आहेत. त्याप्रमाणेंच रक्रिल हें नांव असल्यामुळें तो बौद्ध असावा असें निष्पन्न होतें. शिवाय गोमी हा शब्द पूज्यार्थी बौद्ध विद्वानांच्या नांवापुढें योजीत असतात. हिंदूंत ज्याप्रमाणें शास्त्री, भट्ट, दीक्षित वगैरे शब्द आदरार्थी विद्वानांच्या नामांपुढें योजतात त्याप्रमाणेंच हें होय, व बौद्धसंप्रदायांतच हा प्रचार रूढ असल्यामुळें बौद्ध व्याकरणकर जो चंद्रपंडित त्यानें 'गोमिन् पूज्ये' असें सूत्र करून त्याची उपपत्ति लावून दिली आहे. तेव्हां रक्रिलगोमी ही संज्ञा बौद्ध व्यक्तीची ठरत आहे, व त्यांवरून त्याचा पुत्र भामह हाही बौद्धच ठरत आहे. विद्वानांनीं या दोन प्रमाणांवरच विशेष चर्चा केली आहे, सबब याविषयीं दुसऱ्या पक्षांचें म्हणणें काय आहे तें थोडक्यांत सांगून नंतर त्याविषयीं आम्हांला काय वाटतें तें सांगतों व इतर प्रमाणांचाही उल्लेख येथें करतों.

१ यांतील पहिला मुद्दा मंगलाचरणाचा. बुद्धाला उद्देशून मंगलाचरण केलें असल्यामुळें भामह हा बौद्ध होता असें जें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं. कारण तें मंगलाचरण बुद्धदेवतेला उद्देशून आहे असें म्हणतां येत नाहीं. त्यांतील 'सर्व' व 'सर्वज्ञ' हीं पदें वैदिक देवतांकडेही उपपन्न होत आहेत. 'कृशानुरेताः सर्वज्ञो धूर्जटिर्नीललोहितः,' असा अमरसिंहानें 'सर्वज्ञ' हा शब्द शंकराचा वाचक आहे म्हणून सांगितला आहे. तेव्हां त्या शब्दावरून बुद्धदेवतेचाच बोध होतो व तोच येथें भामहाला अभिप्रेत आहे असें मानण्याचें कारण नाहीं. तसेंच 'सार्व' या पदापासून प्रतीत होणारें जें सर्वहितत्व तें शंकराच्या ठिकाणीं अनुपपन्न नाहीं. कारण शंकरही भक्तवत्सल म्हणून प्रसिद्ध आहे. शिवाय 'प्रणम्य शर्वं सर्वज्ञम्' असाही मूळ पाठ असण्याचा संभव आहे. असा मूळ पाठ असेल तर मग हें नमन शंकराला उद्देशून आहे याबद्दल शंकाच राहत नाहीं. कारण शर्व ही संज्ञा केवळ शंकराचीच म्हणून संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. तात्पर्य, या मंगलाचरणावरून भामह हा बौद्ध होता हें सिद्ध होत नाहीं.

आतां 'रक्रिल'ही संज्ञा वैदिक समाजांत आढळत नाहीं, 'सोमिल' वगैरे संज्ञांप्रमाणें ती बौद्ध समाजांतील असावी, व तें भामहाच्या वडिलांचें नांव असल्यामुळें तो बौद्ध असावा, मग त्याचा पुत्र भामह हा अर्थातच बौद्ध ठरत आहे, असें जें म्हणणें आहे तेंही युक्त नव्हे. कारण 'रक्रिल' ही संज्ञा बौद्ध समाजांत प्रसृत असली तरी ती वैदिक समाजानें कां स्वीकारूं नये ? संज्ञेचा व्यवहार हा समाजाच्या परस्परसंघट्टनावर अवलंबून असतो. जों जों परस्परांचा एकमेकांशीं व्यवहार जास्त दृढ होत जातो, तों तों परस्परांच्या संज्ञा, भाषेच्या लकबी, वगैरे गोष्टी परस्परांत मिश्रित होत असतात. शिवाजीमहाराजांच्या वडिलांचें नांव शहाजी. शहाजी हें नांव हिंदुसमाजांतील नव्हे. हल्लीं मराठे लोकांत कांहीं व्यक्तींचें नांव फकिरा असें असतें व ही संज्ञा मुसलमानाची आहे. प्रस्तुत एका बड्या संस्था-

निकानें आपल्या मुलाचें नांव जार्ज ठेविलें आहे असें ऐकिवांत आहे. तात्पर्य, एखाद्या वर्गांतील संज्ञेवरून त्या व्यक्तीला त्या वर्गांतील समजणें युक्त नव्हे. तेव्हां भामहाच्या बापाचें नांव रक्रिल असलें तरी तेवढ्यावरून तो बौद्ध होऊं शकत नाहीं.

आतां आदरार्थी असणारा गोमी शब्द याचा उल्लेख बौद्ध व्याकरणकार जो चंद्र त्यानें आपल्या व्याकरणसूत्रांत केला आहे. इतर जे पाणिन्यादि वैदिक व्याकरणकार, त्यांनीं त्याचा उल्लेख केला नाहीं. म्हणून तो शब्द बौद्ध समाजांतच प्रसृत होता, वैदिक समाजांत नव्हता, व ज्या अर्थीं रक्रिल या संज्ञाशब्दापुढें तो येथें भामहानें योजिला आहे, त्या अर्थीं भामहाचें घराणें बौद्धधर्मानुयायी असावें, वैदिक मतानुयायी नसावें, असें जें म्हटलें आहे तेंही युक्त नव्हे. गोमी हा शब्द चांद्रव्याकरणांत उपलब्ध होत असला तरी तो शब्द त्यानें बनविला असें नव्हे. व्याकरणकार शब्द बनवीत नसतात, तर प्रचारांतील शब्दांची उपपत्ति करून दाखवितात. त्याप्रमाणें चंद्रानें त्या शब्दाचा अर्थ देऊन उलगडा केला आहे. वस्तुतः तो शब्द गोस्वामी या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. हल्लीं मराठींत गोसावी हा त्याचाच अपभ्रंश आहे व कीर्तनकार व बैराग्यांतील कांहीं विशिष्ट व्यक्ति यांना तो लावतात. तेव्हां गोस्वामी, गोमी व गोसावी वगैरे शब्द कौलिकसंबंधानें एकजातीय असल्यामुळें व ते विविध जातींत प्रसृत झाले असल्यामुळें त्यांवरून विशिष्ट जाति ठरविणें युक्त नव्हे. तात्पर्य, भामह बौद्ध होता याला विशेष प्रमाणें म्हणून ज्या दोन गोष्टींचा उल्लेख केला जातो, त्यांचा येथपर्यंत विचार केला व त्यावरून भामह हा बौद्ध होता असें ठरत नाहीं हें दाखविलें. आतां तो वैदिक होता याविषयीं थोड्याशा प्रमाणांचा निर्देश करूं.

भामहानें आपल्या या काव्यालंकारांत अलंकारांचीं वगैरे जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांत वैदिक व्यक्तींचेच उल्लेख विशेष आढळतात. बौद्धधर्मीय प्रसिद्ध व्यक्तींचा उल्लेख कोठेंही नाहीं. तसेंच बौद्धांनीं अंगीकृत जो अपोहवाद त्याचें भामहानें या ग्रंथांत खंडन केलें आहे. म्हणून भामह बौद्ध नव्हे. अशाच आणखी कांहीं अवान्तर प्रमाणांवरूनही भामह बौद्ध नव्हता अशीच विद्वानांची कल्पना होईल. तेव्हां भामह बौद्ध होता हें विधान चिकित्सकबुद्धीच्या विद्वानाला पटण्यासारखें नाहीं.

याप्रमाणें भामह हा सौगत का वैदिक याविषयीं विद्वानांत चाललेल्या चर्चेचा विषय आहे. आतां यासंबंधानें आम्हांस काय वाटतें त्याचा थोडासा उल्लेख करितों. 'प्रणम्य सार्वं सर्वज्ञम्' अशा तऱ्हेचें मंगलाचरण करण्याची पद्धति अवैदिक संप्रदायांत विशेष आढळते व सर्वांना हितकारी या अर्थीं सार्व हा शब्दही वैदिक वर्गांत विशेष प्रचलित नाहीं. योगवृत्तीनें एखादा शब्द अन्यत्र उपयुक्त होत असला तरी त्याच्या रूढीला जर बाध येत असेल तर ती सोडून देऊन

योगार्थ घेऊन त्याचा इतर संप्रदायांत समावेश करणें बरोबर नव्हे. सर्व शास्त्रांत रूढीला प्राधान्य मानिलें आहे व म्हणूनच 'योगाद्रूढिर्बलीयसी' असा उद्घोष सर्व विद्वानांच्या मुखीं दृष्टीस पडतो. तेव्हां 'सार्व' हा शब्द शंकर वगैरेंकडे उपयुक्त होत असला तरी वैदिक वर्गांत तो प्रचारांत नसल्यामुळें तो वैदिक संप्रदायांतील समजून त्याचा उपयोग वैदिक व्यक्तीनें केला आहे असें समजणें युक्त वाटत नाहीं. वैदिक संप्रदायांतील विद्वानांनीं त्याचा उपयोग केल्याचीं दोनचार उदाहरणें दाखवून मग या शब्दाचा प्रचार वैदिकांत असल्यामुळें तो वैदिक देवतावर्णनांत उपयुक्त होत आहे असें म्हटलें असतें तर ते विचारार्ह झालें असतें. आमच्या या मुद्द्यासंबंधानें कांहीं उदाहरणेंही दाखवितां येतील. अवैदिक वाङ्मयांत 'देवानां प्रियः' हा प्रयोग प्रशंसा या अर्थींच उपलब्ध होतो. परंतु वैदिक वाङ्मयांत तो मूर्ख या अर्थीं योजितात. परंतु अवैदिक वाङ्मयांत प्रशंसार्थीं होणारा त्याचा उपयोग कोणी योगवृत्तीनें वैदिक वाङ्मयांत करील तर तें युक्त होईल का ? होणार नाहीं. कारण 'योगाद्रूढिर्बलीयसी' या न्यायानें तो बौद्ध वाङ्मयांतच प्रशस्य; वैदिक वाङ्मयांत नव्हे. तात्पर्य, येथें विशिष्ट अर्थाविषयीं जसें रूढीचें महत्त्व विचारांत घ्यावें लागतें, त्याचप्रमाणें शब्दप्रचारपद्धतींतही संप्रदाय (रूढि) पाहावा लागतो. तेव्हां 'सार्व' हा शब्द बौद्धसंप्रदायांत प्रचलित असल्यामुळें, तो वैदिक ग्रंथकारानें उपयोजिला आहे असें मानणें युक्त नव्हे.

तसेंच 'कृशानुरेताः सर्वज्ञः' या कोशप्रमाणानें सर्वज्ञ हा शब्द शंकराचा वाचक होत असला तरी मुख्यत्वेंकरून त्याचा उपयोग बुद्धाकडेच करतात. अमरकोशकाराची शब्दक्रमासंबंधानें पद्धति अशी आहे की, तो त्या त्या अर्थाविषयीं लोकांत विशेष प्रसिद्ध असलेला शब्द प्रथम देतो व नंतर त्या मानानें थोडेसे अप्रसिद्ध अशा यौगिक वगैरे शब्दांचा तो संग्रह करतो; उ. 'ब्रह्मात्मभूः सुरज्येष्ठः' येथें प्रथम लोकांत विशेष प्रसिद्ध असलेला ब्रह्मा हा शब्द दिला आहे व त्यापुढें सुरज्येष्ठ वगैरे यौगिक शब्द दिले आहेत. ही पद्धति कोशकारांना अवश्य अंगीकारावी लागते. नाहीं तर प्रथमतः यौगिक शब्द देऊन पुढें रूढ शब्द दिले तर यौगिक शब्दानें व्यक्तिविशेषाचा निश्चय होत नसल्यामुळें पुढील शब्दांच्या अर्थाविषयीं घोटाळा होण्याचा विशेष संभव असतो. तेव्हां रूढ शब्द प्रथम देणें हें कोशकारांना अवश्य असतें. यौगिक शब्द हे रूढ शब्दांपेक्षां गौण असल्यामुळें ते शब्द त्या अर्थाचे दुय्यम प्रतीचे वाचक म्हणून समजले जातात. तेव्हां कोशांत त्या त्या अर्थाविषयीं जो शब्द प्रथम दिला असेल, तो मुख्य असून इतर त्या मानानें खालच्या प्रतीचे मानावे लागतात. या दृष्टीनें विचार केला असतां बुद्धाच्या नांवांत 'सर्वज्ञः सुगतो बुद्धः' असा 'सर्वज्ञ'शब्दाचा प्रथम उल्लेख केला असल्यामुळें तो त्याचा मुख्य रूढार्थक शब्द होय. 'कृशानुरेताः सर्वज्ञः' येथील सर्वज्ञ

शब्द 'शंभुरीशः पशुपतिः' इत्यादि अनेक नामें पूर्वी सांगितल्यावर मग सांगितला आहे. तेव्हां तो शब्द बुद्धाप्रमाणें शंकर या अर्थी रूढ नव्हता, हें उघड होत आहे. तेव्हां सर्वज्ञ शब्दाचा मुख्यार्थ जो बुद्ध, तो घेणें हेंच युक्त होय. तो घेण्यास कांहीं विशेष नड असेल, व शंकर असा अर्थ घेण्यास कांहीं साधक असेल, तर त्याचा दुय्यम प्रतीचा अर्थ जो शंकर तो घेणें युक्त होईल. परंतु वास्तवार्थाला जर कोण· तीही नड येत नाहीं, तर तो सोडून दुय्यम प्रतीचा अर्थ घेणें हें कवीच्या अभि· प्रेत अर्थाला धरून होणार नाहीं. आतां 'सार्व' व 'सर्वज्ञ' हे शब्द बौद्ध संप्र- दायांतच प्रचारांत विशेष होते काय व बौद्धांचें अशा प्रकारें अभिवादन करण्याची पद्धति होती काय, असें कोणी म्हणेल तर बौद्ध वाङ्मयांतील तशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. परंतु वाचकांना कल्पना येण्याकरितां दोनचार उदाहरणें देऊन या मुद्द्यांचें विवेचन पुरें करितों. वाग्भटानें काव्यानुशासन म्हणून ग्रंथ केला आहे. वाग्भट हा बौद्ध होता हें अनेक प्रमाणांवरून सिद्ध झालें आहे व तें सर्वमान्य आहे. त्यानें आपल्या मंगलाचरणांत 'सर्वार्धमागधीं भाषां...सार्वज्ञीं प्रणिदध्महे' असा 'सर्वज्ञ' शब्दानें बुद्धाचा उल्लेख केला आहे. सदुक्तिकर्णामृतांतः 'स सार्वः सर्वज्ञः पथि निरपवादे कृतपदः ।' असा 'सार्व व सर्वज्ञ' शब्दांनीं बुद्धाचा उल्लेख केलेला आहे. 'यस्य ज्ञानदयासिन्धोः' असा अमरकोशकारानें ज्ञानदयासिंधोः या पदानें सार्व सर्वज्ञ या पदांचाच अर्थ उल्लेखिला आहे. तात्पर्य, बुद्धाचें वर्णन करणें म्हणजे सर्वज्ञत्व व सार्वत्व म्हणजे दयासिंधुत्व ह्या गुणांचा उल्लेख असावयाचाच, असा बौद्धसंप्रदाय स्पष्ट होत आहे. तेव्हां या सर्व विवेचनावरून 'प्रणम्य सार्वं सर्वज्ञम्' हें मंगलाचरण बुद्धदेवतेला उद्देशूनच असावें, असें आम्हांस वाटतें.

आतां 'रक्रिलगोमी' या शब्दासंबंधानें थोडेंसें विवेचन करूं.

रक्रिल हें नांव बौद्ध संप्रदायांत रूढ असावें ही गोष्ट कबूल करून तें वैदिक समाजांत कां नसावें असा प्रश्न केला जातो. हल्लीं असा नामविपर्यय उपलब्ध होत आहे, तेव्हां पूर्वीही असाच विपर्यय झाला असेल, असें म्हणून भामह हा वैदिक होता हें ठरविण्याचा किंवा प्रतिपक्ष्याचा या मुद्याचा परिहार करण्याचा उपक्रम पाहिला म्हणजे या विद्वानांच्या बुद्धिचातुर्याचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच वाटतें. अन्य समाजांत प्रसृत असलेलें नाम भिन्न समाजांतील व्यक्तीनें धारण करणें अशक्य अथवा असंभवनीय आहे, असें आमचें म्हणणें नाहीं; परंतु तें अन्यसमाजीय व्यक्तीनें धारण केलें आहे असें इतर प्रमाणांनीं निश्चित करावें लागतें. इतर प्रमाणांनीं ती व्यक्ति अमक्या वर्गांतील आहे, हें निश्चित झाल्यावर मग त्यानें ही अन्यवर्गीय संज्ञा कशी धारण केली अशी कोणीं शंका घेतली, तर तसें नांव घेण्यास हरकत नाहीं. कारण परस्परसहवासामुळें असें होणें शक्य आहे, असें उत्तर दिलें तर चालेल. परंतु एखादी व्यक्ति अमुक वर्गांतील आहे हें सिद्ध

न करतां भिन्न वर्गातील संज्ञेनें युक्त असणारी ती व्यक्ति आमच्या वर्गातीलच आहे असें आपण म्हणूं लागलों, तर हजरत महंमद पैगंबर हा ब्राह्मण होता, श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य हे बौद्ध घराण्यांतच जन्मले होते, असें कोणीं म्हटल्यास त्यास काय उत्तर द्यावयाचें ? कारण संज्ञेनें प्रतीत होणारें भिन्नवर्गीयत्व हें केवळ कल्पनेनेंच उडवून द्यावयाचें, त्याविषयीं प्रमाण देण्याची जबाबदारी घ्यावयाची नाहीं, हें आश्चर्य होय. तात्पर्य, 'रक्रिल' या संज्ञेनें बोधित होणारी व्यक्ति वैदिकच होती ही कल्पना प्रमाणाच्या अभावामुळें अत्यंत त्याज्य आहे.

'गोमी' हा शब्द गोस्वामी या शब्दाचा अपभ्रंश असला व गोसावी हा शब्द गोस्वामी याचा अपभ्रंश म्हणून सध्यां प्रचारांत असला, तरी जोंपर्यंत गोमी हा शब्द वैदिक वाङ्मयांत उपलब्ध होत नाहीं, व बौद्ध व्याकरणकार चंद्राशिवाय कोणत्याही व्याकरणकारानें त्याचा उल्लेख केलेला आढळत नाहीं, तोंपर्यंत तो शब्द केवळ बौद्ध समाजांतच प्रसृत होता, इतर समाजांत नव्हता, अशी कल्पना करणें युक्त वाटतें, व ही गोष्ट मान्य केल्यावर 'गोमी' हा पूज्यार्थक असा शब्द रक्रिल-शब्दाप्रमाणेंच एखाद्या हिंदूनें आपल्या नांवापुढें लाविला असेल हें म्हणणेंहि युक्त होत नाहीं. कारण संज्ञाशब्दाचा कोणीं स्वीकार केला तरी अन्य समाजांत रूढ असलेले प्रसंशावाचक शब्द कोणी स्वीकारीत नाहीं. फकीर, शहाजी वगैरे शब्द जरी हिंदूंनीं क्वचित् उपयोजिले तरी हजरत हा शब्द कोणाही हिंदु व्यक्तीच्या पूर्वी उपयोजिला जाणार नाहीं. किंवा ब्राह्मणवर्गात प्राशस्त्यार्थी उपयोजिले जाणारे आचार्य, दीक्षित वगैरे शब्द अन्य वर्गामध्यें उपयोजिले जाणार नाहींत. तात्पर्य, रक्रिलगोमी हा शब्द हिंदूनेंही स्वीकारला असेल ही कल्पना भामहाचें घराणें वैदिक होतें हें इतर प्रबल प्रमाणांनीं सिद्ध केल्यावांचून कोणासही ग्राह्य होणार नाहीं.

याप्रमाणें प्रमुख मुद्यांचें विवेचन झालें. आतां भामहानें आपल्या ग्रंथांत वैदिक रामकृष्णादि देवतांचा व धर्मराज, भीम वगैरे पौराणिक व्यक्तींचाच उल्लेख केला आहे, बौद्धवर्गातील विशिष्ट व्यक्तींचा उल्लेख केला नाहीं, म्हणून तो बौद्ध नसावा, व त्यानें बौद्धांचा अपोहवाद खंडित केला आहे म्हणून त्याला बौद्ध मानतां येत नाहीं, इ.इ. जीं कारणें त्याच्या बौद्धत्वनिराकरणाकरतां दिलीं आहेत, तींहि ग्राह्य वाटत नाहींत. कसें तें पहा.

शास्त्रीय विषयाचें विवेचन करतांना जीं उदाहरणें द्यावयाचीं असतात, तीं सामान्य समाजांत ज्या व्यक्तींची विशेष प्रसिद्धि असते, त्याच व्यक्तींचीं द्यावीं लागतात. किंवा ज्या विद्वानांनीं आपला ग्रंथ पहावा, त्याचा विचार करावा, अशी मनीषा असते, त्या विद्वानांत विशेष प्रसृत असलेल्या विशिष्ट व्यक्तींचींच उदाहरणें ग्रंथकारास द्यावीं लागतात. भामहाच्या वेळीं वैदिक पंडितांविषयीं समाजांत विशेष गौरव असल्यामुळें त्यानें वैदिक महनीय व्यक्तींचा आपल्या ग्रंथांतील उदाहरणांत

समावेश केला. एवढेंच काय परंतु बौद्धाद्दत पाली भाषेचा परित्याग करून संस्कृत भाषेचा आश्रय केला. कै. लोकमान्यांनीं 'ओरायन' वगैरे पुस्तकें इंग्रजींत लिहिलीं याचें कारणही हेंच होतें. त्यांचें म्हणणें ज्या विषयाचा ज्या वर्गांत विशेष ऊहापोह चालतो, त्या विषयावर लिहावयाचें तर त्या वर्गाच्या भाषेंत लिहिणें अवश्य असतें. कारण तसें केल्यावांचून त्या विषयाची चर्चा त्या विषयांतलि तज्ज्ञांकडून योग्य रीतीनें होत नाहीं. तात्पर्य, भाषा काय अगर उदाहृत व्यक्ति काय, ज्या समाजांत आपल्या ग्रंथाची चर्चा व्हावी अशी इच्छा असेल, त्या समाजाचीच घ्यावी लागते. तेव्हां, या उदाहरणांतील वैदिक व्यक्तींच्या उल्लेखावरून भामह वैदिक होता असें ठरविणें धाडसाचेंच होय. शिवाय एक काल असा होता की, त्या वेळीं बौद्ध व वैदिक यांचें विशेष वितुष्ट नव्हतें. म्हणून बौद्ध वैदिक व्यक्तींचा आपल्या ग्रंथांत उल्लेख करीत व वैदिक त्यांचे ग्रंथ पठनपाठणांत ठेवीत असत. ही गोष्ट अश्वघोषकाव्य, वाग्भटाचें काव्यानुशासन, वगैरे ग्रंथांत वैदिक व्यक्तींचीं विपुल उदाहरणें सांपडतात, व अमरकोशादि ग्रंथ पठणपाठणांत समाविष्ट झालेले आढळतात, यावरून स्पष्ट होते. तात्पर्य, केवळ ग्रंथांतील उल्लेखावरून ग्रंथकर्त्यांच्या जातीचा निश्चय करणें अशास्त्रीय होय. आतां काव्यालंकारांत बौद्धवाङ्मयानुसारी एखादें उदाहरण दृष्टीस पडत नाहीं असें जें म्हटलें आहे, तेंही शंकास्पदच आहे. कारण पांचव्या परिच्छेदांत—

"शुभमरकतपद्मरागचित्रे
सफलसपल्लवभूरिचारुवृत्ते ।
बहुकुसुमविभूषिते स तस्थौ
सुरमुनिसिद्धयुते सुमेरुपृष्ठे ॥ (५.६५)

असें एक पद्य आहे. हें वर्णन बहुधा एखाद्या अर्हताचें असावें. कारण ही वर्णनाची पद्धति जैन वगैरे अवैदिकांनीं आदृत आहे असें त्यांच्या वाङ्मयाशीं ज्यांचा परिचय आहे त्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. याविषयीं बौद्धवाङ्मयांतील उतारे देऊन ही गोष्ट सिद्ध करतां येईल; परंतु विस्तारभयास्तव तसें करणें अडचणीचें होत आहे.

भामहानें अपोहवादाचें निराकरण केलें आहे, अपोहवाद बौद्ध विद्वानांत मान्य झालेला आहे, तद्विरुद्ध ही गोष्ट आहे, तेव्हां यावरून तो बौद्ध नसावा, हें म्हणणेंही युक्त नव्हे. कारण अपोहवाद हा कांहीं धर्मसिद्धांतांत अंतर्भूत होत नाहीं. तो एक शास्त्रीय विषय आहे. त्यासंबंधानें आपल्या कल्पनेप्रमाणें स्वतंत्र विचार करण्यास काय नड आहे ? त्यामुळें धर्माचरणास बाध थोडाच येणार आहे. गौतम षोडशपदार्थवादी तर कणाद सप्तपदार्थवादी. या मतभेदामुळें त्यांच्या वैदिकत्वास बाध थोडाच येणार आहे. द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत वगैरे मतें भिन्न असलीं तरी

त्यांच्या प्रवर्तकास कोणी अवैदिक म्हणत नाहीं. तसेंच हें होय. शिवाय भामह वैदिक म्हणावा, तर वैदिक वैयाकरण यांनीं आदृत स्फोटवादाचें तो 'शपथैरपि चादेयं वचो न स्फोटवादिनाम्' असें उपहासपूर्वक खंडन करीत आहे. तेव्हां तो वैदिक तरी कसा ? तात्पर्य, शास्त्रीय विषयांवरील विप्रतिपत्तीनें कोणाही व्यक्तीचें बौद्धत्व, वैदिकत्व वगैरे ठरविणें हें युक्त होत नाहीं.

याप्रमाणें संक्षेपानें भामह हा वैदिक होता असें प्रतिपादन करणाऱ्यांच्या मुद्यांचें विवेचन केलें व ते मुद्दे त्यांच्या म्हणण्यास उपयुक्त होत नाहींत, हें दाखविलें. आतां भामह बौद्ध होता, यास उपयुक्त होणारें एक प्रमाण दाखवितों.

काव्यालंकाराच्या चतुर्थ परिच्छेदांत पदापासून अथवा वाक्यापासून अर्थबोध कसा होतो, याविषयीं प्रसंगानें विचार चालला असतां बौद्ध पंडितांनीं 'धीरन्त्यशब्दविषया वृत्तवर्णाहितस्मृतिः । वाक्यमित्याहुरपरे न शब्दाः क्षणनश्वराः ॥' अशा रीतीनें वाक्यापासून अर्थबोध होतो म्हणून जें सांगितलें आहे, त्याचा अनुवाद करून 'अत्रापि बहु वक्तव्यं जायते तत्तु नोदितम्। गुरुभिः किं विवादेन यथाप्रकृतमुच्यते ॥' असें म्हटलें आहे. या पद्याचा तात्पर्यार्थ असा आहे की बौद्धांची वाक्यार्थबोधाविषयीं जी ही कल्पना आहे तीवर पुष्कळ आक्षेप घेण्यासारखे आहेत, परंतु आपल्या गुरुवर्गाबरोबर विवाद करून काय करावयाचें ? तेव्हां हा विषय येथेंच सोडून देऊन प्रकृत विषयाकडे वळतों. असें म्हणून हा पदार्थवाद त्यानें सोडून दिला आहे. येथील 'गुरुभिः किं विवादेन ?'' हें वाक्य भामह बौद्ध होता याविषयीं महत्त्वाचें प्रमाण आहे असें वाटतें. कारण यावरून भामहाचें अध्ययन बौद्ध गुरुपाशीं झालें होतें असें स्पष्ट दिसतें. व त्या गुरूस तो मान देत होता हेंही स्पष्ट होत आहे. तेव्हां यावरून भामह हा बौद्ध होता हें स्पष्ट होत आहे. अपोहवादाप्रमाणें त्यानें या वादाविषयीं आपलें प्रतिकूल मत स्पष्ट सांगितलें आहे. परंतु हा वाद त्याच्या गुरूस विशेष मान्य असल्यामुळें त्यानें त्याविषयीं चर्चा करण्याचें सोडून दिलें आहे.

असो. याप्रमाणें भामह हा बौद्ध होता कीं वैदिक होता, या संबंधानें थोडेंसें विवेचन केलें आहे व प्रस्तुत उपलब्ध असलेल्या प्रमाणांवरून तो बौद्ध असावा हें आमचें मत दर्शविलें आहे. प्राचीन पंडितांविषयीं कोणत्याही गोष्टीचें सिद्धांतरूपानें विधान नडीचेंच असतें, म्हणून विषयोपन्यास या बुद्धीनेंच हें विवेचन केलें आहे. कोणाही विद्वानांनीं प्रमाणपुरःसर चर्चा करून आमचें मत निराकृत केलें, तरी त्यांत आम्हांस आनंदच आहे. कारण या चर्चेचा हेतु तत्त्वबोध हा आहे, हें ध्यानांत ठेवून कोणीही विद्वानांनीं यासंबंधीं चर्चा करून यास पूर्णत्व आणावें अशी आमची विनंती आहे.

भामह हा जर बौद्ध आहे तर तो वैदिक आहे असें सिद्ध करण्याची खटपट विद्वान् कां करतात, असा येथें प्रश्न उपस्थित होणें स्वाभाविक आहे. त्याचें उत्तर भामहाचें गुणगौरव हेंच होय. अमरसिंहास वैदिक मानण्याचें जें कारण तेंच याचें होय. आतां असे याचे गुण कोणते की ज्यामुळें वैदिक विद्वानांस याला आपल्या वर्गांत ओढण्याचा अनावर मोह व्हावा, असाहि प्रश्न येणें साहजिक आहे. परंतु आजचा आमचा विषय फक्त त्याच्या धर्माविषयीं असल्यामुळें त्याच्या गुणगौरवाचें विवेचन करतां आलें नाहीं.

रघुनाथपंडित यांच्या

नळ-दमयंती-स्वयंवराख्यानावर चर्चा*

मराठी साहित्यावाङ्मयांत रघुनाथपंडितांचें दमयंतीस्वयंवराख्यान हें काव्य उच्च प्रतीचें आहे. रघुनाथपंडितानें भारतांतील नलोपाख्यान दमयंतीस्वयंवरापुरतेंच वर्णिलें आहे. त्याची रचनापद्धति विद्वत्प्रवर श्रीहर्षांच्या नैषधकाव्यासारखी आहे. श्रीहर्षानें नैषधांत विविध श्लेषप्रचुर वर्णन केलें आहे. त्याचें संस्कृत भाषेवर उत्तम प्रभुत्व असल्यामुळें शब्दांवर अनेक प्रकारच्या कोट्या व सामान्य पदें योजून विविध अर्थांची स्फूर्ती या चमत्कृतींनीं तें काव्य हृदयंगम केलें आहे. अर्थात् त्याच्या या काव्यांत रसपरिपोषापेक्षां शब्दार्थचमत्कृतिपोष उत्तम साधला आहे. परंतु यामुळें या काव्यास थोडेंसें क्लिष्टत्व आलें आहे. ह्या कवीनें स्वतःच शेवटीं उपसंहारामध्यें "ग्रन्थग्रन्थिरिह क्वचित्क्वचिदपि न्यासि प्रयत्नान्मया।" (उपसंहार श्लोक ४ था) असें स्पष्ट सांगितलें आहे. त्याचें म्हणणें असें आहे की, कांहीं ज्ञानलवदुर्विदग्ध लोक काव्यांत काय महत्त्व आहे, शास्त्रीय विचाराप्रमाणें त्यांत विचार्य पदार्थ काय आहेत, अशी काव्याविषयीं अनादरबुद्धि प्रकट करितात. याविषयीं गदाधरभट्टाचा "वाचा वाक्यपदप्रमाणपदवीसंचारसंपूतया। सन्नद्धप्रतिमल्लभल्लभ्रुकुटीकुट्टाकघाटीजुषा ।। साटोपं विहरन् कथं नु सहते साहित्यविद्यारसम् । प्रौढस्त्रीरसिकस्य बालवनितासङ्गः कथं रोचताम् ॥" हा श्लोक प्रसिद्धच आहे. तेव्हां अशा पंडितांच्या विद्वत्ताकंडूचें शमन व्हावें म्हणून या काव्यांत मुद्दाम क्लिष्ट रचना केली आहे. तेव्हां त्याचा अर्थ साहित्यपाथोनिधिमंथन करणाऱ्या विद्वानांजवळूनच या नैयायिक पंडितांनीं करून घ्यावा. तात्पर्य, प्रस्तुत पंडितप्रवर श्रीहर्षानें बुद्धिपुरःसरच काव्याची ठिकठिकाणीं क्लिष्ट रचना केली आहे. सामान्य पदें ठेवून अनेकार्थांच्या घोटाळ्यांत वाचकांस टाकणें यांत या कवीचा हातखंडा आहे. कालिदास सरस उपमेनें प्रतिपाद्य अर्थ मनोहर रीतीनें वर्णितो; माघ हा व्याकरणपरिपक्व भाषेनें गंभीरार्थप्रतिप्रादन करतो. भारवि शास्त्रानुसारी नीतीचें वर्णन करतो; तर श्रीहर्ष हा विविध श्लेषांनीं अर्थ व शब्द अशी उभयविध चमत्कृति दाखवितो. असें हें पंचमहाकाव्यकर्त्यांचें वैशिष्ट्य मानण्यास हरकत नाहीं.

---

* संपादक व प्रकाशक– रा. अ. का. प्रियोळकर, बी. ए., मुंबई.

या नैषधकाव्यावर आज उपलब्ध तेवीस टीका आहेत. त्यावरूनही या काव्याचें गंभीर स्वरूप ताडतां येतें. या टीकाकारांत भट्टनारायण हा साहित्यशास्त्र-प्रवीण असून उत्तम वैयाकरण आहे; त्यामुळें त्यानें व्याकरणपद्धतीनें यांतील श्लोकांचे विविध अर्थ केले आहेत, ते विद्वन्मान्य झाले आहेत. पंचमहाकाव्यां-वर मल्लिनाथाची सरस टीका आहे. परंतु या काव्यावरील भट्टनारायणाचीच टीका विशेष मान्य आहे. तात्पर्य, संस्कृत वाङ्मयांत नैषधीय काव्य हें शब्दार्थ-चमत्कृतीमुळेंच महाकाव्यांत समाविष्ट झालें आहे.

रघुनाथपंडितांनीं हें दमयंतीस्वयंवराख्यान वरील नैषधकाव्याची रचना डोळ्यापुढें ठेवून रचिलें आहे. या आख्यानांत नैषधकाव्याप्रमाणें अनुप्रास, यमक वगैरेंनीं शब्दालंकारचमत्कृति, उपमा, रूपक, दृष्टांत, अर्थान्तरन्यास व विशेषतः सामान्यपदें ठेवून विविध अर्थांची स्फूर्ति करणारे श्लेषालंकार यांची रेलचेल केली आहे. यांत आदियमक, मध्ययमक, अन्त्ययमक, कांहीं विशिष्ट स्थळींच वर्ण-साम्याची योजना करून साधलेले अनुप्रास वगैरे पाहिलें, म्हणजे या कवीचें मराठी भाषेवर बरेंच प्रभुत्व होतें, असें दिसून येतें. त्याच्या काळीं प्रचारांत अस-लेले शब्द[1], क्रियापदांचीं विशिष्ट रूपें[2], भाषेंतील प्रौढ फारशी[3] शब्द, संस्कृता-प्रमाणें दीर्घ समास[4] व संस्कृत काव्यांत विशेष प्रचारांत नसलेले असे कांहीं शब्द[5], संस्कृत कवींच्या कांहीं विशिष्ट कल्पना[6] वगैरे गोष्टी यांचा भरणा या काव्यांत विशेष असल्यामुळें मराठी वाङ्मयावर ज्यांनीं परिश्रम केले आहेत, अशा विद्वानां-सहीं ते सहज वाचून समजण्यासारखें नाहीं. याप्रमाणें या काव्याचें स्वरूप आहे.

रा. अनंत का. प्रियोळकर यांनीं परिश्रमानें नाना ठिकाणचीं हस्तलिखितें व पूर्वी मुद्रित झालेलीं पुस्तकें हीं सर्व मिळवून मूळ पाठ निश्चित करण्याविषयीं पुष्कळ खटपट केली आहे व विवेचनात्मक प्रस्तावना, मार्मिक टीपा, कविकाल व कवि यांचा निर्णय, इ. इ. महत्त्वाच्या विषयांचें सूक्ष्म दृष्टीनें विवेचन करून कवीचें व काव्याचें स्वरूप बरेंच विशद केलें आहे. कांहीं विद्वानांचा कांहीं बाब-

---

१. कथले, कीरवाणी, केवा, कै, चाउटी, चुना, जथणें, टोरच, पंचूरी, भेला, येळिल, वेंधणें, येरीकडे, निडा, बाहीं, अपरूप, शाखाद्दय, थिराणी, शेली, हिंसणें इ. इ.

२. अनुफलणें, उभासणें, कसणें, नवसणें, नवाजणें, फळणें.

३. गाजी, डौर, तेजी, फिरादी, हेजीब, लगाम, तजवीज, इंजली.

४. (९१) चूर्णिका, पद (७५) व इतर कोणतेंही पद पाहिलें तरी चालेल.

५. अगणन, धन्व, बंभर, शाल, शिखावल, सरोगबंधु, साख्य, हंसक, मणिबंध, चक्रवाळ इ. इ.

६. पाषाणरूपजातें, विश्रांतिशेष हिला इ. इ.

तींत मतभेद झाला तरी रा. प्रियोळकर यांचे परिश्रम, विद्वत्ता वगैरे गोष्टी पाहून सहृदय वाचकांस आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

श्रीमंत भवानरावजी पंडित पंतप्रतिनिधि, औंध संस्थानाधिपति, यांची मार्मिक प्रस्तावना, रावबहादूर धुरंधर यांचीं या काव्यांतील विशिष्ट प्रसंगांच्या वर्णनानुरूप चित्रें वगैरे गोष्टींनीं या पुस्तकाला विशेष मोहकत्व आलें आहे. एकंदरींत मराठी वाङ्मयांत या पुस्तकानें चांगली भर घातली असल्यामुळें आपण आतां त्याचें त्यांतील विषयाच्या क्रमानें थोडेंसें विवेचन करूं.

या पुस्तकाच्या आरंभास औंधसंस्थानाधिपति श्रीमंत भवानराव उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांचा सुंदर फोटो दिला असून प्रस्तुत पुस्तक त्यांस समर्पण केल्याचें निवेदित केलें आहे ही गोष्ट रत्नकांचनन्यायानें (रत्नं समागच्छतु काञ्चनेन या न्यायानें) अत्यंत युक्त झाली आहे. कारण महाराष्ट्रीय संस्थानिकांत विद्यावंत, कलावंत, सहृदय, गुणिजनानुरागी, प्रगतिप्रिय व शिवाजीमहाराजांचे पूर्ण भक्त असा त्यांचा लौकिक आहे. तेव्हां दमयंतीस्वयंवराख्यानासारखें रसपूर्ण, मनोहर व छत्रपति शिवाजीमहाराजांच्या अष्टप्रधानांपैकीं पंडितरावपदाधिष्ठित रघुनाथपंडितानें केलेलें काव्य त्यांस अर्पण केलें असतां तें उचित झालें नाहीं असें कोण म्हणेल ? तात्पर्य, ही समुचित योजना सर्वांस कौतुकावहच वाटेल.

यापुढें 'कृतज्ञतेचे चार शब्द' या शीर्षकाखालीं चार पानें मजकूर आहे. त्यांत रा. प्रियोळकरांनीं हें काव्य वाचण्यास आपली प्रवृत्ति कशी झाली वगैरे माहिती देऊन या कामीं ज्या ज्या विद्वान् सद्‌गृहस्थांनीं त्यांना मदत केली त्यांचा गौरवपूर्वक निर्देश केला आहे, हें त्यांच्या सौजन्यास युक्तच आहे. या प्रसंगांत चर्चा करतांना रा. प्रियोळकर यांनीं कांहीं अलंकारांसंबंधानें प्रस्तुत लेखकाशीं मतभेद असल्याचें आदरपूर्वक दर्शविलें आहे. दमयंतीस्वयंवराख्यानांतील अलंकार म्हणून जें शेवटीं परिशिष्ट जोडलें आहे, त्यांत आम्हीं कोणत्याही पद्याचा अलंकार ठरवावयाचा म्हणजे त्यांत मतभेद होणें अपरिहार्य आहे ही गोष्ट कांहीं कारणें देऊन स्पष्ट केली आहे. ती वाचकांनीं तेथेंच पाहावी. 'टाकी उपानह पदें अति मंद टेवी' या श्लोकांत आम्हीं स्वभावोक्ति अलंकार मानिला आहे. रा. प्रियोळकर यांचें म्हणणें शिशु, मुग्ध, पशुपक्षी वगैरेंचें याथातथ्यानें वर्णन केलें म्हणजे तेथें स्वाभावोक्ति होते. देवतादि पूज्य पदार्थ वगैरेंचें याथातथ्यानें वर्णन केलें म्हणजे तेथें स्वाभावोक्ति ते मानीत नाहींत. प्रस्तुत नलराजा हा धीरोदात्त नायक असल्यामुळें व त्याचेंच हें वर्णन आहे, म्हणून हा स्वभावोक्ति अलंकार होत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. या आपल्या विधानास त्यांनीं पान ४८ (चरित्र व काव्यविवेचन) यामध्यें मम्मट, रुद्रट, भोज वगैरे साहित्यपंडितांचे

उतारे प्रमाण म्हणून दिले आहेत. तेव्हां वाचकांचा गैरसमज होऊं नये म्हणून येथें थोडासा त्यासंबंधानें खुलासा करणें भाग आहे.

'काव्यशोभाकरान् धर्मानलंकारान् प्रचक्षते' असें काव्यादर्शांत दंडीनें अलंकाराचें सामान्य लक्षण दिलें आहे. विशिष्ट चमत्कृतीवर अलंकार अवलंबून असतात ही गोष्ट सर्व साहित्यकोविदांस मान्य आहे. विशिष्ट चमत्कृतीनें वर्णन करण्याच्या ज्या ज्या विविध पद्धति आहेत त्यांमुळें विविध अलंकार होत असतात. अमुक एक विशिष्ट पदार्थांचेंच अमुक एका विशिष्ट पद्धतीनें वर्णन केलें म्हणजेच ती चमत्कृति प्रतीत होते, नाहीं तर होत नाहीं, असें म्हणणें हें साहित्यशास्त्रपरंपरा व अनुभव यांच्या विरुद्ध आहे. उपमादि अलंकार हे अमक्या एका विशिष्ट पदार्थांचें औपम्यादि वर्णिलें म्हणजे होतात, नाहीं तर होत नाहींत, असें कोणीहि आलंकारिक मानीत नाहीं; याचप्रमाणें कांहीं विशिष्ट वस्तूंचें गुणक्रियादिकांनीं यथार्थ वर्णन केलें म्हणजे तेथें स्वभावोक्ति होते, अन्यत्र तसें वर्णन करून स्वभावोक्ति होत नाहीं, हें म्हणणें उचित नव्हे. कारण क्षुद्र प्राण्यांच्या यथार्थवर्णनानें चमत्कृति जी प्रतीत होते, ती उदात्त पुरुषाच्या यथार्थ वर्णनानें प्रतीत होत नाहीं असें म्हणणें अनुभवाच्या विरुद्ध आहे. यथार्थ वर्णनानें सर्व ठिकाणीं ती चमत्कृति प्रतीत झालीच पाहिजे. नाहीं तर कोठेंच प्रतीत होतां उपयोगी नाहीं. कांहीं ठिकाणीं ती होते व कांहीं ठिकाणीं ती होत नाहीं, हें म्हणणें अर्धजरतीयन्यायानुसारी असल्यामुळें कोणीहि विद्वान् तें मान्य करणार नाहीं. तेव्हां धीरोदात्त नृप असो, अथवा भयत्रस्त हरिण असो, यथार्थ वर्णन झालें, की स्वभावोक्ति अलंकार तेथें मानणें भाग पडतें. अशी स्वभावोक्ति अलंकाराची परिस्थिति असल्यामुळें 'स्वभावोक्तिस्तु डिम्भादेः स्वक्रियारूपवर्णनम्' या लक्षणांतील 'डिम्भादेः' हें पद पदार्थमात्राचें उपलक्षण म्हणून मानावें लागतें. अर्वाचीन काव्यवाङ्मयांत स्वभावोक्ति अलंकार विशेषेंकरून पशुपक्ष्यादिकांच्या वर्णनांत आढळत असल्यामुळें उद्योतकारांनीं 'डिम्भादेः' यांतील आदिपदानें युवति, भयत्रस्त, मुग्ध, तिर्यक्प्राणी वगैरेंचें ग्रहण होतें म्हणून जें म्हटलें आहे तें युक्तच आहे. स्वभावोक्तीमध्यें यांचेंच वर्णन असतें असा त्याचा अर्थ नाहीं. कारण वर सांगितल्याप्रमाणें यथार्थवर्णनचमत्कृति ही सर्वत्र समानतेनें प्रतीत होत असल्यामुळें तसें मानतां येत नाहीं. शिवाय डिंभादि पदार्थांचें यथार्थ वर्णन केलें असतां स्वभावोक्ति होते, इतरत्र ती मानूं नये, असें मानिलें, तर देवता, नृप वगैरे पूज्यपदार्थवर्णनामुळें चमत्कृति प्रतीत होत आहे, परंतु अलंकार मात्र सांगतां येत नाहीं असा प्रसंग यावयाचा. चमत्कृति प्रतीत होऊन तेथें अलंकार नाहीं, असें समजणें आग्रहाचें होय. तेव्हां अशा प्रकारें विचार केला असतां 'टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी' येथें स्वभावोक्ति मानणें युक्त आहे असें आम्हांप्रमाणें वाचकांसही वाटेल.

आमच्या या विवेचनास प्राचीन साहित्यपंडितांची संमति आहे हें दाखविण्याकरितां त्यांचीं स्वाभावोक्तीचीं लक्षणें व उदाहरणें देतों म्हणजे कांहीं शंका राहणार नाहीं.

"नानावस्थं पदार्थानां रूपं साक्षाद्विवृण्वती ।
स्वभावोक्तिश्च जातिश्चेत्याद्या सालंकृतिर्यथा ॥ (काव्यादर्श)

असें दंडीचें स्वभावोक्तीचें लक्षण आहे. 'पदार्थानाम्' असें सामान्य पद येथें आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. यापुढें त्यानें स्वभावोक्तीचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांत

"कण्ठे कालः करस्थेन कपालेनेन्दुशेखरः ।
जटाभिः स्निग्धताम्राभिराविरासीद्वृषध्वजः ॥

असें शंकरवर्णनात्मक उदाहरण दिलें आहे.

"नानावस्थासु जायन्ते यानि रूपाणि वस्तुनः ।
स्वेभ्यः स्वेभ्यो निसर्गेभ्यस्तानि जातिं प्रचक्षते ॥ (सरस्वतीकंठाभरण)

असें भोजानें लक्षण देऊन त्याचीं उदाहरणें—

"सदक्षिणापाङ्गनिविष्टमुष्टिं नतां समाकुञ्चितसव्यपादम् ।
ददर्श चक्रीकृतचारुचापं प्रहर्तुमभ्युद्यतमात्मयोनिम् ॥"

व "पादावष्टम्भनम्रीकृतमहिषतनोरुल्लसद्बाहुमूलं
शूलं प्रोल्लासयन्त्याः सरलितवपुषो मध्यभागस्य देव्याः ।
विश्लिष्टस्पष्टदृष्टोन्नतविरलवलित्यक्तगौरान्तराला-
स्तिस्रो वः पान्तु लेखाः क्रमवशविकसत्कञ्चुकप्रान्तमुक्ताः" ॥

अशी मदन व महाकाली देवतांचीं स्वरूपवर्णनें दिलीं आहेत.

दहाव्या शतकाच्या आरंभीं झालेल्या चालुक्य सोमेश्वराच्या मानसोल्लासांत

"रूपं शब्दश्च गन्धश्च रसस्पर्शक्रियागुणाः ।
द्रव्यं च वर्ण्यते यत्तु स्वभावोक्तिरसौ मता ॥

असें स्वभावोक्तीचें लक्षण देऊन त्यांतील द्रव्यस्वभावोक्तीचें उदाहरण म्हणून

"अतसीपुष्पसंकाशः पद्मपत्रायतेक्षणः ।
शंखचक्रगदापाणिर्दृश्यते गरुडध्वजः ॥

असें भगवान् विष्णूचें वर्णन करणारा श्लोक दिला आहे. असो. तेव्हां लक्षणाचें तात्पर्य, प्राचीन संप्रदाय, वगैरे गोष्टींचा विचार करून "टाकी उपानह पदें अति मंद ठेवी' या श्लोकांत स्वभावोक्ति मानणें आम्हांस युक्त वाटलें. परंतु याविषयीं आमचा आग्रह मुळींच नाहीं. कोणीं विद्वानांनीं धीरोदात्त नायकादिकांच्या अशा तऱ्हेच्या वर्णनांस अमुक अलंकार म्हणावें व त्यास प्रमाण अमुक म्हणून सांगि-

तलें, तरी आम्हांस त्यांत संतोष आहे; कारण तेवढीच गोष्ट विशेष समजली असें आम्ही मानूं. एवढेंच सांगून हें प्रसक्तानुप्रसक्त्या चाललेलें विवेचन पुरें करतों.

यापुढें औंधसंस्थानाधिपति श्रीमंत बाळासाहेब यांची मुद्देसूद व विचारयुक्त प्रस्तावना आहे. तींत प्रथमत मूळचें कथानक व प्रस्तुतचें काव्य यांच्या गुणौघांचे वर्णन करून सदरहु काव्य मराठी वाङ्मयांत पहिल्या दर्जाचें आहे व त्यामुळें तें रचणाऱ्या कवीची कीर्ति अजरामर झाली आहे असें म्हटलें आहे तें युक्त आहे. या काव्यांतील कांहीं श्लोकपंक्तींवरून हा कवि रामदाससमानकालीन असून श्रीशिवछत्रपतींच्या अष्टप्रधानांतील पंडितपदावर अधिष्ठित होता, या रा. प्रियोळकरांच्या विधानास पुष्टि दिली आहे, तीही युक्तच आहे. यापुढें श्रीमंतांनीं या स्वयंवराख्यानाचा मूळ पाठ कोणता असावा या विषयासंबंधानें आजपर्यंत कोणीं कोणीं प्रयत्न केले वगैरे संक्षिप्त ऐतिह्य देऊन आपण स्वतः या महत्त्वाच्या कार्याकरितां कोणकोणते प्रयत्न केले तें निवेदित केलें आहे. तें सर्व वस्तुस्थितीस धरून असल्यामुळें तें वाचून कोणाच्याहि मनांतील श्रीमंतांविषयींचा आदर द्विगुणित झाल्यावांचून राहणार नाहीं. यापुढें प्रस्तुत काव्याचा मूळ पाठ ठरविण्यास रा. प्रियोळकर यांनीं कोठकोठून प्रती पैदा केल्या, त्यांना या कामीं किती श्रम पडले, वगैरे सांगून त्यांनीं मुद्रित केलेली प्रस्तुतची प्रत आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व प्रतींपेक्षां मुळास जास्त धरून आहे असें सांगितलें आहे व त्याचप्रमाणें रा. प्रियोळकरांनीं चिकित्साबुद्धीनें प्रमाणयुक्त जी प्रस्तावना लिहिली आहे, विशेषतः पाठभेद ठरविण्यासंबंधानें जें विवेचन केलें आहे, तें विद्वत्तापरिपूर्ण आहे असें सांगून रा. प्रियोळकरांचा गौरव केला आहे तो समुचित आहे. यापुढें श्रीमंतांनीं रा. ब. धुरंधर यांनीं या आख्यानांतील कांहीं विशिष्ट प्रसंगांच्या वर्णनाला अनुसरून जीं चित्रें काढून दिलीं आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानून आपली प्रस्तावना संपविली आहे.

या श्रीमंतांच्या प्रस्तावनेंत व रा. प्रियोळकर यांच्या विवेचनांत मूळ प्रत याबद्दल 'संहिता' हा शब्द योजिला आहे. या पवित्र शब्दाच्या योजनेचें कारण काय हें समजत नाहीं. पाणिनीनें 'परः संनिकर्षः संहिता' असे संहिता हा शब्द वर्णांच्या द्रुतोच्चारासंबंधानें योजिला आहे. म्हणजे प्रत्येक वर्णोच्चारास अवश्य जो काळ मध्यें सोडावा लागतो, तेवढाच सोडून क्रमानें वर्णांचे उच्चार केले म्हणजे ती संहिता होय, असें त्यानें सांगितलें आहे. प्रत्येक पदाच्या शेवटीं विश्रांति घेऊन वेदाचें पठण केलें म्हणजे तीं पदें झालीं. अशा परस्परसाक्षेप या संज्ञा आहेत. म्हणून ज्यांचा पदपाठ नाहीं, त्या उपनिषद्, ब्राह्मण वगैरे मूळ ग्रंथांस संहिता या शब्दानें संबोधण्याचा संप्रदाय नाहीं व त्याही संज्ञा केवळ वेदग्रंथालाच योजण्याचा संप्रदाय आहे. त्यामुळें 'संहिता' या शब्दास

पावित्र्यपूर्ण गांभीर्य आलें आहे. व म्हणूनच संहिता हा शब्द गीतेसारख्या पवित्र ग्रंथासही लावला जात नाहीं. मग कालिदासादि अभिजात कवींच्या ग्रंथास तो लावीत नसत हें काय सांगावयास पाहिजे ? ग्रंथ अशा अन्वर्थतेनें तो लावण्यास काय हरकत असें कोणीं म्हटलें तर 'उपनिषद्' हा शब्द शाळेंत शिक्षकापुढें वाचल्या जाणाऱ्या ग्रंथास किंवा 'गोशब्द[१]' हा चालणाऱ्या पुरुषासहि लावतां येईल. परंतु 'योगाद्रूढिर्बलीयसी' या न्यायानें तसें कोणी करीत नाहीं.तेव्हां विशेषतः धार्मिक भावनेनें पूज्य असणाऱ्या ग्रंथांस उपयोजिलेले शब्द काव्यनाटकादिकांस लावणें हें धर्मभावनाशैथिल्यद्योतक होईल कीं नाहीं याचा धार्मिक विचारी वर्गानें विचार करावा.

यापुढें रा. प्रियोळकर यांनीं 'प्रास्ताविक' या मथळ्याखालीं ५४ पानांची प्रस्तावना दिली आहे. त्यांत प्रथमतः रघुनाथपंडित चंदावरकर हा तंजावरचा राहणारा असून हा श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांच्या अष्टप्रधानांतील पंडितराव या पदावर अधिष्ठित होता, ही गोष्ट विविध प्रमाणांनीं निश्चित केली आहे, व भाषानियमानुसार 'तंजावर' या शब्दापासून 'चंदावर' हा शब्द निष्पन्न होतो असें सिद्ध करून 'कथा ऐसी चंदावरकर रघूनाथचि करी' या उक्तीवरून हाच रघुनाथ चंदावरकर दमयंतीस्वयंवराख्यानाचा कर्ता रघुनाथपंडित म्हणून निश्चित केलें आहे. प्रस्तावनेंतील हा सर्व भाग प्रमाणपुरःसर विवेचक बुद्धीनें लिहिला असल्यामुळें विद्वानांनीं विचारणीय असा झाला आहे.

यापुढें रघुनाथपंडितासंबंधानें लोकांत कांहीं भ्रामक समजुती प्रचलित होत्या व आजही आहेत, त्यांचा उल्लेख करून प्रस्तुतचा रघुनाथपंडित हा गोमांतकांतला नव्हे, रघुनाथ गणेश नवहस्त नव्हे, 'राजव्यवहारकोश'कर्ता रघुनाथपंडित नव्हे, या रघुनाथपंडिताची व देवनाथाची भेट झालेली नाहीं, व 'म्हातारा बहु जाहलों' हें पद्य या रघुनाथपंडिताचें नव्हे, वगैरे गोष्टी विविध प्रमाणांनीं विवेचिल्या आहेत, त्या युक्त दिसतात. परंतु त्याची योग्य चिकित्सा ऐतिहासिकांनीं करणें योग्य असल्यामुळें आम्ही त्याविषयीं विशेष ऊहापोह करीत नाहीं. यापुढें या आख्यानाचा रचनाकाल ठरवितांना आनंदतनय व सामराज या कवींच्या आख्यानांतील सदृशवर्णनात्मक असणारे उतारे व सदृश क्रियापदांची व शब्दांची घडण वगैरे दाखवून हे तिघेही कवि समानकालीन व परस्परोपजीवी होते असें म्हटलें आहे. तेंही इतिहास व भाषाशास्त्र यांतील मर्मज्ञांनीं विचारणीय आहे.

यापुढें या कथानकांतील वर्णनशैलीचें वर्णन करून या स्वयंवराख्यानांत व याच कवीनें केलेल्या गजेंद्रमोक्षांत समान श्लोक, पदें वगैरे आढळतात, तेव्हां या कवीपाशीं कल्पनासंपत्ति व शब्दसामग्री विशेष नसावी असें जें कांहीं अमार्मिकांनीं कुचोद्य केलें होतें त्यास योग्य उत्तर दिलें आहे. तथापि यासंबंधानें आम्हांला

---

१. 'गच्छतीति गौः' अशी त्याची व्युत्पत्ति आहे.

एक गोष्ट सुचवावीशी वाटते. ती ही की, हल्लींप्रमाणें पूर्वी हिंदुस्थानांतील निर-निराळ्या भागांचें परस्परांशीं दळणवळण नसल्यामुळें जे थोडेसे विद्वान लोक विविध प्रदेशीं जात येत त्यांत असेही कांहीं बिलंदर असत की दूरच्या प्रदेशांत कांहीं शास्त्रीय कोट्या, सरस कविता, स्फुट काव्यें वगैरे त्यांस आढळली, म्हणजे ते त्यांचा संग्रह करून प्रसंगविशेषीं, हे आपल्याच कल्पकतेचे विलास म्हणून दडपून देत असत व हें त्यांचें शाठ्य पचूनही जात असे. ही गोष्ट 'साहित्यपाथोनिधिमन्थनोत्थं कर्णामृतं रक्षत हे कवीन्द्राः। यत्तस्य दैत्या इव लुण्ठनाय काव्यार्थचौराः प्रगुणीभवन्ति ॥' या कल्हणाच्या उक्तीवरून अथवा 'दुर्वृत्ता जारजन्मानो हरिष्यन्तीति शंकया। मदीयपद्यरत्नानां मञ्जूषैषा विरच्यते ॥' या जगन्नाथाच्या भामिनीविलासांतील शेवटल्या पद्यावरून स्पष्ट होत आहे. काव्यमीमांसेंतही राजशेखरानें या गोष्टीचें विवेचन केलें आहे. तात्पर्य, हा काव्यचौर्यप्रकार वरच्या दर्जाच्या कवींस बराच जाणवत असे हें यावरून उघड होत आहे. तेव्हां त्याचा परिहार करण्याकरितां हा एक उपाय असे की, आपल्या निरनिराळ्या काव्यांत कांहीं समान पद्यें ओविलीं म्हणजे त्या सर्वांचा कर्ता एक अशी विद्वानांची खात्री व्हावी, व कविवंचकास लबाडी करण्यांस सांपडूं नये. तात्पर्य, आपल्या निरनिराळ्या काव्यांचें एककर्तृत्व सिद्ध होण्याला काव्याच्या शेवटीं सर्वत्र जसा नामनिर्देश करणें (स्वयंवराख्यानांत तर मध्येंही वारंवार नामनिर्देश केले आहेत) अवश्य, तसेंच हाही एक मार्ग कवि अवलंबीत असत. तेव्हां आपल्या निरनिराळ्या काव्यांत समान पद्यें गोवणें हें प्रतिभा व शब्द यांच्या दारिद्र्याचें सूचक नव्हे, तर आपलें काव्य सरस असल्यामुळें त्याचा सामान्य कवींकडून अपहार होण्याचा संभव आहे म्हणून त्यांचें संरक्षण करण्याकरितां अशा तऱ्हेची पद्यावृत्ति ही एक प्रकारची मंजूषाच समजून तिचा उपयोग प्राचीनकाळीं करीत असावेत, असें समजणेंच युक्त होय. संस्कृतांतही भवभूति वगैरे सन्मान्य कवींनीं हीच पद्धति अंगीकारलेली आहे.

रघुनाथपंडितांच्या सृष्टिवर्णनांत अतिशयोक्ति फार असते, असा कांहीं मृदुबुद्धीच्या लोकांचा आक्षेप आहे. त्यास प्रियोळकरांनीं योग्य उत्तर दिलें आहे. शिवाय अतिशयोक्ति हा शब्द सापेक्ष आहे. तेव्हां हा दोष कविसंप्रदायावरूनच ठरवावा लागतो. नाहीं तर चंद्रवदना, कमलनयना, सुहास्यज्योत्स्ना वगैरे सरस उपमा आणि रूपकें हींही अतिशयोक्तिदोषकलंकित समजावीं लागतील. तात्पर्य, अतिशयोक्ति हा दोष संस्कृतप्राकृत-साहित्य-वाङ्मयाची परिपाठी पाहूनच ठरविला पाहिजे. दंडीप्रभृति साहित्यकोविदांनीं काव्यांत अतिशयोक्तीला महत्त्व देऊन हिच्यावरच पुष्कळ अलंकार अवलंबून असतात असें म्हटलें आहे.

यापुढें रघुनाथपंडित हे रामभक्त होते ही गोष्ट त्यांच्या काव्यांतील उतारे देऊन सिद्ध केली आहे ती यथार्थ आहे. परंतु येथें प्रस्तुत कवि रामदासांचा

भक्त होता म्हणून त्यानें गुरूच्या उपास्य देवतेची उपासना स्वीकारली असा जो तर्क केला आहे तो विशेष ग्राह्य वाटत नाहीं. कवीच्या कुलांत रामोपासना परंपरेनें चालत आली असावी व म्हणूनच त्याचें नांव रघुनाथ असें वडिलांनीं ठेवलें असेल व या प्रंपराप्राप्त रामोपासनेमुळेंच तो रामदासांचा भक्तही झाला असेल असा तर्क करणेंच आम्हांस विशेष प्रशस्त वाटतें.[१]

'रघुनाथपंडितांसंबंधीं किरकोळ उल्लेख' या सदरांत ऐतिहासिक कागदपत्रांतील बरेच उल्लेख निर्दिष्ट केले आहेत, ते तज्ज्ञांनीं विचारणीय आहेत. त्यांतील कांहीं शब्द अपरिचित आहेत व कांहीं अशुद्धमुद्रित झाले आहेत असें वाटतें; उ. सादल्य, दाना, दिक्षिती, तार्तम्य इ. शब्द अशुद्ध असावेत व पदाचे समर्यी, जामेवार, बाला, बराला, पाचाडांत वगैरे शब्द दुर्बोध आहेत. त्यांच्यापुढें कंसांत त्यांचे पर्याय दिले असते तर बरें झालें असतें. यापुढें लेखकानें आपला विनीत भाव प्रकट केला आहे तो त्यांच्या सौशील्यास शोभणारा आहे. यानंतर या आपल्या ग्रंथपरिशीलनास उपयोजिलेल्या आधारग्रंथांची पुरवणी यादी म्हणून दिली आहे. त्या ग्रंथांचीच संख्या जवळ जवळ पन्नास आहे. त्यावरून रा. प्रियोळकरांनीं या छोट्या काव्यासंबंधानें किती परिश्रम घेतले याची कल्पना होते व त्यांविषयीं एक प्रकारचा आदरही वाटूं लागतो. एथें रा. प्रियोळकरांची प्रस्तावना संपते.

यापुढें रा. ब. धुरंधर यांनीं आख्यानांत वर्णिलेल्या कांहीं प्रसंगांचीं सुमारें २० सुंदर चित्रें चितारलेलीं यांत दिलीं आहेत, त्यांनीं या पुस्तकास विशेष शोभा आली आहे. श्रीमंत औंधसंस्थानाधिपति हे आज निष्णात चित्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत. ही त्यांची प्रसिद्धि त्यांचे या कलेवरील विविध मार्मिक लेख, त्यांनीं स्वतः काढलेलीं विविध चित्रें व त्यांच्या वाड्यांतील चित्रसंग्रह पाहिला म्हणजे अगदीं योग्य आहे असें कोणीही विद्वान् कबूल करील. तेव्हां अशा अभिजात चित्रकलाभिज्ञांनीं प्रशंसिलेलीं हीं चित्रें कला या दृष्टीनें परिपूर्ण नाहींत असें कोण म्हणेल ! असें आहे तरी कला या दृष्टीनें नव्हे, परंतु वस्तुस्थिति या दृष्टीनें, कांहीं शंका उद्भवतात, त्या पुढें मांडणें हें एक कर्तव्य म्हणूनच पुढें मांडण्याचें धाडस करीत आहों. त्यांत किती तथ्य आहे याचा विद्वानांनीं विचार करावा.

१. वैदिक अथवा पौराणिक वाङ्मयांत अग्नीचें जें वर्णन आहे त्यांत त्याला चार शिंगें (चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादाः; सप्तहस्तश्चतुःशृंगः) आहेत. परंतु चित्रांक नं० १३ यांत त्याला पांच शृंगें दाखविलीं आहेत त्याचें कारण काय ?

---

१. रघुनाथपंडितांच्या काव्यनिर्मितींत 'रामदासवर्णन' हें एक काव्य असून तें रामदासी लोकांच्या पठणांत असतें असें मला कुर्डुवाडीजवळील एक विद्वान् रामदासी यांनीं सांगितल्याचें स्मरतें. यावरून रघुनाथपंडित हे रामदासभक्त होते व त्यांनींच रामदासवर्णन केलें आहे या दोन्ही गोष्टी प्राचीन विद्वानांत प्रसृत आहेत हें सिद्ध होत आहे.

२. प्रस्तुत आख्यानांतील हंस हा सुवर्णाचा आहे असें वर्णिलें आहे. (तया हंसांचे देह कांचनाचे । पक्ष झळकती वीज जशी नाचे ॥ व श्लोकांक ४८ ८४, ८७, ९७, ११४, ११८ इ.) परंतु चित्रांक ११ यांत श्वेतवर्ण दाखविला आहे तें कां ?

३. राजहंसाचे पाय व चोंच आरक्त असतात यास 'राजहंसास्तु ते चञ्चुचरणैर्लोहितैः सिताः' । असा कोश प्रमाण आहे. कांहीं ठिकाणीं त्याचे नेत्रहि आरक्त असतात असें वर्णन आहे (' कस्त्वं लोहितलोचनास्यचरणो हंसः कुतो मानसात्'). प्रस्तुत आख्यानांतहि 'रंग माणिकसे चंचुचे पदाचे' असें चोंच व पाय आरक्त आहेत म्हणून वर्णिलें आहे. बगळ्यांत व हंसांत हाच विशेष आहे. बगळ्याचे पाय व चोंच पिवळसर असतात. हंसाचे ते तांबूस असतात. असें असतां चित्रांक ११ यांत ते बगळ्यासारखे पिवळसर कां दाखविले ? ' विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ' याप्रमाणें येथेंहि ' राजहंसं प्रकुर्वाणो रचयामास किं बकम् ! ' असें चमत्कारिक होत नाहीं का ?

४. राजसिंहासन म्हणजे त्याच्या खुरावर अथवा मध्यें कोठें तरी सिंहाकृति कोरलेली असते,[1] व अशा प्रकारची त्या आसनावर आकृति असल्याशिवाय त्यास सिंहासन म्हणतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. चित्रांक १३ यांतील सिंहासनास तशी कांहीं खूण नाहीं. फक्त एका बाजूस हत्ती उभा असल्यासारखा दाखविला आहे. कदाचित् त्याचा सिंहासनाशीं कांहीं संबंधहि नसेल. ऐरावत म्हणून तो इंद्राजवळ दाखविला असेल. तेव्हां प्रस्तुतचें देवेंद्राचें सिंहासन बरोबर होईल का ?

५. नळराजा उद्यानांत गेला असतां त्या प्रसंगांत घोड्यावर बसलेला, घोड्यावरून उतरलेला, हंस धरीत असलेला व हंसाला सोडून दिल्यावर त्याकडे पाहत असलेला अशा प्रसंगांचीं त्याचीं चित्रें चित्रांक ४, ६, ७ व ८ यांत दिलीं आहेत. हा सर्व व्यवहार एक दीड तासांत घडलेला आहे. या वेळीं पोषाक बदलण्याचा कांहीं संभव नाहीं; असें असतां नळाच्या डोक्यावरील फेटे, अंगांतील अंगरखे हे भिन्न भिन्न रंगांचे दाखविले आहेत. ते त्या प्रसंगीच्या वस्तुस्थितीला धरून होतील का ?

६. श्रीमंत औंध संस्थानाधिपति यांचा प्रथम पानावरील भव्य फोटो पाहिला म्हणजे चित्रांक १९ या विवाहकालीन दरबारांत उजव्या बाजूस शिरपेंचयुक्त दक्षिणी ब्राह्मणी पागोटें घातलेलें चित्र पहिल्या चित्राचीच लहान स्वरूपांतील प्रतिकृति आहे असें कोणासहि समजून येईल. व त्या दरबारांत श्रीमंतांचा

---

१ ' सिंहचिह्नितं सिंहोपलक्षितं वा आसनं सिंहासनम्' अशी सिंहासनशब्दाची व्युत्पत्ति असून 'सिंहान्वितानि ज्ञेयानि चरणानि'—अशी याविषयीं वचनेंहि आहेत.

समावेश झाला म्हणून समाधानहि वाटेल. परंतु या दाक्षिणात्य ब्राह्मणराजास मराठीपगडीवाल्या नृपतींच्या मागें बसविल्याबद्दल अनौचित्य घडलें असेंही वाटेल. कारण तो काल कांहीं प्रस्तुतच्या कालाप्रमाणें ब्राह्मणाच्या अवहेलनेचा नव्हता हें खास. तेव्हां चित्रांत श्रीमंतांना मागें कां बसविलें ?

असो. याप्रमाणें वस्तुस्वरूप, समयौचित्य वगैरे दृष्टींनीं ज्या शंका वाटल्या, त्या पुढें ठेविल्या आहेत. त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार मर्मज्ञांनीं करावा.

यापुढें साधनचिकित्सा व पाठचिकित्सा हा भाग आहे. त्यांत या स्वयंवराख्यानाच्या निरनिराळ्या ठिकाणीं व काळीं मुद्रित झालेल्या बारा प्रती व लेखी पांच प्रती अशा प्रती जमविल्या व विचार करून मूळ पाठ निश्चित केला आहे असें रा. प्रियोळकरांनीं सांगितलें आहे. त्यांनीं असे परिश्रम केले असले तरी प्रस्तुतची प्रत अगदीं मुळाबरहुकूमच झाली आहे असें खात्रीनें सांगण्याचें धाष्टर्य कोणासही करतां येणार नाहीं. कारण बराच काल लोटल्यावर अगदीं मुळाबरहुकूम प्रत तयार करणें जवळ जवळ अशक्य कोटींतलें आहे. भारत, रामायण, कालिदास, भवभूति यांचे ग्रंथ पाहिले म्हणजे त्यांतील पाठभेदांचा उलगडा करणें हें ब्रह्मघोटाळ्यासारखेंच दुष्कर वाटतें. फार काय, आज प्रत्यक्ष रघुनाथपंडित अवतरले व त्यांना हल्लींच्या प्रती देऊन त्यांवरून तुमची मूळची अस्सलबरहुकूम प्रत तयार करून द्या म्हणून म्हटलें, तर देतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. प्रत्यक्ष भगवान् कृष्णाचीच गोष्ट सांगतात की, कौरव-पांडव युद्ध समाप्त होऊन बराच काळ गेल्यानंतर कांहीं जिज्ञासूंनीं त्याला आपण अर्जुनास उपदेशिलेली गीता तशीच आतां आम्हांस सांगावी अशी प्रार्थना केली असतां ती गोष्ट कृष्णांनीं अशक्य म्हणून नाकारिली. तात्पर्य, दीर्घकाल समाजांत ज्याचा विशेष प्रचार आहे, असा ग्रंथ मूळ स्वरूपांत राहणें कठीण आहे. असें आहे तरी, पूर्वापरसंदर्भ, ग्रंथकाराची विशिष्ट घाटणी, तत्कालीन ग्रंथांवरून आढळणारी त्या काळची भाषापद्धति, लेखकाच्या चुका होण्याच्या पद्धति, विद्वानांचे व सामान्य व्युत्पन्नांचे पाठांत बदल करण्याचे हेतु, वगैरे गोष्टींचा विचार चिकित्साबुद्धीनें केला असतां बरेंच मूळप्रतीजवळ जातां येतें, व याच दृष्टीनें चिकित्सकांचा प्रयत्न सुरू असतो. रा. प्रियोळकर यांनीं पाठभेद कां होतात याचीं जीं कारणें दिलीं आहेत, त्यांचा विचार केला असतां वाटूं लागतें की, समुद्राच्या तळांतून रत्नें काढतां येतील, परंतु मूळ पाठ ठरवितां येईल कीं नाहीं, ईश्वर जाणे. प्रस्तुत काव्यांत लेखकाचें अज्ञान, हस्तदोष, दृष्टिदोष वगैरे पाठभेद होण्याचीं सर्व कारणें असून शिवाय साधारण व्युत्पन्न अशा कीर्तनकारांच्या बुद्धिदोषाचीही भर पडलेली असावी. या आख्यानांतील प्राकृतवृत्तबाहुल्य, चूर्णिका वगैरे पाहिलें म्हणजे हें आख्यान कीर्तनकारास उपयुक्त व्हावें हा कवीचा हेतु दिसून येतो, व मग नटगणक-

चिकित्सकवर्गांतच हरदासांचाही समावेश होत असल्यामुळें त्यांच्या कोत्या व्युत्पन्नतेनें व कांहींच्या सरस कल्पनेमुळेंही मुळांत बदल होणें अपरिहार्य आहे.

येथें एक गोष्ट या पाठभेदांसंबंधानें वाचकांपुढें ठेवणें अवश्य वाटतें. ती गोष्ट म्हणजे आपण सर्व पाठभेदांस अशुद्ध समजतों, तें युक्त आहे कीं नाहीं हा विचार ही होय. कांहीं मार्मिक विद्वान् पूर्वापरसंगति, कवीचा अभिप्राय, रसनिष्पत्ति वगैरे सर्व गोष्टी जाणून एखाद्या ठिकाणीं असा मनोरम पाठ सुचवितात कीं, त्या वेळीं मूळ कवि प्रत्यक्ष आविर्भूत होईल तर हा पाठ सुचविल्याबद्दल त्या मार्मिक वाचकाला मनःपूर्वक धन्यवादच देईल. तेव्हां असे सरस पाठभेद अशुद्ध मानावेत कीं काय ? तुम्हांस मूळ कृति कायम ठेवावयाची असेल, तर पाठचिकित्सा करून ती ठरवा व तीच मूळ कृति म्हणून तिच्याविषयीं काय आदर दाखवावयाचा असेल व आनंद मानावयाचा असेल तो खुशाल माना. परंतु सरस पाठभेदांना अशुद्ध मानून त्यांस हीनत्व देऊं नका. त्याबद्दल हा पाठ सरस आहे असा गौरवयुक्त निर्देश करून तो संग्रहित करा; उदा. उत्तररामचरितांतील 'अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत्' या श्लोकांतील 'एवं'च्या बद्दल 'एव' असा सुचविलेला पाठ आपणांस अशुद्ध म्हणून त्याज्य पाठभेद असें म्हणतां येईल काय ? प्रस्तुत काव्यांत अशीं कांहीं स्थलें आहेत; उ. 'मर्दे भरोनि बोलतो' असा रा. प्रियोळकरांनीं पाठ निश्चित केला आहे; परंतु यापेक्षां 'मुर्दे भरोनि डोलतो' हा पाठ सरस नाहीं का ? 'छाया तियेसि दुसरी तिसरी वनाळी । जी सोवळी युवति तुल्य दिसे निराळी ॥' असा रा. प्रियोळकरांचा पाठ आहे, व येथील 'सोवळी' याचा सौम्य नाजूक असा अप्रसिद्ध अर्थ दिला आहे. परंतु यापेक्षां 'सावळी' असा पाठ प्रस्तुत स्थलीं सरस नाहीं का ठरणार ? तात्पर्य, असे मूळ काव्यास विशेष शोभा आणणारे व कवीच्या हेतूस पुष्टि देणारे पाठभेद मुळाहून निराळे असले, तरी त्यांस केवळ पाठभेद म्हणून उपेक्षणीय न समजतां त्यांचा गौरवपूर्वक निर्देश करणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें. नाहीं तर सरस बुद्धीच्या मार्मिक विद्वानांच्या कौशल्यास आपणांस पारखें व्हावें लागेल.

या प्रकरणांत रा. प्रियोळकर यांनीं पाठचिकित्साविषयासंबंधानें पाश्चात्यांनीं किती परिश्रम केले आहेत, त्यासंबंधानें शास्त्रीय नियम कसे तयार केले आहेत, वगैरे गोष्टी सांगून या विषयाचें महत्त्व दर्शविलें आहे, व पुढें महाराष्ट्रीय विद्वानांची या विषयासंबंधीं अनास्था, अंधपरंपरासक्ति वगैरे कांहीं दोष सांगून नंतर या प्रस्तुत काव्याच्या पाठचिकित्सेकडे ते वळले आहेत. त्यांत अपपाठ कसे होतात याविषयीं त्यांनीं जें विवेचन केलें आहे तें मार्मिक आहे. संस्कृत ग्रंथांपेक्षां चालू भाषेंतील काव्यांत अपपाठ होण्याचा विशेष संभव असतो. कारण चालू भाषेंतील एखादें सुंदर काव्य अथवा पद वगैरे जनतेच्या पाठान्तरांत येऊन त्यांत जो तो

आपल्या अज्ञानानें अथवा ज्ञानानेंही फरक करीत असतोच. या मानानें संस्कृत भाषेबरोबर अर्वाचीन काळीं जनतेचा परिचय नसल्यामुळें तो त्या भाषेंतील गद्य-पद्यांत बुद्धिपुरःसर फरक करण्याचें साहस करीत नाहीं. चुकून काय प्रमाद होतील तेवढेच अपपाठ होतात.

यापुढें या स्वयंवराख्यानाचें मूळ (अर्थात् पाठचिकित्सापद्धतीनें शुद्ध केलेलें) देऊन शेवटीं अर्थोद्घाटक व विवेचक अशा टीपा दिल्या आहेत. रा. प्रियोळकर यांनीं कांहीं प्रस्तुत अपरिचित असणाऱ्या शब्दांचे अर्थ देतांना प्राचीन मान्य कवींचे उतारे देऊन विशिष्ट अर्थ घेण्याविषयीं जो खुलासा केला आहे, तो फार महत्त्वाचा आहे. त्यावरून त्यांचा मराठीवरील दीर्घ व्यासंग, धारणा व प्रतिभा यांची ओळख होते. हे प्राचीन शब्दार्थ व या शब्दांची व क्रियापदांची रूपपद्धति माहीत नसल्यामुळें अर्वाचीन विद्वानांच्या हातून शुद्धीकरण म्हणून कसे अपपाठ केले गेले हें पाहिलें, म्हणजे 'मानवाः स्खलनशीलाः' ही उक्ति उत्तम रीतीनें पटते.

याप्रमाणें प्राचीन पद्धतीची माहिती व चिकित्साबुद्धि वगैरे गोष्टींनीं रा. प्रियोळकरांनीं जरी सदरहू आख्यानाचा अर्थ चांगल्या रीतीनें बसविला आहे, तरी 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' या न्यायानें अथवा 'भिन्नरुचिर्हि लोकः' असें समजून कांहीं ठिकाणीं दुरुस्ती व कांहीं ठिकाणीं भिन्नार्थ आम्हांस सुचवावेसे वाटतात. त्यांचें रा. प्रियोळकरांनीं व इतर साहित्यभक्तांनीं आलोचन करून युक्तायुक्ततेनुरूप ग्रहण अथवा परिहार करावा अशी विनंति करून या चर्चेस आरंभ करितों.

(१) 'चंद्रासि लागति कळा उपराग येतो ।
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो ।
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ।
नाहीं समान नळराज- महायशाला ॥'

असा पांचवा श्लोक आहे त्यांत चंद्र, गंगा व मौक्तिक हे तीन पदार्थ उपमान आहेत. या तीन्ही उपमानांत न्यूनत्व कोठें श्लेषानें व कोठें सामान्य पदानें सुचवून व या गोष्टी नळराजाच्या यशाचे ठिकाणीं नाहींत म्हणून तें गंगादि पदार्थांहून श्रेष्ठ ठरविलें आहे व व्यतिरेकालंकार केला आहे. अर्थात् गंगेला भंग म्हणजे श्लेषानें लहरी व नाश दर्शविले आहेत; चंद्राला कळा लागतात (कळेची अपेक्षा आहे अर्थात् स्वयं अपूर्ण आहे); उपरागश्लेषानें ग्रहण व मालिन्य येतें म्हणजे तें त्याचे ठिकाणीं आहे व या दोन गोष्टींमुळें तो चंद्र नलराजयशाहून कमी दर्जाचा; मौक्तिक हें चूर्ण होय म्हणजे होतें; म्हणजे श्लेषानें भुकटी होणें व नाश पावणें या दोषांनीं युक्त; नलाचें यश अविनाशी, तेव्हां तें मौक्तिकापेक्षां श्रेष्ठ; असा सरळ अर्थ आहे. येथें रा. प्रियोळकरांनीं कला याचा अर्थ कपट, लबाडी, उपराग याचा अर्थ लोकप्रवाद, पाणउतार याचा अर्थ पाणउतारा—अप-

मान वगैरे घेऊन ते नळराजाला अनुलक्षून आहेत असें म्हटलें आहे. येथील हीं विशेषणें नळाकडे लावण्याचें प्रयोजनच नाहीं, व पाणउतारा-अपमान हें विशेषण नळाकडे लावणें अप्रस्तुत व अनुचित आहे असें आम्हांस वाटतें.

(२) श्लोक ६ यांतील 'याजी धनें न्यावया' या वाक्यांत असलेलें 'धनें' हें बहुवचन संस्कृत वाक्प्रचाराप्रमाणें उपयोजिलें आहे असें म्हटलें आहे. परंतु हा संस्कृत वाक्प्रचारही अवयवीभूत पदार्थांचें बाहुल्य सुचविण्याकरितां असतो. त्या दृष्टीनें येथें 'धनें' याचा अर्थ हिरे, माणिकें, मोतीं, सुवर्ण वगैरे अनेक प्रकारचीं धनें असा समजावा. नुसता वाक्प्रचार नव्हे.

(३) श्लोक ८ यांतील अर्थासंबंधानें बराच घोटाळा दिसतो. प्राचीन विद्वानांनीं 'नाडीज्ञान जयाचें' असा पाठ घेऊन 'सरोगबंधु' हें विशेषनामासारखें मानून त्याचा अर्थ सरोग-रोगसहित-क्षयी असा जो चंद्र त्याचा बंधु-भाऊ-(चंद्र व धन्वंतरि हे दोघेही समुद्रापासून उत्पन्न झाले असल्यामुळें ते परस्परबंधु होत.) धन्वंतरि असा केला आहे. धन्वंतरि हा वैद्य आहे ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. तेव्हां नळाचें नाडीज्ञान म्ह० नाडीपरीक्षा इतकी उच्च होती कीं त्याच्यापुढें प्रत्यक्ष धन्वंतरिही पशु समजावा, असा अर्थ केला आहे. रा. प्रियोळकरांचें म्हणणें नळ हा उत्तम वैद्य होता असें पुराणकाव्यादि ग्रंथांत उपलब्ध होत नसल्यामुळें असा अर्थ करणें युक्त नव्हे म्हणून ते 'नाडीज्ञान जयां जे' असा पाठ घेऊन प्रथमार्थांत अश्विनीकुमारांचें वर्णन आहे म्हणून समजतात. सरोगबंधु याचा अर्थ सरोग-रोगग्रस्त-आजारी लोक. त्यांचे बंधु म्हणजे वैद्य असा घेऊन 'जयां नाडीज्ञान—ज्यांना उत्तम नाडीपरीक्षा होती-व जे सरोगबंधु होते—वैद्य होते—असे जे अश्विनीकुमार' असा करतात. परंतु या अर्थांत नाडीज्ञान व सरोगबंधु हे जवळ जवळ पर्याय होत आहेत. म्हणजे दोन्ही पदांचा अर्थ तात्पर्यंतः एकच होत आहे, व त्यामुळें पौनरुक्त्यदोष किंवा साहित्यशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें तर अपुष्टार्थदोष होत आहे. शिवाय अश्विनीकुमार सुंदर होते अशी पुराणांत प्रसिद्धि आहे. ते सुंदर अश्विनीकुमार नलासारखे सुंदर समजूं नयेत. म्हणजे नल हा त्यांपेक्षां हा सुंदर भावार्थ. तेव्हां अशा सौंदर्यवर्णनाच्या ठिकाणीं अश्विनीकुमार सर्व देवांत सुंदर होते असें त्यांचें वर्णन प्रस्तुतत्वानें उपयुक्त झालें असतें. ते उत्तम नाडीपरीक्षक होते, वैद्य होते, हें सांगण्याचें स्वारस्य काय! याचा उलगडा रा. प्रियोळकरांनीं केला नसल्यामुळें त्यांचा अर्थही विशेषतः पटत नाहीं.

(४) श्लोक ९ यांतील 'विवरलक्ष' याचा अर्थ शत्रूच्या वक्षःस्थलावरील विवर-छिद्ररूपी जें लक्ष—खूण असा केला आहे तो युक्त आहे. तसाच विवराचें जें लक्ष म्हणजे लक्षावधि छिद्रें असाही अर्थ करतां येईल. 'पारिजातलक्ष', 'बिल्व-

लक्ष' म्हणजे पारिजाताची लाखोली, बेलाची लाखोली असा लक्ष याचा अर्थ प्रचारांत आहे.

(५) बाराव्या श्लोकांतील 'क्रीडा करो तुजसवें ललना पलंगीं' हा आशीर्वाद अनुचित दिसतो. कारण या वेळीं या विदर्भदेशाच्या भीमकराजाला चार मुलें झाली होतीं. म्हणजे तो वयस्क व प्रौढ होता. नळासारखा उतावीळ नव्हता व या वेळीं जाणती दमयंतीही तेथें होती. तिच्यादेखत तिच्या वृद्ध बापाला हा आशीर्वाद देणें म्हणजे अनौचित्य दाखविणें होय. तेव्हां हा श्लोक मूळ कवीचा आहे का प्रक्षिप्त आहे याचा विद्वानांनीं विचार करावा.

(६) श्लोक ७५ यांत 'सीतरुचीस नखीं नमयंती' या पदांचा जो अर्थ केला आहे तो बरोबर आहे. 'पदनखरुचिजितमदनः' असें कृष्णाचें वर्णन आढळतें. शिवाय उत्तम व्यक्तीचीं नखें अर्धवर्तुलात्मक व श्वेतवर्ण असतात. तेव्हां या समानधर्मत्वामुळें सीतरुचि म्हणजे चंद्रकला असा अर्थ घेतला तरी प्रस्तुत स्थलीं तो उपयुक्त होत आहे.

'अगणनभणननिपुणफणिमणिमुखीं' याचा अर्थ अगणित बोलण्यांत पटाईत अशा नागराज शेषाच्या मुखीं असा दिला आहे, तो युक्त आहे. परंतु शेषाचें अगणनभणनत्व कशामुळें याचा खुलासा केला नाहीं. शेषाला सहस्र वदनें आहेत ही गोष्ट प्रसिद्ध असल्यामुळें कदाचित् तो खुलासा केला नसेल. परंतु एवढेंच कारण अगणनभणनत्वाला नसून शेषावतार जो पतंजलि त्याच्या महाभाष्यावरून त्याचें अगणनभणनत्व प्रसिद्ध आहे. ही गोष्ट 'नाभौ नाभवमच्युतस्य सुमहद्भाष्यं च नाभाषिषम्' इत्यादि पद्यावरून स्पष्ट होत आहे. तेव्हां अगणनभणनत्व पतंजलि–अवतारावरून शेषाला प्राप्त झालें आहे ही गोष्ट मनांत धरूनही कवीनें असें वर्णन करणें शक्य आहे. 'अगणन' हा शब्द कवीस प्रिय दिसतो. कारण त्यानें 'अशी अगणन गुणकीर्ति नैषधाची.' असा पूर्वी त्याचा उपयोग केला आहे.

'अंसोत्तंसायितताटंका' याचा अर्थ बाहूमुळें अलंकृत झालीं आहेत कर्णभूषणें जिचीं असा करण्यापेक्षां अंसाला–खांद्याला–भूषणभूत झाले आहेत ताटंक जिचे असा अर्थ करणें संप्रदायशुद्ध आहे. कर्णभूषणांतील रत्नांची कांति खांद्यावर पडल्यामुळें त्यांनीं ते भूषित झाले आहेत असें वस्तुस्थितीस अनुसरून हें वर्णन होत आहे.

(७) 'या तारका मदवलोकनसक्त तो कीं। हा नीलिमाच फळला सजणे विलोकीं ॥' या ८० व्या श्लोकांतील उत्तरार्धाचा अर्थ रा. प्रियोळकरांनीं 'तारका' डोळ्यांचीं बुबुळें, 'मदवलोकनसक्त' माझ्या पाहण्यांत गर्क, नीलिमा नीलवर्ण, फळला प्रतिबिंबित झाला, असा करून पुढें "कल्पना अशी कीं दम-

यंतीचे स्तन हें पिवळ्या निंबाप्रमाणें वर्तुळ होते. आणि ती निंबें पाहण्यांत सक्त अशीं नळाचीं बुबुळें त्यामध्यें प्रतिबिंबित झाल्यामुळें स्तनावरील नीळसर भाग अस्तित्वांत आला" असा आशय दिला आहे व याला प्रमाण म्हणून रघुवंशांतील 'दिनेषु गच्छत्सु नितान्तपीवरं तदीयमानीलमुखं स्तनद्वयम् ॥' हा श्लोक आहे. परंतु हें सर्व विवेचन चुकीचें आहे असें आम्हांस वाटतें. स्त्रिया गर्भवती होऊन ६।७ महिने झाले म्हणजे त्यांचे स्तनाग्रभाग नीलवर्ण होतात. एरवीं तसे नीलवर्ण नसतात. अशी वस्तुस्थिति आहे व हेंच वर्णन गर्भवती जी सुदक्षिणा तिचें कालिदासानें केलें आहे. परंतु ही वस्तुस्थिति अवगत नसल्यामुळें रा.प्रियोळकरांनीं ते दमयंतीच्या कुचकलशास चिकटविलें आहे. परंतु हें तिच्या कौमार्याचा विघात करणारें आहे हें त्यांस उमजलें नाहीं. शिवाय 'या तारका' म्हणजे हीं बुबुळें मदवलोकनसक्त याचा सरळ अर्थ 'माझें अवलोकन करण्यांत म्हणजे मला पाहण्यांत आसक्त' आहेत असा होईल तो सोडून माझे डोळे दमयंतीचे स्तन पाहण्यांत आसक्त आहेत असा कांहीं तरी केला आहे. तारका हा कर्ता, मदवलोकनसक्तत्व ही त्याची क्रिया असा येथें अर्थ अभिप्रेत आहे व दमयंतीच्या नील तारका नलावलोकनसक्त झाल्यामुळें नळ हा नीलवर्ण दिसूं लागला. नल हा मेघश्याम होता. त्यावर ही कवीनें त्याच्या मुखीं उत्प्रेक्षा घातली आहे. तात्पर्य, या नीलिम्याचा व स्तनाचा कांहीं संबंध नाहीं. तो मानिला तर भलतेंच कवीनें वर्णन केलें अशी आपत्ति यावयाची. या श्लोकाचा भाव व कालिदासाच्या वर्णनाचा प्रसंग लक्षांत न घेतल्यामुळें हा घोंटाळा झाला आहे.तो युक्त नसल्यामुळें हें जरा विस्तारानें विवेचन केलें आहे.

(८) ८१ पदांतील 'इंद्रादिनुतपद इंद्रावरज मी चन्द्रान्वयास धणी चंद्रानने' या वाक्याचा भावार्थः- इंद्रादिदेवांनीं स्तविलेल्या कृष्णाप्रमाणें मी चंद्रवंशांतील राजा आहें. कृष्ण चंद्रवशांतला प्रसिद्ध पुरुष होता हें पुराणांत प्रसिद्ध आहे. तेव्हां रा. प्रियोळकरांनीं केलेल्या अर्थापेक्षां हा अर्थ सरळ दिसतो.

(९) एक्याणवाव्या चूर्णिकेंत 'कलशजनितमुनिचकित पंच जलधि' असा पदांश आहे. यांतील पंच पदाचा अर्थ बरोबर झाला नाहीं. पृथ्वीच्या भोंवतीं चार समुद्र आहेत अशी पौराणिक प्रसिद्धि आहे. 'पयोधरीभूतचतुःसमुद्राम्' असें कालिदासानें म्हटलें असल्यामुळें कविसंप्रदाय तोच आहे. तेव्हां येथील पंचशब्द संख्यावाचक नसून 'पंचानन' यांतील पंच शब्दाप्रमाणें विस्तृत या अर्थी तो घ्यावा. हा अर्थ येथें उपपन्न होत आहे.

(१०) ११९ या श्लोकाचा अभिप्राय ओळखणें जरा कठीण आहे; करितां तो संपूर्ण श्लोक देऊन त्याची चर्चा करूं. "जो मानसीं विहरतो विहरो परी तो। कां आमुची कुलसती असती करीतो। राखीं नळा निजयशोमय हंसराया। आलों

महीवरी फिरादि असी कराया ॥" रा. प्रियोळकर यांनीं येथें 'सती' या पदाचा देणगी हा अप्रसिद्ध अर्थ घेऊन, नळाचा यशोमय हंस हा आपल्या धवलत्वातिशया-मुळें हंसजातींत कुलपरंपराप्राप्त जी शुभ्रतारूप देणगी ती असती करीतो म्हणजे नाहींशी करतो असा अर्थ दिला आहे व हंस व कीर्ति हीं शुभ्र असतात याविषयीं 'यशसि धवलता वर्ण्यते हंसकीर्त्योः' ह्या कविसमयाचा उल्लेख केला आहे. येथें नलाचा यशोमय हंस हंसाच्या कुलसतीला असती करतो हा अन्वय व वर दिलेला कविसमय हे बरोबर आहेत. परंतु कुलसती शब्दाचा अर्थ काय व त्यांनीं केलेला अर्थ कबूल केला तरी तो येथें उपयुक्त होतो कीं नाहीं, याची चर्चा करावयाची आहे. प्रथम सती याचा अर्थ देणगी हा कोशांत कोठें असला तरी तो विशेष प्रचारांत नसल्यामुळें प्रसिद्ध नाहीं. तेव्हां अप्रसिद्ध अर्थ घेऊन अर्थ करणें युक्त नाहीं. बरें, तो अर्थ घेतला तरी येथें उपयुक्त होत नाहीं. रा. प्रियोळकर म्हणतात हंसघराण्यांतील देणगी म्हणजे शुभ्रत्व. परंतु प्रस्तुतचा हंस शुभ्र नसून सुवर्णकांति होता. तेव्हां याच्या कुलाला देणगी शुभ्रत्वाची नसून सौवर्णवर्णाची होती ही गोष्ट येथें जवळच पूर्वपद्यांत 'कसा झाला तव देह सुवर्णाचा' हें दमयंतीचें वाक्य व 'आम्ही असों नृपसुते तरि कांचनाचे' हें हंसाचें जें भाषण, त्यावरून सिद्ध होत आहे. अर्थात् 'यशसि धवलता वर्ण्यते हंसकीर्त्योः' हा कविसमय विशेष अपवाद म्हणून येथें सोडावा लागतो. म्हणजे रा. प्रियोळकरांनीं "अप्रतिम धवलत्व ही हंसाच्या कुलाची ईश्वरदत्त देणगी आहे. परंतु या हंसापेक्षां नळाचें यश शुभ्रतर ठरल्यामुळें हंसाची ही कुलसती असती म्हणजे हिरावून घेतल्यासारखी झाली" अशी कल्पना केली आहे; परंतु ही त्यांची कल्पना मंदाकिनींतील कनकारविंदाच्या भक्षणामुळें हा हंस सुवर्णमय झाला असल्यामुळें ढासळून पडत आहे. तेव्हां सती याचा अर्थ देणगी वगैरे न करतां आमच्या मतें येथें पुढें दिल्याप्रमाणें कवीचा अभिप्राय समजून अर्थ करावा:—

हे नळा, तुझा यशोमय हंस मानसीं—मानस सरोवर व श्लेषानें सर्व लोकांचीं अंतःकरणें यांत—विहार करतो, तर करूं दे. त्याबद्दल आम्ही तक्रार करीत नाहीं. परंतु आमची कुलसती घरंदाज पवित्र स्त्री हंसी हिला असती करितो. सतीत्वापासून भ्रष्ट करितो. सतीत्वापासून भ्रष्ट होण्याचें कारण नळाचा यशोमय हंस सर्वांच्या मनांत फिरूं लागला, म्हणजे या हंस-स्त्रियांच्या मनांतही फिरूं लागला. व तो विशिष्ट गुणांमुळें त्यांना आवडूं लागला. हेच कुलसतीचें असतीत्व. आपल्या प्रियकराहून इतरांस आपल्या मनांत थारा द्यावयाचा व त्याच्या गुणांमुळें त्यावर अनुरक्तही व्हावयाचें, हें असतीत्वाचें लक्षण होय. तेव्हां हें तुझ्या यशोमय हंसाचें वागणें शिष्टाहत नव्हे, याकरितां त्याला आवरून धर व त्याला योग्य शासन कर. अशा तऱ्हेच्या उत्प्रेक्षा संस्कृ-

तांत आढळतात. 'हे रोहिणि त्वमसि शीलवतीषु धन्या एनं निवारय पतिं सखि दुर्निवारम् । जालान्तरेण मम वासगृहं प्रविश्य श्रोणीतटं स्पृशति किं कुलधर्म एषः ॥' येथेंही अशीच चमत्कृतियुक्त उत्प्रेक्षा कवीनें केली आहे. अथवा येथें तद्गुणपूर्वक भ्रांतिमान् अलंकार मानावा. म्हणजे असा अर्थ होतो की, नळाच्या यशोमय हंसानें म्हणजे यशानें सर्व विश्व श्वेतवर्ण बनविलें असतां हे सुवर्णमय हंसहि श्वेत झाले. तेव्हां त्यामुळें यांच्या कुलसतींना–घरंदाज हंसिणींना–सर्वच हंस शुभ्रवर्ण झाल्यामुळें इतर श्वेतवर्ण हंस व आपले पति, कांचनवर्ण हंस, हे ओळखतां येईनात. व मग त्या मूळच्या श्वेतवर्णीय हंसांशींही ते आपले सहचर म्हणून प्रेमालाप करूं लागल्या व अशा भ्रांतीमुळें त्यांचें सतीत्व नष्ट झालें. भ्रांतिमान् अलंकाराचीं या प्रकारचीं उदाहरणें संस्कृतांत विपुल आहेत. 'कपाले मार्जारः पय इति करान् लेढि शशिनः । तरुच्छिद्रप्रोतान् बिस इति करी संकलयति । रतान्ते तल्पस्था हरति वनिताप्यंशुकमिति । प्रभामत्तश्चन्द्रो जगदिदमहो विप्लवयति ॥' 'पलाशकुसुमभ्रान्त्या शुकतुण्डे पतत्यालिः । सोपि जम्बूफलभ्रान्त्या तमलिं धर्तुमिच्छति ॥' इ.इ. तात्पर्य, सतीशब्दाचा देणगी हा अर्थ घेतला तरी तो पूर्ववर्णनाशीं विरुद्ध होत असल्यामुळें आम्हीं वर दाखविलेल्या पद्धतीनें अथवा अशीच एखादी कल्पना करून या पद्याचा अर्थ करावा असें आम्हांस वाटतें.

(११) "मी जाण देवनळही स्वकरीं धराया । मागेन काय चतुरा मज लाज जाया ॥ काळें करूनि मुख जो वर होय लेखीं । हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी ॥" हा श्लोक श्लिष्ट असल्यामुळें बराच क्लिष्ट झाला आहे. येथें नवनीतकारादि प्राचीन विद्वानांनीं सभंगश्लेषानें ३।४ अर्थ सुचविले आहेत. परंतु उत्तानार्थ कोणता, गूढार्थ कोणता, याची फोड मात्र त्यांनीं केलेली नाहीं. 'अथवा' म्हणून त्यांनीं विविध अर्थ दिले असल्यामुळें ते सर्व अर्थ प्रकृतच वाटतात. येथें कवीस एक प्रकृत अथवा गूढार्थ व दुसरा अप्रकृत अथवा उत्तानार्थ (प्रकटार्थ) असे दोन अर्थ अभिप्रेत आहेत व म्हणूनच त्यानें 'हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी' असें स्पष्ट पुढें सांगितलें आहे. उभयार्थ म्हणजे वरवर दिसणारा एक अर्थ व दुसरा अभिप्रेत असा गूढार्थ. नुसते प्रकृत अर्थच ३।४ प्रकारचे दाखविले, म्हणजे ते उभयार्थ होत नाहींत. उभयार्थ म्हणजे दुहेरी बोलणें, तसेंच या उभयार्थांत एक अर्थ असा पाहिजे की, त्यावरून दमयंती नळाची मागणी करीत आहे हें स्पष्ट झालें पाहिजे. कारण पुढच्याच श्लोकांत 'श्लेषशब्दें इणें भाव सांगीतला । नैषधाधीश तो नाथ मागीतला' असें स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हां कवीस अभिप्रेत असलेले हे उभयार्थ नवनीतांत स्पष्ट केले नसल्यामुळें तेथील अनेकार्थांचें विवेचन निर्णायक होत नाहीं. रा. प्रियोळकरांनीं ३।४ अर्थ दिले आहेत. त्यांत शब्दावरून उघड प्रतीत होणारा अर्थ व श्लेष-

महिम्यानें सुचविला जाणारा अर्थ या दोहोंचें विवेचन केलें आहे. परंतु त्यांनीही प्रकृताप्रकृत किंवा गूढोत्तानार्थ याची चांगली फोड केली नाहीं. तेव्हां येथें कवीस उत्तानार्थ कोणता अभिप्रेत आहे, व गूढार्थ कोणता अभिप्रेत आहे याचें थोडें विवेचन करूं.

उत्तानार्थ अन्वय :— हे चतुरा, मी जाण. (मज) लाज जाया, मुख काळें करूनि जो लेखीं वर होय तो देवनळहि मागेन काय? चवथा चरण सोपा असल्यामुळें त्याची अन्वयार्थ देऊन चर्चा करण्याचें कारण नाहीं.

अर्थ :— हे चतुरा हंसा, मी आतां जाणती झालें आहे. तेव्हां निर्लज्जता प्राप्त करून घेण्याकरतां मी, जो आपलें टोंक शाईत बुडवून काळें करून लेखन-साहित्यांत वर (श्रेष्ठ) होतो, त्या वरूसही मागेन काय? कधींही मागणार नाहीं. तात्पर्य, या वेळीं मला घराण्याच्या लौकिकाकरितां शालीनतेनें कांहीं याविषयीं बोलतां येत नाहीं.

गूढार्थ अन्वय :— हे चतुरा, मी जाण. जो लेखीं मुख (त्या देवनळाला) हे देव नळ या व ही जाया म्हणूनि स्वकरीं धरा असा काळेंकरूनि वर मागेन. (यांत) मज लाज काय?

अर्थ :— हे चतुरा हंसा, मी तूं वर्णिलेले नळाचे गुण जाणत आहें. तेव्हां देवांमध्येंही श्रेष्ठ अशा (त्या नळाला) हे देव नळमहाराज, या आणि ही दमयंती जाया म्हणून स्वकरीं धारण करा (धरा), असा काळेंकरूनि म्हणजे योग्य वेळ आली असतां (अर्थात् स्वयंवरकाळीं) वर मागेन. त्याची प्रार्थना करीन. त्यांत मज लाज काय? त्यांत लाज कशाची? कारण क्षत्रियकन्येला स्वयंवरकालीं पतीची निवड करून मागण्याची पद्धति शिष्टादृत आहे. अर्थात् तसें करण्यांत मला कोणत्याही प्रकारें लाज नाहीं. असे अप्रकृत किंवा उत्तान व गूढ अर्थ केले म्हणजे पुढें सांगितल्याप्रमाणें द्व्यर्थी बोलणें व नळनाथाची श्लेषानें मागणी ह्या दोन्ही गोष्टी जमतात. तेव्हां असा अर्थ करणें युक्त आहे असें वाटतें. येथें संस्कृत नैषधकाव्याप्रमाणें कवीनें असे सामान्य शब्द ठेविले आहेत की, त्यांपासून विविधार्थांची स्फूर्ति व्हावी. परंतु प्रकृतोपयोगी उभयार्थ हुडकून श्लोक लावणें हें विद्वानांचें कर्तव्य आहे. आम्हीं हा एक मार्ग दाखविला आहे. विद्वानांनीं खटपट करून याहून विशेषार्थ प्रकृतोपयोगी दाखविले तर आम्हांस त्यांत आनंदच होईल. अशा श्लोकांचीं चर्चाही 'वादे वादे जायते तत्त्वबोध:' या दृष्टीनेंच करावयाची असते. या श्लोकांतील अनेकार्थी उपयुक्त होणारीं साधारण पदें पाहिलीं म्हणजे नैषधकार श्रीहर्षाची आठवण होते. परंतु या श्लोकाचा गूढार्थ स्पष्ट करणारा नारायणपंडित (नैषधावरील प्रसिद्ध टीकाकार) कोणी झाला नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

(१२) पदक्रमांक १२३ यावर टीपा अवश्य पाहिजेत. सदरहु पद शब्दार्थ-रचनेच्या दृष्टीनें सुंदर आहे. परंतु सर्वसाधारण वाचकांस समजण्यास कठीण आहे.

(१३) 'जे हे दिशापति विशालयशा तशांला। आशावशाकुल अशांत दशा कशाला॥ तूं हे नृपा न वद तूजसमीप येतों। आम्ही मखीं निजमुखीं अवदान घेतों ॥१७४॥' यांतील उत्तरार्ध पूर्वार्धाचा समर्थक आहे. म्हणजे, हे नलराजा, तूं म्हणशील की, हे दिक्पति असणारे देव, यांना पृथ्वीवरच्या पदार्थांची इतकी आशा कां? तर हे नृपेंद्रा, आम्ही पृथ्वीवरलि पदार्थांविषयीं निरिच्छ असतों असें समजूं नकोस. कारण, तुम्ही अशांत (त्वरेनें) जीं कांहीं थोडीशीं क्षुल्लक द्रव्यें फेकतां (हवन करितां) तीं आम्हीं तोंडानें (तोंड पसरून) घेत असतों. तात्पर्य, पृथ्वीवरील पदार्थांविषयींहि आम्ही महालोभी आहोंत.

(१४) १७५वा श्लोक हा संस्कृतांतील उत्तम पताकास्थान आहे. अशी मराठींत पताकास्थानें क्वचितच असतात.

(१५) १८१ या पदांत दातेलोकांचें माहात्म्यपूर्वक संकीर्तन केलें आहे. त्यांत भगीरथाचें वर्णन कशाकरितां? कारण भगीरथ हा दाता म्हणून प्रसिद्ध नाहीं अशी शंका येणें संभवनीय आहे. पण येथें भगिरथाचें जें वर्णन केलें आहे, त्यानें गंगौघ जनतेच्या उद्धाराकरितां भूमंडलावर आणला असें त्याच्या कृतीस समाजकल्याणाचें स्वरूप देऊन त्यास परोपकारी ठरवून दात्यांच्या पंक्तींत गोविलें असावें. 'तेणें गंगौघ आणिला जेणें जनता उद्धरते' या पंक्तीवरून आमचें वरील अनुमान वाचकास पटेल. शिवाय रघुनाथपंडित रामभक्त असल्यामुळें थोर व्यक्तींचें परिगणन चाललें असतां त्यांत त्या घराण्यांतील भगीरथाचा समावेश होणें साहजिक आहे.

(१६) १८२ यातना—अंतकालीन यातना—यमयातना.

(१७) १९० दाक्षिण्य–मनाचें औदार्य, मोठेपणा. 'दक्षिणः सरलोदारः'।

(१८) १९५ या श्लोकाचा भावार्थः— त्या महालांतील स्तंभांमध्यें तेजस्वी हिरे जडविले होते व भिंती पाचूच्या होत्या. अर्थात् त्यामुळें चोहींकडे श्यामलकांति पसरली होती. ती अंधाराप्रमाणें नीलवर्ण होती, हीरकमणियुक्त उभे स्तंभ हे दीपकाप्रमाणें होते. त्यांची कांति श्वेत होती व ती विशेष होती. त्यामुळें ती पाचूच्या कांतीस हतप्रभ करीत होती. रत्नदीपाचें वर्णन संस्कृत वाङ्मयांत बऱ्याच ठिकाणीं आढळतें. 'अर्चिस्तुंगानभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान्। ह्रीमूढानां भवति विफलप्रेरणा चूर्णमुष्टिः ॥' 'अतैलपूराः सुरतप्रदीपाः।' इ. इ.

(१९) १९६ येथें कुरवंदशब्दानें पिवळीं माणकें कवीस अभिप्रेत दिसतात. त्याशिवाय पुढची नीरांजनाची कल्पना उपपन्न होत नाहीं.

(२०) २०६ "राजे असाल तरि धन्य वसुंधरा। शोभाल देव तरि नाक यथार्थ आहे ॥' या श्लोकांतील नाक याचा अर्थ नासिका घेऊन रा. प्रियोळकरानीं पुरुषाला शोभा नासिकेमुळें जशी विशेष तशी तुमच्यामुळें स्वर्गाला विशेष शोभा म्हणून त्याचें 'नाक' हें नाम यथार्थ असा केला आहे. आम्हांला यापेक्षां 'क' सुख, 'अक' दुःख, 'नाक' दुःखशून्य, असा अर्थ घेऊन 'नाक' याची यथार्थता मानणें युक्त दिवतें. 'यत्र नोष्णं न शीतं च न ग्लानिर्नाप्यरातयः।' अशी स्वर्गाची कल्पना आहे. मराठींतील नासिकेचा अपभ्रंश नाकशब्द घेऊन व याबद्दल सर्व शरीरांत नाक श्रेष्ठ ही अर्वाचीन कल्पना घेऊन अर्थ करणें बरें वाटत नाहीं. संस्कृतांत नेत्र, ओष्ठ, दंत यांपेक्षां नाक श्रेष्ठ आहे असें वर्णन कोठेंही आढळत नाहीं. सर्वांचें सारखेंच वर्णन असतें.

(२१) २१० व्या श्लोकांतील 'तृणकणि गणि जैसा त्यासि धैर्यें गणी तो।' या चरणाचा अर्थ स्पष्ट करणें अवश्य आहे.

(२२) २२१ हा श्लोक 'वारा अरूपधर रूप नसेच कामा। तोही पहा परिसतेच अनेक नामा। या पाहते तुज मनोहर रूपधेया। कर्णाभिराम करवी निज नामधेया ॥' असा आहे. याचा अर्थ स्पष्ट करावयास पाहिजे होता. वारा हें अरूप (आकारशून्य) द्रव्य आहे. मदन हा अनंग (अंगशून्य) आहे. परंतु या अशा वस्तूंनाही अनेक नामें आहेत. वस्तुतः हे आकारशून्य असल्यामुळें यांना नांवें नसतीं तरी चालतें. निदान अनेक नामें तरी नको होतीं. परंतु अशा पदार्थांनाही अनेक नामें आहेत. मग मनोहर सौंदर्यानें युक्त अशा तुला मी पाहत आहें (येथें रूपधेय यांतील धेय प्रत्यय नामधेय याप्रमाणें स्वार्थी समजावा.) त्या तुला नांव असलेंच पाहिजे. तेव्हां तें सांगून माझ्या कानाला सुंदर करा, म्हणजे तें सांगा.

(२३) २३८ व्या पद्यांत 'राजीवसुहृत्कुलांबुधिशशी' या पदांतील राजीवसुहृत्कुल याचा अर्थ चंद्रवंश करून तोच कोणी अंबुधि त्याला चंद्राप्रमाणें भरती आणणारा, त्या वंशांत जन्मून आनंदवृद्धि करणारा, असा केला आहे. हें ऋतुपर्णराजाचें वर्णन आहे, व तो अयोध्यावासी आहे. अयोध्येचे राजे सूर्यवंशी आहेत. तेव्हां राजीवसुहृत् म्हणजे सूर्य असा अर्थ घेऊन सूर्यवंशांतील असा अर्थ करावा. ऋतुपर्ण राजा सूर्यवंशांतील म्हणून पुराणांत वर्णन आहे.

(२४) २३९ या पद्यांतील 'जेथें वळी धरुनि पंचनळी बसे ते' यांतील 'पंचनळी' हा शब्द गंगाजमनी दिसतो, असा कांहीं विद्वानांचा अभिप्राय आहे. तो कां? संस्कृतनियमानुसार अष्टाध्यायी, सप्तशती वगैरेंप्रमाणें पंचनली शब्द सिद्ध होत आहे. पुढें अनलचें अनळप्रमाणें पंचनलीचें पंचनळी असें अपभ्रंशानें रूप होत आहे. यांत गंगाजमनीचा काय संबंध? तात्पर्य, व्याकरणी-

षधाचें सेवन न केल्यामुळें बुद्धिभ्रंश झाल्याचें हें नमुनेदार उदाहरण आहे.

(२५) २४१. 'ज्याचीं पदें धरति देव शिरोललामीं' यांतील देवशब्द राजांचा वाचक मानून सर्व राजे ज्याचे पाय मस्तकीं धारण करतात, असा नलपक्षीं अर्थ करतां येईल. 'बहुलोचन' या पदाचा अर्थ इंद्रपक्षीं सहस्राक्ष अभिप्रेत आहेच. परंतु त्याच्या संग्रहीं असलेल्या रंभादि ज्या अनेक (बहु) अप्सरा त्यांचे ठिकाणीं आहे लोचनदृष्टि ज्याची असा अर्थही या पदानें ध्वनित होत आहे. व मग अनेक स्त्रियांवर दृष्टि ठेवणारा चंचलवृत्ति—मधुपवृत्ति—म्हणून वरण्यास अनुचित अशीहि कल्पना करतां येईल.

(२६) २४२. 'मध्यस्थ रूप धरितो हरिचें यमाचें' हरि म्हणजे विष्णु व यम म्हणजे अंतक यांचें मध्यस्थ रूप–साधारणरूप–धरितो, नल राजा धारण करितो. विष्णु हा जगत्पालक असल्यामुळें विशेष मृदु व यम हा जगदंतक असल्यामुळें विशेष प्रखर. तेव्हां यांचें मध्यस्थ रूप म्हणजे अत्यंत मृदु नव्हे व अत्यंत प्रखर नव्हे असें साधारण रूप.

(२७) २४३. 'दक्षिणाशा' विद्वान् चतुर लोकांची इच्छा असाही अर्थ करतां येईल.

(२८) २४४. 'या दास फार म्हणती बहुसौख्यकारी' याचा नळपक्षीं 'या (नळास) दास फार. सेवक फार आहेत, व तें या नळाला बहुसौख्यकारी म्हणती' असा अर्थ करणें युक्त दिसतें. वरुणपक्षीं यादांस, जलांतील जंतूंस, बहुसौख्यकारी, अर्थात् मनुष्याला नव्हे; म्हणून वरण्यास अयोग्य.

(२९) २४५. नंदनविलास– पुत्रविलास हा मुख्यार्थ; नंदनवनांतील विलास हा ध्वन्यर्थ. धनंजय–द्रव्य मिळविणारा–मुख्यार्थ; अग्नीसारखा तेजस्वी हा ध्वन्यर्थ. धर्म जाणतो–धर्मशील–मुख्यार्थ; हा तो धर्मही (यम म्हणून) समज, यमाप्रमाणें समवृत्ति, हा ध्वन्यर्थ. हा विहारी रत्नाकरीं तुज विराजविता–विहार करणारा हा रत्नसमूहानें तुला शोभा आणणारा, हा मुख्यार्थ; रत्नाकरी समुद्रामध्यें विहार करणाऱ्या वरुणाप्रमाणें असणारा (समुद्रावर ज्याचा ताबा आहे असा) नल, हा ध्वन्यर्थ.

(३०) २४७. 'इंद्रादिकां नमस्कारी–' नमस्कार करण्यानें तुम्ही पितृवत् मला पूज्य आहांत. अर्थात् तुमच्याविषयीं पतिभावना माझ्या मनांत उद्भवणें शक्य नाहीं. तेव्हां तुम्ही त्या दृष्टीनें माझ्याविषयीं असलेली भावना दूर करा. आर्य स्त्रिया समाजांत पतीला नमस्कार करीत नाहींत. कारण समाजांत नमस्कार करणें ही गोष्ट एक निराळीच पूज्य भावना उत्पन्न करिते. तेव्हां नमस्कार करणें हा एक सभ्यपणानें मागणीला नकार देण्याचा प्रकार होय.

यापुढें या आख्यानांतील शब्दांचा सार्थ कोश दिला आहे. तो अभ्यास-

कांना उपयुक्त आहे. त्यापुढें चार परिशिष्टें आहेत. त्यांत प्रथम परिशिष्टांत याच कवीचीं रामदासवर्णन व राजेंद्रमोक्ष हीं दोन काव्यें समाविष्ट केलीं आहेत. त्यासंबंधानें प्रस्तुत कांहीं चर्चा कर्तव्य नसल्यानें आम्ही कांहीं लिहीत नाहीं. दुसरें परिशिष्ट या आख्यानांतील सर्व पद्यांचीं वृत्तें देऊन त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत.

७. संस्कृतांत लघूची सरळ रेषा व गुरूची वक्र रेषा म्हणून चिन्हें कल्पिलीं आहेत. त्याच्या विरुद्ध रा. प्रियोळकरांनीं लघूची वक्र रेषा व गुरूची सरळ रेषा कल्पिली आहे. याला कारण आंग्ल लेखकांचें अंधानुकरण याशिवाय कांहीं सांगतां येणार नाहीं. असो. या भागाच्या शेवटीं केवळ मराठी वृत्तें जीं ओवी, अभंग वगैरे त्यांची संक्षिप्त माहिती दिली आहे. यासंबंधानें आम्हीं अन्यत्र विस्तारानें विचार केला असल्यामुळें येथें पुनः वाटाघाट करीत नाहीं. तिसरें परिशिष्ट अलंकाराचें आहे. त्यासंबंधानें काय लिहावयाचें तें तेथेंच लिहिलें असल्यामुळें तीच चर्चा पुनः करण्याचें कारण नाहीं. शेवटच्या चवथ्या परिशिष्टांत या आख्यानाच्या आणखी दोन प्रती सांपडल्याचें सांगून त्यांत कोणतीं पद्यें अधिक-उणीं आहेत तीं सांगितलीं आहेत.

याप्रमाणें या संपूर्ण ग्रंथाचें स्वरूप आहे. रा. प्रियोळकरांनीं विशेष परिश्रम करून व सूक्ष्म दृष्टीनें विचार करून हें सुंदर काव्य प्रसिद्ध केलें, त्यासंबंधानें पुष्कळ माहिती नवी उपलब्ध करून दिली, प्राचीन काव्यांतील शब्द, त्यांची घटना, क्रियापदांचीं प्राचीन रूपें वगैरे प्राचीन मान्य ग्रंथांतील उतारे देऊन निश्चिति केली, व मग प्रस्तुत काव्यांत मूळचे ते पाठ असतांना ते न समजल्यामुळें जे जांवईशोध केले होते, त्यांचें परिमार्जन केलें हें विशेष कौतुकास्पद आहे व यावरून त्यांच्या मार्मिक वाचनाचीही कल्पना होते. आम्हीं जे कांहीं भिन्नार्थ दाखविले आहेत व शंका दर्शविल्या आहेत, त्या त्यांच्या परिश्रमाचें गौणत्व दाखविण्याकरतां नसून त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यास अल्पस्वल्प मदत व्हावी म्हणून आहेत. त्यांच्या युक्तायुक्ततेचा विचार स्वतः रा. प्रियोळकरांनीं व इतर मराठी साहित्य-भक्तांनीं अवश्य करावा अशी प्रार्थना आहे, व हें आमचें विवेचन वाचतांना त्यांनीं रा. प्रियोळकरांचेंच पुस्तक जवळ ठेवावें; कारण या चर्चेत त्यांचाच पाठ आम्हीं घेतला आहे व विस्तार फार होऊं लागला म्हणून त्यांच्याच पद्यांचे आंकडे देऊन त्यांतील कांहीं शब्दांचें विवेचन केलें आहे.

शेवटीं सद्भावनेनें रा. प्रियोळकर यांनीं विशेष परिश्रम करून या मराठींतील सुंदर आख्यानाची लोकांस विशेष रुचि उत्पन्न करून दिली याबद्दल त्यांस धन्यवाद देऊन अशीच मराठी वाङ्मयाची सरस सेवा त्यांच्या हातून घडो अशी परमेश्वराची प्रार्थना करून लेखणी खालीं ठेवितों.

'कालिदास'*

कविप्रवर कालिदासावर आजपर्यंत वेगवेगळ्या भाषांतून अनेक एतद्देशीय व परदेशीय पंडितांनीं त्याचा देश, काल, परिस्थिति, काव्यनाट्यसंबंधीं गुणावगुण इत्यादिविषयीं विविध प्रमाणें व अनुमानें यांनीं युक्त अशी पुष्कळच चर्चा केलेली आहे. किंबहुना, आपल्या मराठी भाषेंतहि या विषयाच्या वेगवेगळ्या अंगांचें विवेचन करणारे लेख अगदींच थोडेथोडके नाहींत. तथापि श्री. केशव लक्ष्मण ओगले, बी. ए., या कालिदासमर्मज्ञांनीं 'लोकशिक्षण-लघुग्रंथमाले'साठीं लिहिलेलें 'कविकुलगुरु कालिदास' हें लहानसें, पण सर्वस्पर्शी व गुणी पुस्तक वगळल्यास, नव्या पिढींतील एक विद्वान् अभ्यासक प्रो. वासुदेव विष्णु मिराशी यांचा प्रायः पाठोपाठ प्रसिद्ध झालेला 'कालिदास' हाच प्रस्तुत विषयाचें सांगोपांग विवेचन करणारा मराठींतील बृहद्ग्रंथ होय असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या ग्रंथांत प्रकट झालेली विद्वत्ता, परिश्रमशीलता व सविवेक कालिदासीय भक्ति पाहून आम्हांस ग्रंथकर्त्यासंबंधीं साक्षात्परिचय नसतांहि आदर उत्पन्न झाला असून त्यामुळें, आणि स्वतः प्रो. मिराशी यांचीहि आम्हीं त्यांच्या या कृतीसंबंधीं थोडें विवेचन करावें अशी इच्छा असल्यामुळें, ग्रंथ प्रकाशित होऊन आज बराच अवधि लोटला असला तरी सांप्रत त्यासंबंधीं चार शब्द लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

तथापि या समग्र ग्रंथाचें विवेचन करावें तर तें फारच विस्तृत होईल. कारण, त्यांत ग्रंथकारांनीं (१) कालनिर्णय, (२) कालिदासकालीन परिस्थिति, (३) जन्मस्थानाचा वाद, (४) चरित्रविषयक अनुमानें, (५) कालिदासाचीं काव्यें, (६) कालिदासाचीं नाटकें, (७) कालिदासीय ग्रंथांचे विशेष, (८) कालिदासीय विचार, आणि (९) कालिदास व उत्तरकालीन ग्रंथकार, असे नऊ भाग करून त्यांतील विषयांची चर्चा जवळजवळ तीनशें पृष्ठांमध्यें केली आहे. शिवाय या विवेचनांत मतभेदास विशेष अवकाशहि नाहीं. ग्रंथकारांनीं कालिदासाच्या काव्य-नाटकाचें जें परीक्षण केलें आहे आणि विविध माहिती दिली आहे ती सर्व चांगली व्यवस्थितच आहे. त्यासंबंधीं लिहावयाचें म्हणजे तींत अधिक भर घालावयाची. परंतु अधिक माहिती देणें ही गोष्ट अमर्याद असल्यामुळें ती संपण्यासारखी नाहीं.

---

* लेखक : प्रो. वा. वि. मिराशी, एम्. ए., नागपूर.

यास्तव ग्रंथकारानें केलेलें विवेचन ते ते विषय समजण्यास पूर्ण आहे कीं नाहीं एवढेंच पाहावयाचें; आणि तें पूर्ण आहे असें वाटत असल्यास त्याचा विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. आम्हांस तें पुरेसें वाटत असल्यामुळें त्याचा विस्तार कर्तव्य नाहीं. तेव्हां प्रस्तुत निबंधांत मुख्यत्वें कविकालनिर्णय व गौणत्वें कवीचे व्याकरणप्रमाद यासंबंधीं लिहून, ग्रंथकाराहून भिन्न असलेलीं मतें सांगण्याचा आमचा विचार आहे; आणि शेवटीं आम्हांला स्वतःला कालिदासाविषयीं कोणतें वैगुण्य वाटतें तें दर्शवून कविप्रशंसापर एकदोन अप्रसिद्ध, पण मार्मिक, प्राचीन पद्यें देऊन आम्ही हा विषय संपविणार आहों.

प्रो. मिराशी यांनीं कालिदासाचा काल ठरवितांना प्रथमतः त्या कालाच्या पूर्वापर दोन मर्यादा निश्चित केल्या आहेत. कालिदासाचें जें 'मालविकाग्निमित्र' नाटक आहे त्यांतील नायक अग्निमित्र हा शुंग घराण्यांतील पुष्यमित्राचा मुलगा होय. पुष्यमित्र सेनापतीचा काल इसवी सनापूर्वीं दीडशें वर्षें, असा सर्व विद्वानांनीं निश्चित केला असल्यामुळें कालिदास हा इसवी सनापूर्वीं दीडशें वर्षांच्या मागें जाऊं शकत नाहीं. अर्थात् खिस्तपूर्व दीडशें वर्षें ही कालिदासाच्या पूर्वकालाची मर्यादा निश्चित झाली. उत्तरकालमर्यादा इसवीसनाच्या सातव्या शतकापुढें जाऊं शकत नाहीं. कारण, सातव्या शतकाच्या पूर्वार्धांतील हर्षवर्धन राजाच्या पदरीं असणाऱ्या बाणभट्टानें हर्षचरितांत "निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु" इत्यादिरीत्या कालिदासाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. तेव्हां ही कालिदासाच्या उत्तरकालाची मर्यादा होय. या दोन मर्यादा सर्व पक्षांस मान्य आहेत. या दोहींतील सातआठशें वर्षांच्या काळांत अग्निमित्र, विक्रमादित्य, अश्वघोष, मातृगुप्त, वराहमिहिर, द्वितीय चन्द्रगुप्त प्रभृति ज्या व्यक्ति झाल्या त्यांच्या विशिष्ट कालावरून कालिदासाचा काल ठरविण्याचा विविध विद्वानांनीं प्रयत्न केला आहे. प्रो. मिराशी यांनीं त्या सर्वांचा परामर्श घेऊन कुंतलेश्वर-दौत्यासंबंधीं क्षेमेंद्रकृत कालिदासविषयक उल्लेखास प्राधान्य देऊन कालिदासाला कुंतलेश्वराचा समानकालीन मानिलें आहे. हा कुंतलेश्वर म्हणजे इसवी सनाच्या चौथ्या शतकांतील द्वितीय चंद्रगुप्ताचा नातु (दौहित्र) द्वितीय प्रवरसेन होय, असें त्यांनीं अनुमानानें निश्चित केलें आहे; आणि द्वितीय चंद्रगुप्ताच्या पदरीं कालिदास होता, त्यानें आपला नातु द्वितीय प्रवरसेन राज्यकारभार कसा काय चालवितो हें पाहण्यासाठीं कालिदासाला प्रवरसेनाकडे पाठविलें, इत्यादि गोष्टी अनुमानतः गृहीत धरून कालिदासाचा काल कुंतलेश्वर द्वितीय प्रवरसेन व त्याचा आजा द्वितीय चंद्रगुप्त यांच्या कालाशीं समान, म्हणजे इसवी सनाचें चौथें शतक, असा मानिला आहे.

प्रो. मिराशी यांनीं या कालनिर्णयासंबंधीं जें विवेचन केलें आहे त्यांतील कांहीं गोष्टी विचारणीय वाटत असल्यामुळें त्यांचा थोडासा विचार करूं. पूर्वी

सांगितल्याप्रमाणें कालिदासाचा पूर्वोत्तर मर्यादेंतील जों आठशें वर्षांचा कालखंड त्यांतील अमक्या शतकांत कालिदास झाला हें निश्चित करण्यासंबंधीं अर्वाचीन विद्वानांचीं चार वेगवेगळीं मतें दिसून येतात : (१) प्रो. पीटर्सन, प्रो. आपटे, श्री. चिंतामणराव वैद्य, क्षेत्रेशचन्द्र चट्टोपाध्याय, शारदारंजन राय प्रभृति विद्वानांनीं इसवी सनापूर्वीचें पहिलें शतक हा कालिदासाचा काल म्हणून विविध प्रमाणांनीं निश्चित केला आहे. (२) डॉ. भांडारकर प्रभृतींनीं इसवी सनाच्या चौथ्या शतकाचा उत्तरार्ध युक्त मानिला असून हेंच मत बऱ्याच युरोपीय विद्वानांस मान्य आहे. (३) प्रो. पाठक प्रभृति कांहीं विद्वान् इसवी सनाचें पांचवें शतक हा कालिदासाचा काल मानतात; तर (४) मॅक्स मूलर प्रभृति इ.स. सहावें शतक हा त्याचा काल समजतात. याप्रमाणें कालिदासाच्या कालासंबंधानें चार पक्ष आहेत. इसवी सनाच्या पूर्वींचा काल किंवा इसवी सनाचें पांचवें सहावें शतक हें प्रो. मिराशी यांस मान्य नसल्यामुळें त्यांनीं तीं मतें खोडून काढून इसवी सनाचें चौथें शतक (भांडारकर प्रभृतींनीं स्वीकारिलेलें) कालिदासाचा काल म्हणून निश्चित केलें आहे. यांतील इसवी सनाचें पांचवें सहावें शतक हें प्रो. मिराशी यांच्याप्रमाणें आम्हांसहि युक्त वाटत नसल्यामुळें आणि त्यांनीं त्या मताचा योग्य निरास केला असल्यामुळें आम्ही त्याविषयीं येथें चर्चा करीत नाहीं. केवळ इसवी सनाच्या पूर्वींचें प्रथम शतक हें प्रो. मिराशी यांना ज्या कारणांस्तव अयुक्त वाटतें त्यांचा विचार करून त्या कालास अनुकूल अशा कांहीं प्रमाणांची आम्ही वाटाघाट करणार आहों.

कालिदास हा विक्रमादित्याचा आश्रित होता ही गोष्ट 'विक्रमोर्वशीय' या नाटकाच्या संज्ञेवरून आणि त्याच नाटकांतील "विक्रममहिम्ना वर्धते भवान्।" व "अनुत्सेकः खलु विक्रमालंकारः।" या श्लिष्ट पदांवरून सूचित केली जाते ही गोष्ट प्रायः सर्व विद्वान् मान्य करितात. हा विक्रम खिस्तपूर्व प्रथम शतकांत झाला ही गोष्ट प्रायः सांप्रत त्याच्या चालू असलेल्या संवतावरून सिद्ध मानून त्याचा आश्रित कालिदास इसवी सनाच्या पूर्वी झाला असें सर्व प्राचीन विद्वान मानितात. परंतु अर्वाचीन कालचिकित्सकांचें म्हणणें असें आहे की, इसवी सनापूर्वीच्या कालांत अथवा खिस्तपूर्व प्रथम शतकांत विक्रमादित्य नांवाचा राजा होता याविषयीं कांहीं प्रमाण उपलब्ध होत नाहीं. अर्वाचीन विद्वानांनीं विविध प्रमाणांवरून त्या कालांतील राजवर्गाचा जो अनुक्रम ठरविला आहे, त्यांत कोठेंही असें स्थल (कालखंड) रिकामें नाहीं की, जेथें या विक्रमादित्यराजाचा काल कल्पितां येईल. याप्रमाणें इसवी सनापूर्वी विक्रमादित्य संभवत नाहीं, तेव्हां त्याचा आश्रित म्हणून मानिलेला कालिदास त्या कालीं कोठून असणार? अर्थात् कालिदास हा खिस्तपूर्व होऊन गेला हें मत अज्ञानपरंपरेनें चालत आलें असून त्यास कांहीं प्रमाणभूत आधार नाहीं अशी त्यांची विचारसरणि आहे.

या मुद्द्यावर कालिदास खि. पू. प्रथम शतकांत होऊन गेला असें मानणाऱ्या मंडळींचे आक्षेप काय आहेत आणि त्यांवर तो खिस्तपूर्व झाला नाहीं असें प्रतिपादणाऱ्या मंडळींचें म्हणणें काय आहे तें सांगून त्यांविषयीं आम्हांस काय वाटतें तें लिहूं. खि. पू. पहिल्या शतकांतील हालाची 'गाथासप्तशती', दहाव्या शतकानंतरची 'बृहत्कथामंजरी' व सोमदेवसूरीचा 'कथासरित्सागर' या सर्वांत विक्रमादित्याचे उल्लेख आहेत हें सर्वमान्य आहे. तेव्हां विक्रमादित्य नांवाची— पदवीची नव्हे— व्यक्ति होऊन गेली असें सिद्ध होतें. कारण, विक्रमादित्य ही पदवी असती तर त्याच्या मूळ नांवाचा उल्लेख या ग्रंथांत कोठें तरी आला असता. मूळ नांव न देतां केवळ पदवीनेंच सर्वत्र उल्लेख करणें हें समुचित दिसत नाहीं. तात्पर्य, या ग्रंथांतील उलेखांवरून विक्रमादित्य या संज्ञेची व्यक्ति होती असें मानणें अयुक्त नव्हे. या मुद्द्यावर प्रतिपक्षाचें म्हणणें असें की, हे ग्रंथ इसवी सनाच्या प्रथम शतकानंतर किती तरी शतकांनीं झालेले; ते कालविवेचनांत विशेष प्रमाण मानतां येत नाहींत; म्हणून त्यांवरून कवीचा काल ठरविणें योग्य नव्हे. परंतु हें म्हणणें विचार केला असतां पटण्यासारखें नाहीं. कारण, 'गाथासप्तशती' सातवाहनाच्या (शालिवाहनाच्या) काळीं इ. स. पहिल्या शतकांत झाली, असें विद्वान् मानतात; आणि 'बृहत्कथामंजरी' व 'कथासरित्सागर' हें ग्रंथ जरी इसवी सनाच्या दहाव्या शतकानंतर झाले असले, तरी ते शालिवाहन शकाच्या पहिल्या शतकांत गुणाढ्यानें रचिलेल्या 'बृहत्कथे'चे संक्षेप आहेत. क्षेमेंद्रानें 'बृहत्कथामंजरी'प्रमाणें 'रामायणमंजरी' व 'भारतमंजरी' हे दोन रामायणभारतांचे संक्षेपरूपी ग्रंथ केले आहेत. संक्षेपांत कांहीं कथाभाग व विस्तृत वर्णन यांचा लोप होणें अवश्य असतें, परंतु नवीन कथाभाग अथवा मूलापेक्षां विस्तृत वर्णन असणें शक्य नसतें. ही गोष्ट कोणासही पटण्यासारखी आहे; आणि रामायण—भारतांवरून रचिलेल्या 'रामायणमंजरी' व 'भारतमंजरी' या ग्रंथांत असेच संक्षेप असल्याचें सिद्ध करून देतां येईल. तेव्हां या दृष्टीनें पाहिलें असतां 'कथामंजरी' काय किंवा 'कथासरित्सागर' काय, यांत मूळ 'बृहत्कथे'चा संक्षेप झालेला असून त्यांत नवीन कथांचा समावेश होणें, निदान विशेष कारणांवांचून तो होणें, हें असंभाव्य आहे. अर्थात् त्यांतील विक्रमादित्याचे उल्लेख 'बृहत्कथे'वरून घेतले जाणें हें वस्तुस्थितीस धरून असल्यामुळें गुणाढ्याच्या बृहत्कथेंत ते असले पाहिजेत; आणि गुणाढ्य हा जर शालिवाहनाच्या पहिल्या शतकांत होऊन गेला, तर त्याच्यांत व खि. पू. प्रथम शतकांत झालेल्या विक्रमादित्यांत फार तर शेंदीडशें वर्षांचें अंतर असलें पाहिजे. हें अंतर प्रसिद्ध राजाच्या उल्लेखासंबंधानें फार आहे असें वाटत नाहीं; आणि मग त्यावरून त्यांतील उल्लेख कालगणनाविचारांत अप्रयोजकहि वाटत नाहींत. प्रो. मिराशी यांनीं इसवी सनाच्या अकराव्या शतकांतील 'औचित्यविचारचर्चा'

व 'शृंगारप्रकाश' यांतील श्लोक देऊन चौथें शतक हा कालिदासाचा काल ठरविण्याचा यत्न केला आहे. तेव्हां त्यापेक्षां 'गाथासप्तशती' व 'बृहत्कथा' हे ग्रंथ विक्रमादित्याच्या काळाला पुष्कळच जवळ असतांना त्यांनीं ते कालचिकित्सेंत अग्राह्य कां मानावे हें समजत नाहीं. अर्थात् 'गाथासप्तशती' व 'बृहत्कथा' यांतील विक्रमादित्याचे उल्लेख विचारणीय आहेत असें आम्हांस वाटतें.

दुसरें त्यांचें म्हणणें असें की, विक्रमादित्य ही पदवी आहे, व्यक्तिनाम नाहीं. परंतु हें म्हणणेंहि संस्कृत वाङ्मयांत जे विक्रमादित्याचे उल्लेख आढळतात त्यांवरून विद्वानांस मान्य होईल असें वाटत नाहीं. "समारूढे पूतत्रिदिववसतिं विक्रमनृपे।" व "सरसीव कीर्तिशेषं गतवति भुवि विक्रमादित्ये।" या उक्तींवरून विक्रमनृप ही व्यक्तिच असावी. येथें "विक्रमराजा स्वर्गाला गेल्यावर" असें म्हटलें आहे. विक्रमादित्य ही पदवी अनेक राजांनीं धारण केली होती असें अर्वाचीन विद्वानांचें म्हणणें आहे. तेव्हां 'समारूढे' येथें केवळ 'विक्रमनृपे' असें म्हटल्यानें काय बोध होणार आहे ? नुसतें "रावसाहेब मेले" असें म्हटल्यानें जसा विशिष्ट व्यक्तीचा बोध होत नाहीं, तर अशा ठिकाणीं विशेषनामाचाच उपयोग करावा लागतो, तसेंच 'समारूढे' या पद्यांत विक्रम ही जर पदवी असेल तर विशेषनांवाचा उल्लेख अवश्य पाहिजे होता. तो केला नाहीं यावरून तेथील विक्रमपद विशेषनामच असलें पाहिजे. तात्पर्य, विक्रमादित्य ही पदवी कांहीं राजांनीं स्वीकारली असली तरी विक्रमादित्य ही एक विशिष्ट व्यक्ति होती हें निश्चित. यासंबंधानें पुष्कळ प्रमाणें देऊन विवेचन करतां येईल; परंतु सध्यां एवढेंच पुरेसें आहे. शिवाय विक्रमादित्य नांवाची व्यक्ति कां नव्हती ? तर त्या व्यक्तीसंबंधानें शिलालेख, नाणीं इत्यादींत उल्लेख सांपडत नाहींत म्हणून. परंतु हें अभावरूपी प्रमाण फारच साधारण होय. हें सहायप्रमाण म्हणून क्वचित् उपयुक्त मानतां येईल. तथापि केवळ एवढ्याच प्रमाणावरून एखादा सिद्धान्त सिद्ध झाला असें मानतां येणार नाहीं. दुसरें प्रमाण काय ? तर त्या कालांतील राज्यकर्त्यांची जी जंत्री अर्वाचीन विसाव्या शतकांतील कालचिकित्सकांनीं कांहीं प्रमाणांवरून अनुमित केली आहे तींत या विक्रमादित्याचा समावेश करण्यास अवकाश नाहीं. हा उत्तम न्याय आहे ! विक्रमादित्यानंतर लौकरच झालेले हाल, गुणाढ्य यांच्या ग्रंथांतील उल्लेख तेवढे अप्रमाण. कारण ते दीर्घ कालानंतर झालेले आहेत म्हणून; आणि त्यांच्याही मागून दोन हजार वर्षांनीं झालेले जे अर्वाचीन कालचिकित्सक यांनीं अनुमानानें सिद्ध केलेली त्या कालांतील राजवर्गाची जंत्री मात्र प्रमाण ! आम्हांला तर अनेक ग्रंथ लुप्त झाले असल्यामुळें व पौराणिक ग्रंथांत प्रक्षेपविक्षेपादि अनेक कारणांनीं अव्यवस्थितपणा पसरला असल्यामुळें त्यांतील प्रमाणांवरून उन्नीत केलेले अर्वाचीन विद्वानांचे विचारच हाल, गुणाढ्य, कालकाचार्य यांच्या उल्लेखां-

पेक्षां बरेच कमी महत्त्वाचे वाटतात. शिवाय वाचकांस येथें हें नम्रपणें सुचवितों की, प्राचीन विद्वानांच्या लेखांत क्वचित् अतिशयोक्ति होईल, त्या काळीं प्रस्तुत कालासारखी वार्तासाधनसंपत्ति नसल्यामुळें क्वचित् दूरच्या व्यक्तींची माहिती देण्यांत अज्ञानानें प्रमाद होतील, परंतु केवळ परप्रतारणार्थ किंवा स्वाभीष्टसिद्धयर्थ अवास्तव व्यक्ति कल्पून त्यांचीं वर्णनें देणें इत्यादि गोष्टी बहुधा त्यांजकडून होणार नाहींत. तेव्हां प्राचीन ग्रंथांतील उल्लेखांस तशीच प्रबल विरोधी प्रमाणभूत कारणें असतील तरच ते उल्लेख सोडून द्यावेत आणि तशीं प्रमाणभूत कारणें नसतील तर त्यांविषयीं अनास्था ठेवूं नये.

दुसऱ्या एका प्रमाणानें कालिदासाच्या कालाचा विचार करूं. विक्रमादित्य या संज्ञेची व्यक्ति होती आणि ती तिच्या चालू असलेल्या संवतावरून खिस्तपूर्व प्रथम शतकांत होती या दोन्ही गोष्टी विवादित म्हणून जरी एकीकडे ठेविल्या, तरी 'मालविकाग्निमित्र' नाटकांतील कांहीं विशिष्ट उल्लेखांवरून कालिदास हा अग्निमित्राच्या राजवटींत अथवा तिच्या लगतच्या कालांत झाला असावा असें विचाराकरितां विद्वानांपुढें मांडतां येतें. 'मालविकाग्निमित्र' नाटक ही कालिदासाची कृति आहे याविषयीं आतां विशेष विवाद राहिला नाहीं. या नाटकामध्यें शुंगवंशांतील पुष्यमित्र सेनापतीचा पुत्र जो अग्निमित्र त्याचा विवाह विदर्भदेशाधिप माधवसेन याच्या मालविका नांवाच्या बहिणीशीं झाला हें कथानक मुख्यत्वें आहे. या कथानकांत प्रसंगानें अशा पुष्कळ गोष्टी वर्णिल्या आहेत की, ज्या तीनचारशें वर्षांनंतरच्या समाजास समजणें अथवा मनोरम वाटणें शक्य दिसत नाहीं. कालिदास हा संक्षेपरुचि आहे, ही गोष्ट त्याच्या काव्यनाटकांवरून कोणासहि समजून येण्यासारखी आहे. तेव्हां अशा तऱ्हेचा कवि श्रोतृसमाजाला समजण्यास कठीण जाईल आणि म्हणूनच मनोरम भासणार नाहींत असे अनुपयुक्त उल्लेख आपल्या नाटकांत करील असें वाटत नाहीं. नानारसपरिपोषक व समाजप्रिय अशाच गोष्टींचा समावेश तो आपल्या संविधानकांत करील हें उघड आहे. याच नाटकांत त्यानें "त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते" असें म्हटलें आहे. म्हणजे, एकप्रकारें आपल्या कृतीविषयींची ही त्याची प्रतिज्ञाच आहे. एवढी गोष्ट आपण मान्य केली म्हणजे त्यानें 'मालविकाग्निमित्र' नाटकांत अश्वमेध यज्ञाचा कथाभाग, अग्निमित्राला निमंत्रणपत्रिका पाठविली त्यांतील "विगतरोषचेतसा" हें पद, यज्ञसेनाला "प्रकृत्यमित्रः प्रतिकूलाचारी च वैदर्भः " या वाक्यांत 'प्रकृत्यमित्रः' असा प्रयोग करणें, "यज्ञसेनश्यालमुररीकृत्य मुच्यन्तां सर्वे बन्धनस्थाः " याप्रमाणें यज्ञसेनश्यालावांचून इतरांना बंधनांतून मुक्त करण्याची आज्ञा करणें, "आशास्यमीतिविगमप्रभृति प्रजानां संपत्स्यते न खलु गोप्तरि नाग्निमित्रे" अशी शेवटीं भरतवाक्यांत अग्निमित्राची

प्रशंसा करणें इत्यादि उल्लेख पुष्यमित्र व अग्निमित्र यांच्या कारकीर्दीचा ज्यांना विशेष परिचय व प्रेम आहे अशाच समाजाला मनोरम वाटणाऱ्या आहेत. चारशें वर्षांनंतरच्या अन्य राजवटींतल्या लोकांस त्या ज्ञात असण्याचा संभव कमी, आणि म्हणूनहि त्यांना त्या चित्ताकर्षक होण्यासारखा नाहींत. या आमच्या विधानाच्या समर्थनार्थ कालिदासाच्या प्रस्तुत नाटकावरून शुंगवंशीय राजघराण्यांतील त्या काळची परिस्थिति कशी होती तिचें थोडेंसें स्पष्टीकरण करूं.

मौर्यकुलांतील बौद्धधर्मानुयायी बृहद्रथ याचा वैदिकधर्माभिमानी शुंग-कुलांतील पुष्यमित्र सेनापतीनें विनाश केला आणि तो स्वतः त्याच्या सिंहासनावर बसला. त्यानें तत्पूर्वी राजाश्रयामुळें प्रबल झालेल्या बौद्ध धर्माचा पाडावा करून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. या पुनरुज्जीवनाचें सूचक म्हणून त्यानें बौद्धांनीं सर्वथा निंदिलेल्या यज्ञकर्मांतील अश्वमेध करून आपल्या सत्तेचा उत्कर्षहि करून दाखविला. यासाठीं आपला नातु वसुमित्र याजकडून यज्ञिय अश्वाचें रक्षण करवून त्यानें तो भरतखंडांतून फिरवून आणिला. वस्तुतः ही गोष्ट त्यानें आपला पुत्र अग्निमित्र याजकडून करवावयास पाहिजे होती; परंतु अग्निमित्र हा पित्यासारखा वैदिक कर्ममार्गाविषयीं विशेष आदर बाळगणारा अथवा बौद्धधर्माचा तिरस्कार करणाराहि नसावा. यामुळेंच त्या उभयतांत फारसें स्वारस्य नसावें; आणि अग्निमित्र हा विशेष स्त्रैण व विलासी म्हणून बापापासून स्वतंत्र असा अन्यत्र राहत असावा. ही आपल्या मुलाची वृत्ति पाहून त्याजपाशीं आपला नातु वसुमित्र यास ठेवणें युक्त नव्हे—कारण, तोहि वैदिक धर्माविषयीं उदासीन व स्त्रैण व्हावयाचा—हें जाणून पुष्यमित्रानें त्यास आपल्या दृष्टीखालीं ठेविलें असावें; आणि त्यास योग्य शिक्षण देऊन वैदिक धर्माभिमानी व पराक्रमी बनविलें असावें. याच दृष्टीनें आपल्या नातवाकडून यज्ञिय अश्वाचें रक्षण करवून त्यानें त्याची वैदिक धर्माविषयींची श्रद्धा व पराक्रम हीं पटवून दिलीं. त्यानें अग्निमित्रास व त्यास पाठविलेल्या निमंत्रण-पत्रिकेंत 'विगतरोषचेतसा' असा टोमणा दिला. तात्पर्य, 'विगतरोषचेतसा' या पदाचें स्वारस्य कळण्यास इतका कथासंदर्भ तत्कालीन सामान्य प्रेक्षकांस अवगत असला पाहिजे. "यज्ञसेनश्यालमुररीकृत्य" या वाक्यावरून अग्निमित्र राजाचा यज्ञसेनावरील क्रोध, वरदा नदीच्या दक्षिणोत्तर तीरावरील राज्यमर्यादाकथन, यज्ञ-सेनाला 'प्रकृत्यमित्र' म्हणून "विषयानन्तरो राजा शत्रुः" असें प्रकृत्यमित्राचें लक्षण असल्यामुळें तो आपल्या देशाला लागून आहे हें सुचविणें, धरणीचा भाऊ 'वर्णावरज' असल्यामुळें त्याला 'अंतपाल' म्हणजे दूर राज्यसीमेवर सीमाधिकारी नेमिला होता हें सांगणें, या सर्व गोष्टी ऐतिह्यदृष्टीनें सत्य असल्यामुळें जरी अग्निमित्र-मालविका यांच्या विवाहकथानकांत त्यांस विशेष महत्त्व नसलें, तरी तत्कालीन लोकांना त्या विशेष प्रिय वाटत असल्यामुळें त्याच कालीं झालेल्या

कालिदासानें त्यांचा या कथानकांत समावेश केला असला पाहिजे; आणि "आशास्यमीतिविगमप्रभृति प्रजानां संपत्स्यते न खलु गोप्तरि नाग्निमित्रे" या भरतवाक्यांतील प्रशंसापूर्वक अग्निमित्राचा उल्लेख चारशें वर्षांपासून दुसऱ्या राजाच्या राजवटींत करण्याचें कारण नाहीं. आतां अग्निमित्र हा विलासी व प्रायः राज्यतंत्रविमुख असा असतांना पुष्यमित्रासारख्या कर्तृत्ववान् राजाचें कथानक घ्यावयाचें सोडून अग्निमित्राचें कथानक कालिदासानें कां घेतलें अशी एक शंका येण्याचा संभव आहे. तिला उत्तर एवढेंच की, कालिदास हा जरी वैदिक धर्माभिमानी होता, तरी स्वतः विलासी व शृंगारवृत्तिप्रधान असल्यामुळें "समान-शीलव्यसनेषु सख्यम्" या न्यायानें त्यानें आपल्या तरुणपणांत या कृतीतील कथानकास अग्निमित्र हा पसंत केला असावा. सारांश, 'मालविकाग्निमित्र' नाटकांतील या विविध उल्लेखांवरून कालिदास हा अग्निमित्राच्या राजवटींत झाला असावा, म्हणजेच त्याचा काळ इसवी सनापूर्वींचा ठरतो; अतणि हें जर वाचकांस पटलें तर मग विक्रमादित्य नांवाची व्यक्ति होती आणि तिच्या पदरीं कालिदास होता या गोष्टी सत्य असल्यास या कालिदासाच्या कालावरून विक्रमादित्याचाहि काल निश्चित होतो. म्हणजे, विक्रमादित्यावरून कालिदासाचा काल न ठरतां उलट कालिदासावरून विक्रमादित्याचा काल ठरतो असें हें होत आहे. शिवाय या मताला मेघदूतांतील "प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्" इत्यादि उल्लेख अनुकूल आहेत. कारण, उदयनकथाकोविद असे ग्रामवृद्ध याच कालीं असणें संभवनीय आहे.

कालिदास हा वैदिक कर्ममार्गाविषयीं पूज्यबुद्धि बाळगणारा होता, हें कुमार-संभवांतील पार्वतीविवाहवर्णन, रघुवंशांतील वसिष्ठाश्रमवर्णन, शाकुंतलांतील होम-शालावर्णन व "वैतानास्त्वां वह्नयः पावयन्तु।" असा कण्वमुखानें शकुंतलेस दिलेला आशीर्वाद, पांचव्या अंकांत शकुंतलेस घेऊन ऋषिजन आले असतां राजा त्यांची भेट अग्निशरणांत (होमशालेंत) घेतो, असा राजगृहांतील होमशालेचा उल्लेख, इत्यादि गोष्टींवरून सिद्ध होतें. पुष्यमित्राच्या अश्वमेधास इतरांनीं केलेल्या अश्वमेधांपेक्षा विशेष महत्त्व होतें. कारण, पूर्वी सांगितल्याप्रमाणें बौद्धधर्मानुयायी बृहद्रथास मारून हा अश्वमेध यज्ञकर्माची निंदा करणाऱ्या बौद्धवर्गास प्रत्याघात-रूप असा पहिलाच होता. यांतील अश्व सगराचा नातु जो अंशुमान् त्याच्याप्रमाणें पुष्यमित्राचा नातु जो वसुमित्र यानें रक्षण करून आणिला होता, आणि या यज्ञांतील अध्वर्यु विद्वदग्रेसर पतंजलि हा होता ("इह पुष्यमित्रं याजयामः।"—महा-भाष्य). यावरून प्रस्तुत अश्वमेधाचें महत्त्व त्या कालच्या वैदिक समाजास अपूर्व वाटत असून त्याविषयीं त्याचें अत्यंत प्रेम असलें पाहिजे. पुढें अनेक राजांनीं यज्ञ केले असले तरी या अपूर्व अश्वमेधाचें कौतुक शुंगराजवटींतील लोकांस जितकें वाटणें शक्य आहे, तितकें तीनचारशें वर्षांनंतरच्या अन्यवंशीय राजांच्या

कारकीर्दीत वाटणें शक्य नाहीं. मालविकाग्निमित्रकथानकांत या प्रसंगाचें वर्णन करण्याचें विशेष कांहीं प्रयोजन नसतां तें केलें आहे, यावरून कालिदासासहि सामान्य प्रजाजनांप्रमाणें ही गोष्ट विशेष महत्त्वाची व आनंदाची वाटत असली पाहिजे; आणि म्हणूनच कालिदास हा शुंग-राजवटींत पुष्यमित्रानंतर लवकरच झाला असावा असें अनुमान करणें अनुचित होईल असें वाटत नाहीं.

प्रो. मिराशी यांनीं कालिदास हा अश्वघोषानंतर झाला असें ठरविलें आहे. त्या गोष्टीचा आतां थोडासा विचार करूं. कालिदास व अश्वघोष या उभयतांच्या कृतींत कांही ठिकाणीं विशेष साम्य दिसून येतें. तेव्हां कोणींतरी कोणाच्या कल्पनेचें व रचनेचें अनुकरण केलें असावें असें मानणें भाग आहे. हें अनुकरण विशेष रीतीनें—म्हणजे एखादी तीच कल्पना वा तोच प्रसंग कवीनें आपल्या प्रतिभाशक्तीनें खुलवून चित्ताकर्षक केला असेल तर—सदोष समजूं नये. कारण, सर्वथैव अपूर्व अशा कृति क्वचित् दृष्टीस पडतात. "दृष्टपूर्वा अपि ह्यर्थाः काव्ये रसपरिग्रहात् । सर्वे नवा इवाभान्ति मधुमास इव द्रुमाः ।" असें जें आनंदवर्धनानें म्हटलें आहे तें मार्मिकपणाचें होय. अर्थात् अशा रीतीची उसनवारी महाकवींच्या कृतींत दिसली तरी ती विशेष सदोष समजली जात नाहीं; आणि त्यामुळें त्या कवींस कोणी विशेष न्यूनताहि देत नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां येथें अश्वघोष व कालिदास यांपैकीं कोणींहि अन्यच्छायोपजीवन केलें असलें तरी दोघेहि महाकविच असल्यामुळें त्यांस कोणी दोष देणार नाही. परंतु या वर्ण्यवस्तूच्या बिंबप्रतिबिंबभावामुळें आपणांस एका कवीचा काल अज्ञात असला तरी, दुसऱ्याचा निश्चित ज्ञात असेल आणि कोणीं कोणाचें अनुकरण केलें हें जर निश्चितपणें ठरवितां येत असेल, तर त्या ज्ञात कवीवरून अज्ञात कवीचा काल ठरवितां येतो. प्रस्तुत स्थळीं अश्वघोष हा कनिष्काच्या पदरीं असल्यामुळें इसवी सनाचें पहिलें शतक हा त्याचा काल निश्चित झाला आहे. अश्वघोष व कालिदास यांच्या कृतींतील साम्यांत अश्वघोषापेक्षां कालिदासाची मांडणी विशेष व्यवस्थित व संस्कारयुक्त आहे. तेव्हां अश्वघोषाच्या साध्या कल्पना घेऊन कालिदासानें आलंकारिक भाषेंत आपल्या कृतींत त्या सजविल्या आहेत असें दिसतें, आणि यावरून अश्वघोषानंतर, म्हणजे इसवी सनाच्या प्रथम शतकानंतर कालिदास झाल्याचें निष्पन्न होतें, असें प्रो. मिराशी यांचें मत आहे. परंतु यासहि दुसरी बाजू आहे. अश्वघोषाच्या काव्यांत प्रायः इतर कवींच्या कृतींत न आढळणारीं अशीं क्लिष्ट सन्नन्त व यङ्लुङन्तांचीं 'अजिहार्षीत्', 'अजाज्वलिष्ट', 'अचेच्छिदिष्ट', 'अत्रेभिदिष्ट' इत्यादि रूपें योजिलेलीं आहेत. व्याकरणशास्त्रांत सन्प्रक्रिया व यङ्लुङ्प्रक्रिया विशेष भानगडीच्या समजतात. अभयेंद्रानें "गहनं व्याकरणं स्यात्तत्रापि च प्रक्रिया महागहनम् । सन्लुङ्यङ्लिट् कष्टं तत्रापि च

थेट्परं महाकष्टम् ॥" असें जें म्हटलें आहे तें वैयाकरणाच्या अनुभवास धरून आहे. "सर्वे भग्ना यङ्लुक्प्रक्रियायाम् ।" हा वैयाकरणाचा उद्घोष प्रसिद्धच आहे. तेव्हां हीं रूपें काव्यांत योजावयाचीं म्हणजे कृत्रिमतेची सीमा झाली. संस्कृत वाङ्मयांत सुलभ व साधी रचना ही प्राचीनत्व दर्शविणारी आणि कृत्रिम व क्लिष्ट रचना ही अर्वाचीनत्वसूचक असें सर्व विद्वानांनीं निश्चितपणें सिद्ध केलें आहे. या दृष्टीनें कालिदास व अश्वघोष यांच्या कृति पाहिल्या म्हणजे कालिदासामागून अश्वघोष झाला हें सिद्ध होतें. शिवाय कालिदास हा अश्वघोषापेक्षां विशेष वरच्या प्रतीचा प्रतिभावान् कवि होता, हें त्याचा काव्यविस्तार व नाट्यरचनाकौशल्य पाहिलें म्हणजे कोणासहि मान्य करावें लागेल. तेव्हां अशा सर्वगामी प्रतिभासंपन्न कवीनें इतरांच्या कल्पना घेतल्या म्हणण्यापेक्षां इतरांनींच त्याचें अनुकरण केलें हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल असें आम्हांस वाटतें. अर्थात् प्रस्तुत परस्परानुकरणाच्या प्रमाणावरून कालिदास अर्वाचीन ठरत नसून अश्वघोषच त्याच्यापेक्षां अर्वाचीन ठरेल, असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं.

प्रो. मिराशी यांनीं आणखी एका कारणास्तव कालिदास हा अश्वघोषानंतर झाला हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचें म्हणणें असें : अश्वघोषाच्या काव्यांत 'प्रागेव' हा शब्द 'किमुत' (किं पुनः) या अर्थीं आढळतो. संस्कृत वाङ्मयांत या अर्थीं या शब्दाचा कोठेंहि उपयोग केलेला उपलब्ध नसून तो केवळ बौद्ध वाङ्मयांतच दिसून येतो. कालिदासाच्या ऋतुसंहारांत "प्रागेव रागमलिनानि मनांसि यूनाम् ।" या ठिकाणीं 'प्रागेव' या शब्दाचा 'किं पुनः' या अर्थानें उपयोग केलेला आढळून येतो. अश्वघोषापूर्वीं संस्कृतांत विशेष बौद्ध वाङ्मय नव्हतें. तें अश्वघोषानंतरच संस्कृतांत प्रसार पावलें. 'प्रागेव' या शब्दाचा 'किमुत' या अर्थीं उपयोग बौद्धवाङ्मयाशिवाय अन्यत्र उपलब्ध नाहीं. तो अश्वघोषानेंच संस्कृतांत प्रचारांत आणिला आणि कालिदासानें त्याच अर्थीं या शब्दाचा उपयोग केला आहे. अर्थात् कालिदास हा अश्वघोषानंतर झाला असें यावरून सिद्ध होतें. ही कल्पना बरीच सयुक्तिक वाटते; आणि तीवरून लेखकाच्या सूक्ष्म वाचनाची कल्पना होऊन एकप्रकारें आदर वाटतो. परंतु अधिक विचार केला असतां हें कारणहि अश्वघोषाचें कालिदासापेक्षां प्राचीनत्व सिद्ध करण्याला उपयुक्त होईल असें वाटत नाहीं. कारण, 'प्रागेव' याचा प्रयोग 'किमुत' या अर्थानें इसवी सनापूर्वीच्या व बौद्धवाङ्मयावांचून इसवी सनानंतरच्या संस्कृत वाङ्मयांत प्रायः उपलब्ध नाहीं. वैदिक व बौद्ध कोशकारांनींही त्या शब्दाचा तो अर्थ कोठेंहि उल्लेखिलेला नाहीं. तेव्हां अश्वघोष कवीनें 'किमुत' या अर्थीं 'प्रागेव' याचा प्रयोग केला याला प्रमाण काय? अर्थात् प्राकृत भाषेंत त्याचा तसा उपयोग होत असावा; आणि त्या भाषेच्या विशेष परिचयामुळें अश्वघोषानें

तो संस्कृत भाषेंत त्या अर्थी उपयोजिला असावा. नाहीं तर प्रस्तुत प्रयोगाची उत्पत्ति लागणार कशी? अप्रसिद्ध अशा विशिष्ट अर्थी प्रयोग करण्याला कांहीं तरी उपपत्ति असावी लागते. रूढ संप्रदाय तसा नसतांना एखादा शब्द स्वेच्छेनें हव्या त्या अर्थी उपयोजितां येणार नाहीं. तें भाषाव्यवहाराला सोडून होईल; आणि त्यावर विद्वान् वर्ग आक्षेप घेतल्यावांचून राहणार नाहीं. तात्पर्य, 'प्रागेव' याचा 'किमुत' या अर्थी प्राकृत भाषेंत प्रचार असावा आणि ती बौद्धधर्मानुयायांची जन्मभाषा असावी; अर्थात् त्या भाषेच्या रूढ व्यवहारामुळें होणारा जो विशेष परिचय त्यापासून इतर भाषेंत त्या शब्दाचा त्या अर्थी प्रचार झाला असावा. ही गोष्ट आंग्लभाषापरिचयामुळें मराठींत जे विशिष्ट प्रयोग सांप्रत चालू झाले आहेत त्यावरून कोणासही कळून येईल. खि. पू. तीनचारशें वर्षें प्राकृत भाषेचा प्रचार विशेष होता असें प्रो. मिराशी प्रतिपादितात. अर्थात् प्राकृत भाषा ही त्या वेळच्या समाजाची व्यवहारभाषा असल्यामुळें अश्वघोषाच्या हातून 'प्रागेव' याचा 'किं पुनः' या अर्थी प्रयोग झाला असला पाहिजे. आमचें म्हणणें असें आहे की, याप्रमाणेंच कालिदास हा प्राकृत भाषेचा विशेष प्रचार असतांना, म्हणजे इसवी सनापूर्वी झाला असल्यामुळें त्याच्या हातूनही त्या भाषेच्या रूढ व्यवहारामुळें तसा प्रयोग झाला असेल. कालिदासाचा प्राकृत भाषेशीं परिचय नव्हता असें त्याच्या नाटकांतील प्राकृत भाषेच्या व्यवहारावरून कोणासही म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, ज्या कारणानें अश्वघोषाच्या हातून 'प्रागेव' याचा 'किं पुनः' या अर्थी प्रयोग झाला असावा, तें कारण कालिदासाविषयींहि संभवत असल्यामुळें खिस्तपूर्व पहिल्या शतकांतील बौद्ध काव्यांच्या परिचयामुळें तो योजिला, असें मानण्याचें कारण नाहीं. आमच्या मतें कालिदासाचें 'प्रागेव', 'आस','कामयान,' हे प्रयोग त्याचें प्राचीनत्व सिद्ध करण्यास उपयुक्त होत आहेत. याविषयीं पुढे 'च्युतसंस्कृतित्व' या प्रकरणीं आम्ही थोडासा विचार करणार असल्यामुळें हें विवेचन येथेंच पुरें करूं. सारांश, या प्रयोगावरून कालिदास हा अश्वघोषानंतर झाला असें निश्चयानें म्हणतां येत नाहीं.

प्रो. मिराशी यांनीं कुंतलेश्वरदौत्यासंबंधीं क्षेमेंद्रकवीनें 'औचित्यविचारचर्चें'त कालिदासाचा जो उल्लेख केला आहे त्यावरून त्याला उपोद्बलक म्हणून भोजाच्या 'शृंगारप्रकाशां'त कालिदासाच्या नांवावर असलेला एक श्लोक दिला आहे, आणि तद्द्वारा कालिदासाचा काल द्वितीय चंद्रगुप्ताच्या राजवटींतला, म्हणजे इसवी सनाचें चौथें शतक, असा निश्चित केला आहे.

"यथा कुंतलेश्वरदौत्ये कालिदासस्य" असा उल्लेख करून क्षेमेन्द्र पुढील श्लोक देतोः—

"इह निवसति मेरुः शेखरः क्ष्माधराणा-
मिह विनिहितभाराः सागरा सप्त चान्ये ।
इह महिपतिभोगस्तम्भविभ्राजमानं
धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम् ॥"

सम्राटाचा दूत मांडलिक राजाच्या सभेंत गेला असतां त्याला बसण्याला योग्य स्थान मिळालें नाहीं, तेव्हां भुईवर बसून त्यानें हा श्लोक म्हटला, असें या श्लोकासंबंधानें क्षेमेन्द्रानें स्पष्टीकरण केलें आहे. श्लोकाचा भावार्थः "सर्व पर्वतांत श्रेष्ठ जो मेरुपर्वत तो पृथ्वीवरच (भुईवरच) बसला आहे. सात समुद्रहि पृथ्वीच्या सपाटीवरच स्थित आहेत. तेव्हां शेषाच्या फणाफलकावर शोभायमान असणारें जें हें पृथ्वीमंडल (भुई) तेंच आम्हांस बसण्यास योग्य स्थान होय." आतां प्रो. मिराशी यांचें म्हणणें असें की, द्वितीय चंद्रगुप्ताचा दौहित्र वाकाटक घराण्यांतील जो द्वितीय प्रवरसेन त्याचा पिता रुद्रसेन हा तरुणपणींच मृत झाल्यामुळें त्याचा राज्यकारभार द्वितीय चंद्रगुप्ताच्या देखरेखीखालीं चालला होता. पुढें ही राज्य-व्यवस्था कशी काय चालली आहे हें पाहण्याकरितां त्यानें आपला आश्रित जो कालिदास त्यास दूत म्हणून तिकडे पाठविलें, आणि त्या समयीं त्याला तेथील राजसभेंत योग्य स्थान न मिळाल्यानें तेथें भुईवर बसूनच त्यानें हा श्लोक म्हटला. याला उपोद्बलक म्हणून भोजाच्या शृंगारप्रकाशांत कालिदासाच्या नांवावर असलेला

"असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलितनयनत्वाद् व्यक्तकर्णोत्पलानि ।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणाम्
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥"

हा श्लोक दिला आहे. याचा भावार्थः—कुन्तलेश्वर हा तुझ्यावर सर्व भार टाकून विलासिनीविलासांत मग्न आहे. हा श्लोक कालिदास कुन्तलेश्वराचा वृत्तान्त द्वितीय चंद्रगुप्ताला निवेदन करीत आहे त्या वेळचा आहे. हा कुन्तलेश्वर म्हणजे वाकाटक द्वितीय प्रवरसेन होय, असें थोडीशी चर्चा करून प्रो. मिराशी यांनीं ठरविलें आहे. आम्हांस येथें एकदोन शंका येतात. द्वितीय चंद्रगुप्तानें कालिदासाला स्वतःला दूत म्हणून जर पाठविलें होतें, तर त्या कालिदासकवीनें त्यासंबंधीं रचिलेल्या काव्याला 'चन्द्रगुप्तदौत्य' असें म्हणावयाचें सोडून 'कुन्तलेश्वरदौत्य' असें कां म्हटलें ? आणि कालिदास हा जर चंद्रगुप्ताचा दूत, तर त्यास त्या सम्राटाच्या नांवानें संबद्ध करावयाचें सोडून मांडलिक कुन्तलेश्वराबरोबर कां जोडलें ? प्रभु रामचंद्रानें सीताशोधार्थ हनुमंताला पाठविल्यामुळें त्याला 'रामदूत' म्हणतात, 'सीतादूत' म्हणत नाहींत. तसें येथें 'चंद्रगुप्तदौत्य' म्हणावयाचें सोडून 'कुन्तलेश्वरदौत्य' कां म्हटलें याचा उलगडा होत नाहीं. शिवाय द्वितीय प्रवरसेन हा अल्पवयी असल्या-

मुळें द्वितीय चंद्रगुप्ताच्या दृष्टीखालींच जर त्याचा राज्यकारभार चालला होता, आणि चंद्रगुप्ताची कन्या प्रभावतीगुप्ता (द्वितीय प्रवरसेनाची आई) जर तेथें होती, तर कालिदासाचा अपमान होण्याचें कारण काय? कालिदास हा तिचा प्रत्यक्ष पिता जो महाराजा चंद्रगुप्त त्याजकडून आलेला आहे, शत्रूकडून आलेला नव्हे; तेव्हां त्याचा असा राजसभेमध्यें अपमान होऊन भुईवर बसण्याचा प्रसंग त्यास कां यावा? तिसरी गोष्ट, कालिदासानें जो कुन्तलेश्वराचा वृत्तान्त द्वितीय चंद्र-गुप्ताला सांगितला त्यावरून तो अल्पवयी दिसत नाहीं. तो "पिबति मधुसुगन्धी-न्याननानि प्रियाणाम्" असा, म्हणजे अनेक विलासिनींचा उपभोग घेण्यास समर्थ होता; मग त्याची राज्यव्यवस्था महाराज चंद्रगुप्त कां पाहत होता आणि तो आपला दूत तरी कशासाठीं पाठवीत होता? तात्पर्य, प्रो. मिराशी यांनीं जी कथा दिली आहे आणि जे श्लोक उद्धृत केले आहेत त्यांचा यथार्थ उलगडा होत नाहीं. अर्थात् 'कुन्तलेश्वरदौत्य' हा ग्रंथ जेव्हां प्रकट होईल तेव्हांच वरील सर्व गोष्टी स्पष्ट होऊन कालिदासदौत्यावर प्रकाश पडेल. तोंपर्यंत हें प्रमाण पुढें न आणणेंच बरें. शिवाय जरी हें दौत्यकर्म कालिदासाचें असलें तरी आम्हीं पूर्वी केलेल्या विवेचनावरून कालिदास हा जर इ. स. पूर्वीचा ठरत आहे, तर हा इसवी सनाच्या चौथ्या शतकांतील कालिदास विख्यात काव्यनाटककार कालिदासाहून निराळा कां नव्हे? 'ज्योतिर्विदाभरण'कार कालिदास हा काव्यनाटककार कालिदासाहून जसा निराळा, तसे अनेक कालिदास होते याला प्रमाण म्हणून राजशेखराचा "एकोऽपि जीयते हन्त कालिदासो न केनचित्। शृंगारे ललितोद्गारे कालि-दासत्रयी किमु॥" हा श्लोक प्रो. मिराशी देतात, तीच उपपत्ति प्रस्तुत स्थलीं कां मानतां येणार नाहीं? काव्यनाटककार कालिदासाचा आजपर्यंतचा लौकिक तो विक्रमादित्याचा आश्रित सभापंडित म्हणून आहे, आणि तदनुरोधानें त्याच्या-संबंधीं अनेक दंतकथा प्रसृत झालेल्या आहेत. त्या सर्व सोडून त्याला दूत समजणें आणि त्याला द्वितीय प्रवरसेनावर अवेक्षण करावयास लावणें हें त्याच्या विद्वत्तेस समुचित आहे, असें विचारी पंडितांस वाटणार नाहीं.

आणखी एकदोन प्रमाणांवरून कालिदास हा प्राचीन काळीं झाला असाव असें निष्पन्न होतें. शकुंतलेचा पालनकर्ता कण्व हा नैष्ठिक ब्रह्मचारी होता, हें दुष्यंताच्या तोंडीं घातलेल्या "शाश्वते ब्रह्मणि वर्तमानस्य" या वाक्यांशावरून सिद्ध होतें. प्रचलित असलेल्या श्रौत पद्धतीप्रमाणें त्रेतापरिग्रहाचा (अग्निहोत्राचा) सपत्नीकावांचून इतरांना अधिकार नाहीं. पत्नी व यजमान यांचा अनुकल्प चालत नाहीं हाहि प्रस्तुतचा श्रौत सिद्धान्त आहे. कण्वमुनि होमशालेंत शकुंतलेला अग्नीस प्रदक्षिणा घालण्यास सांगून "वैतानास्त्वां वह्नयः पावयन्तु" असा आशी-र्वाद देतो आणि त्या वह्नींचें "अमी वेदिं परितः क्लृप्तधिष्ण्याः" असें वर्णन

करितो यावरून तो अग्निहोत्री असून तें त्रेताग्नीचें वर्णन आहे हें सिद्ध होतें. तेव्हां कालिदासाचें हें वर्णन सांप्रत प्रचारांत असलेल्या श्रौतसूत्राला सोडून आहे. भवभूति व दिङ्नाग यांनीं अनुक्रमें 'उत्तररामचरित' व 'कुंदमाला' नाटकांत पत्नीवियुक्त रामानें अश्वमेध आरंभिल्याचें वर्णन केलें आहे; परंतु त्या गोष्टीस रामायण उत्तरकांडाचा आधार आहे. तेथें टीकाकारांनीं राम व सीता या अवतारी व्यक्ति होत्या, त्या देवता होत्या, अर्थात् अपत्नीकाला अश्वमेध करितां येत नसला तरी त्या वेळच्या सीताप्रकृतींत सीतादेवीनें स्वसामर्थ्यानें संचार केला म्हणून तो अश्वमेध युक्त होय, असें कांहींतरी समाधान केलें आहे. सारांश, 'उत्तरामचरित' नाटकांतील अपत्नीक रामाच्या अश्वमेधाला रामायणांत आधार सांपडतो. रामाचा विवाह झाला होता, पत्नी मृत झालेली नव्हती, आणि तिची प्रतिकृति तरी केली होती, म्हणून कसें तरी तें समर्थनीय होईल. परंतु शाकुंतलांतील कण्वाचा विवाहच झालेला नाहीं. पत्नीच नाहीं तर प्रतिकृति कोठली ? शिवाय कण्व हा अवतारी नसल्यामुळें त्यास प्रतिकृतींत पत्नीचा संचार करविण्याचें सामर्थ्य कोठलें ? यजमानपत्नीची प्रतिकृति यज्ञकर्मांत उपयुक्त होत नाहीं, हा श्रौतसिद्धान्त असल्यामुळें या ठिकाणीं प्रतिकृतीचा उपयोग तरी काय ? तेव्हां हें कालिदासाचें अनवधान मानावें तर ज्यानें पुष्पमित्राच्या अश्वमेधाचें सार्थ वर्णन केलें त्याचें असें अनवधान संभवनीय वाटत नाहीं. प्रस्तुतच्या श्रौतसूत्रांत कांहीं बदल झाला असावा किंवा त्या कालीं त्याचा निर्बाध प्रसार नसावा, म्हणजे बौद्ध मताचा प्रचार असतांना कालिदास झाला असावा, आणि त्या काळीं प्रस्तुत श्रौतपद्धति सर्वतः प्ररूढ नसावी अशी शंका येते; आणि यावरून कालिदासाचें इसवी सनापूर्वींचें अस्तित्व संभवनीय ठरतें.

तसेंच रघुवंशांतील रघुराजाचें चतुर्थाश्रमस्वीकाराचें वर्णनही प्रस्तुत पद्धतीस सोडून आहे. चतुर्थाश्रम हा केवळ ब्राह्मणवर्णासच विहित आहे. जनक हा पूर्ण ज्ञानी व विरक्त असूनहि केवळ क्षत्रिय होता म्हणून त्यास चतुर्थाश्रम स्वीकारतां आला नाहीं. मग येथें रघूचें चतुर्थाश्रम-स्वीकाराचें वर्णन युक्त कसें ? चतुर्थाश्रमांत अवश्य असणारें परिचरण व भिक्षान्नसेवन हेंहि प्रस्तुत स्थलीं वर्णिलेलें नाहीं. तेव्हां हेंहि वर्णन बौद्धधर्म प्रचारांत असतांना जे बौद्ध भिक्षु होत असत तदनुसारी दिसतें. कारण, बौद्ध लोकांत भिक्षु वाटेल त्यास होतां येत असे. त्यांच्यामध्यें वर्णजाति मुळींच नसल्यामुळें अमक्यानें भिक्षु व्हावें वा होऊं नये असें नियमन असण्याचें कारणच नाहीं. अर्थात् रघूच्या या चतुर्थाश्रमाच्या वर्णनावरून कालिदास हा, जेव्हां बौद्धधर्म प्रचारांतून नष्ट झालेला नव्हता आणि त्यांतील कांहीं आचार सर्वत्र प्रसार पावलेले होते अशा काळांत, म्हणजे इसवी सनापूर्वीं झाला असावा, अशी कल्पना करणें युक्त वाटतें.

वस्तुतः प्राचीन ऐतिहासिक व्यक्तींच्या स्थलकालांचा सोपपत्तिक निर्णय करणें हा एक तज्ज्ञांचाच विषय आहे. या विषयांत अकृतपरिश्रमानें पडणें उचित नव्हे. संस्कृत वाङ्मयांतील प्रसिद्ध ग्रंथकार हे आपल्या स्थलकालांचाहि उल्लेख करीत नाहींत; मग आत्मचरित्र लिहिणें दूरच राहिलें ! त्यांचे अभिमानी त्यांच्यावर स्तोत्रें करतील; त्यांस अवतारी म्हणतील; विविध रम्याद्भुत कथा रचतील; परंतु स्थल, काल व चरित्र यांसंबंधीं नांवहि काढणार नाहींत. कदाचित् एखाद्यानें चरित्र लिहिलेंच असेल तर भक्त्यतिशयानें त्यांत अतिशयोक्ति ही थोडीबहुत असावयाचीच. बरें, एखादें वास्तव चरित्र लिहिलें असेल तर मानव-चरित्राविषयीं भारतीयांची अनास्था प्रसिद्ध असल्यामुळें तें कालोदधींत नष्ट झालें असण्याचा संभव विशेष. अशा अनेक कारणांस्तव एखाद्या प्राचीन सर्वमान्य विद्वानाचें किंवा कवीचें स्थल, काल वा चरित्र ठरवावयाचें म्हणजे प्रत्यक्ष पुरावा त्यांविषयीं सांपडणें दुर्घट. अर्थात् शिलालेख, ताम्रपट, नाणीं इत्यादि साधनांनीं तत्तत्कालीन राजांचा शोध घेऊन त्यावरून त्यांच्या आश्रित कवींच्या स्थलकालादींविषयीं अनुमानें करावयाचीं किंवा त्या त्या व्यक्तींच्या ग्रंथांतील कांहीं उल्लेखांवरून त्या गोष्टी निश्चित करावयाच्या हाच मार्ग अनुसरावा लागतो. पुढें त्यांत अनेक विद्वानांचे अनेक तर्क उद्भवतात आणि मग "यत्नेनानुमितोऽप्यर्थः कुशलैरनुमातृभिः । अभियुक्ततरैरन्यैरन्यथैवोपपाद्यते ॥" अशी स्थिति होत जाऊन कांहींच निश्चित होत नाहीं. त्यांत एकाच नांवाचे अनेक कवि किंवा पंडित असले म्हणजे तर त्यांचे ग्रंथ व स्थलकालादि गोष्टी ठरविण्यांत ब्रह्मघोटाळाच होतो ! शिवाय एकाच कवीचा अनेक नांवांनीं पुढील ग्रंथकार उल्लेख करीत असले म्हणजेहि कोणता ग्रंथ कोणाचा हें ठरविण्यास प्रयास पडतात. उदाहरणार्थ, भवभूतिकृत 'उत्तररामचरित' नाटकाचा टीकाकार घनश्याम हा प्रस्तुत कालिदासाचा भर्तृमीढ, ईश्वरकृष्ण या संज्ञेनें उल्लेख करितो. "रघुकारः कालिदासो मेधारुद्रश्च कोटिजित्" असा कालिदासाच्या अनेक संज्ञा सांगणारा एक कोश आहे. याप्रमाणें स्थूल काल ठरविणाऱ्या साधनांचा घोटाळा पाहिला म्हणजे विद्वान् लोकांना या कामीं किती प्रयास पडत असतील याची कल्पना होते, आणि विक्रमादित्याप्रमाणें कालिदास ही एक कालीदेवीच्या उपासकांची सामान्य संज्ञा आहे, त्या संज्ञेची विशेष व्यक्ति अशी कोणी झालीच नाहीं, असें कोणी अद्यापि म्हणूं लागले नाहींत हें त्या कवीचें महत् भाग्यच समजावयाचें असें वाटूं लागतें. तसेंच कालिदासासंबंधीं अनेक विद्वानांनीं केलेलीं नानाविध अनुमानें पाहिलीं म्हणजे असें वाटतें की, ही इतिहास-चिकित्सक विद्वान् मंडळी कालिदास-स्थलकालनिर्णयरूपी अंतरिक्षांत आपापल्या प्रमाणांच्या धाग्यावर तर्कवितर्करूपी पतंगच जणूं उडवीत आहेत ! अर्थात् सुताच्या गुंडाळ्यावरून आकाशांत फडफडणाऱ्या पतंगास आकाशाचा ठाव लागणें जसें

दुर्घट, तसेंच या अल्प व शिथिल प्रमाणांवरून कालिदासाचा काल निश्चित ठरणें कठीणच. त्यास यापेक्षां महत्त्वाचीं प्रमाणें उपलब्ध झालीं पाहिजेत. तोंपर्यंत हे वितर्कांचे पतंग उडणार ! सामान्य जनांनीं या वेळीं हे पतंग उडविणाऱ्यांचें कौशल्य पाहून काय समाधान वाटेल तें करून घ्यावें, यापेक्षां अधिक अपेक्षा करूं नये. स्वतः आम्हीं जें कालनिर्णयाविषयी हें लिहिलें आहे तें विद्वान् कालचिकित्सकांचा उपहास करण्याविषयीं लिहिलें, असा कोणीं गैरसमज करून घेऊं नये. या कालचिकित्सक व्यक्ति विद्वान् आहेत, सुबुद्ध आहेत व परिश्रम करणाऱ्याहि आहेत. त्यांच्याविषयीं आम्हांस पूर्ण आदर आहे. तेव्हां या केलेल्या विवेचनाचा उद्देश एवढाच की, हें स्थलकालचिकित्सातंत्र किती भानगडीचें आहे याची थोडी वाचकांस कल्पना यावी. अर्थात् अशा या विषयावर कृतपरिश्रम जे डॉ. भांडारकर, डॉ. पाठक, प्रो. मिराशी यांच्यासारख्यांनींच अधिकारयुक्त लेखणीनें लिहावें, इतरांनीं त्यांत पडणें धोक्याचेंच. आम्ही जें पूर्वी विवेचन केलें आहे, तें फक्त प्रो. मिराशी यांच्या मुद्यांवर काय शंका येतात तें दाखविण्याच्या हेतूनें आहे, कालिदासाचा काल ठरविण्याच्या हेतूनें नव्हे. कालिदासाचा काल ठरविण्यास मुख्य प्रमाण काय आहे ? जें विक्रमादित्याचें आश्रितत्व त्यास तरी प्रमाण काय ? दन्तकथा व 'विक्रमोर्वशीयां'तील 'विक्रम' शब्दाचा उल्लेख. परंतु हीं प्रमाणें फारच संदिग्ध व सौम्य स्वरूपाचीं आहेत. यावरून कालिदासाचा काल ठरविणें म्हणजे नीलोत्पलपत्रधारेनें शमीवृक्षच्छेदनच होय. तेव्हां कालिदासाच्या स्थलकालासंबंधानें निःसंदिग्ध व निर्णायक प्रमाण अद्यापि उपलब्ध नाहीं. अर्थात् आमचें विवेचन केवळ शंकोद्भावक समजावें, निर्णायक समजण्याचें कारण नाहीं; आणि निर्णायक म्हणून तें आम्हीं कोठे दर्शविलेंहि नाहीं.

यानंतर प्रो. मिराशी यांनीं आपल्या ग्रंथाच्या सातव्या प्रकरणांत 'च्युतसंस्कृतित्व' या नांवाखालीं कालिदासाच्या अपप्रयोगांचें म्ह० पाणिनीय नियमांस सोडून असलेल्या शब्दरूपांचें जें विवेचन केलें आहे, त्या आक्षेपासंबंधीं थोडासा विचार करूं.

अभिज्ञ संस्कृतसाहित्यशास्त्रकारांनीं 'च्युतसंस्कृतित्व' हा दोष विशेष त्याज्य मानिला आहे, हें "सर्वथा पदमप्येकं न निगाद्यमवद्यवत् ॥" (भामह), "तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्ये दुष्टं कथंचन । स्याद्वपुः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम् ॥ (दण्डी) इत्यादि साहित्यकोविदांच्या उक्तींवरून स्पष्ट होत आहे. प्रस्तुत 'च्युतसंस्कृतित्व' पाणिनीय नियमांस अनुसरून मानण्याचा संप्रदाय आहे. व्याकरणमहाभाष्यकार पतंजलीनें "प्रमाणभूत आचार्यो दर्भपवित्रपाणिः शुचावाकाशे प्राङ्मुख उपविश्य महता प्रयत्नेन सूत्राणि प्रणयति स्म । तत्राशक्यं वर्णेनाप्यनर्थकेन भवितुम् ।" अशी भगवान् पाणिनीच्या सूत्रांची प्रशंसा केली असून त्यास व्याकरणशास्त्राविषयीं 'प्रमाणभूत' असें म्हटलें आहे. भामहानें तर 'सूत्राम्भसं पदावर्तम्' इत्यादि

कारिकांनीं या व्याकरणशास्त्राची महती वर्णिली आहे. तेव्हां पाणिनीय नियमानुसार शुद्ध प्रयोग कवींनीं करावे असें जें साहित्यशास्त्रकारांनीं ठरविलें तें युक्तच होय. असें आहे तरी प्राचीन कालापासून अभिजात कवींनीं पाणिनीय नियमांस सोडून असलेले जे शब्दप्रयोग अंगीकारले आहेत ते अशुद्ध मानावे किंवा काय हा विचाराचा प्रश्न आहे; उदाहरणार्थ तर्जयति, भर्त्सयति, मा भैः, विश्रामः, भूभर्ता, भयशोकहन्ता इत्यादि शिष्ट कवींनीं व विद्वानांनीं अंगीकृत प्रयोग अशुद्ध समजणें नडीचेंच आहे. कारण, असे कांहीं शब्द शिष्टादृत आहेत म्हणूनच पुढील मान्य व्याकरणकारांनीं त्यांविषयीं नियम करून त्यांचें अशुद्धत्व घालविलें आहे; आणि पाणिनीय व्याकरणकारांनीं योगविभाग, पदच्छेद, ज्ञापक इत्यादि मार्गांनीं त्यांचें अशुद्धत्व निराकृत केलें आहे. प्रो. मिराशी यांनीं 'काव्यालंकार-सूत्र'काराचा उल्लेख करून ही गोष्ट सुचविली आहेच. वामन, शाकटायन किंवा चांद्रव्याकरणकार केवळ एखादद्दुसऱ्या प्रयोगावरून अशुद्ध शब्दांचें समर्थन करण्यास सिद्ध होणार नाहींत; तर तसा शिष्ट विद्वानांचा संप्रदाय पूर्वकाळीं असावा म्हणून त्यांनीं तें समर्थन केलें आहे हें आपण ध्यानांत ठेवावें. प्रो. मिराशी यांनीं दर्शविलेल्या च्युतसंस्कृतींत 'आस' व 'कामयान' हेच दोन प्रधान शब्द असून अन्य दोषांचा त्यांनींच संप्रदायादि कारणें देऊन योग्य निरास केला आहे. परंतु 'आस' या ठिकाणीं ते कालिदासाचें जें अनवधान मानतात तें आम्हांस युक्त वाटत नाहीं. अनवधानानें कानामात्रादिकांमध्यें दोष होणें संभवनीय असतें; उ० 'विश्रम'ऐवजीं 'विश्राम', व 'विरिंचि'ऐवजीं 'विरंच' अनवधानानें होऊं शकेल. परंतु 'बभूव' ऐवजीं 'आस' असें अनवधानानें कसें होईल ? तसें होणें शक्य नाहीं. याची उपपत्ति अशी समजावी : अनुप्रयोग म्हणून पाणिनिहि 'आस' या प्रयोगास संमति देतो. केवळ स्वतंत्रपणें तसा प्रयोग करण्यास पाणिनीय नियमांत सवड दिसत नाहीं. तथापि हा प्रयोग शिष्टव्यवहारांत होता. पाणिनीच्या महत्त्वामुळें हे शिष्टप्रयोग पुढें अशुद्ध समजूं लागले ही गोष्ट निराळी. परंतु पूर्वीं तो 'पातयां प्रथममास', 'तस्थिवांसं' याप्रमाणें शिष्टप्रचारांत होता. म्हणूनच वामनादिकांनीं त्याची उपपत्ति केली. प्रो. मिराशी यांनीं जातकमालेंत 'आस' असा प्रयोग असल्याचें म्हटलें आहे. मग असा संप्रदाय असतां त्यांनीं येथें कालिदासाचें अनवधान कां मानावें तें समजत नाहीं. 'कामयान' हें रूप 'कामयमान' याच्या ऐवजीं योजिलें आहे. त्याची उपपत्ति मल्लिनाथानें 'आगमशास्त्रमनित्यम्' या परिभाषेनें केली आहे. परंतु त्यापेक्षां वामनाचें "कामयानशब्दः सिद्धोऽनादिश्चेति" हें म्हणणें आम्हांस विशेष विचारार्ह वाटतें. तो म्हणतो, 'कामयान' हा प्रयोग अनादिसिद्ध असा प्रचारांत होता. अर्थात् तो अशुद्ध समजण्याचें कारण नाहीं. आम्हांस 'आस', 'कामयान', 'प्रागेव' इत्यादि कालि-

दासीय प्रयोगांवरून ज्या कालांत पाणिनीय नियमांना सर्वशिष्टादृत प्रामाण्य रूढ झालें नव्हतें, अशा प्राचीनकाळीं कालिदास झाला असावा असें वाटतें. तेव्हां पाणिनीला ज्या काळांत सर्वतोमान्यत्व आलें होतें त्या काळांत त्याला ओढून त्याच्या प्रयोगांचें शुद्धत्वाशुद्धत्व ठरविणें उचित होईल कीं काय याचा विद्वानांनीं विचार करावा.

शेवटीं कालिदासाच्या कृतींत जी एक उणीव भासते तिचें थोडेंसें दिग्दर्शन करून हें लांबलेलें विवेचन पुरें करूं.

काव्यरचनेंत रीतीला विशेष प्राधान्य असतें; हें साहित्यशास्त्राचें ज्यांनीं परिशीलन केलें आहे त्यांस अवगत आहेच. वामनानें "रीतिरात्मा काव्यस्य" असें रीतीचें महत्त्व सांगून "विशिष्टपदरचना रीतिः", "विशेषो हि गुणात्मा" असें रीतीचें लक्षण करून पुढें रीतीस आवश्यक असणारे "श्लेषः प्रसादः समता" इत्यादि दहा शब्दगुण व अर्थगुण यांचें विवेचन केलें आहे. या रीतीचे वैदर्भी व गौडी असे मुख्य दोन भेद असून त्यांचीच चर्चा दंडीनें प्रथम परिच्छेदांत केली आहे. माधुर्य, सुकुमारता, अर्थव्यक्ति इत्यादि गुणांनीं युक्त आणि स्वल्प समास, मृदु व्यंजनें व पंचमवर्णयुक्त संयुक्त वर्ण यांनीं परिप्लुत अशी रचना असली म्हणजे वैदर्भी रीति होते; आणि ओजोगुण, दीर्घ समास यांनीं युक्त व कठोर व्यंजनें, समान वर्ण व संयुक्त अक्षरें यांनीं परिप्लुत अशी रचना असली म्हणजे गौडी रीति होते. तसेंच शृंगारकरुणादि रसांत व उद्यान, लता, पक्षी इत्यादिकांच्या मनोरम वर्णनांत वैदर्भी रीति उपयुक्त असते; तर वीर, रौद्रादि रस व ग्रीष्मादि प्रखर ऋतु, अरण्यें, व्याघ्रसिंहादि पशु, यांच्या वर्णनांत गौडी रीति उपयुक्त असते. याप्रमाणें औचित्यानें या रीतींचा कवीनें उपयोग केला म्हणजे कवीची ती कृति चित्ताकर्षक होते. अर्थात् कवीचें या दोन्ही पद्धतींवर प्रभुत्व नसेल तर त्याच्या कृतींत विशिष्ट स्थलीं वैगुण्य प्रतीत होतें. कालिदासाचीं काव्यें व नाटकें पाहिलीं तर त्यांत वैदर्भी रीति पूर्णावस्थेस गेलेली दिसून येते. रतिविलाप, अजविलाप हीं या रीतीचीं उत्कृष्ट स्थलें होत. परंतु कालिदासाच्या सर्व कृतींत, विशेषतः जेथें गौडी रीति आवश्यक आहे अशा स्थळींहि, त्यानें गौडीचा स्वीकार केलेला नाहीं; उदाहरणार्थ, त्याचें हिमालयवर्णन, वन्यगजवर्णन, अजानें केलेल्या युद्धाचें वर्णन. अशीं कितीतरी स्थळें दाखवितां येतील की, जेथें गौडी रीतीचा त्यानें अवलंब करणें अवश्य होतें. यासंबंधीं भवभूतीकडे पाहिलें तर त्यानें एकहि असा प्रसंग व्यर्थ दडवला नाहीं की जेथें गौडी रचना करून त्या प्रसंगास त्यानें मनोहरत्व आणिलें नाहीं; उदाहरणार्थ, ग्रीष्मऋतूंतील मध्याह्नवर्णन : "छायापरिकिरमाणविष्किरमुखव्याकृष्टकीटत्वचः कूजत्क्लान्तकपोतकुक्कुटकुलाः कूले कुलायद्रुमाः।", "दृप्तिस्तृणीकृतजगत्त्रयसत्त्वसारा" व "ज्याजिह्वया वलयितोत्कटकोटिदंष्ट्रं" इत्यादि लवाचें वर्णन पाहावें. भवभूतीनें अशीं किती

तरी पद्यें व गद्येंहि गौडी रीतींत ग्रथित केलीं असून त्यामुळें ते ते प्रसंग वाचकांची चित्तवृत्ति विस्फारित करीत आहेत हें दाखवितां येईल. वस्तुतः पाहतां कालिदासोक्ति ही जशी वैदर्भीगिरेचें सार आहे तशी भवभूतीची उक्ति गौडी गिरेचें सार आहे, असें म्हणण्यास चिंता नाहीं. कालिदासाचें जसें गौडीरचनेंत न्यूनत्व तसेंच भवभूतीचेंहि वैदर्भीरचनेंत अपूर्णत्व दिसून येतें. दोन्ही रीतींचें प्रावीण्य एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं पाहावयाचें असेल तर तें पंडित जगन्नाथरायांत पाहावें. त्याच्या 'रसगंगाधरां'तील माधुर्यगुण व ओजोगुणप्रसंगांचीं उदाहरणें पाहिलीं असतां आमचें म्हणणें वाचकांस युक्त वाटेल. असो. आम्हांस प्रस्तुत एवढेंच सूचित करावयाचें आहे की, कालिदासाच्या कृतींत गौडी रीतीचा अभाव आहे म्हणून तें एक न्यूनत्व भासतें. आतां वाचक म्हणतील की, भवभूतींत वैदर्भीचें न्यूनत्व नाहीं काय ? मग कालिदासाच्या न्यूनत्वाचीच इतकी चर्चा कां ? याचें उत्तर कालिदास कविसम्राट् आहे, काव्यनाटकरचनाचिंतामणि आहे. वर्ण, शब्द, अर्थ इत्यादिकांचा समुचित उपयोग करून वाचकांच्या भावना उद्दीप्त करणारा तो रसमहोदधिचंद्रमा आहे. म्हणून त्याच्या कृतींत ही उणीव उद्विग्नता उत्पन्न करिते. भवभूतीस कोणी 'कविकुलगुरु' म्हटलें नाहीं, तो कविताकामिनीचा विलास नव्हे. तेव्हां त्याचें नांव कालिदासचर्चेत कशाला हवें ?

आतां कांहीं विद्वान् वाचकांस अशी शंका येण्याचा संभव आहे की, दंडी प्रभृति साहित्यग्रंथकारांनीं वैदर्भीप्रमाणें गौडीसंबंधीं आपला आदर दर्शविलेला नसून ठिकठिकाणीं तिला जर न्यूनत्व दिलें आहे, तर तिच्याविषयीं आम्हीं इतका आदर कां दर्शवावा ? या विद्वान् शंकाकारांस आम्हांस एवढेंच सांगावयाचें आहे की, दंडीनें जो उपहास केला आहे तो गौडी रीतीचा नसून अनुचितपणानें गौडीचा उपयोग करणाऱ्या गौड कवींचा आहे. संयुक्तवर्णानुप्रासयुक्त दीर्घसमासघटित रचना करून वर्णतांडव करणें हेंच काव्याचें ध्येय, आणि त्याचा सर्वत्र उपयोग करून दाखविणें हेंच जणु भाषाप्रभुत्व ! तात्पर्य, अर्थ किंवा प्रसंग यांकडे लक्ष न देतां केवळ वर्णाडंबर माजविणें हें ज्यांच्या काव्यांत विशेष दृष्टीस पडतें, आणि अशा पद्धतीचे जे अभिमानी गौडकवि त्यांच्यासंबंधीं दंडीचा तो उपहास आहे, गौडी रीतीविषयीं नव्हे. गौडी रीति सर्वथा त्याज्य मानिल्यास आपल्या साहित्यांत वीररसासानुकूल रचना नसून भरतखंडांतील शौर्य विलयाला गेलें होतें असें समजण्यासारखेंच तें होय. युद्धसंघर्षणवर्णन कर्तव्य असतां तेथें "साकूतमधुरकोकिलविलासिनीकंठकूजितप्राय" अशा उक्तींचा काय उपयोग ! तेथें चापटणत्कारानुकारी गौडी रीतीचाच आश्रय केला पाहिजे.

असो. येथपर्यंत प्रस्तुत 'कालिदास' ग्रंथांतील अत्यल्प विषयाचें आम्हीं समीक्षण केलें आहे. तथापि हा समग्र ग्रंथच वाचनीय झाला असून कालिदासाचा

योग्य परिचय करून देण्यास तो फार उपयुक्त आहे. अर्थात् कालिदासजिज्ञासूंनीं तो अवश्य वाचावा, म्हणजे त्या महाकवीच्या काव्यनाटकांचें यथार्थ महत्त्व त्यांच्या ध्यानांत येईल. एवढेंच नव्हे तर कालिदासकालीन ऐतिह्याचेंहि त्यांस ज्ञान होईल. सारांश, प्रो. मिराशी यांनीं या सुंदर ग्रंथाच्या द्वारें मराठी वाङ्मयांत उत्तम भर घातल्याबद्दल सर्व जुनेनवे विद्वान् त्यांस धन्यवाद देतील असें सांगून आणि कालिदासप्रशंसापर असे विशेष प्रसिद्ध नसलेले दोन श्लोक शेवटीं उद्धृत करून हें समीक्षण पुरें करितों.

> "नेत्रीकृताग्निमित्रा[1] कुमारसूर्[2]जनितमेघरघुभावा[3] ।
> कवितामिषेण काली वशंगता कालिदासस्य ॥" —तर्ककुतूहल
> "कालीच्या लीलों[4] जो ऱ्हस्व करी असुनि दास निजलीला ।
> कवितेला जागवुनी प्रकटवि कवि कालिदास निजलीला" ॥
>
> —विठोबाअण्णा दफ्तरदार.

---

१. या आर्येत श्लेषानें कालिदासकविता व कालीदेवी यांचें साम्य दर्शविलें आहे. 'नेत्रीकृताग्निमित्रा' म्हणजे जिच्यांत अग्निमित्र राजा नायक आहे. पक्षीं, नेत्रीकृत आहे अग्नि ज्यानें असा शंकर जिचा मित्र म्हणजे सहचर (पति) आहे, ती काली.

२. 'कुमारसंभव' काव्य व कार्तिकस्वामी यांची 'सूः' प्रसवणारी.

३. 'मेघदूत' व 'रघुवंश' हीं काव्यें जिनें उत्पन्न केलीं आहेत; 'जनित' आहे मेघाला लघुभाव म्हणजे लघुत्व जिनें, म्हणजे, जी मेघश्यामलकांति आहे. येथें 'रलयोरभेदः' या साहित्यिक समयाप्रमाणें 'रघू'चें 'लघु' करून श्लेष साधला आहे.

४. 'लीला' म्हणजे 'ली' या अक्षराला. 'काली'चा दीर्घ ईकार कालिदास या संज्ञेत 'ङ्यापः । संज्ञाछंदसोर्बहुलम्' या नियमानें ऱ्हस्व झाला आहे. त्यावर ही दप्तरदारांची कोटि आहे. बाकीचा अर्थ स्पष्टच आहे.

महादेव-गोविन्द-रानडेमहाभागानां निधनकाले पौरविलापः ।

प्रस्पन्दन्निजदण्डखण्डितसमुच्चण्डारिषण्डाः पुरा
क्षोणीमण्डलमण्डनाः सुयशसः पण्डावदग्रेसराः ।
राजानो निजधर्मकर्मनिरता दिक्षु श्रुता सर्वत
आसन्भारतभूमिभारभरणोद्युक्ताः प्रजारञ्जनैः ॥१॥

पश्चाद्दैववशादयं सुफलितः सौराज्यवृक्षो यदा
उध्वस्तः कुनृपालमत्तकरिभिः स्वैरेव दुष्कर्मभिः ।
संलब्धप्रसरास्तदाङ्ग्लविबुधाः संपन्नराज्यं त्विदं
ऊढ्वा लोहरथादिकर्मचकितानप्रीणयंस्ते जनान् ॥२॥

तेषां तन्नृपनीतिकौशलमभूत्पारेगिरां सर्वतो
येनासीदिह विस्मयावृतमतिश्चान्तर्मुखः सज्जनः ।
एवं राष्ट्रमभून्निनंक्षु च यदा भग्नोद्यमत्वान्नृणा- ।
मेकः कश्चन राष्ट्रनायकमणिर्ह्यत्राविरासीत्तदा ॥३॥

श्रीगोविन्दाल्लब्धजन्मा सुशीलो लोकैर्गीतो यो महादेवनाम्ना ।
प्रज्ञोन्मेषैश्चित्रितं येन विश्वं विद्यालक्ष्म्योर्यश्च संवासभूमिः ॥४॥

लोकाग्रणीनां प्रथमो विनेता तांस्तानुपायानुपयुज्य यत्नतः ।
सर्वत्र नैराश्यविनष्टजीवितं देशं महाराष्ट्रमसावजीवयत् ॥५॥

हा हा दैवेन सोऽद्य स्मृतिपथविषयं प्रापितो राष्ट्रनेता
नष्टं नष्टं विनष्टं त्रिभुवनललितं भूतलस्थं सुरत्नम् ।
शान्तः शान्तः प्रशान्तो जगदुपकृतये स्थापितो रम्यदीपः
शीर्णः शीर्णो विशीर्णो द्विजकुलवसतिस्तुङ्गनीडायवृक्षः ॥६॥

सर्वत्र संवर्धितमोहजालध्वान्तौघविध्वंसनवासरेशः
सन्नीतिवल्लीनववारिवाहो देवो महापूर्व इतो गतोऽभूत् ॥७॥

प्रज्ञावतां यो हृदयैकहारकः स्वपीडनेनापि परोपकारकः ।
शान्तेः परं केलिविलासधाम सर्वसहायास्तिलको गतोऽभूत् ॥८॥

नरा न राजन्ति सखे सखेदाः प्रभा प्रभातस्य गता सतामितः ।
कालोऽद्य कालोकविशेषदुर्धरः कृता कृतान्तेन मतिश्च निष्ठुरा ॥९॥

एवं महाविपदि संप्रति खिद्यमाने राष्ट्रे कथं भवति ते परलोकवाञ्छा।
कं वाधुना कथयिता सुजनः स्वदुःखं कस्तस्य युक्तिवचनैः शमयेन्महर्धिम् ॥१०॥
त्वया धृता ये मनुजाः स्वहस्ते ते भान्ति राज्ञां नितरां सभासु।
पुष्पाश्रयाच्छम्भुशिरोधिरूढा पिपीलिका किं न चुचुम्ब चन्द्रम् ॥११॥
उदितपरगुणेन्दौ वृद्धिमायाति शान्त्या भवति परगभीरो नीतिरत्नाकरश्च।
इति समगुणयोगात्सागरेणोपहूतः किमिति निजशरीरं प्रोज्झहौ तस्य कूले ॥१२॥
लब्धं हि गोविन्दपदात्सुजन्म कीर्त्या च सर्वं विमलीकृतं जगत्।
तथा स्वगोत्रोद्धरणे भगीरथ इतीव गङ्गा चकमेऽस्थिसञ्चयम् ॥१३॥
भो भो माधव मा धव त्वमधुना कार्येषु भो गीष्पते
देवीं वाचमुपास्व राज्यभरणे त्रासं हरे संहरेः।
पातालं व्रज शुक्र सन्ततमहो देवाः सुखं स्थीयतां
कैलासादिव यद्भुवो दिवि महादेवः समागच्छति ॥१४॥
आस्तामिदं त्यजत तत्परिदेवनं च जन्तोर्यदाह मरणं प्रकृतिः कवीन्द्रः।
आरब्धकार्यनिवहं प्रविभज्य तस्य सिद्धिं मुदा नयत तुष्यति तत्र सोऽन्तः॥१५॥
भोः श्रीश प्रभुवर राष्ट्रनायकेऽस्मिन् धेहि त्वं दिवि परमेश सौख्यजातम्।
सत्कार्योद्यमपरतां तदीयमित्रे सौराज्याङ्कुरतरुतां च तस्य राष्ट्रे ॥१६॥

विद्यावाचस्पतिविद्यालङ्कारमहामहोपदेशकपण्डितप्रवराणामप्पाशास्त्रिराशिवडेकराभिधानां निधनविलापः।

यत्कौशलं किमपि निस्तुलमाविरासीद्वाचस्पतेरिव मनोहरसंस्कृतोक्तौ।
श्लाघास्पदं विबुधमण्डलमण्डनं यो हा हन्त मृत्युविषयं स गतः सखा मे ॥१
आत्मा ममेति मनुते हि सरस्वती यं विद्यानिधिः सततमेव महेश्वरो वा।
अप्पेति ख्यातिरभवत्खलु येन तस्य हा हन्त मृत्युविषयं स गतः सखा मे ॥२
यः क्षीरधीर्भवति संस्कृतचन्द्रिकाया ज्योत्स्नां सुरैरिव बुधैर्विनिपीय यस्याः।
प्रेम्णा मुहुर्मुहुरकारि च साधुवादो हा हन्त मृत्युविषयं स गतः सखा मे ॥३
भावान्वितां च मधुरां च रसाश्रयां च ओजोयुतां च भुवि सूनृतवादिनीं ताम्।
दृष्ट्वा शशंसुरखिला विमलाशया यं हा हन्त मृत्युविषयं स गतः सखा मे ॥४॥

सौजन्यवारिधिरुदारमतिर्विनीतो विद्यानिधिर्विमलधर्मरतिश्च नित्यम् ।
गीर्वाणवाक्समुदयेषु च योऽभिमानी हा हन्त मृत्युविषयं स गतः सखा मे ॥५

विरहिविलापः ।

नभसः प्रथमे दिने प्रशान्तो मम संसारपथस्य रत्नदीपः ।
गृहसौख्यसुखाभिवर्षिचन्द्रो ग्रसितो वा हतदैवराहुणासौ ॥१॥
अथवा दववह्निना प्रदग्धं मम केलीवनमन्दिरं सुरम्यम् ।
अमृतहृद एष वा विलीनो धरणीकम्पवशेन भूतलेऽस्मिन् ॥२॥
सहसा मम सौख्यपारिजातः पतितो वायुवशेन हन्त भूमौ ।
सदपत्यसुमान्यमूनि यस्य गतशोभानि न नन्दयन्ति दृष्टिम् ॥३॥
किमिदं पतितं किमद्य जातं भविता वा मम का गतिः पुरस्तात् ।
इति चिन्तयतोऽनिशं मनो मे भ्रमतीदं खलु मन्थरं विवेके ॥४॥
रमणीविरहेषु भीरु चेतो मम बद्धान् शुकसारिकाकदम्बान् ।
ननु वीक्ष्य बभूव दुःखितं यत् कथमेतत्सहतां प्रियावियोगम् ॥५॥
न तु मातृगृहं कदापि दीर्घमुषिता या खलु मद्वियोगभीता ।
प्रसभं हतमृत्युना हृता सा विवशा हन्त कथं गमिष्यति द्याम् ॥६॥
मयि शोकविषेण दह्यमाने भुवि लुठ्यत्सु सुतेषु पञ्चषेषु ।
अमुषो भुवि चित्तबन्धनं नो न च मृत्यो सदृशस्त्वयास्ति शूरः ॥७॥
शिशवो हतमातृसौख्यदीना गृहिणीरत्नविवर्जितं गृहं मे ।
मुषितोऽस्मि कलत्रसङ्गशून्यो ग्लपितं तां हरता त्रयं त्वयैतत् ॥८॥
अभवन्विषयाः सुधोपमा ये मम पूर्वं प्रियया समाश्रितस्य ।
अधुना खलु तद्वियोगतस्ते विषपूर्णा इव तापयन्ति नित्यम् ॥९॥
कुरु विस्मरणं विमुञ्च शोकमिति मित्राणि दिशन्ति नित्यमेव ।
अनिशं स्मरतस्तदीयलीलां कथमेतन्मम संभवेदिदानीम् ॥१०॥
या मां पुपोष दिवसे दिवसे सुभोज्यैर्या संतुतोष हृदि मे सरसैर्वचोभिः ।
या मां सदाशिशिरयच्च सुधाकटाक्षैर्हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥११
या पारिजातकुसुमैस्तुलसीदलैश्च जातीसुमैश्च परिपूजयति स्म लक्षैः ।
श्रीमाधवं मम करेण विशुद्धशीला हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१२।

हस्तेन हस्तमवलम्ब्य मम प्रयागे गङ्गाकलिन्दतनयाशुचिसंगमे या ।
स्नाताददाद् द्विजवराय सुवायनानि हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् १३।
विश्वेशमाधवमुखानमरान् सुशीला काश्यां समर्चितवती परमादरेण ।
या नन्दिता च नगरीरमणीयदेशैर्हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१४॥
राधामुकुन्दकृतकेलिमनोज्ञदेशां या कौतुकान्मधुपुरीं परितो निशाम्य ।
जातावनम्रवदना मधुरस्मिता च हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१५
या सप्ततारनगरे जनतापुरोगैश्छात्रैः कृतं मम सभाजनमादरेण ।
श्रुत्वा ममज्ज सुखितामृतसागरेषु हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१६
मुम्बापुरे स्वतनयातनयान् कदाचित् सायं पयोधिसविधे परिचारयन्ती ।
उत्तुङ्गवीचिचकिता सुखदर्शना या हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१७
याभ्यास्य नावमुदधौ निशि चन्द्रिकायां वीचीविलोलगतिकां विजहार मोदात् ।
नक्षत्रचित्रितजले स्वदृशं क्षिपन्ती हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१८
भूषाविधिं परिमितं विरचय्य गात्रे मत्स्नेहतश्च रुचिरं परिधाय वस्त्रम् ।
या मोहिनीव मम लोभयति स्म चेतो हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥१९
निर्वर्त्य शीघ्रमखिलं गृहकृत्यजातं सायाह्नि सत्वरमुपेत्य च हर्म्यपृष्ठम् ।
मन्मार्गदत्तनयना भृशमुत्सुका या हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२०
अभ्यागते सखिगणे गृहमस्मदीयं तेषां कथासु चलितासु परस्परेषाम् ।
या प्राहिणोत्स्वतनयैश्च कषायपेयं हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२१
रामायणं परिपठन्त्यथ भारतं वा किं वा धुरीणमपि केसरिवृत्तपत्रम् ।
या मां दिदेश विविधानि रसस्थलानि हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२२
पाके सुशीलपरिचारिकया निवृत्ते यान्येषु सत्स्वपि जनेषु मुदा स्वयं माम् ।
स्नेहस्मितेन परिवेशयति स्म नित्यं हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२३
या भोजनादनुपदं पुरतः समेत्य ताम्बूलमर्पितवती मृदुहासपूर्वम् ।
नेत्रेण मद्गमनमप्यनुमन्यते स्म हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२४
बीजानि दाडिमफलस्य मयोच्चितानि पुत्राय रौप्यचषके निहितानि यादात् ।
बाष्पाम्बुपूर्णनयना गतशक्तिकान्ते हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२५
आस्थीयतां सविधमित्यतिपेशलं मामाहूय या निरदिशत्सविधेऽन्तकाले ।
प्रेम्णा मदीयवदने निहितात्मदृष्टिर्हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२६

पश्यत्तदीयसुमनोहरभूषणानि चेतंस्त्विदं भ्रमति दृष्टिमुपैति बाष्पम् ।
कण्ठश्च रुद्धवचनो मम वत्सरान्ते हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२७
वीणेव मञ्जुलनिनादवती सुशीला ज्योत्स्नेव या सकलतापविनाशदक्षा ।
उत्फुल्लजातिलतिकेव मनोज्ञरूपा हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२८
सोमाभिरामवदना कनकावदाता मुग्धा सरोजनयना विमलाशया या ।
मच्चित्तरञ्जनपरा विनयावनम्रा हा विस्मरिष्यति कथं मम मानसं ताम् ॥२९

मिस् बर्न यांना मुलींचा निरोप

ध्यायं ध्यायं तव गुणगणांश्चेतसो मार्दवं च
स्वीयामोदेष्वपगतमदः सौकुमार्यं तथैव ।
नूनं पुष्पाञ्जलिरयमसौ कन्यकाहस्तमुक्तो
ह्रीणो ह्रीणः कथमपि कथं सेवते ते पदान्तम् ॥ १ ॥

सर्वाः साञ्जलयः प्रणम्य विदुषीं त्वामुत्सुकाः प्रेमतः ।
शालास्थाः प्रणयावरुद्धहृदयाः कुर्मो वयं प्रार्थनाम् ।
वत्सस्यैव हिताय धेनुरटवीं गत्वेति सायं यथा
गत्वायाहि तथैव लन्दनपुरीं त्वं नः सुखाकाङ्क्षिणी ॥
बालार्पितां विदुषि मालां कुरुष्व हृदि लीलास्मितास्यमधुरे
त्वल्लाभतो हृदयमुल्लासमेति खलु कह्लारशोभिनयने ।
शालाभिमानवति नीलालके विमलशीलान्विते गुणयुते
दोलायते सततमालापसंश्रवणलोलान्तरस्तव जनः ॥
माधवीसुमनसां न केवलम् आत्मनः सुमनसामपि स्रजम् ॥
कन्यकाभिरचितां मनोहरां स्वीकुरुष्व तव कण्ठमण्डनम् ॥
विधत्तां प्रभुः सिद्धिमिच्छानुकूलः शिवाः संतु मार्गाश्च भूसागरीयाः ।
सदा चिन्तयामो वयं मङ्गलं ते अये प्रीतिरस्मासु संवर्धतां ते ॥

लो. बाल-गङ्गाधर-तिलकषष्ठ्यब्दीसभाजनम् ।

अहर्निशं भारतभूजनानां कथं समृद्धिर्भवितेति चिन्तनात् ।
येन स्वमायुर्विपुलं व्ययीकृतं श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥१॥

पौरस्त्यपाश्चात्यनिबन्धरत्नान्यालोक्य तत्त्वानि नवानि धीमान् ।
सदा पुरः संनिदधाति यः सतां श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥२॥
मतिर्विचित्रा कृतयो विचित्रा धृतिर्विचित्रा भुवनेषु यस्य ।
विचित्रता याति विचित्रतां यतः श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥३॥
राष्ट्रस्य नेता विदुषां च यः सदा पाताथ भर्ता सुहृदां विशेषतः ।
राष्ट्रस्य चायुः खलु यस्य जीवनं श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥४॥
गङ्गाधराल्लब्धजनिर्महात्मनो बालाभिधो यस्तिलकान्वयाग्रणीः ।
स्मृत्वैवमन्तर्विबुधा नमन्ति यं श्रीशो मुदा तं कुरुताच्चिरायुषम् ॥५॥

श्रीमत्सयाजीनृपतिप्रशस्तिः ।

एषा वटोदरपुरी रमणीयरूपा सौराष्ट्रमण्डलमलंकुरुते नितान्तम् ।
श्रीमत्सयाजिनृपचन्द्रिकया हि यस्यां विद्वच्चकोरगण आतनुते प्रमोदम् ॥१॥
विद्वन्नुतो गुणयुतो नृपनीतिदक्षो लक्ष्मीविलासभवनं भुवने च कीर्तेः ।
उद्धारकर्मणि यथा स पुरा शिवाजिर्भूमेस्तथैव यतते ह्यधुना सयाजिः ॥२॥
नक्षत्रभाभिरुडुराड् गगने चकास्ति विद्वद्भिरेष भुवनेऽनुसृतो विभाति ।
ज्योत्स्नां किरन्हरति तापमसौ जनानां विद्याभिरेष तनुते हि सुखं प्रजानाम् ॥३॥
वृष्ट्या धिनोति मघवा बहुवारमत्र कीर्त्या सयाजिनृपतिश्च सुरान्परत्र ।
दृष्ट्वा सदाचरणमस्य परं महेन्द्रो लज्जाविनम्रवदनो नु दिवं गतोऽभूत् ॥४॥
मातेव रक्षति पितेव हिते नियुङ्क्ते स्वीयाः प्रजाः प्रगतिसाधनतत्परो यः ।
सोऽयं सयाजिनृपतिर्भुवि भातु शश्वत्संवत्सराञ्छतपरान् भगवत्प्रसादात् ॥५॥

ब्रह्मसूत्रभाष्यभाषान्तरप्रस्तावना ।

जन्माद्यस्य यतो भवत्यविरतं विश्वस्य विश्वोत्तमा-
दाम्नायाः सततं च यस्य विविधान् गायन्ति दिव्यान् गुणान् ।
यं सर्वे प्रतिपादयन्ति च परं शब्दा महायोगत-
स्तद्ब्रह्माहमहर्निशं कविनुतं वन्दे मुकुन्दाभिधम् ॥१॥

सांसारिकेषु विषयेषु विरज्य भक्त्या सेवारताय निजपादसरोरुहाणाम् ।
प्रेम्णा समर्पयति यः परमं पुमर्थं तस्मै नमो भगवते गरुडध्वजाय ॥२॥
उत्क्रान्तिमार्गमभियन् सकलोऽपि जीवो यं प्राप्य संप्रविशति तेन युतो मुकुन्दम् ।
तस्मै नमो वितनुमो भगवत्प्रियाय जीवोत्तमाय सततं च समीरणाय ॥३॥
मध्वागमोदधिविलोडनमन्दराभा-दुर्वादिफेरवविदारणपञ्चवक्त्राः ।
संसारतप्तजनशान्तिसुधाकरा ये तान् प्रत्यहं च जयतीर्थमुनीन्नमामः ॥४॥
सच्छास्त्रपाठनिरतान् कुशलान् विपक्ष-वादीभदन्तहरणे श्रुतियुक्तिकुन्तैः ।
तान्विद्वदालिनुतशुद्धगुणांश्च सत्यध्यानाह्वयान् यतिमणीन् शिरसा वहामः ॥५॥
शाब्दाम्बुधौ विहरणे विजितादिमीनाः सद्धर्मकैरवविकासनभास्कराश्च ।
ये चास्मदीयजनुषः परमं निदानं तान् बालकृष्णचरणान् हृदि चिन्तयामः ॥६॥
द्वैतागमो हि रुचिरो निखिलागमेषु जीवेशभेदविषयः खलु तत्र हृद्यः ।
रम्यश्च सर्ववचसां सुसमन्वयो य आनन्दतीर्थमुनिना विहितो मुकुन्दे ॥७॥
तच्छास्त्रतत्त्वकलने ह्यधिकारिणो ये तेषां सुखेन खलु तत्र वगाहनार्थम् ।
यत्नः कृतोऽयममुना निजजन्मनोऽद्धा साफल्यमेव मनुते भुवि रङ्गशर्मा ॥८॥

गुरुवन्दनम् ।

रघूत्तंसमन्तः सदा चिन्तयन्तं सुतत्त्वोपदेशैर्जनानुद्धरन्तम् ।
लसच्छङ्खचक्रादिमुद्रं यतीन्द्रं भजेऽहं मुदा तं सदा मध्वराजम् ॥१॥
तत्त्वं प्रदर्श्य विदुषो भगवन्महिम्नोऽसूयायते कृतिरियं न करोति किञ्चित् ।
पूर्णेन्दुना निजकरैस्तमसि प्रणुन्ने सर्वे मुदं सपदि यान्ति न चक्रवाकाः ॥२॥
यदाज्ञां शिरसा धृत्वा मयेदं साहसं कृतम् ।
श्रीसत्यध्यानतीर्थाख्यांस्तान् वन्देऽहमभीक्ष्णशः ॥३॥

मिस् रुबेन यांना मुलींचा निरोप

विद्वत्ता, सुगुणज्ञता, रसिकता, सद्वृत्तिशालीनता
ह्या गेल्या विधिच्या समीप; म्हणती, आम्ही मुली, तूं पिता ।
देईं बा सकला अम्हांसि बसण्या तूं एक जागा भली
मोदें यास्तव ही रुबेन विधिनें हो निर्मिली माउली ॥१॥

आम्ही अज्ञ मुली न ठाऊक अम्हा जें शास्त्र कर्तव्य तें
ऐसें जाणुनि आमुचे कुलपती झाले विधी प्रार्थिते ।
या कन्या चतुरा करी आशि विभो अध्यापिका दे भली
मोदें यास्तव ही रुबेन विधिनें निर्दोष आम्हां दिली ॥२॥

विद्यादेवि सरस्वती म्हणुनि जी स्वर्गांत हो गाजली
किंवा भूवलयीं महागुणि अहिल्याबाइ जी जाहली ।
ईशा दाविं अम्हा तशीच म्हणुनी संप्रार्थिती या मुली
मोदे यास्तव ही रुबेन विधिनें आम्हांस हो दाविली ॥३॥

भाषा स्वल्प, अनल्प ती कृति, घडे ऐसें न कोठें दिसे
भाषा फार, कृती न अल्पहि, घडे ऐसें जगीं या दिसे ।
हें जाणोनि अम्हांस बोध करण्या विश्वंभरें भूतलीं
मोदें त्या विधिनें रुबेन कृतिचा ठेवाच ही दाविली ॥४॥

गेलों दूर अम्ही कितीहि क्रमितां संसारमार्गा जरी ॥
नाहीं विस्मरणार अज्ञ मुलि या तुम्हीं कधीं अंतरीं ॥
हें जाणूनि सदैव प्रेमलतिका जी वाढली चांगली ॥
ती सिंचा स्मृतिच्या जलें विनवितों जोडोनियां अंजली ॥५॥

हुजुरपागेच्या वर्षदिनप्रसंगीं

अहा ही विश्वेशा ललितमधुरा सृष्टिरचना ।
तुवां कैशी केली नच समजतें हें बुधजनां ॥
नभीं तारे सारे फिरति निजकक्षेंत नियमें ।
विलोकूनी ऐसें बहु मम मना कौतुक गमे ॥१॥

त्रिखंडीं या राजे नच भरतखंडासम दुजे ।
पहा सिंधू गंगा हिमगिरि मना तोषविति जे ॥
अहो ज्यांनीं केले अतुल मतिनें पंडितजन ।
असे येथें व्यासादिक मुनि पहा घेति जनन ॥२॥

तयांच्या सद्वंशा गमति जगिं या भूषण असे ।
महात्मे जे त्यांहीं श्रम करूनियां स्थापित असे ॥
कुमारींची शाळा गुणगणविशाला नगरिं या ।
तियेच्या या वर्धापनदिनिं करूं वंदन तयां ॥३॥

नांदोत बाला भुवि भाग्यवंत । मोदोत ते सर्वहि साधुसंत ॥
सरस्वती श्री बहु वृद्धि लाहो । ईशा असें प्रार्थुनि मागताहों ॥४॥

पंचम श्रेणी

कोणी स्वस्थ बसूनियां परिसती, कोणी हळू बोलती ।
कोणी गुर्गुरती, दुधाजवळि त्या भाटया जणूं भांडती ॥
त्रासोनि कुणि त्याच त्याच करिती प्रश्नासि, कंटाळती ।
कोणी वाचति शिक्षका न कळतां कादंबऱ्या त्या किती ॥१॥
कोणी प्रश्न विचारतांचि धरती स्तंभापरि स्तब्धता ।
केला प्रश्न दुजीस, त्यास कथुनी मध्येंच वाचालता ॥
दावूनी बहु हासती, कुणि अहो भल्तेंच कीं सांगती ।
थोडें शिक्षक बोलतांच अणिती नेत्रांस पाणी किती ॥२॥
कोणी योग्य सदुत्तरा वदुनिया नम्रांतरें दाविती ।
कोणी संस्कृतिप्रेम दावुनि अहो चित्तासि आल्हादिती ॥
ऐशी पंचमश्रेणिका बघुनियां संतोष हा वाटतो ।
ईशा सिद्धि मुलींस देइं म्हणुनी आम्ही सदा प्रार्थितों ॥३॥

U
332